ई/326

# इंग्लंडचा इतिहास


Rewarded No 49

## भाग पहिला

F
19

गोविंद अनंत मोडक बी. ए.

60.4


ब्रिटिश बेटें
अ ट लां टि क
म हा सा ग र
उ त्त र
स मु द्र
आ य रि श
स मु द्र
ग्लासगो
एडिंबरो
पर्थ
डंडी
किलीक्रँकी
बेलफास्ट
आइल ऑफ मॅन
न्यूकासल
कार्लाइल
लिव्हरपूल
मँचेस्टर
लीड्स
यॉर्क
हल
शेफील्ड
लिंकन
नॉटिंगहॅम
डर्बी
लीस्टर
बर्मिंगहॅम
श्रूसबरी
डब्लिन
लिमरिक
कॉर्क
कार्डिफ
ब्रिस्टल
ऑक्सफर्ड
लंडन
केंब्रिज
कॅंटरबरी
डोव्हर
एक्झीटर
आइल ऑफ वाइट
प्लिमथ
लँड्स एंड
चॅनल बेटें
POONA LIT

Received on 14-4-24
R. No 2
1921-22

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते
—गीता

इ/३२६
No 492

# इंग्लंडचा इतिहास

भाग पहिला

रोमन विजयापासून पुनरागमनापर्यंत

खि. पू. ५५–इ. स. १६६०

लेखक
गोविंद अनंत मोडक, बी. ए.

प्रकाशक
लक्ष्मण नारायण गोडबोले
बुकसेलर, बुधवार चौक, पुणें.

मुद्रकः—केशव रावजी गोंधळेकर,
'जगद्धितेच्छु प्रेस,' ५०७ शनिवार, पुणें.

प्रथमावृत्ति–१९२०.

किंमत एक रुपाया.

# अनुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ. |
| --- | --- |
| १ विषयप्रवेश. | १ |
| २ रोमनांनीं ब्रिटन जिंकले! | ७ |
| ३ ब्रिटनचें इंग्लंड झालें! | १३ |
| ४ डेन लोकांच्या स्वाऱ्या. | २१ |
| ५ नॉर्मन वुइल्यम विजयी झाला. | २७ |
| ६ दुसऱ्या हेन्रीची चोख व्यवस्था. | ३६ |
| ७ खिस्ती धर्मयुद्धें १०९६–१२९१. | ४७ |
| ८ मोठी सनद ( मॅग्ना चार्टा ) इ. स. १२१५ | ५३ |
| ९ पार्लमेंटचा उदय | ६० |
| १० स्कॉटलंड जिंकण्याचा प्रयत्न | ६८ |
| ११ शतसांवत्सरिक युद्ध | ७३ |
| १२ लोकस्थिति | ८२ |
| १३ यादवी १४५५–१४८५ | ९० |
| १४ नवयुगास आरंभ | ९७ |
| १५ सरदार शमले व राजाला नमले | १०५ |
| १६ वूल्सेची कर्तबगारी | १११ |
| १७ धर्म–सुधारणा | ११६ |
| १८ आठव्या हेन्रीची दडपशाही | १२० |
| १९ इंग्लंडांत प्रॉटेस्टंट मताचा स्वीकार | १२६ |
| २० क्याथॉलिक मताची पुन्हा स्थापना | १३० |
| २१ प्रॉटेस्टंट पंथ पक्का रुजला | १३४ |
| २२ क्याथॉलिकांचें कारस्थान | १३८ |
| २३ समुद्रावर इंग्लंडचा जयजयकार!! १५८७ | १४२ |
| २४ राजा हा ईश्वरी अंश आहे! | १४७ |
| २५ राजा व पार्लमेंट | १५२ |
| २६ तंटा चालू राहिला | १६० |
| २७ सुलतानी अंमल | १६५ |
| २८ सुलतानीचा कळस | १७१ |
| २९ लॉंग पार्लमेंट भरली ( १६४० ) | १७६ |
| ३० हातघाईवर आले! | १८१ |
| ३१ राजाशीं युद्ध | १८६ |
| ३२ पार्लमेंटची सरशी | १९३ |
| ३३ लोकसत्ताक राज्य–बंडांचा मोड | १९६ |
| ३४ क्रॉम्वेलचा कारभार | २०२ |
| परिशिष्ट | |
| १ सनावली | १–५ |
| २ वाचनीय पुस्तकें | १–३ |

# प्रस्तावना.

१ दुय्यम शाळांत शिक्षणाचें माध्यम (Medium of Instruction) मराठी असावें हा सिद्धांत आतां बहुतेक सर्व विद्वानांस मान्य झाला आहे. माध्यम मराठी असावें या मतास विरोध करणारांच्या अस्त्रागारांतील एक महत्त्वाचें अस्त्र म्हटलें म्हणजे मराठींतील क्रमिक पुस्तकांचा अभाव हें होय. इतिहास मराठींतून शिकवावा ही गोष्ट हे लोक कबूल करतात, पण मराठी पुस्तक नाहीं सबब ही सुधारणा नको असें म्हणतात. वास्तविक पुस्तकें नसलीं तर एकदां तत्त्व मान्य झाल्यावर तीं तयार केलीं पाहिजेत याची जबाबदारी शिक्षणाचा अभिमान बाळगणारांवर येते ही गोष्ट मात्र ते विसरतात. तें कांहींही असो. इंग्लंडचा इतिहास मराठींतून शिकवितांना योग्य मराठी पुस्तकाच्या अभावामुळें बराच त्रास पडतो व मराठी माध्यम करण्याचें फल पुरतें हातीं पडत नाहीं असा अनुभव आहे. तेव्हां मराठी पुस्तक असण्याची अवश्यकता सिद्ध आहे. या पुस्तकानें ही उणीव भरून निघेल असा भरंवसा आहे. पुस्तकाचा पहिला भाग आतां प्रसिद्ध होत आहे. दुसरा भाग कांहीं महिन्यांनीं प्रसिद्ध होऊन पुस्तक पुरें होईल.

२ इतिहासलेखनाच्या दोन पद्धति असतात; एक वर्णनपर व दुसरी कार्यकारणसंबद्ध. सात आठ वर्षांच्या मुलांची कल्पनाशक्ति जोरदार असते; पण कालस्थलांची त्यांची कल्पना अगदीं संकुचित असते; त्यामुळें त्यांच्याकरितां योग्य इतिहास म्हणजे थोर पुरुषांचीं व रमणीय प्रसंगांचीं वर्णनें करणाऱ्या चटकदार गोष्टीच होत. परंतु दहा वर्षांनंतर मुलांच्या मनास अधिक प्रौढता येते, जोरदार कल्पनेबरोबर त्यांच्या तर्कशक्तीचा विकास झालेला असतो व कालस्थलांचें त्यांचें ज्ञानही सुव्यवस्थित होण्याच्या मार्गांत असतें. अशा स्थितींत मुलांचे हातीं जे इतिहास द्यावयाचे त्यांची कार्यकारणसंबंधास प्राधान्य देऊन रचना करणें अवश्य

होतें; केवळ एका 'वृत्तांतामागून दुसरा वृत्तांत व राजामागून राजा' या पद्धतीनें इतिहास न लिहितां वृत्तांतांमध्यें कार्यकारणसंबंध काय, निरनिराळ्या वृत्तांतांची जुळणी कोणत्या एका आकांक्षेनें लागते, ती आकांक्षा कां उत्पन्न झाली व तिची पूर्तता कशी झाली आणि तिच्यांतून दुसरी कोणती आकांक्षा निघाली, या विवेचनात्मक पद्धतीचाच अवलंब करावा लागतो. या दृष्टीनें विचार करूं लागलें म्हणजे एकाद्या युद्धाचें महत्त्व त्यांत भाग घेणाऱ्या माणसांची संख्या अगर त्यावर झालेला खर्च यांत नसून तें युद्ध कां झालें व त्याचे परिणाम काय झाले यावरूनच ठरवावयाचें असतें. इतिहास म्हणजे केवळ स्मरणशक्तीचा विषय होय या भ्रमाचाही या पद्धतीनें निरास होऊन त्याचें अध्ययन करितांना तर्कशक्ति व विचारशक्ति यांचा पदोपदीं उपयोग केल्याशिवाय खरें इतिहासज्ञान होणें कसें दुरापास्त आहे हें कळून येतें. या कार्यकारणप्रधान पद्धतीचा या पुस्तकांत अवलंब केला असून प्रत्येक युगांत ( Period ) जी महत्त्वाची आकांक्षा असेल तिच्या अनुरोधानें त्यांतील वृत्तांतांची जुळणी केली आहे. त्यामुळें पुस्तक कंटाळवाणें होणार नाहीं व विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीस चेतना मिळून विद्यार्थी वृत्तांचा केवळ 'भारवाहक' होणार नाहीं, अशी आशा आहे.

३ अलीकडे दुय्यम शाळांतून चौथ्या व पांचव्या इयत्तांमध्यें इंग्लंडचा इतिहास मराठींतून शिकविण्याचा उपक्रम झाला आहे. परंतु क्रमिक पुस्तक मराठींत नसल्यामुळें तसें करणें बरेच गैरसोईचें होतें. या पुस्तकाचा उपयोग त्या इयत्तांतून केला तर ही गैरसोय दूर होईल. शिवाय ट्रेनिंग कॉलेजमधूनही त्याचा उपयोग करतां येईल. पुस्तकाची रचना केवळ 'जंत्रीवजा' केली नसल्यानें सामान्य वाचकांसही इंग्लंडच्या इतिहासाची माहिती करून घेण्यास तें उपयोगीं पडेल असा भरंवसा आहे.

४ या पुस्तकांतील माहिती मुख्यतः जे ग्रंथ वाचून मीं मिळविली त्या आधारभूत ग्रंथांची यादी येणेंप्रमाणें.

1 Essentials of English History by Walker ( American Book Company ).
2 The Leading Facts of English History by D. H. Montgomery.
3 Short History of the British People by J. R. Green.
4 Short History of the British Empire, Anderson and Marsden.
5 English Political Institutions by J A. R. Marriott
6 History of the British Gonstilution by Howard Masterman.

५ या पुस्तकांत ज्या टिपा दिल्या आहेत त्या दोन प्रकारच्या आहेत; एक स्पष्टीकरणार्थ व दुसऱ्या अधिक माहिती देण्याकरितां. दुसऱ्या प्रकारच्या टिपा पहिल्या वाचनाच्या वेळीं गाळल्या तरी चालतील. विद्यार्थ्यांनीं केवळ एका पुस्तकाचा उपयोग करावा ही पद्धति चुकीची होय. त्यांनीं इतर ग्रंथ वाचून आपली जिज्ञासा तृप्त करावी, आपल्या इतिहासज्ञानांत भर घालावी व शोधकबुद्धी जागृत ठेवून तिचा उपयोग करण्यास शिकावें, या गोष्टीचें महत्त्व जाणून या पुस्तकास 'वाचनीय पुस्तकांची याद' जोडिली आहे. शिवाय ब्रिटिश बेटांचा नकाशा व सनावली घातलीं आहेत; ज्ञान व्यवस्थित व सुस्पष्ट करण्याच्या कामीं त्यांचा उपयोग होईल.

पुणें, आश्विन वद्य पंचमी सोमवार शके १८४२ } गोविंद अनंत मोडक.

# शुद्धिपत्र.

कोठें कोठें अनुस्वारांच्या व काने मात्रा उडून चुका झाल्या आहेत; त्या सहज समजण्यासारख्या असल्यामुळें शुद्धिपत्रांत त्यांचा अन्तर्भाव केला नाहीं.

| पृ. | ओ. | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५ | १५ | समुद्रवयांकित | समुद्रवलयांकित |
| ८ | १५ | ऑँगल्सी | अँगल्सी |
| १० | २७ | उत्तर | सत्तर |
| २८ | २० | डयू | ड्यू |
| ३६ | २२ | १८४५ | १४८५ |
| ५८ | १३ | यातायत | यातायात |
| ६२ | ५ | सांगितले | सांगितलेला |
| ६५ | १० | उतन्ना | उत्पन्ना |
| ७० | २१ व २२ | स्टालिंग | स्टर्लिंग |
| ७२ | २७ | या | हा |
| ७४ | २५ | ऑट्वीड | ऑन् ट्वीड |
| ८० | २७ | बोव्हेनचा | बोव्हेचा |
| ९३ | २० | एलिझावेथ | एलिझबेथ |
| ९५ | १५ | सद् | सद |
| ९९ | २० | ब र | बंदर |
| १०५ | १८ | धर्मयुद्धांत | धर्मयुद्धांत व |
| १५३ | २५ | १८७८ | १८६८ |

# इंग्लंडचा इतिहास.

## विषयप्रवेश.

**१ इंग्लंडचा इतिहास कां शिकावा**---आज जगांत जीं सुधारलेलीं राष्ट्रें म्हणून गाजत आहेत, त्यांमधील पहिल्या प्रतीच्या राष्ट्रांत इंग्लंड या राष्ट्राची गणना आहे. अशा उच्च पदावर आरूढ झालेल्या अर्वाचीन राष्ट्राचा इतिहास कोणासही मनोरंजक व बोधप्रदच होणार; तरी पण हिंदुस्थानच्या लोकांस तो इतिहास माहीत असावा असें म्हणण्यास वर सांगितलेल्या कारणापेक्षां बलवत्तर कारणें आहेत. एक तर दैववशात् हिंदुस्थान देश जवळ जवळ शंभर वर्षांपूर्वींपासून इंग्लंडच्या ताब्यांत आहे व इंग्रज लोक हे हिंदुस्थानचे विद्यमान राज्यकर्ते आहेत. तेव्हां अर्थातच राज्यकर्त्या इंग्रजांची पूर्वींची स्थिति काय होती, त्यांच्या देशांत कोणत्या निरनिराळ्या चळवळी झाल्या व त्यांच्या स्वभावांत विशेष गुण कोणते व ते कसे उत्पन्न झाले इत्यादि वृत्तान्त कळणें हिंदुस्थानांतील नागरिकांस अत्यंत अवश्यक झालें आहे. दुसरें कारण असें कीं, हिंदुस्थानावर इंग्रजांचा केवळ राजकीय अंमलच बसला आहे असें नसून राजकीय बाबीप्रमाणें सांपत्तिक व विद्याविषयक बाबतींतहीं इंग्लंडचे आम्ही अंकित झालों आहों, इतकेंच काय पण सामाजिक बाबतींतहीं इंग्लंडचें अनुकरण करण्याकडे बऱ्याच लोकांचा ओढा दिसून येतो. अठराव्या शतकांत मराठी साम्राज्याचा सर्व हिंदुस्थानावर विस्तार झाला तत्पूर्वीं हा देश परकीय मुसलमानांच्या अंमलाखालीं गेला होता, पण आचवृत्तीनें

मुसलमान त्या वेळच्या हिंदूंपेक्षां कडवे असले तरी त्यांची एकंदर सुधारणा मागसलेली असल्यामुळें मुसलमानांच्या राज्यांत व्यापार, उद्योगधंदे व विद्याकला हिंदूंच्याच कायम राहिल्या. आज तशी स्थिति नाहीं. विद्याकला तसेंच व्यापार व उद्योगधंदे या सर्व बाबतींत इंग्लंडचें हिंदुस्थानावर वर्चस्व आहे. तेव्हां या स्थितीचा उलगडा होण्यासाठीं इंग्लंडचा इतिहास माहीत असणें अधिकच अवश्यक ठरतें.

**२ लोक-सत्ताक राज्यपद्धति**--आतां इंग्लिश राष्ट्राच्या इतिहासाचें ज्ञान करून घेण्याचें सर्वांत बलवत्तर कारण म्हटलें म्हणजे तेराव्या शतकापासून आपल्या राजाशीं झगडून इंग्लिश लोकांनीं लोकसत्ताक राज्यपद्धतीची आपल्या देशांत स्थापना केली हें होय. इतरही देशांत लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापण्यांत आलेली असून बहुतेक सर्व सुधारलेल्या देशांत आज तीच पद्धति अंमलांत आहे. कोणत्याही देशांतील राज्यकारभार सुव्यवस्थित चालावयाचा म्हटला कीं, त्यांत लोकसत्ताक राज्यपद्धतिच स्थापन करण्यांत आली पाहिजे असें हल्लींच्या काळचें महत्त्वाचें सूत्र होऊन बसलें आहे. प्राचीन काळीं हिंदुस्थानांतही महत्त्वाचा प्रश्न निघाला असतां राजानें प्रतिष्ठित नागरिकांची सभा भरवावयाची व तिच्या मताप्रमाणें वर्तन करावयाचें अशी पद्धति असे. प्राचीन ग्रीस व रोम या राष्ट्रांतून लोकसत्ताक पद्धतीच अंमलांत होती. परंतु तीं राष्ट्रें अगदीं लहान असून एकएका शहराचीं बनलेलीं असत, त्यावरून त्यांस नगर-संस्थानें (City states) म्हणतात. त्यामुळें वयांत आलेले सर्व पुरुष त्यांच्या राजकीय सभांना (पार्लमेंट) हजर रहात. हल्लीं एक एक राष्ट्र म्हणजे त्यांत शेंकडों शहरें व कोट्यवधि लोक असतात. अशा वेळीं देशांतील वयांत आलेल्या सर्व लोकांनीं मिळून राज्य चालवावयाचें म्हटलें तर अशक्य होईल. या परिस्थितींत योग्य मार्ग म्हटला म्हणजे देशांतील लोकांनीं निवडून आपले प्रतिनिधि राजधानीच्या शहरीं पाठवावयाचे व त्यांच्या हुकमतीनें राज्यकारभार चालवावयाचा हाच होय. हें निवडणुकीचें तत्त्व हल्लींच्या सुधारलेल्या राष्ट्रांतून इतकें मुरून गेलेलें आहे कीं, राष्ट्रांतील सर्व प्रौढ नागरिक लोकसभेंत काम करण्यासाठीं आपला प्रति-

निधि निवडून देण्याचा आपल्याला जन्मसिद्ध हक्क आहे असें समजतात. येणेंप्रमाणें अर्वाचीन काळीं इतर सुधारलेल्या देशांप्रमाणें लोकसत्ताक पद्धति इंग्लंडांत परिणत दशेस पोंचली आहे. तेव्हां ती इंग्लंडांत कशी रुजली व तिची त्या देशांत वाढ होऊन तिला आजचें परिणत रूप कसें प्राप्त झालें याचा वृत्तान्त जर आपण समजून घेतला व त्यापासून योग्य तो बोध घेतला तर आपला फायदा झाल्यावांचून राहणार नाहीं.

**३ देशस्वरूप**---कोणत्याही राष्ट्राच्या इतिहासावर त्याच्या भूविषयक परिस्थितीचा ठसा उमटलेला असतो, तेव्हां पहिल्यानें आपण ब्रिटिश बेटांची–विशेषतः इंग्लंडची–भूरचना, हवापाणी व स्थानमाहात्म्य काय आहे हें पाहूं. ब्रिटिश बेटांचें क्षेत्रफळ जवळ जवळ सव्वा लाख चौरस मैल असून सरासरीनें तें मुंबई इलाख्याच्या क्षेत्रफळाइतकें आहे. फक्त इंग्लंडचें क्षेत्रफळ ५०,००० चौरस मैल आहे. समुद्राजवळ भूमीचा आकार दंतुर अगर नागमोडीचा झाला म्हणजे देशाच्या क्षेत्रफळाच्या मानानें समुद्रकिनारा वाढतो. या नियमास अनुसरूनच आफ्रिका खंडापेक्षां युरोप खंडाला समुद्रकिनारा फार जास्त आहे. युरोप खंडाच्या क्षेत्रफळांशीं किनाऱ्याचें प्रमाण २०० चौरस मैल क्षेत्रफळास एक मैल समुद्रकिनारा असें पडतें तर ब्रिटिश बेटांच्या समुद्रकिनाऱ्याचे त्यांच्या क्षेत्रफळाशीं प्रमाण त्याच्या दहापट आहे. दंतुर समुद्रकिनाऱ्याच्या रचनेनें देशांतील लोक दर्यावर्दी बनण्यास जशी मदत झाली त्याचप्रमाणें देशांत अत्यंत उंच पर्वत नसल्यानें आंतील दळणवळण सुकर झालें. इंग्लंडांत पर्वताचें अत्यंत उंच शिखर म्हणजे स्काफेल हें असून त्याची समुद्रकिनाऱ्यापासून उंची ३२१० फूट आहे. इंग्लंड व स्कॉटलंड यांच्यामध्यें चेव्हियट डोंगर आहे; व या चेव्हियट डोंगरापासून निघून पेनाईन डोंगरांची रांग दक्षिणोत्तर अशी इंग्लंडच्या मध्यापर्यंत आलेली आहे व वेल्समध्यें दक्षिणेकडेही पश्चिमेच्या बाजूस डोंगर आहेत. इंग्लंडच्या वायव्य भागांत चेव्हियट डोंगर व पेनाईन डोंगर या दोहोंच्या सांनिध्यानें जो डोंगराळ मुलूख वेस्टमूरलंड व कंबरलंड या परगण्यांत येतो त्यांत इतकीं सरोवरें आहेत कीं, त्यास सरोवरांचा मुलुख असें नांव

पडलें आहे. या प्रदेशांत सृष्टि–सौंदर्याचे देखावे प्रेक्षणीय आहेत. पण वेल्समधील व दक्षिणेकडील डोंगराळ मुलुखाची स्थिति मात्र तशी नाहीं. या डोंगरांच्या पश्चिमेकडे समुद्र–किनारा जवळच असल्यामुळें प्रदेश सखल नसून बराच उतरता आहे. पूर्वेकडे मात्र सपाट व सखल मैदानें आहेत. याचा परिणाम असा झाला आहे कीं, पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्या जोरानें वाहतात व पूर्वेकडील नद्यांचें पाणी संथ असतें. पूर्वेकडे थेम्स, वॉश व हंबर या तीन मोठ्या नद्या असून थेम्सची लांबी २१५ मैल आहे. पश्चिमेच्या बाजूस सेव्हर्न ही नदी मोठी आहे. त्याचप्रमाणें डी व मर्सी या सेव्हर्नच्या उत्तरेकडील छोट्या नद्या, त्यांचीं मुखें खाडी-सारखीं असल्यामुळें महत्त्वाच्या आहेत. स्कॉटलंडचा उत्तरेकडील भाग डोंगराळ असून त्याला हायलंड्स ( उंच प्रदेश ) म्हणतात. हीं हायलंड्स व चेव्हियट डोंगर यांच्यामध्यें लोलंड्स ( सखल प्रदेश ) पसरलेलीं आहेत. आयर्लंडांत फारसे डोंगरच नाहींत; त्यामुळें नौकागमनास उपयोगी अशा नद्या त्या देशांत नाहींत व देशांत पडलेल्या पावसाच्या पाण्याचा निकालही बरोबर होत नाहीं.

**४ हवामान**——या देशस्वरूपाचा हवापाण्यावर परिणाम झाल्याशिवाय राहिलेला नाहीं. अॅटलँटिक महासागरावरून जे उष्ण व सर्द वारे वाहतात ते इंग्लंडच्या पश्चिमेकडील डोंगरांच्या रांगांवर आदळतात व तेथून पुढें जाण्यास त्यांना मज्जाव होतो. यामुळें पूर्व इंग्लंडची व स्कॉटलंडची हवा दमट नाहीं. परंतु आयर्लंडास मात्र असें संरक्षण नसल्यामुळें तेथील हवा फार दमट झाली आहे. त्याचप्रमाणें याच कारणामुळें आयर्लंडांत व पश्चिम इंग्लंडांत पावसाचें वार्षिक मान ४० इंच आहे तर पूर्व इंग्लंडांत तें अवघें २५ इंच आहे. याकरितां शेतकीला काय किंवा इतर उद्योगांना काय पूर्व इंग्लंड हा समशीतोष्ण हवामानाचा प्रदेश सर्वस्वीं अनुकूल झालेला आहे. पश्चिम इंग्लंडांत फार पाऊस पडत असल्यामुळें व प्रदेश उतरता असल्यानें नद्यांचे प्रवाह जोरानें वाहतात. या जोरानें वाहणाऱ्या प्रवाहांच्या वेगाचा उपयोग करून इंग्लंडांतील खनिज द्रव्यें व शेतांतून पैदा होणारा कच्चा माल यांचा पक्का माल

तयार करितां येत आहे. हा डोंगराळ प्रदेश समुद्र–किनाऱ्यानें ठिकठिकाणीं पोखरला जाऊन व्यापारास अत्यंत सोईस्कर अशीं ब्रिस्टल, लिव्हरपूल यासारखीं बंदरें बनलीं आहेत. त्याचप्रमाणें विषुव-वृत्तापासून ध्रुवाकडे जे उष्ण जलप्रवाह समुद्राच्या पृष्ठभागाशीं वाहतात त्यांपैकीं एक प्रवाह ब्रिटनच्या किनाऱ्यावर येऊन आदळतो; त्यामुळें ब्रिटन देशाच्या सम अक्षांशावर असलेल्या इतर देशांपेक्षां ब्रिटनची हवा कमी थंड झाली आहे.

**५ बेट असल्यामुळें फायदे**—इंग्लंड, वेल्स व स्कॉटलंड म्हणजे ग्रेट ब्रिटन व आयर्लंड हीं मिळून ब्रिटिश बेटें होतात. हा देश युरोपच्या पश्चिमेस जवळ असला तरी चोहों बाजूंनीं समुद्रानें वेढलेला अतएव युरोपपासून भूरचनेच्या दृष्टीनें स्वतंत्र आहे. भूगर्भ शास्त्रवेत्ते असें म्हणतात कीं, अति प्राचीनकाळीं युरोपखंड व इंग्लंड ही एकाशीं एक जोडलेलीं असावीं. तथापि ज्याचा इतिहास ठाऊक आहे अशा काळांत तरी असें असल्याचा केव्हांचाच दाखला मिळत नाहीं. तेव्हां त्या काळाच्या आरंभापासून ग्रेट ब्रिटन हा देश समुद्रवलयांकित आहे, असें धरून चालण्यास हरकत नाहीं. या परिस्थितीमुळें जरी निरनिराळ्या देशांतील लोक इंग्लंडांत आले तरी प्राचीनकाळीं फारसें दळणवळण शक्य नसल्यामुळें इंग्लंडांत राहणाऱ्या लोकांची रहाणी व सुधारणा युरोपांतील सुधारणेची केवळ नक्कल न होतां तींत इंग्लंडचें वैशिष्ट्य उद्भूत झालें; व युरोपाशीं जारीनें संसर्ग सुरू झाल्यानंतर देखील इंग्लंडला आपल्या समुद्रवलयांकितत्वाचा फायदा मिळाल्याशिवाय राहिला नाहीं. युरोपांत परस्परांचे देश जिंकण्यासाठीं दोघां राजांचे युद्ध सुरू झालें कीं प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें सर्व युरोप त्यांत सामील होऊन सर्व खंडभर दंगल माजे. परंतु इंग्लंडचें समुद्रवलयांकित स्वरूप त्यास अनुकूल झालें. युरोपची भांडणें युरोपांतील राष्ट्रांस खुशाल भांडू देऊन इंग्लिश लोकांनीं आपली राज्यपद्धति सुधारण्याचा जो उपक्रम केला व जो उद्योग त्यांनीं अव्याहत दोन तीन शतकें चालविला, तो ब्रिटिश बेटें समुद्रवलयांकित नसतीं तर त्यांना करतां आला असता असें म्हणवत नाहीं

६ **इंग्लंडचें पुढारीपण**—इंग्लंडच्या नैर्ऋत्य टोंकापेक्षां आग्नेय टोंकच युरोपला अधिक जवळ आहे. त्यामुळें पहिल्यानें युरोपांतून वस्ती करण्याकरितां जे लोक आले ते या आग्नेय टोंकावरच आल्याचें आढळून येतें. त्याचप्रमाणें इंग्लंडच्या आंत प्रवेश करण्यास उत्तम साधन अशी जी थेम्स नदी ती याच टोंकाजवळ उत्तर समुद्रास मिळते. तेव्हां थेम्स नदीच्या मुखाजवळ वसलेल्या लंडन शहरास व्यापाराच्या दळणवळणाच्या दृष्टीनें अगदीं स्वाभाविकपणें सर्व इंग्लंडांत अग्रेसरत्व आलें. युरोपमधील लोकांची इंग्लंडवर स्वारी व्हावयाची म्हटली अगर युरोपियन लोकांशीं दळणवळण होऊन त्यांच्यांतील सुधारणेचा इंग्लंडांत प्रसार व्हावयाचा म्हटला तरी दक्षिण—पूर्व भागांतूनच तो व्हावयाचा असल्यामुळें, शत्रूशीं टक्कर देण्याचें जोखमीचें काम अगर परकीयांची सुधारणा देशांत प्रसृत करण्याचा उद्योग या दक्षिण—पूर्व भागांतील लोकांच्या वांट्यास आला व साहजिकपणेंच इंग्लिश राष्ट्राचें पुढारीपण त्यांस प्राप्त झालें मध्य युगांत व अर्वाचीन काळीं राजसत्तेवर आळा घालण्यांत येऊन लोकसत्ताक राज्याचीं गोड फळें इंग्लिश लोकांस चाखावयास मिळालीं, यासही या दक्षिण—पूर्व भागांतील लोकांचे परिश्रमच विशेष कारणीभूत झाले आहेत असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून उद्योगधंद्याकडे इंग्लंडांतील लोकांचें लक्ष विशेष लागलें, व तेव्हांपासून उद्योगधंद्यास अनुकूल साधनें ज्यांत आहेत अशा इंग्लंडच्या मध्य व उत्तर भागांतील लोकवस्ती एकसारखी वाढत आहे. मध्य इंग्लंडांत लोखंडाच्या व दगडी कोळशाच्या खाणी विपुल असून लोखंडाचीं यंत्रें करण्याच्या कारखान्यांचें तेथें केंद्र बनून गेलें आहे. त्याचप्रमाणें वायव्येकडच्या लँकेशायर परगण्याची हवा दमट असून लिव्हरपूलसारख्या उत्तम बंदराची सोय असल्यानें, कापसाचें सूत काढावयाचें व कापड बनविण्याचे कारखाने फारच मोठ्या प्रमाणावर तेथें चालू झाले आहेत. दमट हवेमुळें सुताचा धागा तुटण्याची भीति नसते व बंदराच्या सोयीमुळें परदेशांतून कापूस आणण्यास व पक्का माल परदेशीं पाठविण्यास फारच सोईचें झालें आहे. शिक्षण, राजकारण व ऐतिहासिक परंपरा या दृष्टींनीं

इंग्लंडचा दक्षिण भाग पुढें सरसावला असला व त्यांतील लंडन शहरांतील लोकसंख्या सत्तर लक्ष असून इंग्लंडच्या लोकसंख्येच्या पंचमांश लोक त्या एका शहरांत रहात असले तरी उद्योगधंद्याच्या आश्चर्यकारक प्रगतीमुळें उत्तर भागाचें महत्त्व वाढत्या प्रमाणांत असून उत्तरोत्तर तें जास्तच वाढत जाईल असा रंग दिसतो.

---

# २ रोमनांनीं ब्रिटन जिंकलें !

१ स्वाऱ्यांचा काळ—इंग्लंड देश व युरोपखंडांतील इतर जवळच देश यांजमध्यें एक लहानशी खाडी आहे. प्राचीन काळीं इंग्लंड देशांतील लोक फारसे सुधारलेले नव्हते व त्यांच्याजवळ स्वसंरक्षणाचें आरमारासारखें कांहीं साधनही नव्हतें. त्यामुळें इंग्लंडवर प्राचीन काळापासून १०६६ पर्यंत एकसारख्या परकीय लोकांच्या स्वाऱ्या झाल्या. पहिल्यानें ब्रिटन लोकांची स्वारी इंग्लंडवर झाली. नंतर खि. पू. ५५ मध्यें रोमनांची स्वारी ब्रिटनवर झाली. त्यानंतर सॅक्सन, डेन व शेवटीं १०६६ त नॉर्मन या लोकांनीं लागोपाठ त्या देशावर हल्ले केले व नंतर त्यांत वसाहत केली. १०६६ नंतर इंग्लंडवर कोणत्याही परकीय लोकांची स्वारी होऊन वसाहत झाली नाहीं; व आजचे इंग्रज लोक म्हणजे १०६६ पर्यंत स्वाऱ्या करून आलेले जे केल्ट, सॅक्सन, डेन व नॉर्मन त्या सर्वांचें मिश्रण होऊन झालेलें राष्ट्र होय. तेव्हां इंग्लंडच्या इतिहासाच्या १०६६ पर्यंतच्या भागास स्वाऱ्यांचा काळ म्हणणें युक्त होईल.

२ प्राचीन रहिवासी—इंग्लंड देशाचें प्राचीन नांव ब्रिटन हें होय. प्राचीन काळीं पूर्वेकडील लोकांवर परदेशांतील शूर लोकांचा ज्यास्त दाब पडून निरनिराळ्या जाति पश्चिमेकडे सरकत असलेल्या दिसून येतात. पहिल्यानें ब्रिटनमध्यें केल्टिक वंशाच्या दोन जातींचे लोक आले. पहिले गेल जातीचे असून दुसरे ब्रिटन होत. त्यांच्या मागून टयुटॉनिक वंशाचें

लोकांनीं गॉल[1]मधून हांकून लाविलेल्या बेल्जिक केल्ट लोकांच्याझुंडीच्या झुंडी ब्रिटनच्या किनाऱ्यावर येऊन उतरल्या. या तिन्ही जातींचे लोक मिळून ब्रिटनची प्राचीन लोकवस्ती बनली होती. उत्तरेच्या बाजूचे लोक अगदीं रानटी असून युद्धाचे वेळीं शरीर उग्र दिसण्यासाठीं वनस्पतीपासून निघालेल्या रंगांनीं तें रंगविण्याची त्यांच्यांत चाल पडली होती. रानांत आपोआप उगवलेल्या झाडांची कंदमुळें, फळें, शिकार व मासे यावरच त्यांची उपजीविका चालली असून मासे मारण्याकरितां झाडांच्या खांद्यांवर कातडीं ताणून ते आपल्या बोटी करीत. परंतु दक्षिणेकडील लोकांचा संबंध व्यापारद्वारां युरोपशीं होत असल्यामुळें ते जास्त सुधारले होते. ते कातड्याचे कपडे वापरीत असून मृगया वृत्तीबरोबर कृषिवृत्तिही त्यांनीं स्वीकारलेली होती. त्यांच्या निरनिराळ्या टोळ्या असून प्रत्येक टोळीवर अंमल चालविणारा नायकही त्यांच्यांत असे. टोळ्यांमध्यें नेहमीं तंटे चालत असून नायकांना युद्धाशिवाय दुसरें काम फारसें नसे. या लोकांत धर्मकल्पनांचा उदय झाला होता. त्यांचे " ड्रुइड " नांवाचे धर्मगुरु असून 'मोना' ( पश्चिम किनाऱ्यावरील ॲंगलसी ) या बेटांत त्यांचें मुख्य ठाणें होतें. नद्या, वृक्ष, प्राणी व सूर्य चंद्रादि आकाशांतील ज्योती यांची पूजा करण्यास त्यांनीं लोकांस शिकविलें होतें. त्यांच्यांत यज्ञ करण्याची चाल असून नरमेध सुद्धां प्रचलित होता. फ्रान्सच्या उत्तरेकडील ब्रिटनी प्रांतांतून जीं नाणीं येत त्यांच्या नमुन्यावर ब्रिटनमध्येंही ओबडधोबड नाणीं तयार करण्यांत येत, त्यांचा उपयोग व्यापारास होई; पण त्याबरोबरच अलंकार म्हणून धारण करण्यासही त्यांचा उपयोग करीत. खनिज पदार्थ काढण्याची विद्या या लोकांस अवगत असून लोखंड, कथील इत्यादि धातु येथून युरोपांत निर्गत होत असत.

**३ सीझरची स्वारी**–ब्रिटन अशा रीतीनें अर्धवट रानटी स्थितींत असतां रोमन लोकांचा प्रसिद्ध सेनापति सीझर यानें इसवी सनापूर्वीं ५५ व्या वर्षीं ब्रिटनवर स्वारी केली. इटलीमध्यें रोम हें प्रसिद्ध शहर असून

---

१ फ्रान्सचें प्राचीन नांव.

तेथील लोकांचे बहुतेक सर्व युरोप, आशिया खंडाचा पश्चिम भाग व आफ्रिकेचा उत्तर भाग या विस्तीर्ण प्रदेशावर साम्राज्य पसरलेलें होतें. गॉलमधील लोकांस नरम आणण्याच्या कामगिरीवर जुलिअस सीझर या प्रसिद्ध रोमन सेनापतीची नेमणूक झाली. तेव्हां त्यानें लवकरच गॉल देश पादाक्रांत केला. गॉलच्या उत्तरेकडे ब्रिटन बेट आहे व तेथील लोक आपले शत्रु गॉल यांस मदत करितात अशी बातमी सीझरला लागली; तेव्हां त्यानें गॉलमधील दंगे पुरे मोडिल्यावर ब्रिटनमध्यें उतरण्याचा निश्चय केला. ख्रि. पू. ५५ या सालीं सैन्याचीं दोन पथकें—सुमारें साडे सात हजार लोक—बरोबर घेऊन बोटींतून सीझर ब्रिटनच्या किनाऱ्यावर आला. ब्रिटनमधील लोकांनीं सीझरच्या सैन्यावर दगड व बाण यांचा वर्षाव केला. परंतु कवाईत व शिस्त यांचे बाळकडू मिळालेल्या लष्करापुढें त्यांचा कसा टिकाव लागणार ? इतक्यांत समुद्रांत वादळ होऊन रोमन लोकांच्या कांहीं बोटी बुडाल्या. तेव्हां हें संकट व आपलें थोडे सैन्य आहे, या बाबी लक्षांत घेऊन सीझर ब्रिटनांपासून शरणचिठ्ठी व कांहीं लोक ओलीस घेऊन थोड्याच दिवसांत फ्रान्सला परत गेला. पुढील सालीं ( ख्रि. पू. ५४ ) तो सैन्याचीं दहा पथकें, कांहीं घोडेस्वार व लढाऊ जहाजें घेऊन आला. तो थेम्स नदी उतरला व नंतर सगळें बेट पादाक्रान्त करून रोमन साम्राज्यास जोडून टाकण्याचा त्याचा विचार होता. परंतु दोन महिन्यांच्या आंतच रोममध्यें गडबड उडाल्यामुळें व गॉलमधील लोकांनीं दंगे आरंभिल्यामुळें सीझरला ब्रिटन जिंकण्याचें काम अर्धवट टाकून गॉलला परत जावें लागलें.

**४ रोमन अंमलाची स्थापना**—सीझरच्या स्वारीनंतर शंभर वर्षेपर्यंत ब्रिटनवर रोमनांची धाड मुळींच आली नाहीं. मध्यंतरी रोमची प्रजासत्ता बुडून तिच्या जागीं बादशाही अंमल चालू झाला. बादशहा क्लॉडियस यानें इ. स. ४३ सालीं ऑशिअस सेनापतीच्या हाताखालीं पन्नास हजार सैन्य देऊन त्याला ब्रिटनवर पाठविलें. त्यानें ब्रिटनचा दक्षिण भाग हस्तगत केला व पुढील सेनापतींनीं विजय मिळवून हंबर नदीपर्यंत साम्राज्याची हद्द नेऊन भिडविली. रोमन लोकांनीं ब्रिटनचा

पूर्व प्रदेश जिंकला तेव्हां कॅरॅडॉक नांवाचा एक शूर ब्रिटन नायक वेल्समध्यें गेला व तटबंदी करून एका टेकडीवर त्यानें आपलें ठाणें केलें. पुढें रोमन सेनापति जेव्हां त्याचा पाठलाग करीत तेथें आले, तेव्हां कॅरॅडॉकच्या लोकांनीं त्यांजवर दगड व बाण यांचा वर्षाव करण्यास सुरवात केली, परंतु रोमनांचें शिरस्त्राण, चिलखत व ढाली हीं बळकट असल्यामुळें रोमन सैनिकांवर या वर्षावाचा फारसा परिणाम झाला नाहीं. शिवाय रोमनांपाशीं भाले व तलवारी उत्तम असून लढाईचें शिक्षणही त्यांस यथास्थित मिळालेलें असे. ब्रिटनांना यांपैकीं कोणतीच गोष्ट अनुकूल नव्हती. त्यामुळें त्यांचा पुरा मोड झाला. तथापि सुदैवानें कॅरॅडॉक सुटला व उत्तरेकडे लपत छपत चालला. इतक्यांत त्याच्या सावत्र आईनें रोमन लोकांस त्याचें ठिकाण दाखवून दिल्यामुळें तो शत्रूच्या हातीं लागला ( इ. स. ५० ). रोमन सेनापति जेव्हां रोमला गेला तेव्हां जिंकलेल्या वस्तूंची रोम शहरांत जी मिरवणूक काढावयाची त्यांत त्यानें कॅरॅडॉक यासही चालविलें. रोमन बादशहासमोर जेव्हां कॅरॅडॉक यास उभें केलें तेव्हां तो म्हणाला " मजपाशीं माणसें, घोडे, शस्त्रें, संपत्ति हीं सर्व होतीं. तुमचा बंदीवान होण्यापेक्षां मी तुमचा मित्र होण्यास अधिक योग्य नाहीं काय ? आतां एवढेंच कीं, मी पराजित झालों व तुम्हाला जय आला. तुम्हीं जर माझे प्राण वांचविले तर तुमच्या यशांत भरच पडेल. " त्याच्या एकंदर चाल चालणुकीचा बादशहाच्या मनावर अनुकूल परिणाम झाला व असें म्हणतात कीं, बादशहानें त्यास उमराव करून रोमला ठेवून घेतलें ! इकडे रोमन लोकांच्या कडक राज्यपद्धतीस कंटाळून ब्रिटनच्या पूर्वेकडील लोकांनीं बंड उभारिलें. एका कर वसूल करणाऱ्या अंमलदारांस झिडकारल्याबद्दल ब्रिटन वीर स्त्री बोअडिसिआ हीस रोमन अधिकाऱ्यांनीं सर्व लोकांसमक्ष फटके मारले. तेव्हां तिचा क्रोध अनावर झाला. तिनें रोमन राज्याविरुद्ध हजारों ब्रिटनांस उठविलें व थेम्स नदीच्या उत्तरेकडी बहुतेक मुलूख परत मिळविला. या प्रसंगीं क्यामुलोडनम् हे रोमन लोकांचे ठाणें सर करण्यांत येऊन सुमारें उत्तर

हजारपर्यंत रोमन कापले गेले असे सांगतात! (इ. स. ६१) लवकरच रोमन सेनापति सुटोनियस यानें बंडाच्या मुलुखांत आपलें सैन्य नेलें, व ब्रिटन लोकांवर हल्ला चढविला. रोमन शिस्त, शौर्य व एकी यांचा लवकरच प्रभाव दिसून आला. ब्रिटनांची विस्कळित व आडमुठी फौज सैरावैरा धांवूं लागली. शेवटीं एक निकराची लढाई होऊन हजारों ब्रिटन मारले गेले व बंडाचा पुरा मोड झाला.

**५ रोमन राज्याची मर्यादा**--इ. स. ७८ पासून रोमन सेनापतींनीं उत्तरेकडे मुलूख वाढविण्यास सुरवात केली. शेवटीं १२१ त बादशहा हेड्रियन स्वतः ब्रिटनला आला. त्यानें सॉल्वे व टाइन नद्या यांस जोडणारी पट्टी हींच आपल्या राज्याची हद्द ठरविली व या सरहद्दीवर पूर्वेपासून पश्चिमेकडील समुद्रापर्यंत एक जंगी तट बांधिला. स्कॉटलंडांत त्या वेळीं केल्टिक वंशांतले पिक्ट लोक रहात असत. त्यांचा मुलूख जिंकण्याचा प्रयत्न पुढील रोमनांनीं केला. परंतु क्लाइड नदीच्या उत्तरेकडील मुलुखावर-बहुतेक स्कॉटलंड-रोमनांचा अंमल बसला नाहीं व रोमन साम्राज्य हेड्रियननें बांधलेल्या तटापर्यंतच्या मुलुखांतच राहिलें !

**६ रोमन अंमलाखालीं ब्रिटनची स्थिति**--रोमन लोक हे त्या वेळच्या सुधारणेचे अग्रणी असल्यामुळें त्यांचें राज्य ब्रिटनमध्यें सुरू होतांच त्यांनीं तेथें आपल्या सर्व सुधारणा हळू हळू अमलांत आणिल्या. ब्रिटनचा पुष्कळसा भाग निर्जन असून पुष्कळ ठिकाणीं दलदलीच्या पाणथळ जमिनी व जंगी आणि विस्तीर्ण अरण्यें होतीं. रोमन लोकांनीं पुष्कळ पाणथळ जमिनींतील पाणी काढून टाकून त्या कोरड्या केल्या. त्याचप्रमाणें निबिड अरण्यांत शिरून त्यांतील झाडें तोडिलीं, व या जंगलांतून त्यांनीं सुंदर व बळकट शहरें बांधिलीं. सुंदर वाडे, छानदार स्नानगृहें व विस्तृत सार्वजनिक इमारती त्यांत बांधण्यांत येऊन शहरांची शोभा फारच वाढविण्यांत आली. हीं जीं रोमनांनीं शहरें बांधिलीं तीं पहिल्यानें लष्करासाठीं ठाणीं म्हणून उपयोगांत आणिलीं असल्यामुळें त्या

---

१ टेनिसनची कविता 'बोअडिसिआ' (Boadicea) पहा.

भोंवतीं वळकट तटबंदी असे. ठाण्यास क्यास्ट्रा हे नांव असून आज जीं शहरांचीं मँचेस्टर, लीस्टर, डॉर्चेस्टर, विंचेस्टर हीं नांवें आहेत तीं या क्यास्ट्रा शब्दावरूनच बनलीं असलीं पाहिजेत. शहरांबरोबरच रोमन लोकांनीं सर्व देशभर भक्कम रस्ते बांधिले. खालीं चुना व मोठाले दगड व वर खडी व लहान लहान गोटे घालून हे रस्ते तयार केलेले असत. हे रस्ते तयार करतांना रोमन लोकांनीं कोणत्या म्हणून अडचणीस तोंड द्यावयाचें शिल्लक ठेविलें नाहीं. अरण्यांतून झाडी तोडून व दलदलींत कोठें भर घालून तर दोन्ही बाजूस तट बांधून त्यांनीं रस्ते केले. दोन रस्ते जेथें जेथें एकमेकांस मिळत तेथें तेथें रोमन लोकांनीं आपलीं लष्करी ठाणीं बसविलीं होतीं. रस्त्यांमुळें दळणवळण सुकर झालें व रोमन फौजेनें शांतता राखली असल्यामुळें ब्रिटन लोकांस तंटे करतां येत-नासे झाले. रोमनांची राहणी खर्चाची असल्यानें करांचें ओझें जबर असे, सर्व आयात मालावर जकाती बसविल्या होत्या. धंदेवाल्या लोकांवर डोईपट्टी बसविली होती व शेतकऱ्यामागें सैन्यासाठीं धान्याचा पुरवठा करण्याची तसदी असे. त्याचप्रमाणें रोमन साम्राज्याचे इतर भागांचें संरक्षण करण्यासाठीं ब्रिटनमधील सशक्त लोकांची रवानगी होई. अशा रितीनें रोमन राज्य उधळपट्टीचें व जुलमी होतें ही गोष्ट खरी, पण रानटी ब्रिटन लोकांना त्याबरोबरच सुधारणेचीं बरींच अंगें रोमनांनीं शिकविलीं यांत शंका नाहीं. ब्रिटनांत मातीची भांडीं करण्याचे धंदे ऊर्जित दशेस आले. लहान प्रमाणावर ब्रिटन लोक शेती करीत. ती मोठ्या प्रमाणावर कशी करावी हेंही रोमन लोकांनीं त्यांना शिकविलें. क्यास्टर गांवानजीक वीस मैलपर्यंतच्या टापूंत भांड्यांचे शेष अजून सांपडतात. या भांड्यांवर हरणाची शिकार व डुकराची शिकार कर-ण्याचीं चित्रें काढिलेलीं आढळून येतात. त्यावरून रोमन लोकांचें मृगयाप्रेम किती होतें हें कळून येतें. रोमनांनीं आपले ब्रिटनमधील विज-याच्या संस्मरणार्थ धातूची नाणीं पाडिलीं व पुढें तर व्यापारासाठींही तीं पाडण्यांत येऊं लागलीं. जुपिटर, मार्स वगैरे देवांचीं देवळें बांधिलीं गेलीं; उदार कॉन्स्टन्टाईन बादशहाच्या अमदानींत ख्रिस्ती देवळें बांधण्यांत

आलीं; नाटकगृहेंही बांधण्यांत येऊन वाङ्मय व वक्तृत्व शिकविण्याच्या शाळासुद्धां रोमप्रमाणें ब्रिटनमध्यें रोमन लोकांनीं सुरू केल्या. रोमन राज्य इंग्लंडांत असतांनाच रोमन साम्राज्यांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाला व पुष्कळ ब्रिटन लोकांनींही त्या धर्माचा स्वीकार केला.

**७ रोमन अंमलाची समाप्ति**—रोमन लोकांचें ब्रिटनवर राज्य इ. स. ४१० पर्यंत होते. त्या सुमारास खुद्द रोमवर ॲलॅरिकच्या हाताखालीं व्हिसिगॉथ नांवाची रानटी टोळी चालून आल्यामुळें या धाडीपासून रोमचें रक्षण करण्यासाठीं इंग्लंडांतील सर्व रोमन सैन्य परत बोलाविण्यांत आलें, तें गेल्यावर ब्रिटन अगदीं अनाथ झाल्यासारखे झाले. गेलीं चार शतकें जोरदार रोमन शिपायी त्यांचें रक्षण करण्यास असल्यामुळें त्यांना स्वतःला शस्त्र धारण करण्याचा कधींच प्रसंग पडला नव्हता. स्कॉटलंडांतील पिक्ट व आयर्लंडांतील स्कॉट या दोन जातींनी त्यांच्यावर हल्ले केले. तेव्हां ते अगदीं घाबरून गेले. त्यांनीं रोमन लोकांस मदत करण्याविषयीं अर्ज केला. त्यावरून इ. स. ४१८ सालीं एक रोमन पथक आलें. त्यानें शत्रूस हांकून हेड्रियन तटापर्यंतचा मुलुख सोडविला, ब्रिटनांस शस्त्रें कशीं वापरावयाची हे सांगून कवाईत शिकविली व मग ४२६ सालीं त्यानें आपलें शेवटचें प्रयाण केलें.

---

## २ ब्रिटनचें इंग्लंड झालें !

**१ अँगल व सॅक्सन यांचें आगमन**—रोमन लोक गेल्यावर ब्रिटन लोकांची स्थिती अत्यंत शोचनीय झाली; स्कॉटलंड व आयर्लंड मधून पिक्ट व स्कॉट हे त्यांजवर सारखे स्वाऱ्या करूं लागले; पण ब्रिटन लोकांच्या अंगांत आपला बचाव करण्यास लागणारी कुवत नसल्यामुळें लांडग्यापुढें कोंकराची जी अवस्था होतें तशी त्यांची झाली. तेव्हां त्यांनीं रोमनांना फिरून साहाय्य करण्याविषयीं विनंति केली. परंतु

रोमन लोक आतां मदतीला येणें शक्य नव्हतें. तेव्हां निराशेनें मनुष्यास जे धैर्य येतें त्यानें प्रेरित होऊन ब्रिटनांनीं स्वतः लढण्याचा निश्चय केला व आपल्या साहाय्यास इंग्लंडच्या समोर डेन्मार्कच्या दक्षिणेस व जर्मनीच्या उत्तरेस किनाऱ्यालगत वसलेल्या व दर्यावर सुखानें संचार करणाऱ्या साहसी लोकांस त्यांनीं बोलाविलें. हे लोक ज्यूट व सॅक्सन या जातींचे होते. ते जात्या शूर असून लढाई करावी, लूट मारावी हा तर त्यांच्या आवडीचा विषय होता. दिलेलें आमंत्रण स्वीकारून ते ब्रिटनच्या किनाऱ्यावर उतरले ( सुमारें इ. स. ४४९ ). थोड्याच अवकाशांत त्यांनीं पिक्ट व स्कॉट या लोकांना हाकून दिलें व ब्रिटन लोकांना निर्भय केलें. पण ब्रिटनांना आतां नवेंच भय उत्पन्न झालें. हे ज्यूट व सॅक्सन परत न जातां ब्रिटनच्या पूर्व किनाऱ्यावर वस्ती करून राहिले. आपल्या बंधूंना ब्रिटनमध्यें वसाहत करण्याच्या कामीं यश आलेलें पाहून त्यांच्या आणखी टोळ्या ब्रिटनच्या किनाऱ्यावर उतरूं लागल्या. या टोळ्यांनीं लवकरच इंग्लंडचा दक्षिण भाग व आग्नेयीकडचा भाग व्यापला, शेवटीं डेन्मार्कच्या दक्षिणेकडील अँग्लेन या लहानशा टापूंतून अँगल जातीचे लोक भरारा निघाले व थेम्स नदीच्या उत्तरेस सगळ्या पूर्व किनाऱ्यावर त्यांनीं वसाहती केल्या. आतां या वसाहती ज्या झाल्या त्या बिनबोभाट झाल्या असें मात्र नाहीं. कारण ब्रिटन लोकांनीं आपला मुलूख त्यांच्या हातीं जाऊं न देण्यासाठीं शर्थ केली, पण त्यांचे कांहीं न चालून त्यांना पश्चिमेस वेल्समध्यें हटावें लागलें व ब्रिटनचा बहुतेक सर्व भाग या परकीयांच्या हातीं पडला. असें सांगतात कीं आर्थर नांवाच्या एका ब्रिटनांच्या राजानें आपल्या "एक्सकॅलिबर" या तेजस्वी तरवारीनें शत्रूंशीं समरांगणांत जोराची लढाई दिली. त्याच्याबरोबर त्याचे शूर सरदारही आपले भाले घेऊन लढले, व या सर्वांनीं मिळून शत्रूंचा हल्ला मागें परतविला व त्यांच्या वसाहती कांहीं काळपर्यंत वाढूं दिल्या नाहींत ! अशा रीतीनें ब्रिटनच्या समोरील युरोपच्या किनाऱ्यावरून तीन जातींचे लोक ब्रिटनवर आले. ज्यूट, सॅक्सन व अँगल हीं त्यांचीं नांवें होतीं. यांपैकीं अँगल हेच सर्वांच्या मागून आले, परंतु देशाचा बहुतेक भाग त्यांनींच व्यापला,

त्यावरून ब्रिटन देशास अँगल लँड-इंग्लंड-हें नांव पडलें. या लोकांनीं पहिल्यानें वसाहत केल्यापासून ( इ. स. ४४९ ) शंभर वर्षांत इंग्लंडांत सात संस्थानें उदयास आलीं; १ उत्तरेकडचें नार्दंब्रिया, २त्याच्या दक्षिणेस ईस्ट अँग्लिया, ३ पूर्वेकडील केंट, ४-६ इसेक्स, ससेक्स व वेसेक्स हीं इंग्लंडच्या दक्षिणेकडे, ७ मध्यावर मर्शिया, हीं तीं होत. अशीं संस्थानें होऊन अँग्लो-सॅक्सन अंमल ब्रिटनवर सुरू झाला.

**२ ख्रिस्ती धर्माचा प्रसार**—अँग्लो-सॅक्सन लोकांनीं ब्रिटनमध्यें येतांच ख्रिस्ती धर्मगुरूंची कत्तल केली व धर्म मंदिरांचा विध्वंस केला. त्यामुळें लवकरच इंग्लंडांतून ख्रिस्ती धर्म नाहींसा झाला. पुढें ५९७ सालीं रोमचा पोप पहिला ग्रेगरी यानें ऑगस्टाइन या धर्मगुरूस इंग्लंडांतील लोकांस ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्यासाठीं पाठविलें. या वेळीं एथेल्बर्ट हा केंटचा राजा असून त्यानें

१ ख्रिस्ती धर्मांत धार्मिक अधिकाऱ्यांपैकीं सर्वांत श्रेष्ठ अधिकारी रोमचा पोप हा असून त्याचा अमर्यादित अधिकार आधुनिक युगापूर्वी युरोपांतील सर्व ख्रिस्ती राष्ट्रांवर चालत असे. पोप हा ख्रिस्ताचा प्रतिनिधी अशी समजूत होती व त्याचा हुकूम ईश्वराज्ञेप्रमाणें मानण्यांत येई. परंतु १५०४ साली कॉन्स्टॅन्टिनोपलमधील धर्मगुरूशीं पोपचा तंटा होऊन त्यानें त्या धर्मगुरूस बहिष्कृत केलें. तेव्हां पूर्व युरोपांतील बहुतेक लोकांनीं विशेषतः रशियन लोकांनीं त्यांची कड घेतली, व ग्रीक चर्च नांवाचा पोपला न मानणारा धर्मपंथ पूर्व युरोपांत स्थापिला गेला. या ग्रीक चर्चचे आज विसाव्या शतकांत आठ कोट अनुयायी असून त्यांतले जवळ जवळ दोन तृतियांश रशियन आहेत व याचप्रमाणें सोळाव्या शतकांत पश्चिम युरोपांत धर्मसुधारक निघून प्रॉटेस्टंट मताची स्थापना झाली या प्रॉटेस्टंट मताचाच इंग्लंड हा देश असून यांतील लोक पोपला मानीत नाहींत. तथापि पश्चिम युरोपचा बहुतेक भाग रोमन क्याथलिक मताचा आहे व हे क्याथलिक पोपचा अधिकार पूर्वीप्रमाणें सर्वस्वीं मानतात.

फ्रान्समधील बर्था नांवाच्या ख्रिस्ती स्त्रीशीं लग्न केलें होतें. या कारणानें ऑगस्टाइनचें काम सुलभ झालें. एथेल्बर्टनें त्याला आपल्या राज्यांत क्यान्टर्बरी येथें राहून लोकांस उपदेश करण्यास परवानगी दिली. आपला क्रूस उंच हातीं धरून ऑगस्टाईन व त्याचे चाळीस अनुयायी यांनीं बायबलांतील लॅटिन प्रार्थना म्हणत मोठ्या थाटानें क्यान्टर्बरींत प्रवेश केला. लवकरच राजा एथेल्बर्ट यानें ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली व मग राजाश्रय मिळाल्यावर ख्रिस्ती धर्म इंग्लिश लोकांत जारीनें पसरूं लागला.

**३ ख्रिस्ती धर्मापासून ब्रिटनचे झालेले फायदे**—यापूर्वी अँग्लो-सॅक्सन लोकांना म्हणण्यासारखा धर्म नव्हता. वोडेन हा देव ते मुख्य मानीत व त्याला भजलें असतां युद्धांत शत्रूची कत्तल करावयास मिळते व आपल्याला जय येतो अशी त्यांची कल्पना असे ! त्यांची अशीही समजूत असे कीं, वीरपुरुष जेव्हां मरतात तेव्हां ते स्वर्गास जातात व तेथें नेहमीं दिवसा युद्ध करावयास सांपडून रात्र विषयोपभोगांत घालवितां येते. जनावरांचा ते यज्ञ करीत, इतकेंच नव्हे तर आपल्याजवळील गुलामांचा व केव्हां केव्हां आपल्या मुलाबाळांचाही देवाची कृपा संपादन करण्यासाठीं ते यज्ञ करीत असत. त्यांच्या धर्माचा पाया क्रौर्यावर रचिलेला असून भूतदयेला ते पारखेच होते. अशी ही रानवट धर्मतत्त्वें—किंवा तत्त्वें म्हणण्यापेक्षां आचार म्हणणेंच जास्त युक्त होईल—ज्या लोकांत होतीं त्यांच्या मनावर ख्रिस्ती धर्माचा उपदेश ठसला व पूर्वीचा हेंगाडा धर्म सोडून देऊन ते ख्रिश्चन झाले, यांत कांहीं नवल नाहीं. नंतर आणखी कित्येक मिशनरी इंग्लंडांत उतरले व बहुतेक सर्व लोकांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला. क्यान्टर्बरी येथें आर्चबिशप ( मुख्य धर्मगुरु ) ची जागा स्थापण्यांत येऊन तो सर्व धर्मगुरुंवर अधिकार गाजवूं लागला. इंग्लंडांत निरनिराळ्या ठिकाणीं मठ स्थापण्यांत आले व ख्रिश्चन धर्माच्या तत्त्वांचा उपदेश करून गरीब व दुःखग्रस्त लोकांस मदत करण्यासाठीं शेंकडो मठवासी ( monks ) झटूं लागले. मठवासी लोक मठास मिळालेल्या जमिनी नांगरून त्यांत पिकें करीत, धार्मिक

विधी आचरीत व दिवसाचा कांहीं भाग ग्रंथरचना करण्यांत व शिकविण्यांत घालवीत. मनुष्यानें दयाशील बनलें पाहिजे, हें तत्त्व त्यांच्या प्रत्यक्ष आचरणांत दिसून येई. मठवाशांप्रमाणें धर्मगुरूही लोकांच्या फारच उपयोगीं पडत.

**४ धर्मव्यवस्था**—पोपच्या मनांत इंग्लंडांत रोमच्या धर्तीवर व्यवस्थित धर्मखातें सुरू करावयाचें आलें. त्या वेळीं इंग्लंडांत धर्मसंबंधीं दोन पक्ष झाले होते. एक केल्टिक पक्ष व दुसरा लॅटिन पक्ष. आयोनाच्या मठांतील धर्मगुरू कोल्मन हा केल्टिक पक्षाचा पुरस्कर्ता होता व विल्फ्रिडनें लॅटिन पक्षाचा पुढाकार घेतला होता. शेवटीं व्हिट्बी येथें धर्मगुरूंची एक मोठी सभा भरली. तींत ईस्टर सण केव्हां धरावा हा वादाचा मुख्य मुद्दा होता. त्यांत धर्म-विषयांत रोमन म्हणजे पोपनें सांगितलेली व्यवस्था इंग्लंडांत सुरू असावी, असें म्हणणारा लॅटिन पक्षच विजयी झाला व कोल्मन आपल्या आयरिश अनुयायांसह आयर्लंडांत निघून गेला ( इ. स. ६६४ ). धर्मविषयांत रोमचें अधिराज्य कबूल करणें म्हणजे कला, वाङ्मय, कायदे इत्यादि युरोपांतील सुधारणेच्या अंगांशीं संबंध कायम राखण्यासारखें होतें. तेव्हां कूपमंडुकवृत्ति सोडून इंग्रजांनीं युरोपियन सुधारणेस इंग्लंडांत प्रवेश करूं दिला हें उत्तम झालें. लागलीच पोपनें इंग्लंडांत लहान खेडीं ( Parish ) ठरवून देऊन त्यांवर क्लर्जी नेमिले. कांहीं पॅरिश मिळून त्यावर एका मोठ्या शहरांत बिशप नेमावयाचा व त्याची हुकमत पॅरिशमधील क्लर्जींवर चालावयाची असें ठरलें. बिशपच्या हाताखालील प्रांतास डायोसीज ( Diocese ) म्हणत. ज्या देवळांत बिशप प्रार्थना चालवी त्यास क्याथीड्रल चर्च हें नांव पडलें. या सर्व डायोसीज मिळून इंग्लंडचे दोन भाग करण्यांत आले; उत्तरेकडील भागावर यॉर्कचा आर्चबिशप याची हुकमत चाले व दक्षिणेकडील भागावर क्यान्टर्बरीचा आर्चबिशप आपली सत्ता गाजवी. या दोघांतही क्यान्टर्बरीच्या आर्चबिशपला जास्त मान असून त्यास इंग्लंडचा मुखत्यार ( प्रायमेट ) करण्यांत आलें. याप्रमाणें धार्मिक दृष्ट्या इंग्लंडचें ऐक्य करण्यांत येऊन पुढें जें त्या देशाचें राजकीय ऐक्य

होणार होतें त्याचा ओनामाच अशा रीतीनें घालून दिला गेला, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

**५ एकछत्री अंमलाची सुरवात**—मागें इंग्लंडचीं सात संस्थानें झाल्याचें सांगितलें. त्यांपैकीं तीन प्रमुख होतीं; नॉर्दंब्रिया, मर्शिया व वेसेक्स हीं तीं होत. या तिन्हीं संस्थानांमध्यें अधिराज्याबद्दल सारखे तंटे चाललेले असत; या तिन्ही राज्यांनी वेल्स प्रांत जिंकण्याचा प्रयत्न केला, पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. एकदां एग्बर्ट नांवाच्या केंटमधील राजपुत्रानें वेसेक्सच्या गादीवर आपला हक्क सांगितला; परंतु त्याच्या प्रतिस्पर्ध्यास वेसेक्सची गादी मिळाली व एग्बर्टला देशांतर करून फ्रान्सांत पळून जावें लागलें. ८०२ सालीं एग्बर्ट इंग्लंडांत जर्मनीचा बादशहा शार्लमेन व पोप यांच्या संमतीनें परत आला व त्यानें वेसेक्सची गादी मिळविली, तो जबर महत्त्वाकांक्षी व कर्तृत्ववान् असल्यामुळें आठ वर्षेंपर्यंत लढाई करून कॉर्नवॉलमधील लोकांस त्यानें शरण यावयास लाविलें. पुढें मर्शिया व नॉर्दंब्रिया या दोन्ही बड्या संस्थानांवर चाल करून त्यांचा त्यानें पराभव केला. तेव्हां या दोन्ही संस्थानिकांनीं आपले वकील पाठवून एग्बर्टचें अधिराज्य कबूल केलें. अशा रीतीनें इ. स. ८२७ या सालीं सर्व इंग्लिश लोकांनीं वेसेक्सचें अधिराज्य कबूल केलें व या सनापासूनच एक राष्ट्र या नात्यानें इंग्लंडचा इतिहास सुरू झाला.

**६ सामाजिक स्थिति**—या एग्बर्ट राजाच्या वेळीं इंग्लिश लोकांचे सामाजिक दर्जे व राज्यपद्धत ठरून गेली होती; तीच अँग्लो-सॅक्सन पद्धत असल्यामुळें तिचें वर्णन देणें अवश्य आहे. त्यावरून इंग्लिश लोकांच्या अंगीं जात्याच कोणती रहाणी व पद्धति ठसून गेली होती हें कळून येतें. जमिनीच्या मालकीवरच सामाजिक दर्जा ठरलेला होता. राजाच्या मालकीची सर्वांत जास्त जमीन असून त्याच्या नातेवाईकांस एथेलिंग म्हणत, राजाच्या खालोखाल आल्डरमेन किंवा अर्ल (सरदार) हे असून त्यांच्या मालकीची निदान चाळीस हाईड[1]

---

१ एक हाइड म्हणजे सुमारें ३३ एकर.

तरी जमीन असावी लागे. या अर्लच्या खालीं थेन व सर्ल असे दोन वर्ग असत. यांपैकीं थेन याची स्वतःच्या मालकीची निदान पांच हाईड तरी जमीन असे, व सर्ल मात्र स्वतः जमीन नांगरीत असे. एखाद्या सर्लला पांच हाइड जमीन मालकीची झाली कीं थेन होतां येई. सर्लला केंस ठेवण्याची व शस्त्र धारण करण्याची परवानगी असे, व या दृष्टीनेंच तो गुलाम वर्गाहून श्रेष्ठ असे. या सर्लच्या खालीं गुलामवर्ग होता. यांची भरती जित ब्रिटन लोकांमधून झाली होती. या गुलामांना जमीन व तींतील गुरें यांजबरोबरच विकीत असत. गुलामास स्वतंत्र करावयाचें मालकाच्या मनांत आल्यास त्यास तसें करतां येई. असें करावयाचें असतां योग्य कामगाराकडून गुलामाच्या हातांत तलवार अगर भाला दिला जाऊन तूं स्वतंत्र आहेस, आतां वाटेल तिकडे जा, असें त्यास सांगण्यांत येत असे.

**७ अँग्लो–सॅक्सनांच्या राज्यसंस्था**–अँग्लो-सॅक्सन लोकांमध्यें केवळ दंडुकेशाहीचीं राज्यपद्धति सुरू नसून आजची लोकसत्ताक राज्यपद्धति बीज स्वरूपानें चालू असल्याचें दिसून येतें. विटन नांवाची राजाची मदतगार सभा असून तिच्या बैठकी वर्षांतून तीनदां होत. तिच्यांत सरदार लोक, धर्मगुरु, प्रमुख प्रमुख थेन ( स्वतंत्र शेतकरी ), हे सर्व येत. तींत लोक निवडून येत नसून हे सर्व जण हक्कानें तींत बसत. कायदे करणें, कर बसविणें, युद्ध सुरू करणें, तह करणें, राजा निवडणें, बिशप नेमणें व मुख्य न्यायकोर्ट म्हणून काम करणें, हीं कामें विटनच्या सल्ल्यानें राजा करीत असे. देशाचा सर्वांत लहान घटक म्हटला म्हणजे गांव ( Township ). प्रत्येक गांवांत ग्रामसभा असून ती गांवचा कारभार पाही. कित्येक गांवें मिळून महाल (Hundred) होई. त्याचा कारभार महालाची सभा ( Hundred moot ) पहात असे. हिचा ऑल्डरमन[१] हा अध्यक्ष असे व ही महिन्यांतून एकदां भरे.

---

१ आल्डरमन हा परगण्यांतील मुख्य सैन्याधिकारी असे. ही संस्था फार जुनी असून सॅक्सन लोक ब्रिटन देशांत येण्यापूर्वींपासून प्रत्येक

शायर—मूट किंवा काउन्टी-मूट ही परगण्यांतील मुख्य सभा असून तींत शायरमधले सर्व प्रतिष्ठित लोक न्याय देण्यास बसत. या सभेचे आल्डरमन व बिशप हे म्होरके असून ती वर्षांतून दोन वेळां भरत असे. समाजाचा किंवा व्यक्तीचा कोणी गुन्हा केल्यास न्याय करावयाचा म्हणजे झालेलें नुकसान भरून द्यावयाचें ही न्यायाची कल्पना होती. गुन्ह्याचा ज्यावर आरोप केला असेल त्यानें सभे ( मूट ) पुढें आपण तो गुन्हा केला नसल्याची शपथ घ्यावी व आपला शब्द विश्वसनीय असें शपथेवर सांगणारे बारा साक्षीदार मिळवावे, म्हणजे त्याची गुन्ह्यापासून मुक्तता होई. परंतु या बारा जणांच्या शपथा घ्यावयाच्या, त्यांच्या किंमतीही विविध असत. सहा थेनांची शपथ व एकट्या आल्डरमनची शपथ यांची किंमत सारखी असून राजाच्या शपथेइतकी कोणाच्याच शपथेला किंमत नसे ! जर असे साक्षीदार आणतां आले नाहींत तर आरोपीला ‘ दिव्य ’ करून दाखवावें लागे. त्याला देवळांत नेल्यावर निखाऱ्यांवरून अगर उकळत्या पाण्यांतून दगड बाहेर काढून आपला निरपराधीपणा सिद्ध करावा लागे ! या दिव्यांतून जर तो इजा न होतां सुरक्षित बाहेर पडला तर तो निरपराधी ठरून त्याची शिक्षा चुके !

**८ राजाचें उत्पन्न व कर्तव्यें**—राजाचें उत्पन्न खालील सदरांतून येई; १ त्याच्या खाजगी जमिनींचें उत्पन्न, २ जमिनदारांकडून त्यांच्या जमिनीबद्दल वेळोवेळीं मिळणारा खंड, ३ न्यायसभांतून गुन्हेगारास जे दंड होत व न्यायाकरितां जी फी द्यावी लागे ती. याखेरीज सरकारचें असें निराळें उत्पन्न मुळींच नव्हतें. येवढ्या उत्पन्नांतूनच सर्व सरकारी खर्च चाले. बाहेरच्या शत्रूपासून संरक्षण करणें व देशांत शांतता राखणें, याशिवाय आज सुधारलेलीं सरकारें जीं कामें करितात तें कोणतेंच त्यावेळीं करण्यांत येत नसून, फक्त हीं दोन कामेंच करण्यांत त्यावेळीं सरकार गुंतलेलें असे. जमीनदारांवर तीन निर्बंध घातले असून त्यांच्याकडून

---

टोळींतील तरुण वीरांच्या सेनेवर आल्डरमन हा मुख्य असे. या नांवापासूनच पुढें अर्ल हा सरदारवाचक शब्द बनला.

दरेच काम करून घेण्यांत येई. रस्ते व पूल नीट राखणें, किल्ल्यांचा बंदोबस्त करणें व राजा अगर आल्डरमन यांनीं बोलाविलें म्हणजे लष्करी नोकरी करण्यास तयार असणें हीं तिन्ही कामें त्यांच्यावर पडत.

---

## ४ डेन लोकांच्या स्वाऱ्या.

**१ डेन लोक व त्यांच्या हालचाली**—ट्युटॉनिक वंशांतील जूट, अँगल व सॅक्सन या तीन जातींनीं स्वाऱ्या करून शेवटीं इंग्लंडांत राज्यें स्थापिलीं. नंतर त्यांच्यांत स्थिरस्थावर झाल्यावर वेसेक्सचा राजा एग्बर्ट यानें सर्व राज्यें एक करून इंग्लंडांत आपलें अधिराज्य स्थापिलें. ( ८२७ ). या कालापूर्वी दहा वीस वर्षांपासूनच डेन्मार्कमध्यें राहणाऱ्या लोकांच्या इंग्लंडावर स्वाऱ्या सुरू झाल्या होत्या! त्यांना नॉर्थमेन ( उत्तरेकडील लोक ) हें नांव असे. हे साहसी व शूर असत व यांच्या देशांतील जमिनी बहुतेक नापीक असल्यामुळें यांच्यांतील तरुण लोकांचा, आपल्या सामर्थ्याचा उपयोग समुद्रावर चांचेगिरी करावी किंवा इतर देशांत उतरून तेथील शांतताप्रिय लोकांशीं भांडून लूट मारावी हाच खासा धंदा होऊन बसला होता. या लोकांनीं इंग्लंडप्रमाणें फ्रान्सच्या उत्तर किनाऱ्यावर स्वाऱ्या करून नॉर्मंडींतही वसाहत स्थापिली. त्याचप्रमाणें भूमध्य समुद्रांत शिरून युरोपच्या दक्षिण किनाऱ्यावर व आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावर त्यांनीं बऱ्याच वसाहती केल्या. सॅक्सन लोक ज्या ट्युटॉनिक वंशांतील होते त्यापैकींच हे असून रूपानें व स्वभावानें व सवयीनें त्या दोघांत पूर्ण साम्य होतें. परशु ( battle axe ), धनुष्यबाण व गदा ( war hammer ) हीं त्यांचीं हत्यारें होतीं. वोडेन व थॉर या देवांचे ते मोठे भक्त असून सॅक्सन लोकांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला हें पाहून त्यांचें पित्त फारच खवळलें. त्यांची धाड एकाद्या गांवावर आली कीं, तेथील लोकांची निर्दयपणें कत्तल करावयाची, घरें

जाळून टाकावयाचीं, शेतें उध्वस्त करावयाचीं व देवळांचा विध्वंस करावयाचा, असा त्यांचा क्रम असे. इंग्लंडच्या नैर्ऋत्येच्या टोंकावरील लँडस् एन्ड भूशिरापासून तों स्कॉटलंडच्या दक्षिणेच्या फर्थ ऑफ फोर्थ खाडीपर्यंतच्या किनाऱ्यावर कोठें त्यांची स्वारी येईल याचा नेम नसे. विन्चेस्टर, रोचेस्टर, क्यांटरबरी, लंडन इत्यादि शहरांस सुद्धां त्रास देण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. केव्हां केव्हां आपल्या बोटींतून उतरून जवळपासचीं घोडीं पकडावीं, त्यांवर स्वार होऊन किनाऱ्यापासून जरा आंत दूरवर असलेला श्रीमंतीच्या ऐश्वर्यानें मंडित असा मठ गांठावा व तेथील सोनें नाणें आणि वेदीवरील उंची वस्त्रें लांबवावीं, असाही चमत्कार ते करून दाखवीत. एकादा गांव लुटीत असतां सशस्त्र शत्रुसैन्य आपल्यावर चालून येत आहे अशी नुसती कुणकुण लागतांच हे भुरटे आपल्या होडयांत बसून लागलीच पसार होत. या लुटालुटीच्या कामांत त्यांना जसजसें यश येऊं लागलें, तसतसे ते ज्यास्त धीट बनून समुद्राच्या भरतीचें पाणी नद्यांमध्यें आंत जितकें दूरवर शिरे तेथवर आपल्या होडया नेऊन सुरक्षित स्थळीं तळ द्यावयाचा व मग सवडीनुसार भोंवतालच्या मुलखांत लूट मारावयाची, असा क्रम त्यांनीं सुरू केला. पुढें पुढें तर वसाहती करून कायमचें ठाणें देण्याचा मार्गही त्यांनीं स्वीकारला. इंग्लंडांत पहिल्यानें ईस्ट ( पूर्व ) अँग्लिया येथें त्यांची वसाहत झाली. तेथील राजा एडमंड यास, तूं खिस्ती धर्म सोड व आमचा मांडलिक म्हणून राज्य कर, अशी डेन लोकांनीं अट घातली. त्या राजानें खिस्ती धर्म न सोडतां मृत्यूचाच स्वीकार केला. तेव्हां ईस्ट अँग्लिया डेनांच्या हातीं आलें.

**२ आल्फ्रेडचें डेनांशीं युद्ध व तह**—८७१ त डॅनिश राजा गथ्रम यानें पूर्व अँग्लियांतून वेसेक्सच्या राज्यावर पुनः पुनः हल्ले करण्यास सुरवात केली. राजा एग्बर्ट यानें ८२७ त वेसेक्सचें अधिराज्य सर्व इंग्लंडवर स्थापिलें होतें; तेव्हां वेसेक्स जिंकलें कीं इंग्लंड हातीं आल्यासारखेंच आहे ही कल्पनाच या वेसेक्सवरील गथ्रमच्या स्वाऱ्यांच्या बुडाशीं होती. या वेळीं एग्बर्टचा नातू आल्फ्रेड हा

गादीवर होता. त्याची मुत्सद्दीगिरी, लष्करी बाणा व प्रजावात्सल्य हीं विलक्षण होतीं. हा राज्यावर आला त्या सालींच डेन लोकांशीं प्रत्यक्ष समोरासमोर दोन्ही बाजूंचीं सैन्यें उभीं राहून अशा नऊ लढाया झाल्या, व पुढील सहा वर्षेपर्यंत डेन लोकांचे हल्ले परतवून लावण्यासाठीं आल्फ्रेडला अत्यंत कष्ट करावे लागले. एकदां तर त्याला एका गुराख्याच्या घरांत अज्ञातवासांत रहावें लागून तव्यावर टाकलेल्या भाकऱ्या राखण्याचें काम करीत बसावें लागलें व राज्य–रक्षणाच्या विचारांत डोकें गर्क झाल्यामुळें तें त्याच्या हातून नीटपणें पार न पडून त्यामुळें त्यास गुराख्याच्या बायकोचीं बोलणीं खावीं लागलीं! पुष्कळ वेळां इंग्लंडच्या दक्षिणेस व पूर्वेस त्यांनीं व्यापिलेल्या अनुकूल जागांतून हुसकून, नद्यानाल्यांच्या मुलुखांत त्यांना कोंडून व केव्हां केव्हां त्यांच्या लष्करी तळावर हल्ले करून त्यानें डेन लोकांस जेर केलें व त्यांच्याकडून शपथेवर तहनामे करून घेतले; पण डेन लोकांस शब्दाची किंमत मुळींच वाटत नसे व ते आपण करून दिलेले तहनामे खुशाल मोडीत. शेवटीं ८७८ च्या हिंवाळ्यांत गथ्रम जंगी सैन्य बरोबर घेऊन आल्फ्रेडच्या राज्यावर चालून आला. तेव्हां आल्फ्रेडला विल्टशायर व सॉमरसेटशायर मधून आपले अनुयायी जमा होतपर्यंत अॅथेल्नीपर्यंत मागें हटावें लागलें. मग दोन्ही सैन्यांमध्यें एडिंग्टन येथें युद्ध झालें. त्यांत डॅनिश सैन्याचा पुरा मोड झाला. पुढें पाठलाग करून पळपुट्या डॅनिश लोकांना चिपेनहॅम येथें आल्फ्रेडनें वेढा दिला. चौदा दिवसपर्यंत वेढ्याचें काम चालल्यावर डेन शरण आले. आल्फ्रेडला कळून चुकलें होतें कीं, डेन लोकांना इंग्लंडांतून हाकून देणें अशक्य आहे. तेव्हां नुकत्याच मिळविलेल्या दुहेरी विजयापासून फायदा करून घेण्याकरितां त्यानें शहाणपणानें गथ्रम याशीं वेडमूर येथें तह केला (८७८). त्यांत इंग्लंडचे पूर्व व पश्चिम इंग्लंड असे दोन भाग करून त्यांपैकीं पश्चिमेकडचा भाग आपल्याकडे घेऊन पूर्व भाग डेन लोकांना त्यानें देऊन टाकिला. डेन लोकांनीं आल्फ्रेडच्या राज्यावर स्वाऱ्या न करण्याचें कबूल केलें. गथ्रम यानें ख्रिस्ती धर्म स्वीकारला व हा तह पूर्वीप्रमाणें मोडिला नाहीं.

३ **आल्फ्रेडची राज्यव्यवस्था**—आल्फ्रेडला हें जें इंग्लंडचें परचक्रापासून रक्षण करतां आलें, त्याचें कारण त्यानें लष्करी दृष्टीनें इंग्लंडचें सामर्थ्य वाढविण्याची अहर्निश खटपट केली हेंच होय. त्यानें चारशें बोटींचें आरमार तयार करून आपल्या खलाश्यांना शिक्षण देण्यासाठीं डॅनिश व वेल्श खलाशीही नोकरीस ठेविले. त्याचप्रमाणें सैन्यांतही त्यानें सुधारणा केली. शत्रूच्या स्वाऱ्या होऊं लागल्या कीं तात्पुरती फौज उभारण्याची पद्धत सोडून आपल्या देशांतील सर्व लोकांस आळीपाळीनें लष्करी शिक्षण देण्याची त्यानें व्यवस्था केली. या पद्धतीनें एक तृतियांश लोक लष्करी शिक्षण घेत असतां बाकीचे दोन तृतीयांश घरकामांत गुंतलेले असत व पाळीपाळीनें सर्व लोकांस लष्करी शिक्षण मिळून युद्धकलेंत देशांतील सर्व सशक्त पुरुष तरबेज रहात. त्याचप्रमाणें आपल्या राज्यांतील महत्त्वाच्या ठाण्यांस तटबंदी करून त्यानें तेथें कायमची शिबंदी ठेवून दिली. आल्फ्रेडनें केवळ लष्करी सुधारणा केल्या असें नाहीं. धर्मशास्त्र्यांशीं स्नेहानें वागून त्यानें नीतीचा आधार कायद्यास मिळविला व कायद्याचें एक कोड तयार केलें. त्यानें उद्योगधंदे व युरोपशीं व्यापार यांस उत्तेजन दिलें. पूर्वीचा ॲंग्लो-सॅक्सनांचा इतिहास रचण्यास त्यानें लोक नेमिले. युरोपांतून शिक्षक आणवून इंग्लिश सरदारांच्या मुलांस शिक्षण देण्यास शाळा घातल्या. त्याला स्वतःला निबंध लिहिण्याचा व परभाषेंतील पुस्तकांचें भाषांतर करण्याचा नाद होता. आल्फ्रेड इ. स. ९०१ त वारला.

४ **डेन राजांचा अमल**—आल्फ्रेडच्या मागून वेसेक्सच्या गादीवर जे राजे आले ते कर्तबगार असून त्यांनीं सगळ्या इंग्लंडवर वेसेक्सचें अधिराज्य तसेंच कायम राखिलें; परंतु ९७५ सालीं कर्तबगार राजांची ही परंपरा संपून दुर्बळ राजे त्यांच्या जागीं आले. या राजांनीं डॅनिश लोकांच्या तडाक्यांतून आपला बचाव करून घेण्याकरितां डेनगेल्ड नांवाचा सार्वत्रिक कर लोकांवर बसविला व तो कर खंडणी म्हणून ते डेन लोकांच्या हवालीं करूं लागले. परंतु शत्रूला खंडणी

देऊन त्याच्यापासून आपलें संरक्षण करूं पाहणें म्हणजे अर्धांत लांकडें भरून तो विजवूं पाहण्यासारखेंच अदूरदृष्टीचें कसें आहे, हें त्यांस लवकरच कळून आलें. या खंडणीनें शत्रूचा लोभ अधिकच वाटला; व एथलरेडच्या कारकिर्दीत त्याचा पूर्ण अनुभव आला. एथलरेडनें पुनः पुनः खंडणी भरली. पण डेन लोकांची तृप्ति झाली नाहीं. तेव्हां तो अगदीं त्रासून गेला. इतका कीं, त्याचें डोकें फिरून त्याच्या हुकुमावरून वेसेक्समधील सर्व डेन लोकांची 'सेंट ब्राइसेस डे' या सणाच्या दिवशीं कत्तल करण्यांत आली ( १ ०२ ). या कृत्यानें डेन्मार्कचा राजा स्वेन अगदीं चिडून गेला व त्यानें पुढील वर्षी स्वारी करून वेसेक्सचा मुलूख उध्वस्त केला. दहा वर्षेंपर्यंत लढाई चालली होती. " शेवटीं सैन्याची जमवाजमव करून लढाई देण्यास एकही सरदार राजास मदत करीना व एका शायरमधील ( परगणा ) लोक दुसऱ्या शायरांतील लोकांस कोणतेंही साहाय्य करण्यास तयार होईनात. " १०१३ त एथलरेड फ्रान्सच्या उत्तरेकडील नॉर्मंडी प्रांतांत पळून गेला, व स्वेन हाच इंग्लंडचा राजा बनला. पण तो एक वर्षांतच मरण पावला. ही संधि साधून विटन सभेनें एथलरेड व त्याचा मुलगा एडमंड यांची सत्ता स्थापण्याची खटपट चालविली, परंतु स्वेनचा मुलगा क्यान्यूट हा बापासारखाच कर्तबगार असल्यामुळें इंग्लिशांस हार खावी लागली. इ. स. १०१६ त ॲसन्डन येथें निकराची लढाई झाली. तींत एड्रिक हा प्रबल इंग्रज सरदार आयत्या वेळीं फितूर होऊन शत्रूस मिळाल्यामुळें इंग्रजांचा पराभव झाला. पुढील सालीं तर देशद्रोही एड्रिकनें एडमंडचा खून करविला ! तेव्हां इंग्लिशांचा निरुपाय होऊन त्यांनीं क्यान्यूट या डेन राजास इंग्लंडचा राजा म्हणून मान्यता दिली व डॅनिश वंश इंग्लंडवर राज्य करूं लागला. ( १०१७ )

**५ तोंडपुज्यांची फजिती**—या क्यान्यूट राजाची एक गमतीची आख्यायिका सांगतात. तोंडपुजे लोकांनीं त्यास म्हटलें कीं, पंच महाभूतेंसुद्धां आपली आज्ञा शिरसामान्य करितात, मग यःकश्चित मानवांची गोष्ट काय ? एके दिवशीं क्यान्यूट भरतीच्या वेळीं समुद्राच्या किनाऱ्या-

वर खुर्ची टाकून बसला; व तोंडपुज्यांदेखत त्यानें समुद्रास अमक्या एका हद्दीच्या पुढें लाटा न येऊं देण्याची आज्ञा केली. पण ती आज्ञा कोठल्या कोठेंच राहून समुद्राच्या पाण्यानें राजाची खुर्ची वेढिली. तेव्हां क्यान्यूट तोंडपुज्यांस बोलला " माझी खुषामत करीत असतां सत्याची तुम्ही कांहींच चाड कशी ठेवीत नाहीं बरें ! हा समुद्र पहा, ईश्वराज्ञेनें माझी खुर्ची वेढून टाकीत असून माझ्या आज्ञेची त्याला कांहींच पर्वा नाहीं. तेव्हां धिःकार असो तुम्हांला!" क्यान्यूट हा कर्तबगार असून त्यानें शहाणपणानें राज्यकारभार चालविला. परंतु त्याच्या मुलांत कर्तृत्व नसल्यामुळें त्यांच्यानें राज्याची बळकटी राखविली नाहीं. तेव्हां १०४२ त त्याचा धाकटा मुलगा वारला ही संधि साधून विटनसभेनें एग्बर्टचा इंग्लिश वंश फिरून राज्यावर आणिला. एथलरेडचा मुलगा एडवर्ड यास गादीवर बसविण्यांत आलें व इंग्लंडवर फिरून वेसेक्सचा अंमल चालू झाला.

६ **सरदारांच्या सत्तेची वाढ**—डॅनिश लोकांशीं ॲंग्लो-सॅक्सन लोकांस जी टक्कर द्यावी लागली तिमुळें ॲंग्लो-सॅक्सनांच्या सामाजिक व्यवस्थेंत मोठाच फरक पडला. गरीब शेतकरी जे सर्व त्यांना स्वतंत्रतेनें रहाणें धोक्याचें वाटून ते कोणत्याना कोणत्या सरदाराचे अंकित बनूं लागले. राजांनाही सबंध इंग्लंड हातीं पडल्यामुळें मोठमोठ्या जमिनी सरदारांस तोडून देणें भाग झालें. सरदारांच्या वाढत्या सामर्थ्यास आळा घालणें राजांस शक्य राहिलें नाहीं, किंबहुना त्यांची सत्ता वाढल्यास शत्रूशीं लढतांना त्यांच्या वाढत्या सामर्थ्याचा आपणासच उपयोग व्हावयाचा असल्यामुळें ती सत्ता वाढविण्यासच राजे लोक उत्तेजन देऊं लागले. एकाद्या थेननें ( कनिष्ठ सरदारानें ) पराक्रम गाजवून स्वामिसेवा केली तर त्याची संभावना करण्यासाठीं राजे त्यास मोठी जमीन तोडून देऊं लागले. अशा रीतीनें सरदारांचें ऐश्वर्य व सामर्थ्य अतिशय वाढून सामान्य लोक कंगाल व परावलंबी बनले. " आल्फ्रेडच्या वेळेपासून लॉर्डांच्या सत्तेचा आश्रय केल्याशिवाय एकही मनुष्य राहीनासा

झाला. ज्याचें संरक्षण करण्यास एकही लॉर्ड मिळत नसे, तो मनुष्य कायद्याच्या संरक्षणास अपात्र अशीच स्थिति झाली. ''

---

## ५ नॉर्मन वुइल्यम विजयी झाला.

### हेस्टिंग्जची लढाइ, १०६६.

[१] **सरंजामी पद्धति**—१०४२ त एडवर्ड गादीवर आला; तेव्हां डेन लोकांची सत्ता नाहींशी होऊन फिरून सॅक्सन अंमल सुरु झाला. हा एडवर्ड शांतवृत्तीचा असून साधुपणानें वागत असे. परंतु राज्य करावयाचें म्हणजे राज्यकर्त्यांच्या अंगीं जी तडफ, कर्तृत्व व दुसऱ्यावर छाप बसविण्याचा गुण लागतो त्यांचा त्याच्या ठिकाणीं अभाव असल्यामुळें त्याच्या काळीं सरदार लोक अधिकच प्रबल होऊन राजा म्हणजे सरदारांच्या हातचें बाहुलें ही स्थिति झाली. शिवाय एडवर्ड राज्यावर येण्यापूर्वी फ्रान्सांत जाऊन राहिला होता. तेथें राजानें सरंजामी पद्धत स्वीकारून सरदार लोकांस मोटमोठे प्रांत तोडून दिले होते. या पद्धतीनें राज्य करूं लागलें म्हणजे सरदार लोक आपआपल्या प्रांताचा सर्व बोजा संभाळतात व राजावर कांहींच भार पडत नाहीं हें खरें; पण कामाची जबाबदारी दूर होते तिच्याबरोबरच सत्ताही राजास सोडून जाते, व राजा निर्माल्यवत् होतो. शिवाय राज्यव्यवस्थेंतील एकसूत्रीपणा नाहींसा होऊन देशांत कलह माजण्याचा संभव दुणावतो. मराठी राज्याच्या विनाशकाळीं शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड इत्यादि सरदार असेच स्वतंत्र झाले व राज्यांतील शिस्त बिघडून मराठेशाहीस इंग्रजांशीं टक्कर देणें अशक्य झालें हें प्रसिद्धच आहे. तें कसेंही असलें तरी एडवर्डला

---

१ ग्रीनकृत इंग्लिश लोकांचा इतिहास, भाग १ पृ. ४

ही पद्धत पसंत पडली व इंग्लंडची गॉड्विन, सिवर्ड व लिऑफ्रिक या तीन सरदारांत त्यानें वांटणी केली. वेसेक्स गॉड्विनकडे, उत्तर भाग सिवर्डकडे व मध्य ब्रिटन लिऑफ्रिककडे त्यानें सोपविले. त्यामुळें हे सरदार प्रबल झाले; पण गॉड्विन हा खुद्द राजाजवळ असल्यानें त्याची सत्ता अतिशय वाढली.

**२ गॉड्विन व त्याचा मुलगा हॅरोल्ड**—फ्रान्सांत असतां उत्तरेकडील नॉर्मंडी या प्रांतांत एडवर्ड राहात असे. तो प्रांत सरंजामी-पद्धतीप्रमाणें दोन तीन शतकांपासून त्यांत वसाहत करून राहिलेल्या नॉर्मन ( नॉर्थमेन ) लोकांच्या म्होरक्यास बहाल करण्यांत आला होता. या नॉर्मन लोकांचा पगडा एडवर्डच्या मनावर फार बसला होता. त्यानें इंग्लंडचें राजपद मिळतांच बहुतेक सर्व अधिकाराच्या जागा नॉर्मन लोकांस दिल्या. क्यान्टरबरीच्या आर्चबिशपच्या जागेवरसुद्धां एका नॉर्मनाची नेमणूक केली. सरदार गॉड्विन यास हें राजाचें कृत्य मुळींच आवडलें नाहीं व त्यानें नॉर्मनांची सत्ता कमी करण्याची खटपट चालविली. शेवटीं त्याच्या इच्छेवरून क्यान्टरबरीच्या नॉर्मन आर्चबिशपास रजा देण्यांत येऊन स्टिगंड नांवाच्या इंग्रज आर्चबिशपाची राजानें त्याच्या जागीं नेमणूक केली. यानंतर थोड्याच महिन्यांनीं गॉड्विन वारला व त्याचा मुलगा हॅरोल्ड हा त्याच्या जागीं सरदार होऊन सर्व राज्याचा कारभारही पाहूं लागला. या वेळीं एडवर्डचा भाचा वुइल्यम हा नॉर्मंडीचा डयूक होता. या वुइल्यमची एडवर्डच्या मनावर इतकी कांहीं छाप बसली होती कीं, १०५१ सालीं तो इंग्लंडांत आला असतां एडवर्डनें आपल्यामागून इंग्लंडची गादी त्यास मिळावी अशी व्यवस्था करण्याचें वचन दिलें. त्यामुळें वारशाच्या हक्कानेंच आपल्याला इंग्लंडची गादी मिळेल असें त्यास वाटूं लागलें. या हक्कास आणखी एका प्रसंगानें त्यानें बळकटी आणिली. एडवर्डचा कारभारी हॅरोल्ड हा एकदां फ्रान्सकडे दर्यावरून प्रवास करीत असतां त्याची बोट फुटली व तो वुइल्यमच्या हातीं लागला. तेव्हां एडवर्डच्या मागून इंग्लंडचें राजपद तुम्हास मिळवून देईन असें त्याजपासून वचन घेऊन वुइल्यमनें

त्यास सोडून दिलें. एडवर्ड हा १०६५ च्या नाताळांत वारला. इंग्लिश राजवंशांतील वारस लहान असल्यामुळें व या वेळीं नॉर्मंडीचा सरदार वुइल्यम हा इंग्लंडची गादी मिळविण्यासाठीं टपलेला आहे असें माहीत असल्यामुळें या वेळीं कर्तबगार मनुष्यच राज्यावर बसविला पाहिजे असा विचार करून हॅरोल्ड हा इंग्लिश वंशांतील असून राज्यास या नॉर्मनांच्या धाडीपासून वांचविण्यास समर्थ आहे असें पाहून विटन सभेनें एडवर्डचा ज्या दिवशीं वेस्ट मिन्स्टर मठांत दफन-विधि केला त्याच दिवशीं इंग्लंडचा राजा म्हणून हॅरोल्डच्या नांवानें द्वाही फिरविली.

**३ इंग्लंडांतील दुही.** इकडे वुइल्यमनें इंग्लंडची गादी मिळविण्याचा पक्का निश्चय केला होता. १०६६ च्या आरंभाला फ्रान्समध्यें जेथें जेथें नॉर्मन लोकांची वस्ती होती तेथून इंग्लंडवर स्वारी करण्यासाठीं त्यानें सैन्य जमा केलें व लवकरच स्वारी करण्याचा त्यानें बेत केला. पण दुर्दैवानें अशा संकटकाळींही इंग्रजांत एकी झाली नाहीं व त्यामुळें परकीय वुइल्यमचें इंग्लंड जिंकण्याचें कार्य अगदीं सुकर झालें! हॅरोल्डनें आपला भाऊ टॉस्टिग यास काढून नॉर्दंब्रिया प्रांतावर मॉर्कर यास नेमिलें होतें; टॉस्टिग हा नॉर्वेच्या राजाची मदत मिळवून नॉर्दंब्रियांतून मॉर्कर यास हाकून देण्यासाठीं त्या प्रांतावर चालून आला, व त्यानें मॉर्करचा पराभव करून त्यास दक्षिणेस हाकून दिलें. ही बातमी लागली तेव्हां वुइल्यमची स्वारी केव्हां येईल याचा नेम नव्हता तरी हॅरोल्डला उत्तरेचा बंदोबस्त करण्यासाठीं घाईघाईनें तिकडे जावें लागलें. हॅरोल्ड घाईनें कुच करून यॉर्कला पोंचला व थोड्याच वेळानें स्टॅम्फर्ड ब्रिज येथें त्याची व शत्रूची गांठ पडून १०६६ तील सप्टेंबरच्या २५ तारखेस लढाई झाली. तींत टॉस्टिग व त्याचा साहाय्यकारी नार्वेचा राजा हे दोघेही पडले. त्यामुळें बंडाचा मोड झाला व हॅरोल्डला यश आलें.

**हेस्टिंग्ज येथील लढाई**—इतक्यांत वुइल्यमची स्वारी फारच लवकर होणार अशी बातमी आल्यामुळें त्या प्रांताचा बंदोबस्त करण्यास न थांबतां हॅरोल्ड लगबगीनें दक्षिणेकडे आला. तो पोंचण्यापूर्वीच

वुइल्यम सप्टेंबरच्या २८ तारखेस पेव्हेन्से बंदरांत सुरक्षितपणें उतरून लंडनवर चाल करून येऊं लागला होता. भोंवतालचा मुलूख उध्वस्त करून वुइल्यमला उपास पाडावे व त्याला शरण यावयास लावावें असा हॅरोल्डला त्याच्या पुष्कळ मित्रांनीं सल्ला दिला, परंतु कोणाचेंही ह्मणणें न ऐकतां हॅरोल्डनें दक्षिणेकडील व पूर्वेकडील कांहीं लोक जमविले व हेस्टिंग्ज गांवाजवळच्या सेन्लॅक टेकडीवर तो वुइल्यमच्या वाटेवर तळ देऊन बसला. टेंकडीच्या अगदीं माथ्यावर हॅरोल्ड राहिला व त्याच्या-भोंवतीं खाशी फौज ढाली घेऊन सज्ज होती; व त्याच्याही खालीं इतर सैन्य होतें. इंग्रजांचें सैन्य पायदळ असून परशू व दगड हींच त्यांचीं हत्यारें होतीं. नॉर्मन लोकांकडे बरेच घोडेस्वार असून त्यांच्याकडे तिर-दाजही पुष्कळ होते. नॉर्मन घोडेस्वारांनीं जेव्हां टेकडीवर पहिला हल्ला केला, तेव्हां इंग्रजांनीं परशूचे तडाके लगावून व धोंड्यांचा वर्षाव करून तो परतविला. शिस्त, चपलाई व लष्करी शिक्षण या बाबतींत नॉर्मन सैन्याची जरी सरशी होती तरी संख्येनें इंग्रज फौज अधिक असल्यामुळें व तिला आपलें ठिकाणच धरून रहावयाचें असल्यामुळें पुनः पुनः नॉर्मनांनीं केलेले हल्ले तिनें परतविले. नॉर्मन सैन्य बरेंच जेरीस येऊन वुइल्यम मारला गेल्याचीही सैन्यांत बातमी उठली. तेव्हां वुइल्यमनें आपल्या डोकीवरचें शिरस्त्राण काढून सैन्यांत आपण जिवंत असल्याचा पुकारा केला. मग आपण पळून चाललों अशी बतावणी करण्याचा त्यानें सैन्यास हुकूम केला. त्याबरोबर नॉर्मन सैन्य पळूं लागलें. शत्रु पळतात असें पाहतांच हॅरोल्डच्या सैन्याच्या उजवीकडले लोक हुरळून गेले व शत्रूचा पाठलाग करण्यास धांवले. त्याबरोबर नॉर्मन लोक एकदम उलटले. अव्यवस्थित रीतीनें पाठलाग करावयास आलेल्या लोकांचा त्यांनीं चक्काचूर उडविला व हॅरोल्डच्या सैन्यावर उजव्या बाजूनें निकराचा हल्ला केला. तरी लढाई लवकर संपेना. तेव्हां वुइल्यमनें तीरवाल्यांस टेंकडीच्या माथ्यावर तीर सोडण्याची सूचना केली. त्यांतून एक बाण हॅरोल्डच्या डोळ्यांत शिरला व त्यानें त्याचा प्राण घेतला. हॅरोल्डचे भाऊ अगोदरच पडले होते. तेव्हां इंग्रज सेनेस पुढारीच कोणी न राहिल्या-

मुळें ती पळत सुटली, व वुइल्यमचा जय झाला. (१०६६आक्टोबर १४)

**५ विजयी वुइल्यमला राज्यप्राप्ति**—हॅरोल्ड पडल्याची बातमी कळतांच विटन सभेनें इंग्लिश राजवंशांतील एड्गर एथेलिंग यास राजपद दिलें; पण तें त्याजकडे कायम रहावें यासाठीं कांहींच तजवीज केली नाहीं. जय मिळाल्यावर वुइल्यमनें लंडनमध्यें लागलीच न जातां दक्षिणेकडील प्रांत काबीज करण्याचा उद्योग आरंभिला. या कृत्यांनीं लंडनचा समुद्राशीं संबंध तुटला तेव्हां एड्गर व त्याचे साहाय्यकारी घाबरून गेले व खुद्द एड्गरनें वुइल्यमला इंग्लंडची गादी देण्याचें कबूल केलें. मग १०६६ च्या नाताळांत वेस्ट मिन्स्टर ॲबेमध्यें वुइल्यमला राज्याभिषेक करण्यांत आला, व अशा रीतीनें इंग्लंडवर परकीय नॉर्मन राजांचा अंमल चालू झाला. अशा प्रकारें अवघ्या पन्नास वर्षांमध्यें इंग्लंड दोनदां पारतंत्र्यांत पडलें. इंग्रज लोक नादान किंवा देशभक्तिशून्य होते असें केव्हांही म्हणतां येणार नाहीं. पूर्वी ॲसन्डनच्या लढाईंत एडमंड व आतां

---

## नॉर्मन घराणें १०६६–११५४

पहिला वुइल्यम.
१०६६—१०८७

रॉबर्ट

दुसरा वुइल्यम.
१०८७–११००

पहिला हेन्री.
११००-११३५

ॲडेला (मुलगी)

मॅटिल्डा

स्टीफन
११३५-११५४

( ॲंजेव्हिन घराण्याचा पहिला राजा ) दुसरा हेन्री
११५४–११८९

हॅरोल्ड यांसारखे तेजस्वी वीर त्यांच्या पक्षाचे धुरीण होते. दोन्ही लढा-यांत इंग्रज सैन्य मोठ्या शर्थीनें लढलें. पण दोन्ही वेळां त्यांच्या बाजूस एक मोठें व्यंग होतें. तें म्हणजे त्यांच्यांतील दुही ही होय. एड्रिक, टॉस्टिग, एडविन, मॉर्कर इत्यादि लोकांची फितुरीच इंग्रजांच्या पराजयाचें खरें कारण होय, इंग्लंडांत बेकी झाली तेवढें सोडून परकीयांची इंग्लंडांत कधींही डाळ शिजली नाहीं व शिजणार नाहीं, या शेक्सपियरनें सांगितलेल्या तत्त्वाचीं हीं उत्तम उदाहरणें होत.

**६ नॉर्मन राज्यापासून फायदे**—इंग्लंडांत या वेळीं इतकी बजबजपुरी माजली होती कीं, वुइल्यमसारखा कडक, धोरणी व कर्तृत्ववान् राजा या वेळीं त्या देशावर आला ही एका दृष्टीनें बरी गोष्ट झाली असेंच म्हटलें पाहिजे. दुसरें असें कीं, नॉर्मन हे अँग्लो–सॅक्सनांप्रमाणें टयुटॉनिक वंशाचेच होते, व कांहीं दिवस जरी नॉर्मन राजे इंग्रजांशीं परकेपणानें वागले तरी हळूहळू या कुलैक्याचा जोर होऊन नॉर्मन हे इंग्रजांत मिसळून गेले व आजचें इंग्रज राष्ट्र म्हणजे या दोन्ही जातींच्या मिश्रणानेंच झालें आहे. नॉर्मन लोक फ्रान्सांत रहात असल्यामुळें इंग्लंडचें युरोपशीं आजपर्यंत जितकें दळणवळण असे, त्याहून यापुढें तें वाढलें. आणि याचा परिणाम इंग्रजी भाषेवरही झाला; त्या भाषेंत पुष्कळ फ्रेंच शब्द प्रत्यक्ष किंवा परंपरेनें शिरून त्या भाषेला विशेषच प्रौढता आली. इंग्लंड हें एकाकी बेट पडलें होतें ती स्थिति पालटून रोमन साम्राज्यांत शिरल्यामुळें पूर्वी जसा युरोपियन सुधारणेशीं इंग्लंडचा संसर्ग घडला तशीच या वेळींही स्थिति झाली.

**७ इंग्रजांचे स्वातंत्र्याकरितां प्रयत्न**––हें परकीय राज्य इंग्रजांनीं एकदम मान्य केलें नाहीं. पश्चिम इंग्लंडांत व उत्तर इंग्लंडांत सॅक्सन लोकांनीं पुनः पुनः बंडें केलीं. परंतु वुइल्यमनें जबरदस्तीनें त्यांचा वेळींच मोड केला. शेवटीं उत्तरेकडे तर त्यानें मुलूख जाळून पोळून उध्वस्त केला, तेव्हां हीं बंडें पुरीं मोडलीं (१०७०). त्यानें बंडखोरांच्या जमिनी जप्त केल्या व आपल्या नॉर्मन सरदारांत वांटून

दिल्या. परकीय वुइल्यमशीं झगडणाऱ्या या कर्तबगार पुरुषांत प्रमुख म्हटला म्हणजे देशभक्त हिअरवर्ड दी सॅक्सन हा होय. त्यानें दलदलीच्या इलाय बेटांत एक लांकडी किल्ला बांधिला व नॉर्मनांशीं स्वदेश-रक्षणार्थ झगडणाऱ्या लोकांचें इलाय हें आश्रय-स्थानच बनून गेलें. वुइल्यमनें हिअरवर्डला पकडण्यासाठीं हरप्रयत्न केले, पण ते सर्व व्यर्थ जाऊन इलाय बेट हातीं येणें अशक्य असें त्यास वाटूं लागलें. वुइल्यमच्या अनुयायांपैकीं एकानें असें म्हटलें आहे कीं, हिअरवर्डसारखे जर आणखी तीन देशभक्त इंग्लंडला या वेळीं लाभले असते तर नॉर्मनांचा विजय होऊन इंग्लंडला स्वातंत्र्यास मुकावें लागलें तसा कदापिही प्रसंग आला नसता ! पण वुइल्यमचें नशीब जोरावर असल्यामुळें इलाय येथील कांहीं मठवाश्यांस हिअरवर्डचा घात करण्याची बुद्धि झाली व त्यांनीं त्याच्या किल्ल्याची वाट विश्वासघातानें वुइल्यमास दाखवून दिली व हिअरवर्ड वुइल्यमच्या हातीं आला (१०७१). यानंतर नॉर्मनांशीं विरोध करणारा कोणीही वीरपुरुष निघाला नाहीं व नॉर्मन राज्यसत्ता दृढमूल झाली.

**८ सरंजामी पद्धतीची स्थापना**—इंग्लंडमध्यें सरंजामपद्धति ( feudalism ) ढोकळमानानें पूर्वीं होती हें आपण पाहिलेंच आहे. परंतु वुइल्यमनें युरोपांतल्याप्रमाणें व्यवस्थितपणें आतां ती पद्धति इंग्लंडांत सुरू केली. त्यानें सर्व जमीन राजाची असें जाहीर केलें. तिच्यापैकीं कांहीं भाग ' राजाची जमीन ' म्हणून पूर्वींप्रमाणें स्वतःकडे राखिला. ज्या इंग्रजांनीं त्याची सत्ता मान्य केली त्यांच्या जमिनी त्यांजकडेच सोंपविल्या. बंडखोरांची जमीन मात्र जप्त करून नॉर्मन अनुयायांत त्यानें वांटून दिली. ही जमीन घेतांना प्रत्येक सरदारास कांहीं अटी कबूल कराव्या लागत. पहिली गोष्ट ही कीं, गुडघे टेकून राजाबद्दल राजनिष्ठा त्याला विधिपूर्वक प्रदर्शित करावी लागे. दुसरें असें कीं, लढाईच्या प्रसंगीं राजानें हुकूम केल्याबरोबर आपण आपणाकडे नेमून दिली तितकी फौज घेऊन राजाच्या वतीनें लढण्यास तयार राहूं, अशीही त्यास शपथ घ्यावी लागे. हे सरदार लोक आपल्याला मिळालेल्या जमिनीपैकीं

कांहीं स्वतःकडे ठेवून बाकीची खालच्या गरीब जमीनदारांस अशाच त्यांच्याकडून शपथा घेऊन वांटून देत. त्यांच्याकडून त्याहूनही खालच्या दर्जाच्या लोकांस त्या मिळत. अशा रीतीनें वरपासून खालपर्यंत आपल्या कुळास लष्करी चाकरीबद्दल बांधून घेऊन जमीन देण्याची वहिवाट पडली. परंतु ही पद्धति सरदाराच्या सत्तेवर कोणताही आळा न घालतां अमलांत आणिली तर कसे अनर्थ उद्भवतात हें वुइल्यमनें फ्रान्सांत पाहिलें होतें. तो स्वतः नॉर्मंडीचा डयूक असल्यामुळें फ्रेंच राजाचा मांडलिक सरदार होता, तथापि आपल्या मुलुखांत स्वतंत्रेनें वागण्याची त्याला संवय लागून गेली होती. असे जर सरदार वागूं लागले तर राजाची सत्ता नामधारी होऊन बसते असा त्याचा अनुभव होता. याकरितां इंग्लंडांत एकाच सरदारास मोठमोठे प्रांत तोडून द्यावयाचे नाहींत व एकाद्या सरदाराची वांटणी जरा मोठी झाली असें वाटल्यास त्यास ती एका ठिकाणीं न देतां कांहीं भाग एका ठिकाणीं तर राहिलेला दुसऱ्याच ठिकाणीं असें करावयाचें, या बाबतींत वुइल्यमनें दक्षता ठेविली. आतां डरहॅम, चेस्टर, व कैंट या तीन परगण्यांच्या सरदारांच्या पॅलॅटिनेट काउन्टीज राखून त्यांच्या हातीं त्यानें विशेष सत्ता ठेविली ही गोष्ट खरी, परंतु तिन्ही परगणे स्कॉटलंड, वेल्स व फ्रान्स या शत्रूंच्या राज्यांलगत असल्यामुळें शत्रूवर दडपण ठेवण्यासाठींच त्यानें ही व्यवस्था केली होती. अशा रीतीनें सरदारांच्या सत्तेवर योग्य आळा ठेविल्यामुळें इंग्लंडचें एक राष्ट्र बनण्यास फारच उपयोग झाला व इंग्लिश राजसत्ता फ्रान्सांतल्याप्रमाणें दुर्बळ झाली नाहीं.

---

अगदीं खालच्या टोंकास जमिनीवर राबणारीं कुळें असत. त्यांनीं आपली जमीन करावी व आठवड्यातून कित्येक दिवस सरदारानें स्वतःकडे राखिलेल्या जमिनीवर काम करावें अशी व्यवस्था असे. हीं कुळें लष्करी चाकरीबद्दल बांधलीं नसत. यांची स्थिति कष्टाची असून त्यांना गुलामवर्ग ( villeinage ) म्हणत, व जित इंग्रजांतून या वर्गाची भरती झाली होती.

**९ वुइल्यमची दूरदृष्टि**—सर्व राष्ट्रावर राजाची छाप पडून सरदारांच्या प्राबल्यानें देशाचे तुकडे पडूं नयेत म्हणून वुइल्यमने दुसऱ्याही युक्त्या अंमलांत आणिल्या. वुइल्यमनें १०८६ त सर्व राज्यांतील मोजणी करविली, त्या वेळीं जमिनीची किंमत, तिचा मालक, त्याचीं गुरें, घरें वगैरे वाबींची नोंद करण्यांत आली. त्याचप्रमाणें सॅलिस्बरी येथें सरदार व त्यांचीं मुख्य मुख्य कुळें या सर्वांची सभा भरविली. तींत सुमारें साठ हजार लोक जमले होते. तेथें वुइल्यमनें सरदारांकडून व त्यांच्या कुळांकडून राजनिष्ठेच्या शपथा घेवविल्या. त्यामुळें इंग्लंड हें एक राष्ट्र असून सरदारांहून राजाचा आपणावर अधिक हक्क आहे याची प्रत्येक जमीनदार कुळास जाणीव उत्पन्न झाली व प्रसंग पडल्यास सरदाराविरुद्ध कां होईना पण आपणास राजाच्याच बाजूनें लढलें पाहिजे, हेंही त्यास कळून आलें. वुइल्यमनें आपल्या राज्याची बळकटी राखण्यासाठीं बरेच किल्ले बांधिले. त्यांत लंडनचा टॉवर प्रमुख आहे. या किल्ल्यांच्या आंत बळकट बालेकिल्ले असून भोंवतीं ठिसूळ दगडाच्या किंवा लाकडाच्या लहान लहान इमारती असत. शत्रूकडून यांचा पाडाव झाल्यावर मग बालेकिल्ल्यांवर धाड यावयाची. ते बालेकिल्ले इतके बळकट केले होते कीं, आंतील सैन्यास उपासमारीशिवाय अन्य कारणानें शत्रूस शरण जाण्याची भीतिच नसे. येणेप्रमाणें वुइल्यमनें इंग्लंडवर स्वारी करून बळकट राज्याची स्थापना केली. पुढें पुढें नॉर्मन सरदारांनीं बंडें केलीं व वुइल्यमच्या मुलांनीं तंटे माजविले. परंतु वुइल्यम शूर व खबरदार असल्यामुळें कोणाचें कांहीं चाललें नाहीं. वुइल्यम १०८७ त वारला. त्याला शिकारीचा बराच नाद असल्यामुळें त्यानें शिकारीसाठीं 'न्यू फॉरेस्ट' (नूतन अरण्य) राखावयाचें म्हणून ९०,००० एकर जमीन हॅम्पशायर परगण्यामध्यें पड पाडिली, व आपल्यालाच केव्हां झालें तरी शिकार मिळावी या उद्देशानें जो कोणी मनुष्य हरिण मारील त्याचे डोळे काढण्यांत येतील असें त्यानें फर्माविलें. असल्या कडक कायद्यांनीं लोक अगदीं त्रासून गेले; तथापि त्याच्या कडक अंमलानें सरदारांचें बंड पुष्कळ शमलें आणि देशांत शांतता नांदूं लागली. त्यानें

ज्यू व फ्लेमिंग ( फ्लँडर्समधील लोक ) यांस इंग्लंडांतील मोठमोठ्या शहरांत राहण्यास परवानगी दिली व अशा रीतीनें अप्रत्यक्षपणें इंग्लिश व्यापारास व उद्योगधंद्यांस उत्तेजन दिलें.

---

## ६ दुसऱ्या हेन्रीची चोख व्यवस्था.

**१ सरदारांचें प्राबल्य**–१०६६ पासून इंग्लंडच्या इतिहासाच्या नवीन भागास सुरवात होते. नॉर्मन वुइल्यम इंग्लंडवर स्वारी करून आला त्यानें तेथें कायमची वस्ती केली, व इंग्लंडांत जोरदार एकछत्री सत्ता स्थापिली. तथापि त्याला या कामीं सरदारांची मदत घेणें जरूर पडलें. शिवाय त्या वेळची समाजरचना, युद्धरीति व इतर देशांतील रिवाज यामुळें सरदार लोक बलिष्ठ असत. राजास परदेशाशीं युद्ध करितांना काय किंवा देशांत शांतता राखतांना काय सरदारवर्गाशीं गोडी गुलाबीनें वागून हीं कामें पार पाडावीं लागत. ही स्थिति १४८५ पर्यंत टिकली. तेव्हां ( १०६६-१४८५ ) या कालविभागांत सरदारवर्गच प्रमुखत्वानें वावरतांना आपल्याला दिसेल. एकादा कर्तबगार राजा असला कीं नमतें घेऊन दिवस काढावे, पण त्याच्या जागीं दुर्बळ राजा आला कीं त्यास त्राहि त्राहि करून सोडावें, केव्हां सामान्य जनांची कड घेऊनही राजे लोकांशीं तंटा करावा तर केव्हां केव्हां परदेशाशीं युद्ध सुरू असतां शौर्य गाजवून धन व कीर्ति यांची पैदास करावी, कोठेंच युद्ध नसलें तर स्वदेशांतच दोन राजघराण्यांत फूट पाडून यादवी माजवावी व आपला रणकंडु शमवावा, असे नाना प्रकारचे डाव खेळण्यांत सरदार वर्ग चूर झालेला आपल्याला आढळेल. या भागाच्या शेवटीं मात्र यादवी माजवून सरदारांनीं आपला नाश करून घेतला ( १४८५ ), व त्यामुळें सरदार वर्गाच्या सत्तेचा तेव्हां अंत झाला.

**२ दुसऱ्या वुइल्यमची कारकीर्द**—पहिल्या वुइल्यमच्या मागून त्याचा दुसरा मुलगा वुइल्यम हा इंग्लंडचे गादीवर आला. त्यानें तेरा वर्षें राज्य केलें ( १०८७—११०० ). त्या वेळांत नॉर्मन सरदार राजसत्तेस धाब्यावर बसविण्याचा सारखा प्रयत्न करीत होते. त्यांस त्यानें बरेंच ताब्यांत ठेविलें. पण तो अत्यंत द्रव्यलोभी होता. संभाजीचा जसा कलुशा तसा त्याचा फ्लॅम्बर्ड नांवाचा दुष्ट मंत्री होता; त्याच्या साहाय्यानें कोणताही अधिकारी नेमावयाचा झाला कीं लांच घ्यावयाचा, शिवाय जागा पुष्कळ दिवस रिकाम्या ठेवूनही पैसे मिळवायाचे असा क्रम वुइल्यमनें चालविला. क्यान्टरबरीचा आर्चबिशप लॅन्फ्रॅंक हा वारल्यानंतर त्याची जागा बरींच वर्षें रिकामी ठेवून राजाच उत्पन्न खाऊं लागला. पुढें वुइल्यम आजारी पडला. तेव्हां क्यान्टरबरीची जागा रिकामी ठेविल्यामुळें हें दुखणें आपल्याला आलें असें वाटून त्यानें शीलवान् व विद्वान् अशा ॲन्सेम नांवाच्या इसमास त्या जागेवर नेमिलें. परंतु पुढें बरा झाल्यावर लांचाचें बोलणें काढिलें. ॲन्सेम कांहीं केल्या कबूल होईना; तेव्हां राजानें त्याला हद्दपार केलें. दुसरा वुइल्यम न्यु फॉरेस्टमध्यें शिकार करीत असतां कोणी डाव धरून त्याला ठार मारिलें ( ११०० ).

**३ पहिल्या हेन्रीची सनद**—नंतर त्याचा धाकटा भाऊ हेन्री हा गादीवर बसला. त्यानें गादीवर येतांच लोकांना एक सनद दिली. धर्मखात्याच्या हक्कांत आपण ढवळाढवळ करणार नाहीं, सरदार व जमिनदार यांचे हक्क आपणास मान्य आहेत व साधु एडवर्डच्या वेळच्या इंग्लिश चालीरीति आणि कायदे तसेच पुढें चालविण्यांत येतील, अशीं अभिवचनें तींत होतीं. ही सनद म्हणजे पुढें जॉनच्या काळीं जी लोकसत्तेचा आधारस्तंभ अशी मोठी सनद ( मॅग्नाचार्टा ) लोकांनीं मिळविली तिचें पूर्व चिन्हच होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ही सनद लोकांस सुखासुखीं मिळाली असें नसून हेन्रीचा वडील भाऊ रॉबर्ट हा जिवंत असल्यामुळें आपण गादीवर टिकूं कीं नाहीं याची हेन्रीस शंका होती. व अशा वेळीं राजसत्तेवर आळा पडला तरी लोकांस हक्कांचें दान करून

खूष करण्यांतच आपला निभाव आहे, हें त्यानें ओळखिलें आणि सनद देऊन लोकप्रियता संपादन केली. या राजासंबंधानें एक मुख्य गोष्ट अशी कीं, त्याचा जन्म इंग्लंडांत झाला असून तो इंग्लिश लोकांत वाढला होता व इंग्लिश राजवंशांतील शेवटला पुरुष जो एड्गर एथेलिंग याची भाची मॅटिल्डा ( स्कॉटलंडच्या राजाची मुलगी ) हिशीं त्यानें विवाह करून नॉर्मन राजवंश व इंग्लिश राजवंश यांचें ऐक्य केलें; त्यामुळें इंग्रज लोकांना त्याच्यासंबंधीं स्वत्व वाटावयास लागून त्यांचें समाधान झालें.

**४ हेन्रीचीं रॉबर्टशीं व पोपशीं भांडणें.**—हेन्रीचा वडील भाऊ रॉबर्ट यास पहिल्या वुइल्यमच्या व्यवस्थेप्रमाणें नॉर्मंडी प्रांत मिळाला होता; परंतु लवकरच तो आपला धाकटा भाऊ दुसरा वुइल्यम याजकडे त्यानें गहाण टाकिला व कर्ज काढून तो पहिल्या धर्मयुद्धाकरितां जेरुसलेमकडे गेला. पुढें तो परत आला व हेन्रीशीं इंग्लंडच्या राज्यासाठीं भांडूं लागला. दोन्ही भावांत सारखा तंटा चालला होता, शेवटीं टेन्शिब्राई येथें ( ११०६ ) लढाई होऊन रॉबर्ट हेन्रीच्या हातीं सांपडला; यापुढें तो कैदेंत पडला व हेन्री पहिल्या वुइल्यमप्रमाणें इंग्लंड व नॉर्मंडी या दोन्ही देशांचा कारभार पाहूं लागला. धर्मासंबंधीं बिशप कोणीं नेमावयाचे ? राजानें कीं पोपनें हा इंग्लंडचे राजे व पोप यांच्यांत वादाचा मुद्दा असून पुष्कळ वर्षेंपर्यंत या संबंधीं कटकट चालली होती. हेन्रीनें समेटाचें धोरण अंगिकारून या वादाचा निकाल लाविला. आंगठी व दंड हीं धर्मचिन्हें बिशपच्या हातीं देऊन त्याची विधिपूर्वक नेमणूक पोपनें करावी, पण राजानें धर्मखात्याकडे ज्या जमिनी चालविलेल्या असतात त्याजबद्दल राजनिष्ठेची शपथ राजापुढें वाहून धर्मगुरूनें इतर जमीनदारांप्रमाणें राजाचें स्वामित्व कबूल करावें असें ठरलें.

**५ स्टीफन**—हेन्री ११३५ त वारला. त्यानें आपल्यामागें आपली मुलगी मॅटिल्डा हीस गादीवर बसविण्याविषयीं सरदार लोकांकडून शपथा घेवविल्या होत्या. परंतु स्त्रीराज्याची कल्पना लोकांस न पटून पहिल्या वुइल्यमच्या मुलीचा मुलगा स्टीफन हाच गादीवर आला. पण स्टीफन कर्तृत्ववान् नसल्यामुळें मॅटिल्डाचा एक पक्ष व स्टीफनचा दुसरा

पक्ष, असे सरदारांत पक्षभेद होऊन देशांत यादवी माजली. या संधीपासून लाभ करून घेण्याकरितां सरदारांनीं ठिकठिकाणीं किल्ले बांधिले व राजसत्ता अगदीं दुबळी झाली. शेवटीं ११५३ सालीं वॅलिंगफर्ड येथें तह ठरून त्यांत मॅटिल्डाचा मुलगा हेन्री यास स्टीफनच्या मृत्यूनंतर गादी मिळावी असा ठराव झाला. पुढें एक वर्षानेंच स्टीफन वारला, व दुसरा हेन्री गादीवर आला ( ११५४ ).

**६ धर्मगुरूंची चौकशी**—दुसरा हेन्री हा फ्रान्समधील अॅन्जू

---

**१ अँजेव्हिन घराणें ११५४–१३९९.**

दुसरा हेन्री. ११५४–११८९

पहिला रिचर्ड ११८९–११९९ | जॉन ११९९–१२१६

तिसरा हेन्री १२१६–१२७२

पहिला एडवर्ड १७७२–१३०७

दुसरा एडवर्ड १३०७–१३२७

तिसरा एडवर्ड १३२७–१३७७

एडवर्ड ( ब्लॅक प्रिन्स ) | जॉन ऑफ गॉंट

दुसरा रिचर्ड १३७७–१३९९ | चौथा हेन्री (पहिला लँक्यास्टर राजा)

प्रांताच्या सरदाराचा मुलगा होता. त्यावरून ११५४ पासून जें घराणें इंग्लंडवर राज्य करूं लागलें त्यास अॅन्जेव्हिन म्हणतात. या घराण्याचा अंमल ११५४ ते १३९९ पर्यंत, म्हणजे सुमारें अडीचशें वर्षे होता. हेन्री कर्तबगार असून त्यानें राज्यकारभारांत पुष्कळच सुधारणा केल्या; परंतु त्या सांगण्यापूर्वी त्याचा धर्मखात्याशीं झालेला तंटा व त्याला आलेलें काव्यमय स्वरूप यांचें अगोदर कथन केलें पाहिजे. धर्मगुरूंची चौकशी सामान्य लोकांच्या कोर्टांत न होतां धर्मकोर्टें निराळीं असत, त्यांच्याच-पुढें धर्मगुरूंची चौकशी व्हावयाची असा नियम होता. त्यामुळें त्यांस योग्य शिक्षा न मिळतां अगदीं थोड्या शिक्षेवर त्यांची सुटका होत असे. हा अन्याय हेन्रीला सहन न होऊन त्यानें स्वतंत्र धार्मिक कोर्टांपुढें चौकशी केली जाण्याचा धर्मगुरूंचा हक्क काढून घेऊन निदान महत्वाच्या गुन्ह्याचा आरोप त्यांजवर आला असतां त्यांची चौकशी सामान्य कोर्टांत व्हावी अशी व्यवस्था करण्याबद्दल खटपट चालविली.

**७ थॉमस ए बेकट**—इतक्यांत या प्रकरणांत पोपकडून आपल्या बाजूचा निकाल करून घेण्यास हेन्रीस एक चांगलीच संधि मिळाली. क्यान्टरबरीचा आर्चबिशप वारला. हेन्रीनें त्याच्या जागीं आपल्या मर्जी-तील एका इसमाची नेमणूक करण्याचें ठरविलें. हा इसम म्हटला म्हणजे थॉमस ए बेकेट हा होय. हा एका श्रीमंत व्यापाऱ्याचा मुलगा असून मोठा हुशार होता. त्याला फ्रान्समध्यें चांगलें शिक्षण मिळालें होतें. त्याची हुशारी व विद्वत्ता पाहून क्यान्टरबरीच्या आर्चबिशपनें त्याला चर्चमध्यें नोकरीस घेतलें. तेथें त्याच्या बुद्धिमत्तेचें तेज पडून तो लवकरच वैभवास चढला. त्यावेळीं हुशार व विद्वान लोकांचा भरणा बहुतेक धर्म-खात्यांतच असे. तेव्हां राजास जर शहाणा मंत्रि नेमावयाचा झाला तर धर्मखात्यांतील हुशार मनुष्यच निवडणें भाग पडे. हेन्रीनें बेकेटला चॅन्सेलर ( दिवाण ) ची जागा दिली. त्याची बेकेटवर पूर्ण मर्जी बसून तो त्याचा उजवा हात झाला. अशा प्रकारच्या वैभवास चढल्यावर

बेकेटची रहाणी उच्च दर्जाची व डामडौलाची होऊन त्याचें वर्तन रंगेल व चैनीचें झालें. तेव्हां या आपल्या गुलहौशी मंत्र्यास जर आपण क्यांटरबरीचा आर्चबिशप केलें तर धर्मगुरूंच्या कोर्टांचा अधिकार कमी करून टाकण्याचा आपला बेत सफल होण्यास पुष्कळ मदत होईल असें हेन्रीस वाटलें, व त्यानें बेकेटला क्यांटरबरीच्या आर्चबिशपची जागा मिळवून दिली. परंतु ती जागा मिळतांच बेकेटच्या वर्तनांत एकदम अत्यंत फरक पडला; त्यानें चैनीची रहाणी सोडून तो एकाद्या जोग्याप्रमाणें राहूं लागला, व राजाज्ञेपेक्षां धर्माज्ञा पाळण्यांतच अधिक पुण्य आहे व तसें करणें आपलें कर्तव्य आहे, अशी त्याची भावना झाल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. हेन्रीनें जेव्हां धर्म–कोर्टांची सत्ता कमी करण्याचें काम त्यास सांगितलें तेव्हां राजास विरोध करण्यास त्यानें सुरवात केली.

८ **क्लॅरेण्डनचे नियम व बेकेटचा खून**—यापुढें सामोपचारानें होत नाहीं तर जबरीनें धर्माधिकाऱ्यांस नमविण्याचा हेन्रीनें निश्चय केला. त्यानें ११६४ सालीं देशांतील बड्या लोकांचें एक कौन्सिल क्लॅरेण्डन येथें बोलाविलें. त्या कौन्सिलनें एक सोळा कलमांचा तक्ता तयार केला; त्यापैकीं एका कलमानें कांहीं कांहीं गुन्ह्यांच्या खटल्यांत धर्मगुरूंची सामान्य कोर्टांतच चौकशी झाली पाहिजे असें ठरविण्यांत आलें. त्याशिवाय जे खटले धार्मिक कोर्टांत चालावयाचे ते नीट चालविले जातात कीं नाहीं हे पाहण्यासाठीं तपासनीस नेमण्याचा ठराव झाला. सरकारी कामगार व राजाचे हस्तक यांना राजाच्या संमतीशिवाय धर्मगुरूंनीं बहिष्कृत करावयाचे नाहीं, असाही एक नियम होता. क्लॅरेण्डन येथें केलेल्या या नियमांना नाइलाज म्हणून बेकेटनें पहिल्यानें संमति दिली. पण त्याप्रमाणें आचरण करण्यास मात्र तो अळंटळं करूं लागला. तेव्हां हेन्री व त्याचे अनुयायी क्षुब्ध झाले, व बेकेट पकडला जाणार असा रंग दिसूं लागला. इतक्यांत गुप्त रीतीनें बेकेट युरोपांत पळून गेला व भांडण लांबणीवर पडलें. बेकेट युरोपांत असतांना हेन्रीनें आपला वडील मुलगा हेन्री याचा आपल्या मागून गादीवरचा हक्क दृढ करण्याकरितां त्यास यौवराज्याभिषेक करण्याचें ठरवून यॉर्कच्या आर्चबिशपच्या हस्तें

तो विधि उरकून घेतला. पुढें ११७० सालीं हेन्री व बेकेट यांचा पोपच्या मध्यस्थीनें समेट होऊन बेकेट इंग्लंडांत परत आला. पण हेन्रीशीं ऐक्य करावें असें बेकेटला अन्तःकरणापासून वाटत नव्हतें, असें दिसतें. त्यानें परत येतांच यौवराज्याविधि नियमास सोडून केल्याबद्दल यॉर्कच्या आर्चबिशपला बहिष्कृत करण्याचें ठरविलें. त्याचप्रमाणें पुष्कळ राजपक्षीयांनाही तसेंच बहिष्कृत करण्याचा त्यानें घाट घातला. यावेळीं हेन्री फ्रान्सांत होता. जेव्हां त्यास ही बातमी समजली तेव्हां तो बोलला, " काय ? मजपाशीं इतके नोकर असतां मीं गरिबीपासून वर चढविलेल्या ह्या पोरानें माझा छळवाद आरंभिला असतां कोणीच मला याच्या त्रासापासून मुक्त करूं शकत नाहीं काय ? " हेन्रीचे हे शब्द ज्या सेवकांच्या कानीं पडले त्यांत बेकेटचे चार शत्रु होते. त्यांनीं आपल्या दुस्मानाचा पुरा सूड उगविण्यास ही संधि बरी आहे असें पाहिलें. ते ताबडतोब इंग्लंडला गेले व क्यांटरबरी येथील धर्ममंदिरामध्यें (क्याथीड्रल) त्यांनीं बेकेटचा खून केला ( ११७० डिसेंबर ). या भयंकर कृत्यामुळें सर्व लोक बेकेटचे दोष विसरले व चोहोंकडून त्याजबद्दल सहानुभूतिपर उद्गार निघूं लागले. परंतु हेन्रीच्या अंगीं मुत्सद्देगिरी विशेष असल्यामुळें देशाच्या शांततेंत बिघाड झाला नाहीं. हेन्रीनें पड खाण्याचें धोरण स्वीकारून पोपकडे आपल्याला पश्चात्ताप होत आहे व आपल्याला पापमुक्त करावें अशी विनंति केली. लोकांचें समाधान व्हावें म्हणून क्यान्टरबरीच्या देवळांत तो पायीं गेला व आपल्या अंगावर त्यानें फटके मारून घेतले ! अशा घोर रीतीनें या प्रकरणाचा अंत झाला; तेव्हां खरा भांडणाचा मुद्दा मागें पडला ही गोष्ट खरी. तथापि क्लॅरेण्डन येथील नियमांचा अंमल होत नसला तरी ते तत्वतः मान्य झाले असल्यामुळें धर्मगुरूंच्या हालचालीवर राजसत्तेचा पगडा बसविण्याचा हेन्रीचा उद्देश बराच सफल झाला, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

९ **दुसऱ्या हेन्रीची सैन्यव्यवस्था**—नॉर्मन घराण्यांतील शेवटचा राजा स्टीफन याच्या कारकिर्दींत सरदार लोकांची सत्ता फारच वाढली होती. हेन्रीनें या सरदार लोकांस कह्यांत आणण्यासाठीं बरीच

खटपट केली. स्टीफननें राजाच्या खाजगत जमिनी देऊन कांहीं नवे सरदार लोक बनविले होते. हेन्रीनें त्या जमिनी परत घेतल्या व सरदारांनीं बांधिलेले किल्ले पाडून टाकिले. सरंजामी पद्धतीप्रमाणें सरदारांना जमिनीचा मोबदला, पांच हाईड जमिनीबद्दल एक, या हिशेबानें चिलखत घातलेले घोडेस्वार ( नाईट ) लढाईच्या वेळीं चाळीस दिवसपर्यंत हजर करूं, असा ठराव करून द्यावा लागत असे. पण त्यांत राजांस सरदारांच्या इमानावर भिस्त ठेवावी लागे. तेव्हां हेन्रीनें या पद्धतीला हळू हळू रजा देऊन जमिनीबद्दल पैसेच घ्यावयाचे, असा प्रघात सुरू केला. पहिल्यानें धर्मगुरूंच्या जमिनीबद्दल सैन्याऐवजीं कर घेण्याची ही व्यवस्था अंमलांत आली ( ११५६ ). पुढील सालीं दक्षिण फ्रान्सांत जाण्याचें हेन्रीस कारण पडलें व "नाईट" परदेशी जाण्यास तयार होईनात; तेव्हां त्यांजपासून एक एका माणसाच्या बदली ( २६ शिलिंग ८ पेन्स ) त्यानें घेतले. अशा रीतीनें जमलेल्या ८०,००० पौंडांच्या रकमेवर त्यानें फौज उभारली. या नव्या व्यवस्थेनें सरदार लोक इतरांप्रमाणें कर देऊन शांततेचे उद्योग करूं लागले; व त्यामुळें त्यांची रणकंडु बरीचशी कमी होऊन राजसत्तेचें प्राबल्य अधिकच वाढलें. हेन्रीनें देशांत स्वयंसैनिकांची ( Militia ) परंपरा चांगली जागृत ठेविण्याचा प्रयत्न केला. ११८१ त प्रत्येक स्वतंत्र नागरिकानें उत्तम सुधारलेलीं हत्यारें आपल्यापाशीं बाळगलीं पाहिजेत व तीं केव्हांही विकावयाचीं किंवा गहाण ठेवावयाचीं नाहींत, असा निर्बंध करण्यांत आला. या स्वयंसैनिकांचा परगण्यांत शांतता राखण्यासाठीं शेरीफला[1] उपयोग होत असून देशावर स्वारी झाल्यासही ते उपयोगीं पडत.

---

१ अँग्लो-सॅक्सन लोकांची इंग्लंडांत जसजशी वसाहत होऊं लागली तसतसे देशाचे निरनिराळे शायर ( परगणे ) पडले. या परगण्यांत राजाचा मुख्य अधिकारी असे. त्याचें नांव शायर-रीव्ह-शेरीफ-म्हणजे परगण्याचा अधिकारी. तो राजप्रतिनिधि या नात्यानें वागत असून करवसुली व कायद्यांची अंमलबजावणी करणें हीं त्याचीं मुख्य कामें होतीं. पुढें नॉर्मन राजांनीं सरदारांची सत्ता मर्यादित करण्याचे हेतूनें शेरीफ

**१० दुसऱ्या हेन्रीची न्यायव्यवस्था**—हेन्रीनें न्याय देण्याच्या कामांतील सरदारांची सत्ताही पुष्कळ कमी केली. आजपर्यंत शायरमूटमध्यें न्यायाचें काम चालत असून परगण्यांतील सरदार, बिशप, शेरीफ इत्यादि लोकांच्या नेतृत्वाखालीं त्या भरत. या व्यवस्थेनें न्यायाचें काम बहुतेक सरदारांच्या हातीं राही. पहिल्या हेन्रीनें देशाचे कांहीं भाग पाडून फिरते न्यायाधीश नेमिले होते. हीच व्यवस्था पूर्णत्वास नेऊन दुसऱ्या हेन्रीनें देशाचे सहा भाग पाडून त्यांजवर कायमचे फिरते *न्यायाधीश नेमिले. त्यांनीं आपआपल्या भागांत फिरून लोकांस

---

व काउन्टी–मूट या अँग्लो–सॅक्सन पद्धति कायम राखून दृढ केल्या. दुसऱ्या हेन्रीनें फिरते न्यायाधिश नेमिले तेव्हां व त्यानंतर चौदाव्या शतकांत प्रत्येक परगण्यांत शांतता राखणारे अधिकारी ( Guardians of the peace ) नेमण्यांत आले, तेव्हां शेरीफच्या सत्तेस बराच धक्का बसला. तथापि राजाचे फिरते न्यायाधीश येतील तेव्हां त्यांच्या कामाची तयारी ठेविणें व त्यांच्या हुकुमाची अंमल–बजावणी करणें हीं कामें अद्यापही त्यास करावीं लागतात. शिवाय प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धतीमुळें दुसरें एक काम शेरीफकडे आलें आहे. परगण्यांतून पार्लमेंटास जे सभासद निवडून जावयाचे, त्यांच्या निवडणुकीची सर्व व्यवस्था शेरीफच पाहतो.

* जेव्हां हे न्यायाधीश एखाद्या ठिकाणीं जात तेव्हां गुन्हेगारांस न्यायाधिशापुढें चौकशीसाठीं आणून उभे करण्याचें काम तेथील सोळा प्रतिष्ठित गृहस्थांकडे असे. या व्यवस्थेपासूनच हल्लींची ‘ ग्रॅण्ड ज्यूरी ’ निघाली आहे, तिजमध्यें बारापासून तेवीसपर्यंत इसम असून त्यांजकडे एखाद्या गुन्हेगारावरील आरोपांचा विचार करून कोर्टापुढें खटला भरावयाचा कीं नाहीं हें ठरविण्याचें काम असतें. इ. स. १२१५ त पोप तिसरा क्लेमंट यानें दिव्यें बंद केली व मग गुन्ह्यांची रीतसर चौकशी करण्याची पद्धति अंमलांत आली. तेव्हां साक्षीदार येऊन त्यांच्या साक्षी होत, त्यांसही ज्यूरीच म्हणत. पण पुढें न्यायाधीशास मदत म्हणून कांहीं

कायद्याप्रमाणें न्याय द्यावा अशी व्यवस्था झाली. शिवाय सॅक्सन लोकांच्या वेळची विटन सभा नॉर्मन राजे झाल्यावर बंद पडली होती. तिच्या जागीं सरदार लोकांचें एक मंडळ भरवावयाचें ठरलें असून राजे लोक केव्हां केव्हां त्याचा सल्ला विचारण्याकरितां त्या मंडळास बोलावीत. या मंडळाला "ग्रेट कौन्सिल" म्हणत. पण यांतील सर्व लोक नेहमीं येत नसल्यामुळें राजाचा चॅन्सेलर (शिक्का मोर्तब बाळगणारा अधिकारी) खजिनदार ( treasurer ),मुख्य न्यायाधीश ( justiciar ), मार्शल

---

गृहस्थ पंच म्हणून बसत; व न्यायाधीश व हे गृहस्थ या दोघांपुढें मिळून खटला चाले. याच गृहस्थांस ज्युरी हें नांव पडलें व तें आजपर्यंत चालू आहे. हल्लीं साक्षीदारांस कोणी ज्यूरी म्हणत नाहीं हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे. हीस ग्रॅण्ड ज्यूरीपासून तिचें विशिष्टत्व दर्शविण्यास 'पेटी ज्यूरी' असेंही म्हणतात, हें सर्व फौजदारी खटल्याविषयीं झालें. दिवाणी खटल्यांतही न्यायाधीश व पंच मिळून दावे चालविण्याची पद्धत दुसऱ्या हेन्रीनें सुरू केली. हीच "दिवाणी पंचायत" ( civil jury ) होय.

१ हाच नॉर्मन राजे व पहिले ॲन्जेव्हिन राजे यांचे काळीं राज्यांतील मुख्य मंत्रि असे. राजप्रतिनिधि म्हणून तोच कामें करीत असून राजा गैरहजर असतां क्यूरिया रेजिसमध्यें तोच अध्यक्ष होत असे. न्यायाचेंच काम त्याजकडे पुढें आलें व आजचा सर न्यायाधीश म्हणजे त्याचेंच रूपांतर होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं. चॅन्सेलर हा राजमंत्रि असून शिक्कामोर्तब त्याजकडे असे. जस्टिसिअरचे मागून हा अधिकारी वरिष्ठ झाला; व स्टुअर्ट काळापर्यंत हाच मुख्य अधिकारी असे. हल्लीं चॅन्सेलर उमरावाच्या सभेचा अध्यक्ष असतो. त्याचे मागून खजिनदार ( treasurer ) हा श्रेष्ठ पदास पोंचला. हल्लीं या जागेची फोड झाली असून कमिशनरांचे मंडळ त्या जागीं असतें व त्यांतील अग्रेसरास—जो बहुतेक इंग्लंडचा मुख्य प्रधान असतो—( First Lord of the Treasury ) खजिन्याकडील पहिले लॉर्ड, ही पदवी असते.

( सेनापति ), खाजगी मंत्रि, क्यान्टरबरी व यॉर्क येथील आर्चबिशप व आणखी कांहीं मंडळी मिळून 'क्युरिया रेजिस' नांवाची एक ग्रेट कौन्सिलची कमिटी बनून तिच्या संमतीनेंच बहुतेक राज्यकारभार चालविला जात असे. हेन्रीनें कोर्ट ऑफ दि किंग्जे बेंच नांवाचें एक वरिष्ठ कोर्ट स्थापिलें व क्यूरिया रेजिसपैकीं कांहीं मंडळी त्यांत नेमिली ( ११७८ ). त्यामुळें न्यायाच्या बाबतींत राजाचें वजन प्रस्थापित झालें व दुसरा फायदा असा कीं, न्यायाधीश हा निराळाच वर्ग झाल्यामुळें कायद्याचा विशेष विचार होऊन अधिक शुद्ध न्याय लोकांस मिळूं लागला.

**११ आयर्लंडवर अंमल**— दुसऱ्या हेन्रीनें स्कॉटलंडच्या राजास

---

२या कोर्टाप्रमाणें दुसरींही कोर्टें पुढें स्थापण्यांत येऊन क्यूरिया रेजिसचा न्याय देण्याचा अधिकार सर्वस्वीं त्यांजकडे देण्यांत आला. ( १ ) कोर्ट ऑफ दि एक्सचेकर ( वसुलीचें कोर्ट ) हें यांपैकीं एक असून सरकारी वसुलासंबंधीं खटले त्यापुढें चालत. २ कोर्ट ऑफ कॉमन प्लीज ( साध्या तंट्यांचें कोर्ट ) स्थापिलें असून त्यांत दोन खाजगी व्यक्तींमधील तंट्यांचा निकाल होई. ३ कोर्ट ऑफ धि किंग्ज बेंच मध्यें राजा हा एक पक्षकार ज्यांत असेल ते खटले चालत; खालील कोर्टांच्या निकालावर यांत अपिलेंही करतां येत. शिवाय ज्या खटल्यांत चालत आलेल्या कायद्यावरून निकाल देणें शक्य नसे त्या खटल्यांचा समबुद्धीनें विचार करून स्वतंत्र निकाल करण्याचा अधिकार राजाच्या चॅन्सेलरकडे असे, व यांतूनच पुढें कोर्ट ऑफ चॅन्सरीची उत्पत्ति झाली पहिल्या एडवर्डच्या कारकिर्दींत ( १२७२—१३०७ ) या सुधारणा पूर्णपणें अमलांत आल्या. त्याच सुमारास पूर्वींपासून चालत आलेली " ज्यूरी " तील गृहस्थास साक्षीदार म्हणून मानण्याची पद्धत बंद पडून ' ज्यूरी ' तील बारा गृहस्थ म्हणजे इतर साक्षीदारांनीं सांगितलेल्या हकिकती व इतर पुरावा याजवर आपल्या न्यायबुद्धीस योग्य वाटेल तो निकाल सांगणारे अधिकारी पुरुष होत, असा ज्युरीसंबंधाचा हल्लींचा प्रचार रूढ झाला.

व वेल्स प्रांताच्या मुख्य सरदारास आपले स्वामित्व कबूल करावयास लाविलें, व ११६९ च्या सुमारास आयर्लंड देशही जिंकला. आयर्लंडांत अल्स्टर, मन्स्टर, लेन्स्टर व कनॉट असे चार परगणे होते. लेन्स्टर संस्थानचा राजा मॅकडरमॉट हा दुष्ट असून त्यानें ११५३ सालीं रोरुर्क नांवाच्या सरदाराची स्त्री पळविली. बिचाऱ्या रोरुर्कनें ओकॉनर या एका संस्थानिकाचा आश्रय मागितला व त्या दोघांनीं मिळून मॅकडरमॉटला आयर्लंडांतून घालवून दिलें ! तो इंग्लंडांत आला व हेन्रीस मदत मागूं लागला. हेन्रीनें फर्मान काढिलें कीं, वाटेल त्या सरदारानें फौज घेऊन आयर्लंडांत उतरावें व मॅकडरमॉटला साहाय्य करावें. या हुकुमावरून इंग्रज सरदार स्ट्रॉंगबो आयर्लंडांत घुसला व आयर्लंडच्या पूर्व किनाऱ्यावरील बराच प्रांत त्यानें काबीज केला ( ११६९ ). पुढें खुद्द हेन्री आयर्लंडांत गेला व तेथील बऱ्याच सरदारांनीं व धर्मगुरूंनीं त्याची सत्ता कबूल केली. हेन्रीचीं शेवटचीं वर्षे दुःखांत गेलीं. त्याच्या मुलांनीं दंगे करण्यास आरंभ केला. आपला सर्वांत धाकटा मुलगा जॉन याचें नांव बंडखोरांच्या अग्रभागीं पाहून हेन्रीस भयंकर धक्का बसला व त्यांतच त्याचा अंत झाला ( ११८९ ).

---

# ७ खिस्ती धर्मयुद्धें १०९६–१२९१.

**१ पहिला रिचर्ड**—दुसऱ्या हेन्रीच्या मरणानंतर त्याचा वडील मुलगा रिचर्ड हा गादीवर आला ( ११८९-११९९ ). तो दहा वर्षेपर्यंत इंग्लंडचा राजा होता, परंतु त्याचें इंग्लंडच्या राज्यकारभारांत मुळींच लक्ष नव्हतें. या वेळीं तिसरें धर्मयुद्ध चालू झालेलें होतें व या धर्मयुद्धांत सामील होऊन धर्मकार्य करण्यांत रिचर्डनें आपलें तन-मन-धन अर्पण केलें. तेव्हां हीं धर्मयुद्धें काय होतीं, तीं केव्हां व कां सुरू झालीं, याची माहिती या प्रकरणांत करून घेऊं.

**२ धर्मयुद्धांचीं कारणें**—जेरुसलेम शहर पॅलेस्टाइन प्रांतांत असून १०७६ सालीं तें तुर्क लोकांच्या हातीं गेलें. जेरुसलेम शहर हें येशू ख्रिस्ताचें चरित्र-स्थळ असल्यामुळें, आपणा हिंदु लोकांना श्रीकृष्णाचें क्रीडास्थान गोकुळ वृंदावन जसें प्रिय असतें त्याप्रमाणें ख्रिस्ती लोकांना हें स्थान प्रिय असून या ' पवित्र स्थळीं ' यात्रा करण्यास हजारों ख्रिस्ती लोक जात असत. या लोकांस मुसलमानांकडून अत्यंत जाच होऊं लागला; तेव्हां हा प्रश्न पोप दुसरा अर्बन यानें हातीं घेतला. इ. स. १०९५ च्या नोव्हेंबरांत फ्रान्सच्या दक्षिणेस क्लेर्मांट येथें त्यानें एक जंगी सभा भरविली व लोकांस प्राण देऊन आपली ' पवित्र भूमि ' मुसलमानांपासून परत घेण्याविषयीं कळकळीनें सांगितलें. याचा सुपरिणाम होऊन धर्मयुद्धें सुरू झालीं. युद्धास निघण्याचा दिवस १५ आगष्ट १०९६ ठरला होता. मध्यंतरीं पीटर डी हर्मिट या नांवाच्या साधूनें हृदयद्रावक भाषणें करून लोकांत रणोत्साह उत्पन्न केला. हा फ्रान्समधील रहिवाशी असून जरुसलेम येथील जाचाचा कटु अनुभव त्यानें प्रत्यक्ष घेतला होता. तेव्हां त्याच्या तोंडून दुःखाची कहाणी ऐकून श्रोत्यांचीं मनें उद्वेग व संताप यांनीं भरून गेलीं, व पुष्कळ ख्रिस्ती लोक धर्मयुद्धांस सामील झाले. हीं धर्मयुद्धें इ. स. १०९५ पासून १२९१ पर्यंत चाललीं होतीं. जेरुसलेम हें शहर ख्रिस्ती लोकांप्रमाणें मुसलमानांसही पवित्र वाटतें. येथेंच त्यांच्या धर्मदृष्टीनें पूज्य असे महंमद पैगंबराच्या पूर्वींचे महात्मे, इब्राहिम, दौद व इसा ( जीजस ख्राइस्ट ) हे रहात असत, व ईश्वर न्यायदिवशीं दूत घेऊन येणार व जेरुसलेममधील पवित्र देवालयांतच इनसाफ करणार, अशी मुसलमानांची समजूत आहे. मुसलमानी धर्माच्या आद्यकालीं जरुसलेमच्या दिशेकडे तोंड करूनच मुसलमान लोक नमाज पडत. येथें ' महमदाचें द्वार ', ' ओमारची मशीद ' व ' सखरा ' नांवाचा पवित्र खडक हीं स्थानें आहेत. यांपैकीं पवित्र खडकावर आपला घोडा ' बुराग ' यावर बसून महमद अरबस्थानांतून आला व येथूनच त्यानें स्वर्गास प्रयाण केलें. अशा रीतीनें जरुसलेम हें स्थळ मुसलमान व ख्रिस्ती या दोघांच्याही दृष्टीनें धार्मिक महत्त्वाचें असल्या-

मुळें त्या दोघांमध्यें धर्मयुद्धें दोन अडीच शतकें एकसारखीं माजून राहिलीं.

**३ धर्मयुद्धासाठीं रिचर्डची तयारी**—११८९ सालीं रिचर्ड गादीवर आला त्या वेळीं तिसरें धर्मयुद्ध चाललें होतें. रिचर्ड जात्या शूर व साहसी असल्यामुळें त्यानें धर्मयुद्धांत आपल्या सर्वस्वाची आहुति देण्याचा निश्चय केला. बिशप, जज, यांच्या व इतर सरकारी जागा भराभर पैसे घेऊन त्यानें विकून टाकिल्या! पैसे घेऊन पदव्या व मान-मरातब यांची खैरात केली. स्कॉटलंडच्या राजानें दुसऱ्या हेन्रीच्या वेळीं इंग्लिश राजाचें स्वामित्व कबूल केलें होतें. तो स्वामित्वाचा हक्क १०,००० मार्क घेऊन त्यानें सोडून दिला! राजाच्या खाजगत म्हणून पुष्कळ जमिनी असत त्यांपैकीं बऱ्याच त्यानें विक्रीस काढिल्या. त्यावेळीं शहरें हीं राजाच्या किंवा दुसऱ्या एकाद्या सरदाराच्या सरंजामां-तील होत, अशी समजूत असून त्यांच्यावर नाना तऱ्हेच्या बाबतींत बोजा पडे. रिचर्डनें कित्येक शहरें दुसऱ्या लोकांस विकिलीं व कित्येक शहरांवरचा बोजा कमी करून नियमित कर घेण्याखेरीज इतर कोणत्याही रीतीनें त्यांच्या अन्तर्व्यवहारांत ढवळाढवळ न करण्याबद्दलच्या सनदा त्यांच्यापासून पुष्कळ पैसे घेऊन त्यांस करून दिल्या. एकदां रिचर्ड बोलला " जर कोणी श्रीमंत विकत घेणारा भेटेल तर मी लंडन शहर सुद्धां विकून टाकीन. "

**४ पहिल्या रिचर्डचे पराक्रम**—अशा रीतीनें पैसा जमा करून आणि पुष्कळ पैसा ज्यू लोकांकडून कर्जाऊ घेऊन रिचर्ड हा फ्रान्सचा राजा फिलिप यास जाऊन मिळाला व मग ते दोघे मिळून पॅलेस्टाइनवर चालून गेले. त्यांनीं एकर शहरास वेढा घातला. तें शहर त्यांच्या हातीं आलें. मग जेरुसलेमवर चालून जाण्याचें काम एकट्या रिचर्डवर सोंप-वून फ्रान्सचा राजा फिलीप हा परत आला. रिचर्ड धाडसी व शूर अस-

---

१ हें नाणें पूर्वी इंग्लंड व स्कॉटलंड या देशांत असे. याची किंमत १३ शिलिंग ६ पेन्स होती.

त्यामुळें खिस्ती सरदारांत फूट पडली होती, तरी धैर्यानें तो जेरुसलेमवर आपल्या फौजेनिशीं एकटाच चालून जाऊं लागला. रिचर्डच्या सैन्यावर भयंकर संकटें आलीं होतीं. परंतु त्याच्या शौर्यानें व लष्करी चातुर्यानें खिस्ती सैन्य बचावलें! जोराची चाल करून रिचर्ड शेवटीं तर अगदीं जेरुसलेमजवळ जाऊन ठेपला. पण इतक्यांत इंग्लंडांत आपला धाकटा भाऊ जॉन यानें आपल्याविरुद्ध कट करून इंग्लंडची गादी बळकाविण्याचा घाट घातला आहे, अशी बातमी त्याला समजली. तेव्हां जेरुसलेम घेण्याचा नाद सोडून त्यानें तुर्की सरदार सलाहुद्दीन याशीं खिस्ती यात्रेकरूंस जेरुसलेममध्यें ते गेले असतां मुसलमानांनीं त्रास देऊं नये, असा तीन वर्षांच्या मुदतीचा तात्पुरता तह केला. व तो इंग्लंडांत परत जाण्यासाठीं घाईनें निघाला.

**५ रिचर्डचा बंदिवास**—वाटेनें येतांना त्याचें जहाज फुटलें. तेव्हां प्रगटपणें युरोपांत प्रवास करणें धोक्याचें होतें; म्हणून युरोपांतून व्यापाऱ्याच्या वेषानें इंग्लंडला जाण्याचें त्यानें ठरविलें, परंतु मध्यंतरीं त्याचें खरें स्वरूप बाहेर पडून ऑस्ट्रियाचा ड्यूक लिओपोल्ड यानें त्याला बंदींत ठेविलें. थोडयाच दिवसांनीं त्यानें रिचर्डला जर्मन बादशहास विकून टाकिलें. यापुढें रिचर्डला जर्मनींतील एका बळकट किल्ल्यांत वर्षाच्यावर बंदींत रहावें लागलें. इंग्रज लोकांस एका भाटाच्या तोंडून आपला राजा कैदेंत असल्याची बातमी चमत्कारिक रीतीनें समजली. तेव्हां सर्व लोकांवर नानातऱ्हेचे कर बसविण्यांत येऊन तीन कोट रुपयांची रक्कम उभी करण्यांत आली. येवढा मोठा खंड भरला तेव्हां जर्मन बादशहानें रिचर्डची सुटका केली! इंग्लिश लोकांस रिचर्डच्या शौर्याबद्दल कौतुक वाटून ते त्याच्याकरितां इतकी घस सोसावयास तयार झाले. त्याच वेळीं त्याचा धाकटा भाऊ जॉन यानें राज्यलोभास बळी पडून रिचर्डच्या बंदीवासाची मुदत लांबविण्याकरितां जर्मन बादशहास २००० पौंड देऊं केले. परंतु त्याच्या कारस्थानास यश न येऊन रिचर्ड इंग्लंडांत सुखरूप येऊन पोंचला (११९४). तो जात्या उदार असल्यामुळें त्यानें जॉनला सर्व अपराधांबद्दल क्षमा केली.

**६ रिचर्डचा मृत्यु**— त्यानंतर रिचर्डच्या कारकीर्दीचा अवशिष्ट भाग फ्रान्सच्या राजाशीं युद्ध करण्यांत गेला. फिरून सरकारी जागा व पदव्या विकून व कर बसवून या फ्रान्सांतील लढाईकरितां त्यानें पैसा जमा केला. फ्रान्सांत सारख्या लढाया चालल्या होत्या. शेवटीं ११०८ त फ्रान्सच्या राजाशीं रिचर्डनें तह केला. हा तह होतो न होतो तोंच रिचर्डचें एका सरदाराशीं भांडण लागून त्यानें शालूझ किल्ल्यास वेढा दिला. एके दिवशीं किल्ल्यावरील शिबंदीपैकीं एकानें एक बाण रिचर्डवर रोखून सोडला. तो मर्मी लागून रिचर्ड मरण पावला (११९९) रिचर्डची शक्ति व शौर्य विख्यात असून त्याच्या युद्धविशारदत्वावरून त्यास सिंहहृदय असें टोपण नांव पडलें होतें.

**७ धर्मयुद्धांपासून फायदे**—रिचर्ड सारखा युद्धें करीत राहिल्यामुळें प्रजेवर कराचा अत्यंत बोजा बसला व इंग्लंडचे लोक जवळ जवळ पिळून निघाले. तथापि या धर्मयुद्धांमुळें युरोपवर व त्याबरोबर इंग्लंडवर सुपरिणाम झाला. तो कसा हें आतां पाहूं. धर्मयुद्धांस सुरवात होण्यापूर्वी युरोपमधील राष्ट्रांस एकीनें वागण्याचा असा प्रसंग आलाच नाहीं, म्हटले तरी चालेल. युद्धप्रिय लोकांनीं लोकांच्या मुलुखांत लूट मारावी किंवा आपल्या शौर्याचें प्रदर्शन करावें या हेतूनेंच लढाई करीत रहावें असें चाललें होतें. परंतु धर्मयुद्धांत सर्व युरोपियन लोकांपुढें आपल्या धर्माचें रक्षण करण्याचा उदात्त हेतु प्रमुख झाला व निरनिराळ्या देशांतील धाडसी व शूर लोक खांद्यास खांदा लावून सर्वांचा सामान्य जो ख्रिस्ती धर्म त्याचें रक्षण करण्याच्या उद्योगास लागले. रिचर्ड गादीवर येण्यापूर्वीं इंग्लंडनें या धर्मयुद्धांमध्यें महत्वाची कोणतीच कामगिरी बजाविली नाहीं. पण रिचर्डच्या काळीं मात्र इंग्लंडांत यासंबंधीं पुष्कळच उत्साह उत्पन्न झाला होता. जरुसलेम शहर तुर्कांच्या हातांतून परत घ्यावयाचें हा धर्मयुद्धांचा मूळ हेतु मुळींच सिद्धीस गेला नाहीं व जेरुसलेम शहर

आज विसाव्या शतकांतही तुर्कांच्या–मुसलमानांच्या–ताब्यांत आहे. तथापि या युद्धांपासून बरेच फायदे झाले. इंग्लंडांतील लोक एकलकोंडे राहात. या युद्धांमुळें युरोपशीं त्यांचा ज्यास्त संबंध येऊं लागला त्याचप्रमाणें विद्यांच्या बाबतींत या युद्धांपासून मोठाच फायदा झाला. युरोपांतील सर्व प्राचीन विद्या ग्रीक व लॅटिन या भाषांतील ग्रंथांत सांठविलेल्या होत्या. ख्रिस्ती लोकांपेक्षां त्या वेळीं मुसलमान अधिक सुधारलेले असून त्यांनीं या ग्रंथांचीं भाषांतरें आपल्या भाषेंत केलीं होतीं. तेव्हां ॲरिस्टॉटल, प्लेटो इत्यादि प्राचीन तत्त्वज्ञांच्या ग्रंथांचा अभ्यास मुसलमान गुरूंपाशीं युरोपांतील लोक करूं लागले. इतकेंच नव्हे तर अंकगणित, बीजगणित, भूमिति व ज्योतिषशास्त्र हींसुद्धां मुसलमानांपासूनच त्यांना शिकावीं लागलीं. मुसलमानांच्या संसर्गामुळें शिक्षणास जोर आला व देशांत विद्या–वृद्धीची लाट उसळून तेराव्या शतकाच्या उत्तरार्धांत ऑक्सफर्ड व केंब्रिज येथें विद्यालयें स्थापण्यांत आलीं. धर्मयुद्धांमुळें आशियाखंडांत तयार होणारें रेशमी कापड व मऊ मलमल, हीं विकत घेण्याची श्रीमंतांस चटक लागली. एकंदरीनें व्यापार वाढला व शहरांस अधिक महत्त्व आलें. पुष्कळ इंग्रज व्यापारी परदेशांत जाऊन आशियांतून आलेला मसाल्याचा माल व कापड विकत घेत व इंग्लंडांत आणीत. याचा मोबदला इंग्लंडांत तयार झालेली लोंकर, कातडें, धान्य व गवत हीं तेथें नेऊन विकीत. या व्यापाराकरितां लवकरच व्यापारीसंघ Merchant guilds निर्माण झाले. त्याचप्रमाणें सामाजिक बाबतींतही या युद्धांमुळें पुष्कळ हितकर फरक पडला. जेव्हां धर्मयुद्धें सुरू झालीं तेव्हां देशांत नागरिक अशी ज्यांस पदवी लावतां येईल, असे तीनच वर्ग होते. एक सरदारांचा, दुसरा धर्मगुरू व मठवासी यांचा व तिसरा कांहीं विशेष हक्क मिळालेल्या शहरांतील रहिवाश्यांचा. बाकीचे सर्व लोक अर्धवट गुलामगिरींतच होते. रिचर्डनें पैसा घेऊन पुष्कळ शहरांस सनदा दिल्या,

---

१ नुक्तयाच झालेल्या महायुद्धांत हें शहर इंग्रजांनीं इजिप्तांतील फौजेच्या मदतीनें आपल्या ताब्यांत घेतलें आहे.

त्याचप्रमाणें आपआपल्या हद्दींतील शहरांस सरदार लोकांनीं सनदा देऊन मोकळें केलें. त्या काळीं शेतावर अर्धवट गुलामगिरींत बरेच लोक असत त्यांचीही स्थिति सुधारली. सरदार लोकांस आशियांत जाण्याची तीव्र इच्छा असे व त्याकरितां पैशाचीं त्यांना नेहमीं जरूर असे. तेव्हां अर्धवट गुलामगिरींत खिचपत पडलेलीं कुळें धन्यास पैशाची मदत करीत व त्यांच्यापासून कायम खंडाचा ठराव करून घेऊन आपल्या शेताचे जवळ जवळ स्वतंत्र मालक ( copyholders ) बनत असत. या कारणानें व लढाई किंवा उद्योगधंदा यांत पडण्याची कोणासही मुभा असल्यामुळें देशांतील निकृष्ट वर्गाची स्थिति बरीच सुधारली. आतांपर्यंत राजा व सरदार यांच्या हातांत सर्व सत्ता एकवटलेली असे. ती कोंडी फुटून सनद मिळालेलीं शहरें व सुखाचा अनुभव घेणारा स्वतंत्र शेतकरी-वर्ग निर्माण झाला आणि त्यांनाही राजकीय सत्ता मिळविण्याची इच्छा उत्पन्न झाली व पुढील शतकांत त्या दिशेनें त्यांना हक्क मिळून इंग्लंडच्या राजकीय सुधारणेचा उपक्रम झाला.

---

# ८ मोठी सनद ( मॅग्ना चार्टा ) इ. स. १२१५.

**जॉनचा स्वभाव**—रिचर्ड वारल्यानंतर त्याचा धाकटा भाऊ जॉन हा गादीवर आला. वास्तविकपणें जॉनचा वडील भाऊ जिऑफ्रे याचा मुलगा आर्थर हाच गादीवर यावयाचा. परंतु रिचर्डचें व आर्थरच्या आईचें भांडण झालें होतें म्हणून त्यानें जॉनलाच आपल्यामागें गादी मिळावी, असें लिहून ठेविलें. त्याप्रमाणें जॉन गादीवर आला. हा जॉन अविचारी असून प्रजेचा छळ करावा व आपली तुंबडी भरावी हें तत्त्व उराशीं बाळगून त्याचें आचरण चाललें होतें. हट्टीपणा, वचनभंग करण्याची संवय व स्वार्थसाधुपणा हे दोष त्याच्या ठायीं होतेच. परंतु या सर्वांवर ताण करणारा त्याचा दोष म्हणजे नीतिभ्रष्टता हा होय. अगदीं लहान-

पणींच या राजश्रींनीं राजनिष्ठा व्यक्त करण्यास आलेल्या आयरिश सरदारांच्या दाढ्या उपटून आपल्या भावी क्रौर्याची व क्षुद्रत्वाची साक्ष पटविली होती! त्याची कारकीर्द इ स. ११९९ पासून १२१६ पर्यंत झाली. येवढ्या वेळांत एक फ्रान्सच्या राजाशीं, दुसरा पोपशीं व तिसरा इंग्लडांतील लोकांशीं, असे तीन मोठे तंटे त्यानें केले. यांपैकीं प्रत्येकांत त्याची फजिती व विरुद्ध पक्षाचा जय झाला.

**२ फ्रेंच राजाशीं तंटा**—दुसरा हेन्री गादीवर आला, तेव्हांपासून इंग्लंडच्या राजाच्या ताब्यांत फ्रान्समधील बरेच प्रांत आले होते. पूर्वींच्या नॉर्मंडी या प्रांताखेरीज मेन, अँजू, टुरेन, अॅक्विटेन इत्यादि प्रांतही इंग्लंडच्या राजाच्या मालकीचे झाले होते. या प्रांतांतील सरदार लोकांनीं आर्थर हाच या प्रांतांचा खरा धनी असा पुकारा केला व फ्रान्सचा राजा फिलिप यानें त्यांच्या म्हणण्यास पुष्टि दिली. त्यावरून युद्ध सुरू झालें. त्यांत आर्थर जॉनच्या हातीं सांपडला. तेव्हां त्यास जॉननें कैदेंत ठेविलें. पुढें लवकरच तो वारला. जॉननें आपण गादीवर स्थिर व्हावें यासाठीं आर्थरचा भयंकर रीतीनें खून केला असें फ्रान्समधील लोक म्हणूं लागले. या संधीचा उपयोग करून फ्रेंच राजा फिलिप यानें नॉर्मंडीवर स्वारी केली. शूर रिचर्डच्या जागीं आतां दुर्बळ जॉनशीं युद्धप्रसंग असल्यानें फिलिपची लवकरच फत्ते झाली आणि नॉर्मंडीसुद्धां इंग्लिश राजाच्या मालकीचे बहुतेक सर्व प्रांत त्यानें काबीज केले (१२०४). जॉननें नॉर्मंडी घालविली त्याचा इंग्लिश राष्ट्रास फायदाच झाला. आजपर्यंत नॉर्मन सरदार इंग्लंड ही आपली 'भोगभूमि' असून फ्रान्स हीच आपली जन्मभूमि मानीत, व त्यामुळें साहाजिकपणेंच ते इंग्लिश लोकांस कमी लेखीत. पण आतां नॉर्मंडीशीं असलेला संबंध कायमचा तुटल्यामुळें इंग्लंड हाच आपला स्वदेश असून त्याच्या कल्याणार्थ झटणें हेंच आपलें कर्तव्य आहे, अशी जाणीव नॉर्मन सरदारांत उत्पन्न होऊन हळू हळू इंग्लिश व नॉर्मन या दोन्ही जातींचा योग्य संयोग झाला व त्यापासून जोमदार इंग्लिश राष्ट्राची निपज झाली! पहिल्या वुइल्यमच्या फ्रेंच मुलुखापैकीं चॅनेल बेटें तेवढीं इंग्लंडच्या ताब्यांत अजून राहिलीं आहेत.

**३ पोपशीं भांडण**——जॉनचें दुसरें भांडण पोपशीं झालें. १२०५त क्यान्टरबरीचा आर्चबिशप वारला. जॉननें आर्चबिशपची निवडणूक करणाऱ्या धर्मगुरूंच्या मंडळास आपल्या प्रीतींतील नॉर्विचच्या बिशपची निवडणूक करण्यास सांगितलें. हें म्हणणें मंडळाला न पटून आर्चबिशप नेमावयाचा आमचा स्वतंत्र अधिकार आहे, त्यांत राजानें ढवळाढवळ करण्याचें कारण नाहीं, असें ते म्हणूं लागले. तेव्हां हें प्रकरण पोप तिसरा इनोसंठ याजकडे गेलें. त्यानें दोघांनाही धाब्यावर बसवून स्टीफन लँग्टन याची नेमणूक केली. स्टीफन लँग्टन हा विद्वान् व कार्यक्षम होता व म्हणून त्याची नेमणूक झाली हें चांगलें झालें. परंतु ज्या रीतीनें तो नेमिला गेला ती रीति आक्षेपार्हच म्हटली पाहिजे. कारण त्यावरून पोपला सर्वांच्या डोक्यावर मिरे वांटण्याचा अधिकार आहे, हें तत्त्व प्रस्थापित होत होतें. जॉनला ही नेमणूक मुळींच पसंत पडली नाहीं. त्यानें क्यान्टरबरीच्या आर्चबिशपकडे असलेली सर्व जमीन स्वतःच्या ताब्यांत घेतली; व ठिकठिकाणच्या धर्मगुरूंना कायद्याचा आश्रय न मिळून त्यांच्या घरीं चोऱ्या व मारहाणही होऊं लागली. इकडे पोपनें इंग्लंड देशास धर्मभ्रष्ट ठरवून लग्नविधि व प्रेतसंस्कार करण्याची तेथें बंदी केली ( १२०८ ). यावर जॉननें सर्व धर्मगुरूंच्या जमिनी जप्त केल्या. पोपनें जॉनला बहिष्कृत केलें. यानंतर तीन वर्षांनीं जॉन हा वठणीस येत नाहीं हें पाहून पोपनें खालील हुकूम काढिला. ' जॉन हा नास्तिक असल्यामुळें इंग्लंडच्या गादीवरून पदच्युत झाला आहे; तरी फ्रान्सचा राजा फिलिप यानें इंग्लंडांत उतरून त्यास हद्दपार करावें. ' इंग्लिश प्रजेंतही असंतोष असल्यामुळें पोपला शरण जाऊन या संकटांतून आपली सोडवणूक करून घेण्याचें जॉननें ठरविलें. शिवाय जर्मनीच्या बादशहाशीं ऐक्य करून फ्रान्समधील आपले गेलेले प्रांत मिळविण्याच्या खटपटींत तो होता. तेव्हां पोपशीं समेट करण्याच्या धोरणास दुजोरा आला. जॉन पोपला शरण गेला. पॅण्डल्फ नांवाचा पोपचा प्रतिनिधि इंग्लंडांत आला होता, त्याजपाशीं त्यानें आपल्या सर्व अपराधांची क्षमा मागितली, स्टीफन लँग्टन यास क्यान्टरबरीचा आर्चबिशप म्हणून

कबूल केलें, व सर्व धर्मगुरूंच्या जमिनी परत देऊन नुकसानीबद्दलही भरपाई केली ( १२१३ ). इतकें केल्यावर मग फ्रान्समधील गेलेला मुलूख परत मिळविण्याचा उद्योग त्यानें जोरानें सुरू केला. परंतु १२१४ त बोव्हीनं[1] ( Bouvines ) येथें मोठीं लढाई होऊन तींत जॉनच्या पक्षाचा पुरा मोड झाला.

४ **लोकांवर जुलूम**—जॉननें पोपशीं समेट केला तेव्हां लोकांचे पुढारी जे सरदार लोक त्यांनीं इंग्लंडांतील सर्व जनतेवर जॉननें जुलूम चालविला होता त्याचा प्रतिकार करण्यासाठीं कंबर कसली. धर्मखात्यांतील जागा रिकाम्या ठेवून वसूल आपण खात रहावयाचा क्रम जॉननें अंगिकारिला होता. सरदारांपासून खूप पैसा उकळण्यास त्यानें कमी केलें नव्हतें. लंडन व इतर शहरांना नियमित कर घेऊन अन्तर्गत व्यवहारांत ढवळाढवळ न करण्याबद्दल दिलेल्या सनदा धाब्यावर बसवून त्यानें यथेच्छ त्रास दिला. व्यापाऱ्यांपासून त्यानें जबर रकमा वसूल केल्या. पुष्कळ माणसांस किरकोळ व खोट्या आरोपांवरून त्यानें तुरुंगांत टाकिलें व त्यांची चौकशी न करितां त्यांना तेथें तसेंच खितपत पडूं दिलें. गरीब शेतकऱ्यांपासून ही जबर रकमा मागावयाच्या व त्या त्यांनीं दिल्या नाहींत म्हणजे त्यांचें शेतकीचें सामान,गाड्या, नांगर इत्यादि जप्त करून त्यांच्या जीवनाचें साधन नाहींसें करून टाकावयाचें असा धूमधडाका त्यानें चालविला.

५ **सरदारांचा निश्चय**—अशा रीतीनें लोकांवर जुलूम होत होता, तो कायमचा थांबावा या उद्देशानें राजाकडून लेखी करारनामा करून घेण्याचा बेत कायम झाला. या खटपटींत स्टीफन लँग्टन यानें लोकांच्या वतीनें पुढाकार घेतला होता. सेंट ऑल्बन्स व सेंट पॉल्स या ठिकाणीं सभा भरल्या, व राजकीय सुधारणा करण्याबद्दल राजास मागणी करण्याचा विचार कायम झाला. शेवटीं बोव्हीनच्या लढाईंत नक्षा उतरून जॉन परत आल्यानंतर सेंट एडमंड्स या ठिकाणीं सभा भरून तेथें

---

१ हें ठिकाण क्यालेच्या आग्नेय दिशेस सत्तर मैलांवर आहे.

जमलेले सर्व सरदार, धर्माधिकारी व मध्यम वर्गांतील लोक यांनीं शपथ घेतली कीं, ' जर राजानें आमच्या मागण्या मान्य केल्या नाहींत तर त्याच्याशीं युद्ध करून आपणास लेखी करारनामा करून देण्यास राजा तयार होईपर्यंत तें चालवावयास चुकावयाचें नाहीं. ' धर्मगुरूंस, बिशप व आर्चबिशप निवडण्याचे हक्क निर्बाध चालतील अशी मी तुम्हांस हमी देतों, असें आमिष दाखवून व पुष्कळ सरदारांना व्यक्तिशः सवलती देण्याचें आश्वासन देऊन लोकपक्षांत फूट पाडण्याचे होते नव्हते तितके सर्व उपाय जॉननें करून पाहिले. त्यानें पोपपाशींही साहाय्य मागितलें. पण सर्व व्यर्थ. १२१५ च्या ईस्टरमध्यें सरदार व दोन हजार सशस्त्र नॉईट[1] यांनीं ऑक्सफर्ड येथें राजाची गांठ घेतली व हक्कांची मागणी केली. देशांतील बहुतेक सर्व लोक विरुद्ध आहेत व आतां अळंटळं करण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें पाहून जॉननें त्यांस दिवस व जागा नक्की करण्यास सांगितलें. १५ जून हा दिवस व रॅनीमीड[2] हें ठिकाण कायम झालें. मग ठरलेल्या दिवशीं व ठरलेल्या ठिकाणीं लोकांनीं तयार केलेल्या करारनाम्यावर जॉननें सही केली.

**२ सनदेंतील कलमें**—हा करारनामा अत्यंत महत्त्वाचा असून लोकसत्तेचीं बीजें इंग्लंडांत कायमचीं पेरलीं जाण्यास तो कारणीभूत झाला असल्यामुळें मोठी सनद ( मॅग्ना चार्टा ) या नांवानें तो इतिहासांत प्रसिद्ध आहे. या सनदेमध्यें जॉननें तिजवर सही केली त्यावेळीं एकुणपन्नास कलमें होतीं. हींत प्रत्येक वर्गाच्या तक्रारींचें निवारण केलेलें होतें व तीं इतक्या महत्त्वाचीं होतीं कीं, जॉनच्या पुढील राजांकडूनही वेळोवेळीं तीं मान्य असल्याची कबुली घेण्यांत आलेली असून पुढील दोन शतकांतच सदतीस वेळां तीं मान्य असल्याचीं लेखी वचनें राजांनीं दिलीं. पुढें तर तिच्या कलमांचीही संख्या त्रेसष्टपर्यंत वाढली. त्यांपैकीं बरींच

---

१ एका स्वाराचा सरंजाम उपभोगणारा गृहस्थ.

२ हें ठिकाण लंडनच्या नैर्ऋत्येस वीस मैलांवर थेम्स नदीच्या कांठीं आहे.

कलमें तात्पुरत्या उपयोगाचीं होतीं; तथापि तीन मात्र इतक्या महत्वाचीं आहेत कीं, तीं यावच्चंद्र दिवाकरौ अंमलांत राहिलीं पाहिजेत. तीं कलमें येणेंप्रमाणें:--( १ ) बरोबरीच्या लोकांकडून चालत असलेल्या कायद्यास अनुसरून चौकशी झाल्याखेरीज कोणाही नागरिकास कैदेंत घातलें जाणार नाहीं. ( २ ) न्याय देण्याच्या कामीं लांच घेतली जाणार नाहीं, नकार दिला जाणार नाहीं, अगर विलंब लाविण्यांत येणार नाहीं. ( ३) लोकांवर राजानें आपल्याला मदत म्हणून युद्धाचे वेळीं किंवा इतर कारणांकरितां लोकांपासून जी मागणी करावयाची, ती लोकसभेच्या ( Great Council ) संमतीखेरीज कदापि करावयाची नाहीं.

**७ सनदेचें महत्त्व**—हें शेवटचें कलम लोकसत्तेच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. जॉन राजाची व पुढील राजांचीही त्याला शाब्दिक संमति मिळाली खरी; परंतु त्याचा प्रत्यक्ष अंमल घडवून आणण्यास इंग्लिश लोकांस अतिशय यातायत पडली; तरी शेवटीं त्याचा अंमल करण्यास राजास त्यांनीं भाग पाडलें. या सनदेंत राजानें कबूल केलेल्या मागण्या नव्यानेंच कबूल केल्या असें नाहीं. यापूर्वीं पहिल्या हेन्रीनें सनद

---

१सरंजामी पद्धतीप्रमाणें राजाच्या उत्पन्नांत मदत म्हणून जें सदर असे त्याला हें कलम लागू नव्हतें. सरंजामी उत्पन्नाचीं पुढील सदरें होतीं १ एक जमिनदार मरून दुसरा मालक झाला कीं वारसानें राजास नजराणा देण्याची चाल असे. २ वारस जर अज्ञान असला तर राजाच त्याचा पालक होई व त्या अज्ञान मुलांमुलींची लग्नें व्हावयाचीं म्हणजे राजास त्या निमित्तानें पालक या नात्यानें मोठी प्राप्ति असे. ३ राजा बंदींत पडला, त्याच्या वडील मुलीचें लग्न निघालें किंवा मुलास ' नाईट ' ही पदवी देण्याचा प्रसंग आला म्हणजे राजास 'मदत' करण्यास जमीनदार बांधिलेला असे. ४ एकाद्या जमीनदारावर राजद्रोहाचा गुन्हा शाबीत झाला किंवा तो संतानावांचून वारला तर त्याची जमीन सरकारजमा होई. ५ राजाची स्वारी फिरतीवर निघाली कीं त्याची सरबराई फुकट ठेविण्याचा बोजा जमीनदारांवरच पडे.

दिली होती, व इतर राजांनींही वेळोवेळीं लोकांचे हक्क मान्य केले होते; परंतु लोक व राजा हे दोघेही बरोबरीच्या नात्यानें असे याच वेळीं वागले. आमचीं अमुक दुःखें आहेत असें लोकांनीं राजास सांगावें व राजानें प्रत्यक्षरीतीनें त्यांचें म्हणणें कबूल करावें हा प्रकार याच वेळीं पहिल्यानें झाला. शिवाय मागील राजांनीं दिलेलीं वचनें त्यांनीं पाळिलीं तर पाळिलीं, नाहीं तर कांहींच तोड नव्हती. पण यावेळीं, जर राजानें या सनदेंतील कलमें पाळिलीं नाहींत तर तीं पाळण्यास त्यास भाग पाडावें, यासाठीं एक पंचवीस सरदारांची कमिटी नेमण्यांत आली. राजास अगर त्याच्या कुटुंबांतील माणसास शारीरिक दुखापत न करितां वाटेल तो उपाय योजून त्यांनीं राजावर सक्ति करावी, असा या कमिटीस अधिकार देण्यांत आला होता. ही सनद अमक्या एका वर्गास अनुलक्षून तयार केलेली नव्हती. सरदार व धर्मगुरू यांच्या हक्कांबरोबरच शहरांतील व्यापारी व गरीब शेतकरी यांचेही हक्क हींत ग्रथित केले होते, हीही तिच्यांतील विशेष गोष्ट होय.

८ **जॉनचा लपंडाव**— जॉननें सनदेवर सही केली, असें म्हणण्यापेक्षां सरदारांनीं ती त्याजकडून करविली, असें म्हणणेंच ज्यास्त बरोबर होईल. आतां एकदां वचन दिल्यावर तें पाळणें हा सरळ मार्ग होता; परंतु वचनें देणें जितकें सोपें आहे तितकेंच किंबहुना त्याहून ज्यास्त अवघड तीं पाळणें असल्यामुळें राजे लोक पुष्कळ वेळां वचनें देतात, पण ते त्याप्रमाणें वागत नाहींत ! त्याप्रमाणें सनदेंतील एकामागून एक कलम मोडण्याची जॉननें सुरवात केली. पोपनेंही जॉनचा पक्ष उचलला व त्यानेंच नेमिलेला आर्चबिशप स्टीफन लॅङ्गटन लोकपक्षाकडे असल्यामुळें पोपनें त्याला कामावरून कमी केलें, व सनद रद्द समजावी असा हुकूम काढून ती मिळविण्याची ज्या सरदारांनीं खटपट केली, त्यांस त्यानें बहिष्कृत केलें. परंतु ज्या ज्या अडचणी आल्या, त्यांनीं लोकपक्ष गांगरून गेला नाहीं; उलट राजाशीं दोन हात करून आपले हक्क कायम राखण्याची सरदारांनीं तयारी केली. त्यांनीं फ्रान्सचा युवराज लुई याची मदत मागितली, आणि त्याच्या नांवानें इंग्लंडचा राजा म्हणून द्वाही

फिरविली. जॉननें मोठ्या प्रयासानें उत्तरेकडील व पश्चिमेकडील परगणे आपल्या बाजूस मिळविले, व मध्यभागचे परगणे आपल्या बाजूस मिळवून घेण्याच्या खटपटींत तो होता. इतक्यांत लुई लंडनांत येऊन दाखल झाला व सरदार त्याला मिळाले. तेव्हां त्यांच्याशीं सामना देण्यासाठीं जॉन घाईनें येऊं लागला. परंतु दगदगीनें वाटेंतच त्याला ताप येऊन आकस्मिक रीतीनें न्यूआर्क या गांवीं त्यास मृत्यु आला ( १२१६ ऑक्टोबर ). सरदारांनीं राजास ताळ्यावर आणण्याच्या इच्छेनेंच लुईचा पक्ष घेतला असल्यानें राजा मृत्यु पावला तेव्हां अर्थातच त्यांनीं तो पक्ष सोडून दिला. तेव्हां लुईला फ्रान्सांत परत जाणें भाग पडलें. जॉनच्या मागून त्याचा नऊ वर्षांचा मुलगा तिसरा हेन्री ही पदवी धारण करून गादीवर आला.

---

# ९ पार्लमेंटचा उदय.

**१ तिसऱ्या हेन्रीचा स्वच्छंदीपणा.** —तिसरा हेन्री गादीवर आला तेव्हां तो अज्ञान असल्यामुळें १२२७ पर्यंत अर्ल ऑफ पेमब्रोक व ह्यूबर्ट डी बरो या दोन कारभाऱ्यांच्या हातीं राज्यसूत्रें होतीं. ते कर्तव्यदक्ष असल्यामुळें राज्यकारभार नीट चालला होता. १२२७ त हेन्री वयांत आला; तेव्हांपासून पुढील वीस वर्षेपर्यंत त्यानें स्वतः राज्य चालविलें. हेन्रीनें आपला विवाह प्रॉव्हेन्समधील ( फ्रान्सांतील प्रांत ) एलेनॉर हिशीं करून आपल्या एका बहिणीचें लग्न जर्मन बादशहा दुसरा फ्रेडरिक याशीं केलें. हेन्रीनें परकीय लोकांची मैत्री जोडली. बहुतेक सर्व सरकारी जागांवर व बिशपच्या जागीं फ्रेंच माणसांच्या नेमणुका केल्या. आपल्या फ्रेंच नातलगांवर पदव्या व सरंजाम यांची खैरात केली. पोपनेंही धर्मखात्यांत परकीय नोकर नेमण्याचा सपाटा चालविला. बऱ्याच बड्या जागा हेन्रीनें रिकाम्या ठेविल्या व आपल्या परकीय

प्यार दोस्तांची चैन चालविण्याकरितां सक्तीचीं कर्जें काढिलीं. तथापि त्याच्या चैनीस तितका पैसा न पुरून लवकरच त्याच्या वार्षिक उत्पन्नाच्या चौपटीपर्यंत कर्जाचा आंकडा फुगला.

२ **पार्लमेंटच्या मागण्या**--आपल्याला लागणाऱ्या पैशाची मागणी करण्याकरितां हेन्री वेळोवेळीं बडे सरदार, धर्मगुरु व नाईट या सर्वांची सभा बोलावीत असे. अलीकडे या सभेस पार्लमेंट ( Parliament ) असें नांव पडलें होतें. हे लोक राजास पैसे देतांना न्यायाधीश, चॅन्सेलर व खजीनदार नेमण्याविषयीं विनंति करीत. परंतु हो म्हणून सनदांना फिरून शाब्दिक मान्यता देण्यापलीकडे तो कांहीं एक करीत नसे. परकीयांचें प्रस्थ वाढविण्याचें धोरण कायमच होतें. १२५७ सालीं पार्लमेंटपुढें आपल्याला पोपचें फार देणें झालें आहे असें त्यानें जाहीर केलें व धर्मखात्याच्या उत्पन्नापैकीं एक दशांश भाग, सर्व रिकाम्या जागांपासून होणारें पांच वर्षांचें उत्पन्न व देशांतील एकंदर संपत्तीवर कराऐवजीं एक तृतीयांश, इतक्या पैशाची मागणी केली. या मागण्या पार्लमेंटनें देण्याचें नाकारिलें व एकंदर राज्यकारभाराच्या स्थितीचा रिपोर्ट करण्यासाठीं ऑक्सफर्ड येथें एक चोवीस सभासदांची कमिटी नेमिली. या कमिटीच्या रिपोर्टावरून १२५८ त ‘ ऑक्सफर्ड येथील नियम ’ करण्यांत आले, व त्यांस राजाचीही संमति मिळाली. या नियमांअन्वयें एक पंधरा सल्लागारांचें कायमचें मंडळ राजास सल्ला देण्यासाठीं नेमावयाचें ठरलें. या मंडळानें व राजाच्या मुख्य अधिकाऱ्यांनीं मिळून राज्यकारभारावर देखरेख ठेवावयाची व्यवस्था करण्यांत आली. वर्षांतून निदान तीनदां तरी पार्लमेंटची बैठक बोलाविलीच पाहिजे असा ठराव झाला. या पार्लमेंटांत येण्याची दगदग सर्वांस पडूं नये म्हणून या कमिटींतील पंधरा सभासद व सरदारांनीं निवडून पाठविलेले ‘ बारा प्रामाणिक सभासद ’ येवढ्यांनींच त्या सभेंत बसावयाचें, असें ठरलें. तीन वर्षेपर्यंत याप्रमाणें व्यवस्था चालली. राजाच्या सर्व परकीय बगलबच्चांना हांकून देण्यांत आलें. परंतु राजा व सरदार यांजमध्यें फिरून दुही माजली. शेवटीं फ्रान्सचा राजा नववा लुई

याच्याकडे तंटा नेण्यांत आला. तेव्हां लुईनें ऑक्सफर्डचे नियम रद्द ठरवून सरदारांस पूर्ण क्षमा करण्याविषयीं हेन्रीस शिफारस केली.

**३ सायमन डी मॉंटफर्ट**——पण हें भांडण अशा गुळचट मार्गानें थांबण्यासारखें नव्हतें. त्यांत सरदारांच्या बाजूस राजाचा मेहुणा सायमन डी मॉंटफर्ट हा कर्तबगार व न्यायप्रिय पुरुष पुढारी होता. लुईनें सांगितले निकाल त्यानें मानिला नाहीं. या कृत्यांत त्याला लंडन व इतर शहरांतील नागरिक, धर्मखात्यांतील बरेचसे लोक व बहुजनसमूह यांचा पाठिंबा होता. राजास वठणीवर आणण्यास आतां युद्धाशिवाय कांहीं मार्ग नाहीं, असें पाहून सायमननें युद्ध करण्याचा निश्चय केला. इकडे हेन्री व त्याचा मुलगा एडवर्ड यांनीं उत्तर व पश्चिम या भागांतील लोक त्यांस अनुकूल होते, तिकडे सैन्य जमविण्याची खटपट चालविली. शेवटीं लुएज ( Lewes ) किल्ल्याजवळ दोन्ही सैन्यांची गांठ पडली. मॉण्टफर्टनें राजा 'ऑक्सफर्डचे नियम' फिरून मान्य करीत असला तर माघार घेऊन सर्व नुकसानीची भरपाई करून देण्याची तयारी दाखविली. परंतु ही विनंति नाकबूल केली गेल्यामुळें लढाई झुंपली. तींत मॉण्टफर्टचा पूर्ण जय झाला आणि हेन्री व एडवर्ड हे दोघेही त्याच्या हातीं आले (१२६४).

**४ मॉंटफर्टची सभा**——मॉण्टफर्टनें हेन्री व त्याचा मुलगा एडवर्ड यांस कैदेंत ठेविलें व राज्यकारभार पाहण्यासाठीं एक नऊ गृहस्थांचें मंडळ नेमिलें. पोप, फ्रान्सचा राजा व परकीयांस अनुकूल असा पक्ष, यांचीं हें राज्य उलथून पाडण्यासाठीं सारखीं कारस्थानें चाललीं होतीं. तेव्हां जनतेचें मत आपल्याला अनुकूल करून घेण्याच्या बुद्धीनें मॉण्टफर्टनें या नवीन प्रस्थापित राज्याचा मुख्य व्यवस्थापक या नात्यानें एक पार्लमेंट बोलाविली ( १२६५ ). या पार्लमेंटची विशेष गोष्ट अशी होती कीं, ह्या सभेस बडे सरदार, धर्मगुरू व छोटे जमीनदार ( Knights ) येवढेच बोलाविले नसून बरो ( तट असलेलें शहर ) व सिटी ( शहर ) यांतूनही प्रतिनिधींस आमंत्रण केलें होतें. आतां ही मॉण्टफर्टची योजना सर्वस्वीं निर्दोष होती, असें नाहीं. त्यानें आपल्याला अनुकूल तेवढ्याच

लोकांस सभेंत बोलाविलें असून बऱ्याच योग्य ठिकाणांहून सभासद बोलाविणें युक्त असतां त्यांचीं नांवें गाळलीं होतीं. तथापि पहिला प्रयत्न या दृष्टीनें या चुका क्षम्य होत. येवढें मात्र खरें कीं, केवळ सरदार व इतर बडे लोक यांच्या संमतीनें राज्यकारभार चालविणें शक्य नाहीं, तर सामान्य जनतेचाही राज्यकर्त्यांस पाठिंबा पाहिजे, या तत्त्वाची मात्र त्याला जाणीव उत्पन्न झाली होती.

**५ हेन्रीचा कारभार**---मॉण्टफर्टचें राज्य फार दिवस टिकलें नाहीं. बंदींत असतां राजपुत्र एडवर्ड यानें घोड्यावर बसून फेरफटका करण्याचा प्रघात ठेविला होता. एडवर्डला नवा घोडा मिळाला होता; तेव्हां त्याची चाल पाहण्यासाठीं म्हणून एडवर्ड बराच दूरवर गेला. त्याच्या पहारेकऱ्यांचे घोडे अगदीं दमून गेले होते. इतक्यांत वाटेंत एक ताज्या दमाचा घोडा पकडून एडवर्ड त्याच्यावर स्वार झाला व पसार झाला ! राजपुत्र सुटला असें पाहतांच बरेच लोक त्याला मिळाले. मग त्यानें त्या सैन्यानिशीं मॉण्टफर्टवर चाल केली. ईव्हूझॅम ( Evesham) येथें लढाई होऊन ( १२६६ ) तींत मॉण्टफर्ट पडला. नंतर हेन्री फिरून राज्यावर आला व या पुढें कोणतीही भानगड उपस्थित न होतां १२७२ पर्यंत त्यानें राज्य केलें व तो त्या सालीं मृत्यु पावला.

**६ नमुनेदार पार्लमेंट**---हेन्रीचा मुलगा एडवर्ड हा या वेळीं सातव्या-शेवटच्या-धर्मयुद्धांत सामील होण्याकरितां पॅलेस्टाईनमध्यें गेला होता. तो बापाच्या मरणाची बातमी ऐकून तांतडीनें परत आला. हा एडवर्ड शूर असून युद्धकलानिपुण होता. पहिल्यानें लुएजच्या लढाईत सैन्याच्या अव्यवस्थेनें आपणाला कसा पराजय आला हें त्याच्या लक्षांत आलें, व इव्हूझॅमच्या लढाईत त्यानें आपलें सैन्य व्यवस्थेनें व शिस्तीनें उभें केलें व तो यशस्वी झाला. त्यानें राज्यावर आल्यानंतर वेल्स व स्कॉटलंड हे देश आपल्या अंमलाखालीं आणिले. तथापि या विजयांचें वर्णन पुढील प्रकरणासाठीं शिल्लक ठेवून तो धोरणी मुत्सद्दी असल्यामुळें त्यानें पार्लमेंटमध्यें कोणकोणत्या सुधारणा केल्या त्यांचाच विचार आतां

करूं. तिसऱ्या हेन्रीच्या वेळीं राज्यांत परकीयांचा सुळसुळाट होऊन त्याचीं कडु फळें एडवर्डनें आपल्या बापाबरोबर भोगिलीं होतीं. तेव्हां मॉण्टफर्टपासून लष्करी गुण जसे एडवर्डनें घेतले त्याचप्रमाणें त्याची मुत्सद्देगिरी व दूरदर्शित्वही उचललें. पार्लमेंटमध्यें वडया लोकांसच तेवढें न बोलावितां सामान्य जनांचाही तींत अन्तर्भाव केला पाहिजे, हें तत्व एडवर्डच्या मनावर पूर्णपणें बिंबलें होतें. त्यानें १२९५ सालीं पार्लमेंट बोलाविली. तींत बडे सरदार, आर्चबिशप व बिशप यांस व्यक्तिशः निमंत्रण–पत्रिका ( Special writs ) पाठवून बोलावणें केलें. प्रत्येक शायरचे प्रतिनिधी दोन छोटे जमीनदार, व प्रत्येक मुख्य शहराचे व बरोचे दोन प्रतिनिधी यांस सामान्य निमंत्रण–पत्रिका परगण्याच्या शेरीफकडे पाठवून बोलावणीं केलीं. अशा तऱ्हेनें पार्लमेंटमध्यें दोन ठळक भेद झाले. या पुढील पार्लमेंटच्या निवडणुकींतही हाच क्रम स्वीकारण्यांत आला. यामुळें ही व्यवस्था कायमची झाली. त्यावरून १२९५ त भरलेल्या पार्लमेंटास मॉडेल पार्लमेंट ( नमुनेदार पार्लमेंट ) असें नांव पडलें. या वेळीं बडे लोक व सामान्यजन या दोन्ही वर्गांच्या प्रतिनिधींचा अन्तर्भाव पार्लमेंटांत झाला. पहिल्यानें हे दोन्ही वर्ग एकाच ठिकाणीं बसत; परंतु तिसऱ्या एडवर्डच्या वेळेपासून ( १३२७-१३७७ ) दोन सभा निराळ्या झाल्या ( १३३३ ). बडया लोकांच्या सभेला उमरावांची सभा (House of Lords ) म्हणू लागले. हींत लॉर्ड व बिशप बसत. सामान्य लोकांच्या प्रतिनिधिसभेस लोकसभा ( House of Commns ) हें नांव पडलें. हींत छोटे जमीनदार व नागरिक प्रतिनिधि बसत. १२९५ च्या पार्लमेंटांत बिशपकडे निमंत्रणपत्रिका पाठवून बिशपच्या हाताखालच्या धर्मगुरूंचेही प्रतिनिधी बोलाविण्यांत आले होते. पुढें पुढें कॉमन्ससभेंत त्यांचा अन्तर्भाव होई. परंतु ते नियमितपणें हजर रहात नसत, व चौदाव्या शतकानंतर ते मुळींच येतनासे झाले.

**७ पार्लमेंटचा राजास उपयोग**–. ही १२९५ तील पार्लमेंट भरल्यानंतर दोन वर्षांनीं एडवर्डनें फ्रान्समध्यें युद्ध करण्यासाठीं सरदारांवर

एक कर बसविला, व व्यापाऱ्यांची लोंकर जप्त केली. हीं कृत्यें पार्लमेंटच्या संमतीशिवाय केल्यामुळें देशांत फारच मोठा असंतोष उत्पन्न झाला. तो असंतोष नाहींसा करण्यासाठीं राजाला पार्लमेंट बोलावणें भाग पडून पूर्वीच्या सनदा आपल्याला मान्य असल्याबद्दल आश्वासन द्यावें लागलें. त्यावेळीं पार्लमेंटच्या संमतीशिवाय प्रजेवर कोणताही कर न बसविण्याचें त्यानें शपथपूर्वक कबूल केलें. या तत्वाचें राजे लोकांनीं जरी वेळोवेळीं उल्लंघन केलें तथापि तें उघडपणें नाकबूल करण्याची कोणाची छाती झाली नाहीं. पार्लमेंटची बैठक राजे बोलावीत, ती मुख्यतः आपली पैशा-ची गरज भागावी म्हणूनच बोलावीत. पहिला वुइल्यम हा आपल्या स्वतःच्या उत्पन्नावर राज्यभार चालवीत होता. परंतु पुढें राज्याच्या मर्यादा वाढल्या व खर्चाच्या बाबीही वाढून पुढील राजांस आपलें उत्पन्न पुरेनासें झालें. तेव्हां ग्रेट कौन्सिल भरवून त्यांत सरदारांपासून ते पैशाच्या मागण्या करीत. काउन्टीमूट म्हणून परगण्यांच्या सभा असत. त्यांच्यापासून शेरीफतर्फे पैशाचें मागणें करण्यांत येई व शहरांत एजंट ( प्रतिनिधि ) पाठवून त्यांजकडून पैसा मिळवीत. परंतु या यातायातीपेक्षां एका बैठकींत, पार्लमेंट बोलाविल्यानें राजास मागणें करणें सोईचें झालें. पार्लमेंटनें दिलेला पैसा जरी सार्वजनिक कामास लागावयाचा असला तरी तो प्रत्यक्ष देणगीच्या स्वरुपानें राजास दिला जाई. याचे दोन परिणाम झाले. एकतर, ही देणगी देतांना पार्लमेंटला राजापासून राज्य सुव्यवस्थितपणें चालविण्यांत येईल, अशीं आश्वासनें, व सनदांच्या रूपानें लोकांच्या हक्कांची कबुली करून घेतां येई. दुसरें असें कीं जोंपर्यंत देणग्या द्यावयाच्या हेंच पार्लमेंटचें मुख्य काम असे, व देशांत चालणारे कायदेकानू करण्याचा क्रम पार्लमेंटांत सर्रास सुरू झाला नव्हता तोंपर्यंत पार्लमेंटचे सभासद होण्यास लोक फारसे खुषी नसत. चौदाव्या शतकांत प्रतिनिधि पाठविण्याच्या त्रासापासून आपली सोडवणूक करण्याबद्दल कित्येक मतदारसंघांकडून राजाकडे अर्ज करण्यांत आले होते.

**८ एडवर्डचें आर्थिक धोरण**——लोकांच्या लांड्या-लबाड्यां मुळें सरकारला बरेंच कमी उत्पन्न येत असे. एडवर्डनें या लबाड्या थांब विण्यास उपाय केलेच, पण कराच्या बाबीही वाढविल्या. धर्मखात्याच्या जमिनी म्हणजे संस्थेच्या जमिनी असत. व्यक्तीला मरण असतें पण संस्थेला नसतें. त्यामुळें सरंजामी पद्धतीप्रमाणें वारसापासून नजराणा, अज्ञानपालन अगर बिनवारशी जप्ती, इत्यादि बाबींपासून धर्मखात्याच्या जमिनी मुक्त असत. त्यामुळें जमिनीवरील कराच्या बाबी चुकविण्या- साठीं जमीनदार लोक पोकळ विक्रीपत्र करून धर्मखात्याला जमिनी विकीत, त्याचप्रमाणें आपली सत्ता वाढविण्याकरितां सरंजामी पद्धती- प्रमाणें बांधून घेऊन आपली जमीन कुळांस वांटून देत. १२७९ त एडवर्डनें मॉर्टमेनचा कायदा केला. या कायद्यानें धर्मखात्यास जमीन विकावयाची नाहीं असा निर्बंध घालण्यांत आला. १२८५ व १२८९ या दोन सालीं वेस्ट मिन्स्टरचे दोन कायदे करण्यांत आले. १२८५ च्या कायद्यानें जमीनदारांस आपली जमीन अखंड रहावी अशी व्यवस्था करण्याचा हक्क देण्यांत आला, त्यामुळें विकली काय किंवा वारसास गेली काय, जमिनीचे कधीं तुकडे पाडावयाचे नाहींत अशी व्य- वस्था करतां येई. १२८९ च्या कायद्यानें जमीन आणखी खालील प्रतीच्या कुळांना वांटून देण्याची मनाई झाली. कोणींही जमीन विकली कीं, विकत घेणारा, जमिनीचा वरिष्ठ मालक जो सरदार त्याचें प्रत्यक्ष

---

१ जमीन अखंड राखण्याच्या या पद्धतीमुळें जमीनदार वारला कीं त्याची जमीन त्याच्या वडील मुलास वारशाच्या हक्कानें ‘ अखंड ’ प्राप्त होई. अर्थात् त्याच्या इतर मुलांस वकिली, व्यापार अथवा धर्मखातें यांपैकीं कोणाचा तरी आश्रय करणें भाग होई. अशा रीतीनें एकाच कुटुंबांतील मंडळी निरनिराळ्या धंद्यांत पडल्यामुळें ‘ सरदार व सामान्य जन यांजमध्यें भला मोठा खंड पडून वर्गभेद तीव्र झाला ’ हा फ्रान्सां- तील प्रकार इंग्लंडांत झाला नाहीं; व त्यामुळें इंग्लंडची राजकीय उन्नति उत्पातरूपानें न होता क्रमशः प्रगति होत झाली.

कुळ बनत असून वरिष्ठाचे सर्व हक्क त्यानें भागविले पाहिजेत व जमीन विकणाराचा त्याच्याशीं पुढें कांहीं संबंध नाहीं, असा निर्बंध घालण्यांत आला. या निर्बंधामुळें राजाच्या कोणाही प्रत्यक्ष कुळानें आपली कांहीं जमीन विकली, कीं विकत घेणारा राजाचें प्रत्यक्ष कुळ बने, त्यामुळें प्रत्यक्ष कुळांची संख्या वाढली व त्या मानानें सरंजामी सरदारांची सत्ता कमी झाली. शिवाय एडवर्डनें केवळ जमीनबाबीवर अवलंबून न राहतां आयात–निर्गत मालावरही कर बसविला. शिवाय शहरांत राहणाऱ्या श्रीमंत व्यापाऱ्यांच्या जंगम मालावर तो कर वसूल करूं लागला. धर्मखात्याकडे ज्या जमिनी असत त्यांची करवसुली नीट होत नसे. एडवर्डनें इतर जमिनदारांप्रमाणें धर्मगुरूंकडूनही जमिनीचा कर सक्त रीतीनें वसूल करण्याचा प्रचार पाडला. या कामांत पोपनें बरेच अडथळे आणिले; पण त्यांस दाद न देतां धर्मगुरूंना पहिल्यानें कायद्याचें संरक्षण न मिळण्याची व पुढें जमिनी जप्त करण्याची धमकी देऊन इतरांबरोबर कर देण्यास एडवर्डनें भाग पाडिलें.

**९ लोकसत्तेचें बीज**—येणेंप्रमाणें एडवर्ड सरकारी उत्पन्न वाढविण्यासाठीं एकसारखी खटपट करीत होता; व त्यानें १२९५ सालीं जी नमुनेदार पार्लमेंट बोलाविली ती आपला सरकारी उत्पन्नाचा प्रश्न सहज रीतीनें सुटावा, याकरितांच होय. शिवाय सल्लागार सभेंत सामान्य जनांचे प्रतिनिधी बोलावण्यांत प्रबळ उमरावास प्रतिस्पर्धी निर्माण होऊन त्यांच्यापासून आपल्या राज्यास अधिक स्थैर्य यावें, असाही त्याचा हेतु होता. पूर्वी मॉंटफर्टनें जनतेचे प्रतिनिधी पार्लमेंटांत बोलाविले, तेव्हांही त्याचा हेतु आपलें राज्य स्थिर होऊन सामान्य जनांचा त्यास पाठिंबा मिळावा हाच होता. अशा रीतीनें पार्लमेंटचे उत्पादक स्वार्थमूलक भावनेनें प्रेरित झाले होते, हें जरी खरें असलें तरी राजाच्या खास सभेंत जनतेचे प्रतिनिधी जाऊं लागले व पैसे मिळविण्याच्या हेतूनें कां होईना राजे आपल्या गरजा त्यांजपुढें सांगूं लागले, यांतच लोकसत्तेचीं बीजें पेरलीं गेलीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. पहिल्यानें राजनिमंत्रणास मान देऊन आपल्या गांवाहून याक्याचें व ' मागणी

मंजूर ' असा आशीर्वाद देऊन गांवीं परत जावयाचें इतकेंच काम पार्लमेंटच्या सभासदाकडे असे. तथापि देशांत ही संस्था सतत चालू राहिल्यानें कालांतरानें तिची वाढ होऊन त्या काळीं पेरल्या गेलेल्या लोकसत्तेच्या बीजांचा प्रचंड वृक्ष बनावा व त्याचीं गोड फळें भावी पिढ्यांनीं चाखावीं हें स्वाभाविक होतें ! तसें पुढें घडूनही आलें. कसें तें पुढें येणारच आहे.

---

# १० स्कॉटलंड जिंकण्याचा प्रयत्न.

**१ वेल्स प्रांत जिंकला**—पहिला एडवर्ड जेव्हां गादीवर आला ( १२७२ ) त्या वेळीं ल्युवेलिन हा वेल्सचा मुख्य होता. त्यानें एडवर्डचें अधिराज्य कबूल करण्याची शपथ घेण्याचें नाकारिलें. पण एडवर्ड त्याच्यावर चालून गेला; तेव्हां १२७७ त त्यानें मांडलिकत्व कबूल केलें. पांच वर्षांनंतर त्यानें फिरून बंड उभारिलें, वेल्सप्रांत व इंग्लंड यांच्या सरहद्दीवरचे तीन किल्ले बळकाविले व लगतच्या इंग्लिश रहिवाशांस त्रास देण्यास सुरवात केली. वेल्श लोक हे इंग्लंडांतील प्राचीन ब्रिटन लोकांचे वंशज असून ल्युवेलिनला आपल्या जातीचा मोठा अभिमान असे. वेल्श राजास लंडनांत राज्याभिषेक होणार अशी एक वेल्समध्यें वदंता होती व आपणास तो योग आहे, असें ल्युवेलिनला वाटत असे. यामुळें त्यानें दंगा मांडिला. परंतु एडवर्डनें जलदी करून वेल्सवर चाल केली. युद्ध झालें; त्यांत ल्युवेलिन पडला, वेल्स प्रांत एडवर्डच्या हस्तगत झाला. पश्चिम वेल्सचें स्वातंत्र्य कायम ठेविण्यांत आलें व पूर्व वेल्स त्या लगतच्या इंग्लिश उमरावांच्या स्वाधीन करण्यांत आला. वेल्सवरील आपलें स्वामित्व दृढ करण्यासाठीं एडवर्डनें सरहद्दिवर एक किल्ल्यांची रांग बांधिली. त्यांपैकीं कॅरनॅरव्हन किल्ल्यांत एडवर्डला पुत्र झाला. त्यास १३०१ सालीं ' प्रिन्स ऑफ वेल्स ' अशी

ल्युवेलिनची काढून घेतलेली पदवी देण्यांत आली. तेव्हांपासून इंग्लंडच्या राजाच्या वडील मुलास 'प्रिन्स ऑफ वेल्स' म्हणण्याची पद्धति पडली आहे. हल्लींचे इंग्लंडचे राजे पांचवे जॉर्ज यांचा वडील मुलगा एडवर्ड यास कॅरनॅरव्हन किल्ल्यांत मोठ्या समारंभानें यौवराज्याभिषेक करण्यांत येऊन ही पदवी समारंभानें देण्याचा नवीनच प्रघात नुकताच पाडण्यांत आला ( १९११ ).

**२ स्कॉटलंडांत दुही**—स्कॉटलंडच्या राजांनीं आपल्या इंग्लंडांतील मुलखावरच नव्हे तर सगळ्या स्कॉटलंड देशावर आपलें अधिराज्य कबूल करावें, अशी एडवर्डची इच्छा होती. ही इच्छा तृप्त करण्याची संधि १२९० सालीं आली. स्कॉटलंडची गादी रिकामी पडून तीवर तेरा वारस हक्क सांगू लागले. त्यांपैकीं जॉन बेलियल व रॉबर्ट ब्रूस या दोघांचा हक्क इतरांपेक्षां अधिक होता. देशांत यादवी होऊं नये म्हणून त्या दोघांनीं व स्कॉटलंडमधील कारभाऱ्यांनीं एडवर्ड जो निकाल देईल तो मान्य करण्याचें ठरविलें. पहिल्या रिचर्डनें धर्मयुद्धावर जाण्याचे वेळीं स्कॉटलंडवरील अधिराज्याचा हक्क विकून टाकिला होता. तथापि त्याला तसें करण्याचा अधिकार नव्हता, असें सांगून ज्याला मी निवडीन त्या वारसानें माझें अधिराज्य कबूल केलें पाहिजे अशी एडवर्डनें अट घातली. या वेळीं कसेंही करून इंग्लिश राजाची मदत घेतल्याशिवाय आपलें चालावयाचें नाहीं, असें जाणून स्कॉटिश सरदारांनीं ती अट कबूल केली. तेव्हां एडवर्डनें बेलियलला स्कॉटलंडचा राजा नेमिलें, व बेलिय-

---

१ हल्लीं सरदारांचे पांच वर्ग असून बॅरन, व्हायकाउंट, अर्ल, मार्क्विस व डयूक असा दर्जावरून त्यांचा चढता क्रम आहे. पूर्वकाळीं सरदार, बडे जमीनदार असून त्यांच्यांत आंखीव दर्जे नव्हते. तिसऱ्या एडवर्डनें डयूक ही पदवी पहिल्यानें इंग्लंडांत चालू केली. त्यानें आपला वडील मुलगा ब्लॅक प्रिन्स यास 'डयूक ऑफ कॉर्नवॉल' बनविलें. तेव्हांपासून प्रिन्स ऑफ वेल्स हा 'डयूक ऑफ कॉर्नवाल' असतो. पुढील राजांनीं अर्ल, मार्क्विस इत्यादि पदव्या सनदेनें करून दिल्या अशा रीतीनें सरदार वर्गांत पांच सनदशीर दर्जे निर्माण झाले.

लनें आपण इंग्लंडच्या राजाचा मांडलीक असल्याची शपथ घेतली व इंग्लंडचें अधिराज्य आपल्या वंशजासही मान्य असलें पाहिजे अशी कबुली दिली ( १२९१ ).

**३ स्कॉटलंडशीं युद्ध**—यानंतर दोन वर्षांनीं इंग्लंड व फ्रान्स या दोन देशांत लढाई सुरू झाली; तेव्हां एडवर्डनें बेलियलास सैन्यासह आपल्या मदतीस दाखल होण्याविषयीं हुकूम पाठविला. स्कॉटिश सरदारांस या एडवर्डच्या कृत्याचा राग आला. त्यांनीं बेलियलला सल्ला देण्यासाठीं एक मंडळ नेमिलें व त्याच्याकडून १२९६ मध्यें इंग्लंडचें अधिराज्यही नाकबूल करविलें. एडवर्डला मुळींच मदत न करितां स्कॉटिश लोकांनीं फ्रान्सशीं स्नेहसंबंध जोडिला, व मधून मधून त्या संबंधांत खंड पडले, तथापि तो पुढें तीनशें वर्षें टिकला. हें स्कॉटिश लोकांचें वर्तन पाहून एडवर्डच्या तळव्याची आग मस्तकास गेली. त्यानें लागलीच स्कॉटलंडवर स्वारी केली. चार महिन्यांच्या आंत स्कॉटलंडचें मुख्य बंदर बेरिक हें एडवर्डच्या हातीं आलें, व डनबार येथें त्याचा जय होऊन बेलियल त्याच्या हातीं लागला. त्यानें बेलियल स्कॉटलंडच्या गादीवरून पदच्युत झाला आहे असें जाहीर केलें, स्वतःच्या नांवानें स्कॉटलंडांत द्वाही फिरविली व स्कॉटलंडच्या राजांचें स्कोन येथील राज्याभिषेकाच्या वेळीं बसण्याचें सिंहासन वेस्ट मिन्स्टर ॲबेंत आणिलें !

**४ देशभक्त वॉलेस**—यानंतर एडवर्ड फ्लॅण्डर्समध्यें गुंतला. ती संधि साधून स्कॉटलंडमधील प्रसिद्ध देशभक्त वुइल्यम वॉलेस यानें आपल्या भोंवतीं विश्वासू अनुयायी जमवून इंग्लंडची सत्ता झुगारून देण्याचा प्रयत्न केला. स्टार्लिंग ब्रिज येथें इंग्लिश सैन्यास गांठून वॉलेसनें त्याचा पराभव केला, व स्कॉटलंड स्वतंत्र केलें. पण ही स्थिति फार दिवस टिकली नाहीं. १२९८ त एडवर्डनें मोठ्या सैन्यानिशीं स्कॉटलंडवर चाल केली. वॉलेसनें समोरासमोर उभें राहून लढाई देण्याचा प्रसंग टाळण्यासाठीं शर्थ केली, पण फॉल्कर्क येथें प्रत्यक्ष लढाई देणें त्यास भाग पडलें व त्याची

त्या लढाईंत सपशेल पराभव झाला. तथापि वॉलेस मोठ्या युक्तीनें निसटून गेला. व गनिमी काव्याचें युद्ध त्यानें पुढें पांच सहा वर्षेपर्यंत चालू ठेविलें. शेवटीं १३०४ मध्यें कोणा विश्वासघातकी माणसानें आपला स्वार्थ साधण्यासाठीं नीचपणानें वॉलेसला इंग्रजांच्या स्वाधीन केलें. त्याच्यावर दया न करतां एडवर्डनें त्याला लंडनमध्यें फाशीं दिलें !

**५ स्कॉटलंड स्वतंत्र झालें.**—स्कॉटलंडांत एडवर्डनें नवी राज्यपद्धति सुरू केली. स्कॉटिश सरदारांचें एक कौन्सिल नेमून त्याच्या हातीं त्यानें राज्यकारभार दिला. व स्कॉटिश प्रतिनिधी इंग्लिश पार्लमेंटांत घेण्याचें ठरविलें. इंग्लंडप्रमाणें स्कॉटलंडचे परगणे पाडिले व सर्व किल्ले सरदारांपासून हिसकून घेतले. या व अशा आणखी जाचक निर्बंधांनीं स्कॉटिश लोक एडवर्डच्या राज्यास अगदीं कंटाळून गेले. व मागें जो रॉबर्ट ब्रूस गादीला वारस म्हणून उभा होता त्याच्या रॉबर्ट ब्रूस हेंच नांव धारण करणाऱ्या नातवाच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं बंड उभारिलें ! रॉबर्ट ब्रूस इतके दिवस स्वतःस एडवर्डचे मित्र म्हणवीत होता. त्यानें आतां आडपडदा न ठेवितां स्कोन येथें स्वतंत्र स्कॉटलंडचा राजा म्हणून आपल्याला राज्याभिषेक करून घेतला ( १३०६ ). या बातम्या ऐकतांच एडवर्डनें एकदम स्कॉटलंडवर चाल केली, व ब्रूसच्या सैन्याचा पुरा पराभव करून त्याला हेब्रिडीज बेटांत हांकून दिलें. तथापि एडवर्ड इंग्लंडांत परत जातो तों ब्रूसनें फिरून स्कॉटलंडांत आपली सत्ता बसविल्याचें त्याला कळलें. एडवर्ड या वेळीं म्हातारपणामुळें क्षीण व आजारी होता. तरी त्यानें सैन्य जमवून स्कॉटलंडवर चाल करण्याचा निश्चय केला व कार्लाइलपर्यंत तो चालून गेला. त्या मुक्कामाहून पुढें चाल करीत असतां त्याची प्रकृति अतिशय बिघडली व तो वारला. मृत्यु शय्येवर असतां आपल्या मुलास त्यानें आज्ञा केली कीं, " तूं स्कॉटलंडवर अर्धवट राहिलेली स्वारी पुरी कर, व माझीं हाडें आपल्या सैन्याबरोबर पुढें चालीव. " परंतु एडवर्डचा मुलगा—जो लवकरच दुसरा एडवर्ड म्हणून गादीवर बसला—त्याच्या अंगीं मुळींच तडफ नसल्यामुळें त्यानें आपल्या बापाची आज्ञा मानिली नाहीं. तो दुर्बल

असून चैनी होता. तेव्हां स्कॉटिश लोकांस आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्यास चांगलीच संधि मिळाली. रॉबर्ट ब्रूसनें किल्ल्यामागून किल्ला व प्रांतामागून प्रांत सोडवीत बहुतेक सर्व स्कॉटलंड इंग्लिश अंमलदारांपासून सोडविलें. एका स्टर्लिंग या ठिकाणाखेरीज दुसरें कोणतेंही ठिकाण इंग्रजांच्या ताब्यांत राहिलें नाहीं.

६ **बॅनकबर्नची लढाई**—शेवटीं १३१४ मध्यें एक जंगी सैन्य बरोबर घेऊन दुसऱ्या एडवर्डनें स्कॉटलंडवर चाल केली. ब्रूसनें स्टर्लींगच्या दक्षिणेस सुरक्षित अशा ठिकाणीं आपली फौज लढाईच्या तयारीनें उभी केली. त्याच्या सैन्याची तुकडी बॅनकबर्न नांवाच्या ओढ्याच्या आश्रयानें होती, व ओढ्याच्या मध्यभागापुढें खड्डे असून त्यांत अणकुचीदार खडक होते. मजबूत ठिकाणीं तळ दिलेल्या स्कॉटिश लष्करावर एडवर्डनें हल्ला चढविला; लढाई जोरांत चालली असतां ब्रूसच्या घोडेस्वारांनीं इंग्लिश सैन्याच्या बगलेवर हल्ला केला. त्यामुळें इंग्लिश सैन्यांत गोंधळ उडाला. इतक्यांत स्कॉटिश सैन्याचें बाजारबुणगें आपल्या सैन्याकडे येतांना दिसलें. एडवर्डला ही स्कॉच सैन्यांत नवीन सैन्याची भरतीच पडत आहे. असें वाटलें, व त्यानें आपल्या सैन्यास परत फिरण्याचा हुकूम दिला. याच वेळीं ब्रूसनें आपल्या मुख्य सैन्यानिशीं हल्ला चढविला. तेव्हां इंग्लिश तिरंदाज व घोडेस्वार यांची तिरपीट उडून ते पळूं लागले. खुद्द एडवर्ड शत्रूच्या हातून मोठ्या शर्थीनें निसटला, व थोड्याशा लोकांसह लंडनला आला. यापुढें उठावाचें धोरण सात वर्षें पर्यंत स्वीकारून ब्रूसनें इंग्लंडच्या उत्तरेकडील परगण्यांस त्रास देण्याचा क्रम चालविला. १३२० सालीं एका स्वारींतच त्यानें चौऱ्याऐशीं गांवें उद्ध्वस्त केलीं ! यानंतर तीन वर्षांनीं इंग्रजांनीं ब्रूसशीं तेरा वर्षांपुरता तह केला, व त्यांत स्कॉटलंडचें स्वातंत्र्य कबूल केलें.

७ **दुसऱ्या एडवर्डचा अंत**—स्कॉटलंड घालविलें तेव्हांपासून इंग्लिश लोकांस एडवर्डचा अगदीं तिटकारा आला होता. एडवर्डची ह्यू डीस्पेन्सर याच्यावर मर्जी असून त्याच्या तंत्रानेंच तो वागत असे. या

डीस्पेन्सर व त्याचे नातलग यांजवर देणग्यांचा वर्षाव होऊं लागला. तेव्हां देशांत अस्वस्थता होऊन बंडें होऊं लागलीं, परंतु त्या सर्वांचा मोड झाला. मॉर्टिमर नांवाचा एक बंडवाला फ्रान्सांत पळून गेला. दुसऱ्या एडवर्डची राणी इझाबेला ही या वेळीं पॅरिसमध्यें होती. ती आपल्या नवऱ्याविरुद्ध उलटली व मॉर्टिमर यास मिळाली. नंतर १३२६ तर्ती दोघेंही इंग्लंडच्या किनाऱ्यावर उतरलीं. लवकरच त्यांना राजघराण्यांतील पुरुष व राष्ट्रांतील वजनदार लोक मिळाले. राजा वेल्समध्यें पळून गेला व बचावासाठीं आयर्लंडांत जाणार होता. पण इतक्यांत तो पकडला गेला व त्यास कैदेंत टाकण्यांत आलें. १३२७ च्या जानेवारींत पार्लमेंट बोलाविली जाऊन तिच्यापुढें हिअरफर्डच्या बिशपनें राजावर पुढील आरोप आणिले. १ राजास न्यायान्याय निवडण्याची कुवत नाहीं, २ तो बदसल्ल्यानें वागला, ३ त्यानें स्वतःच्या चुकीनें स्कॉटलंड गमाविलें. ४ धर्मखात्याचें त्यानें नुकसान केलें, ५ सर्वांस न्याय देण्याची राज्याभिषेकाच्या वेळीं घेतलेली शपथ त्यानें मोडिली. त्या दुर्बल राजानें सर्व गुन्हे आपण केल्याचें कबूल केलें व गादीवरील आपला हक्क सोडिला. पार्लमेंटनें त्याचा मुलगा एडवर्ड यास तिसरा एडवर्ड ही पदवी देऊन गादीवर बसविलें. राजा दुसरा एडवर्ड पदच्युत झाल्यावर आठ महिन्यांनीं मरण पावला.

---

## ११ शत सांवत्सरिक युद्ध.

### ( फ्रान्स जिंकण्याचा प्रयत्न ) १३४०–१४५३.

**१ फ्रान्स जिंकण्याचें ध्येय**—तिसरा एडवर्ड (१३२७–१३७७) राज्य करीत असतां इंग्लंड व फ्रान्स या दोन देशांमध्यें भयंकर युद्ध सुरू झालें. हें मध्यें मध्यें थांबून १३४० पासून १४५३ पर्यंत चाललें

होतें, म्हणून यास शत सांवत्सरिक युद्ध म्हणतात. या युद्धांत महत्त्वाकांक्षी इंग्लंडच्या राजांनीं आपल्या राष्ट्राची सर्व शक्ति एकवटून फ्रान्स देश जिंकून आपल्या राज्यास जोडण्याकडे तिचा उपयोग केला. हें काम अशक्य कोटींतील असून या युद्धापासून शेवटीं कोणतीही फलप्राप्ति न होतां द्रव्यहानि व मनुष्यहानि होऊन इंग्लंडवर आपत्तींची परंपरा ओढवली! तथापि पहिल्यानें तिसरा एडवर्ड व पुढें पांचवा हेन्री या इंग्लंडच्या कर्तृत्ववान् राजांनीं आपलें बुद्धिबल व युद्धचातुर्य फ्रान्स जिंकण्याच्या कामीं खर्च केल्यामुळें या युद्धाचा वृत्तांत सांगणें भाग आहे.

**२ युद्धाचीं कारणें**—पहिल्याने या युद्धास तात्कालिक कारणें काय झालीं तीं पाहूं. तिसरा एडवर्ड गादीवर आला तेव्हां तो अज्ञान असल्यामुळें मॉर्टिमर व इझाबेला ही दुक्कलच कारभार पहात होती. त्यांनीं कारभार नीट न करतां अंदाधुंदी चालविली. तेव्हां तिसऱ्या एडवर्डनें त्यांना तुरुंगांत टाकून स्वतःच्या हातीं राज्यसूत्रें घेतलीं (१३३०). इतक्यांत स्कॉटलंडचा राजा रॉबर्ट ब्रूस मृत्यु पावला, व त्याचा पांच वर्षांचा मुलगा डेव्हिड ब्रूस हा गादीचा मालक झाला. पण जॉन बेलियलचा मुलगा एडवर्ड बेलियल यानें या लहान मुलास गादी पचूं न देतां आपण बळकाविली (१३३२). तिसऱ्या एडवर्डनें एडवर्ड बेलियलला स्कॉटलंडचा राजा म्हणून मान्य केलें. स्कॉच लोकांनीं डेव्हिड ब्रूसची बाजू उचलून धरली, व इंग्रज व स्कॉटिश लोकांत हॉलिडनहिल येथें लढाई होऊन स्कॉटिश लोकांचा पूर्ण पराजय झाला (१३३३). तेव्हां डेव्हिड ब्रूसनें फ्रेंच लोकांचा आश्रय केला. बेलियलनें इंग्लिश राजाचें अधिराज्य कबूल करून इंग्लिश सैन्याच्या मदतीनें १३४७ पर्यंत स्कॉटलंडवर राज्य केलें. त्या वर्षीं डेव्हिड ब्रूस यानें एडवर्डला एक लक्ष मार्क व बेरिक ऑट्वीड हें शहर देण्याचें ठरवून एडवर्डचें आपण मांडलिक असल्याबद्दल शपथ घेऊन स्कॉटलंडची गादी मिळविली. ब्रूसला मदत करून स्कॉटलंडचें स्वातंत्र्य रक्षण करण्याचा उद्योग फ्रेंचांनीं तो त्यांच्याकडे पळून गेल्यापासून सारखा चालू ठेविला होता. तेव्हां

हेंच पहिलें वितुष्टाचें कारण म्हणण्यास हरकत नाहीं. त्या वेळीं सहावा फिलिप हा फ्रान्सचा राजा होता. जॉनच्या वेळीं इंग्लिश राजांचा बहुतेक सर्व मुलूख गेल्याचें सांगितलें. पण त्या वेळीं लॉयर नदीच्या दक्षिणेकडील अॅकिटेन हा प्रांत मात्र इंग्रजांकडे कायम राहिला. सहाव्या फिलिपच्या मनांत हाही प्रांत इंग्रजांकडून घ्यावयाचे होते. तेव्हां हा प्रांत हातचा जाऊं न देणें हें युद्धाचें दुसरें कारण होतें. पण सर्वांत बलवत्तर कारण निराळेंच होतें. फ्रान्समध्यें ईशान्येस फ्लँडर्स हा प्रांत आहे. इंग्लंडांतील मेंढ्यांची लोकर विकत घेऊन कापड तयार करावयाचें, हा फ्लँडर्समधील लोकांचा धंदा होता. लोकरीच्या व्यापारामुळें फ्लँडर्समधील लोक गबर होते, व त्यांचा इंग्लंडकडे विशेष ओढा होता. या फ्लँडर्सच्या लोकांस पूर्णपणें आपल्या कह्यांत आणण्याचा निश्चय सहाव्या फिलिपनें केला होता व तसें झालें असतें म्हणजे लोकरीच्या व्यापारास बराच धक्का बसला असता. तेव्हां फ्लेमिश लोकांनीं एडवर्डला आपल्या प्रांतांचें रक्षण करण्याची विनंति केली; व फ्रान्सच्या गादीवर सहाव्या फिलिपपेक्षां आपलाच अधिक हक्क पोंचतो व म्हणुन आपणच खरे फ्रान्सच्या गादीचे मालक आहों, असें जाहीर करण्यास सांगितलें. फ्रान्सच्या मागील राजाच्या सख्या बहिणीचा एडवर्ड हा मुलगा असून फिलिप हा त्याचा चुलत भाऊ होता. तेंव्हां नात्यानें एडवर्ड मागील राजास अधिक जवळ होता यांत शंका नाहीं. परंतु फ्रान्सच्या राज्यांत कोणत्याही मुलीला अगर मुलीच्या संततीला गादी मिळावयाची नाहीं असा कायदा होता. तथापि एडवर्डनें त्या कायद्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करून फ्लेमिश लोकांच्या विनंतीस मान दिला व आपणच फ्रान्सच्या राज्याचे खरे वारसदार आहों असें जाहीर केलें. तेव्हां अर्थातच युद्धास सुरवात झाली.

**३ समुद्रावर चकमक**—सहाव्या फिलिपनें इंग्लिश खाडींत हिंडणाऱ्या जहाजांस चांचेगिरी करून बराच त्रास दिला होता. तेव्हां फ्रान्स व इंग्लंड यांच्या मधील दळणवळणाचा हा मार्ग कायमचा सुरक्षित करण्याच्या उद्देशानें एडवर्डनें फ्रेंच जहाजांचा नायनाट करण्याचें

ठरविलें. फ्लँडर्सच्या किनाऱ्यावरील स्ल्यूज ( Sluys ) बंदरांत १९० जहाजांचा तांडा तळ देऊन होता. एडवर्डनें फ्रेंचांच्या जहाजांपेक्षां थोडीं अधिक जहाजें बरोबर घेतलीं व फ्रेंच जहाजांवर हल्ला चढविला ( १३४० ). त्या काळीं बंदुका व दारुगोळा यांचा उपयोग करण्याची माहिती नव्हती; तेव्हां शत्रूचें जहाज लांब असतां त्यावर अचुक बाणांचा वर्षाव करावयाचा व मग जवळ आपलें जहाज नेऊन शत्रूच्या जहाजावर उतरावयाचें व लढाई करावयाची अशी पद्धति असे. याप्रमाणें लढाई करून इंग्रजांनीं फ्रेंचांचें खूप नुकसान केलें, कित्येक जहाजें बुडविलीं व दुसरीं कित्येक खिळखिळीं केलीं. इंग्रजांचीं फक्त दोनच जहाजें बुडालीं. या चकमकींत फ्रेंचांचा इतका मोड झाला कीं, इंग्लिश खाडींत फ्रेंचांनीं हें युद्ध चालू असतां पुढें कधींहीं गडबड केली नाहीं.

४ **क्रेसीची लढाई**---पुढें १३४६ त एडवर्ड ला होग बंदरांत उतरला व त्यानें उत्तर फ्रान्स काबीज करण्यास सुरवात केली. यानंतर फ्रान्सची राजधानी जें पॅरिस शहर त्याचे रोखानें तो चालला. इतक्यांत सेंट डेनिस येथें फ्रेंच राजानें त्याला अडविलें, व उत्तरेकडे परतविलें. एडवर्ड क्रेसीपर्यंत हटला; पण आणखी मागें न हटतां फ्रेंचांचें सैन्य फारच भारी होतें, तरी त्याच्याशीं समोरासमोर लढाई देण्याची त्यानें तयारी केली. इंग्रजांचें पायदळ मोठें असून तिरंदाजांची त्यांच्याकडे चांगली भरती होती. फ्रेंचांच्या बाजूस जिनोआ शहरांतील १४००० तिरंदाज असून त्यांचा मुख्य भर चिलखत घालून सज्ज असलेल्या घोडेस्वार सैनिकांवरच होता. क्रेसीच्या लढाईच्या अगोदर मोठें वादळ सुटून खूप पाऊस पडला होता. त्यांत फ्रेंचाकडील जिनोआंतील तिरंदाजांचे तिरकमठे भिजून ओले चिंब झाले होते. इंग्रजांनीं आपले तिरकमठे म्यानव्हासमध्यें ठेवून कोरडे राखिले. लढाई सुरू झाली तेव्हां फ्रेंचांकडील तीरवाल्यांचे तीर निरुपयोगी होऊन त्यांच्या तिरंदाजांकडून कांहींच काम होईना. इंग्रजांचे तिरंदाज एकसारखे तीर मारीत होते. त्यामुळें फ्रेंचांच्या अवाढव्य सैन्याचा तेव्हांच धुव्वा उडाला. फ्रान्समधील कुलीन घराण्यांपैकीं सुमारें निम्मे लोक या लढाईंत पडले, या

लढाईंत एड्वर्डचा वडील मुलगा एडवर्ड–ज्याला त्याच्या काळ्या चिलखता-वरून 'ब्लॅक प्रिन्स' असें नांव पडलें होतें––त्यानें फारच पराक्रम गाजविला. ही लढाई दोन दृष्टींनीं महत्त्वाची आहे. एक तर, या लढाईंत चिलखतें घालून भोसकावयास भाला व हाणावयास तरवार या शस्त्रांनिशीं घोड्यावर बसून युद्ध करणाऱ्या खानदानीच्या लोकांशीं, बाणांसारख्या दुरून फेंकून मारावयाच्या शस्त्रानें, सामान्य जनांचें पाय-दळ जर लढूं लागलें तर सामान्य पायदळासही आपल्या चपळाईच्या जोरावर खानदानीच्या लोकांच्या सैन्याची चांगलीच तिरपीट उडवितां येते हें सिद्ध झालें. दुसरें असें कीं, याच लढाईच्या वेळीं शत्रूस भिव-विण्यापुरता तरी तोफांच्या सरबत्तीचा उपयोग करण्यांत आला.

**५ क्यालेचा वेढा**––क्रेसीच्या लढाईनंतर एडवर्डनें क्याले बंदरास वेढा घातला. वेढ्याचें काम सुमारें एक वर्षपर्यंत चालल्यानंतर आंतील लोक उपासमारीनें जर्जर होऊन शरण आले. किल्ल्यांतील लोकांनीं दाखविलेल्या हट्टानें एडवर्ड इतका संतापला होता कीं, आंतील सर्व लोकांची कत्तल करण्याचा त्याचा विचार होता. तथापि लोकांच्या विन-वणीवरून सहा पुढाऱ्यांस वेशीच्या कुलूप किल्ल्यांसह माझ्या स्वाधीन करा म्हणजे मी इतर लोकांची सुटका करीन असें त्यानें कबूल केलें. मग सहा पुढाऱ्यांस एडवर्डपुढें बांधून आणिलें व एडवर्ड वेढ्याच्या वेळीं आपणास फार त्रास पडला म्हणून क्रूरपणानें त्यांची कत्तल करणार होता. परंतु इतक्यांत स्कॉच लोकांनीं इंग्लंडवर स्वारी केली असतां नेव्हिल्स क्रॉस येथें लढाई होऊन स्कॉच लोकांचा पूर्ण मोड झाल्याचें आनंद-कारक वर्तमान सांगण्यास एडवर्डची राणी आली होती. तिनें त्या सहा पुढाऱ्यांस क्षमा करण्याविषयीं मोठ्या काकुळतीला येऊन मागणें मागितलें. तेव्हां मात्र एडवर्ड गहिंवरून गेला. व त्यानें त्या साही पुढाऱ्यांची सुटका केली.

**६ ब्रेटिग्नीचा तह**—पुनः आठ नऊ वर्षे थांबून लढाई सुरू झाली. १३५६ सालीं ब्लॅक प्रिन्स ( एडवर्डचा वडील मुलगा ) यानें

पॉयटियर्स येथें फ्रेंचांवर फारच मोठा जय मिळविला. आतां फिलिप वारून त्याचा मुलगा जॉन हा फ्रान्सच्या गादीवर आला होता. पॉयटियर्सच्या लढाईत खुद्द जॉन कैद झाला. यानंतर चार वर्षेपर्यंत इंग्लिश सैन्यानें सर्व फ्रान्सभर धुमाकूळ घातला व फ्रेंच लोकांस तटबंदीच्या शहरांचा आश्रय करून रहाण्याशिवाय गत्यंतर नाहींसें झालें. १३६० त ब्रेटिग्नी येथें तह ठरला. त्यांत एडवर्डनें फ्रेंच गादीवरचा हक्क सोडिला. त्याच्या मोबदला ॲक्विटेन प्रांत फ्रेंच राजाच्या स्वामित्वाचाही हक्क न राहतां एडवर्डला मिळाला. आपली सुटका करून घेण्यासाठीं फ्रेंच राजानें सहा वर्षांच्या आंत बारा कोट रुपये खंडणी भरण्याचें कबूल केलें. परंतु या भपकेदार कलमांच्या तहापासून इंग्लंडास खरोखर कांहींच फायदा झाला नाहीं. ॲक्विटेन प्रांतांतील लोक इंग्लिश सत्तेखालीं रहाण्यास न खुष होते. पुनः १३७५ सालीं एक तह झाला. त्यांत इंग्लिशांकडे क्यॅलेसारख्या समुद्रावरील कांहीं बंदरांखेरीज फ्रान्सांत कांहींच राहिलें नाहीं.

**७ शूर पांचवा हेन्री**--तिसरा एडवर्ड १३७७ त वारला. ब्लॅक प्रिन्स त्याच्या अगोदरच वारला असल्यामुळें ब्लॅक प्रिन्सचा दुसरा मुलगा दुसरा रिचर्ड ही पदवी घेऊन राज्यावर आला. त्यानें १३९९ पर्यंत राज्य केलें. परंतु त्या वेळीं तो राज्य करण्यास नालायक ठरून तिसऱ्या एडवर्डचा तिसरा मुलगा जॉन ऑफ गॉंट, ड्यूक ऑफ लॅंक्यास्टर हा होता, त्याचा मुलगा चौथा हेन्री ही पदवी घेऊन गादीवर आला. त्याच्या मागून १४१३ त त्याचा मुलगा 'पांचवा हेन्री' हा गादीवर आला. हा तरुण असून शूर होता. यानें फ्रान्सशीं तिसऱ्या एडवर्डच्या

---

## लॅंक्यास्ट्रियन घराणें १३९९–१४६१

चौथा हेन्री १३९९–१४१३
|
पांचवा हेन्री १४१३–१४२२
|
सहावा हेन्री १४२२–१४६१

वेळीं चाललेलें शतसांवत्सारिक युद्ध फिरून सुरू केलें. त्या वेळीं फ्रान्स-मध्येंहि परकीयांचा हात शिरकण्यास परिस्थिती अनुकूल होती. फ्रान्सचा राजा सहावा चार्लस हा वेडा असून ड्यूक ऑफ बर्गंडी व ड्यूक ऑफ ऑर्लीन्स या दोघां कारभाऱ्यांत तंटा पडला होता. ड्यूक ऑफ बर्गंडीच्या ताब्यांत फ्लँडर्स हा इंग्लंडशीं हितसंबंध असलेला प्रांत होता. त्यानें १४१३ त पांचव्या हेन्रीची मदत मागितली व हेन्रीस फ्रान्सचा राजा म्हणून कबूल करण्यास तो तयार झाला. हेन्री १४१५ त फ्रान्समध्यें मोठ्या सैन्यानिशीं उतरला. फ्रेंच व इंग्रज यांमध्यें क्रेसीजवळ एजिंकूर येथें मोठें युद्ध झालें. त्यांत क्रेसीप्रमाणें फ्रेंचांचा पुरा मोड झाला. हेन्रीचेंही सैन्य अगदीं थकून गेलें असल्यामुळें फ्रान्सांत रहाणें त्यास अशक्य झालें, व तो क्यालेवरून इंग्लंडांत परत गेला. पुढें चार वर्षांनीं फिरून हेन्री फ्रान्सांत गेला व प्रांत काबीज करूं लागला. इतक्यांत डॉफिननें[1] हेन्रीचा पक्षपाती ड्यूक ऑफ बर्गंडी याचा खून करविला. त्यामुळें बर्गंडींतील लोक चिडून गेले. डॉफिन केव्हांही फ्रान्सचा राजा होऊं नये या विचारानें त्यांनीं हेन्रीस उत्तर फ्रान्सचा राजा म्हणून कबूल केलें. १४२० त त्यांनीं ट्रॉइजचा तह घडवून आणिला. त्या अन्वयें त्या वेळच्या फ्रान्सच्या राजाच्या हयातीपर्यंत हेन्रीस (पालक) नेमण्यांत आलें तो वारल्यावर हेन्रीस फ्रान्सची गादी मिळावी असें ठरलें; व फ्रान्सच्या राजाची मुलगी डॉफिनची बहीण क्याथेराईन हिचा हेन्रीशीं विवाह करण्यांत आला. आर्लीन्समधील पक्षास ही व्यवस्था मान्य नव्हती. तेव्हां त्यांनीं झगडा तसाच चालू ठेविला. हेन्री या पक्षाशीं लढून लॉयर नदीच्या दक्षिणेकडील मुलूख जिंकीत असतां दगदगीनें अजारी पडून १४२२ त वारला. तेव्हां त्याचा वारस मुलगा तान्हा असून पुरता एक वर्षाचाही नव्हता. त्यास सहावा हेन्री म्हणून इंग्लंडांत राज्याभिषेक झाला व पॅरिसमध्येंही फ्रान्सचा राजा म्हणून त्याच्या नांवानें द्वाही फिरविण्यांत आली. परंतु दक्षिण फ्रान्सनें डॉफिनला गादीवर बस-

---

१ फ्रान्सच्या राजाच्या वडील मुलास डॉफिन म्हणतात.

वून सातवा चार्लस अशी पदवी दिली. बालराजा सहावा हेन्री याचा एक चुलता डयूक ऑफ ग्लूस्टर यानें इंग्लंडचा कारभार अंगावर घेतला व दुसरा चुलता डयूक ऑफ बेडफर्ड हा फ्रान्समधील व्यवस्था पाहूं लागला. ऑर्लीनिस्ट पक्षाकडे लॉयर नदीच्या उत्तरेकडे ऑर्लीन्स शहर येवढेंच ठिकाण होतें. बेडफर्डनें १४२८ त या शहरास जोराचा वेढा दिला.

**८ जोन ऑफ आर्क**—याच सुमारास जोन ऑफ आर्क नांवाची एक फ्रेंच शेतकऱ्याची मुलगी लोरेन परगण्यांतील डॉमरेमी या गांवीं रहात होती. आपल्या राजघराण्याची नाचक्की झाली व इंग्रजांनीं आपला देश व्यापला या गोष्टीनें तिचें अंतःकरण कळवळून गेलें, व स्वदेशरक्षणार्थ आपण जन्मलों आहों या भावनेनें ती पूर्णपणें प्रेरित झाली. इंग्रजांनीं ऑर्लीन्स शहरास वेढा घातला होता तो उठवून त्या शहरास मोकळें करावयाचें व इतकें केलें कीं इंग्रज सत्ता नाहींशी करून फ्रान्सचें स्वातंत्र्य हां हां म्हणतां अबाधित करावयाचें असा तिनें दृढ निश्चय केला. ती फ्रान्सचा राजा सातवा चार्लस याला जाऊन भेटली व आपला हेतु तिनें त्याला कळविला. पहिल्यानें तिच्या शब्दावर कोणाचाही विश्वास बसेना. पण शेवटीं दैवाची परीक्षा तर पहावी या बुद्धीनें फ्रेंच राजानें तिच्या हाताखालीं सैन्य दिलें. तें घेऊन १४२९ च्या एप्रिलांत ती ऑर्लीन्सला गेली व तेथील शिबंदीच्या अंगांत चैतन्य उत्पन्न करून तिनें लवकरच वेढा घालणाऱ्या इंग्रज फौजेस हांकून दिलें ( १४२९ ). ठिकठिकाणीं इंग्रज सैन्याचे पराभव करून बारा आठवड्यांच्या आंत अभिवचन दिल्याप्रमाणें तिनें सातव्या चार्लसला ऱ्हीम्स येथील क्याथीड्रल ( धर्ममंदिर ) मध्यें पूर्वजांप्रमाणें मोठ्या थाटानें राज्याभिषेक करविला ! ऑर्लीन्सचा वेढा उठला तेव्हांपासूनच इंग्रजांची फ्रान्सांतील सत्ता नाहींशी होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. इतक्यांत १४३१ च्या उन्हाळ्यांत जोन ऑफ आर्क ही इंग्रजांस अनुकूल असलेल्या बर्गंडियन पक्षाच्या हातीं सांपडली. त्या पक्षानें तिला इंग्रजांस विकलें. त्यांनीं आपला हस्तक बोव्हेचा बिशप याच्यापुढें

धार्मिक चौकशीचा फार्स करून तिला चेटकी म्हणून जिवंत जाळिलें ! ! ( १४३१ मे ३० )

९ **युद्धाचा अंत व परिणाम**--यानंतर इंग्लिशांच्या पक्षाची बिघडलेली घडी फिरून केव्हांच सावरली नाहीं. ड्यूक ऑफ बेडफर्ड १४३५ त वारला व राज्याचे कारभारी ग्लूस्टर व बोफर्ट या दोघांत तंटा झाला. ग्लूस्टरच्या मतें फ्रान्सशीं लढाई चालू ठेवावयाची होती. पण बोफर्ट फ्रान्सवर परराज्य लादण्याचा अशक्य उद्योग सोडून देण्यास आतुर झाला होता. इंग्रज सैन्यासही सारखे पराभव येऊं लागल्यामुळें पैसा पुरविण्यास पार्लमेंट कां कूं करूं लागली. थोडथोडी लढाई चालू होती. परंतु १४५३ त क्याले बंदराखेरीज इंग्रजांनीं जिंकलेला सर्व मुलूख त्यांच्या हातांतून गेला व शतसांवत्सरिक युद्ध संपलें. याच्या शेवटीं तह असा झालाच नाहीं. इंग्लंड व फ्रान्स हे देश परस्परांपासून वस्तुतः स्वतंत्र असे झाले. तथापि १८०१ सालापर्यंत इंग्रज राजांचे बिरुदावळींत ‘ फ्रान्सचे राजे ’ असा किताब घालण्यांत येत असे.

या युद्धाच्या अखेर इंग्रजांच्या ताब्यांत क्याले बंदराखेरीज फ्रान्सचा कांहींच भाग राहिला नाहीं. तिसरा एडवर्ड व पांचवा हेन्री यांनीं जिंकलेले प्रांत तर गेलेच. पण दुसऱ्या हेन्रीच्या लग्नांत मिळालेला ॲक्विटेन हा दक्षिणेकडील मोठा प्रांतही इंग्रजांच्या हातून गेला. याचा परिणाम असा झाला कीं, फ्रान्सचा कांहीं भाग कायमचा परकीयांच्या ताब्यांत राहून त्या देशांत बेकीचें व दौर्बल्याचें बीज पेरलें गेलें होतें, तें आतां उपटून निघालें, व फ्रान्स हें एक राष्ट्र होऊन थोड्याच काळांत मोठ्या वैभवास चढलें. इंग्लंडवर या युद्धाचा परिणाम बराच प्रतिकूल झाला. तेथील सरदार एक शतकभर परदेशांत धुमाकूळ माजविण्यांत गढून गेले होते. गांवें लुटावीं, लूट मारावी व बंदिवानांपासून जबर खंडणी उकळून त्यांना सोडून द्यावें असा त्यांचा सारखा क्रम चालला होता. लढाईंत जय मिळविला कीं, त्यापासून आपल्या स्वतःचा कसा फायदा करून घेतां येईल यांतच जो तो चूर असे. त्यामुळें पांचव्या हेन्रीसारखा कर्तबगार नायक जरा दूर झाला कीं, बंडाळी सुरू होऊन

कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी स्थिति तेव्हांच होऊन जाई. शेवटीं शतसांवत्सरिक युद्ध संपलें तेव्हां सरदार वर्गांत चैन व स्वार्थसाधुत्व बोकाळलीं असून परस्परांत कलह करण्याची प्रवृत्ति खूप बळावली होती ! अर्थात् इंग्लंडांत लवकरच यादवी माजणार हें उघड होतें.

---

# १२ लोकस्थिति.

**१ लोकरीचा धंदा**—इंग्लंडांतील मेंढ्यांच्या अंगावर होणारी लोकर फ्लँडर्समध्यें पाठवावी व तेथील ब्रूग्ज, घेंट, लिली, यिप्रेस इत्यादि शहरीं विणकऱ्यांनीं त्या लोकरीचा पक्का माल बनवावा व पुनः विक्रीसाठीं तो इंग्लंडांत परत यावा अशी स्थिति चौदाव्या शतकाच्या मध्यापर्यंत चालली होती. परंतु तिसऱ्या एडवर्डनें फ्लँडर्सचा व्यापार कायम ठेवण्यासाठीं फ्रान्सशीं युद्ध सुरू केलें, त्याप्रमाणेंच फ्लँडर्समधील विणकऱ्यांनीं इंग्लंडांत येऊन वसाहती कराव्यात म्हणून त्यांना सवलती दिल्या. इंग्लंडांतून बाहेर जाणाऱ्या लोकरीवर व फ्लँडर्समधून इंग्लंडांत येणाऱ्या लोकरीपासून तयार केलेल्या कापडावर जाचक निर्बंध ठेविले व कच्च्या लोकरीपासून पक्कें कापड तयार करण्याचा उद्योगधंदा इंग्लंडांत त्यानें भरभराटीस आणिला. फ्लँडर्समधील लोकांची इंग्लंडच्या दक्षिण भागांत वसाहत होऊन उद्योगधंद्यांत इंग्लंडचा दक्षिण भाग लवकरच पुढें सरसावला. इंग्लंड व युरोप यांच्यामध्यें जो व्यापार चाले तो परकीय लोकांच्या हातीं असे. तिसऱ्या एडवर्डनें याही बाबतींत सुधारणा करून इंग्लिश व्यापाऱ्यांस जहाजें बांधण्यास उत्तेजन दिलें व थोड्याच अवकाशांत हा व्यापार स्वदेशी जहाजांतून होऊं लागला.

**२ भयंकर सांथ** ( Black Death)–तथापि इंग्लंडमध्यें एकंदर जनतेचा मुख्य धंदा म्हटला म्हणजे आजच्या हिंदुस्थानांतील लोकांप्रमाणें

शेतकीचाच होता. देशांतील बहुतेक जमीन बड्या सरदारांच्या मालकीची असून खुद्द जमिनीवर काम करणारे लोक अगदीं कंगाल असत. व जमिनीचा मालक बदलला तर तीबरोबर हे मजूरही या नव्या मालकास विकले जात. अलीकडे फ्रेंच युद्ध सुरू झाल्यामुळें बड्या सरदारांस युद्धावर जाण्यासाठीं पैसा लागूं लागला. तेव्हां धर्मयुद्धांच्या वेळेप्रमाणें कित्येक हुशार मजुरांनीं कायमचा धारा ठरवून घेऊन सरदारांपासून खंडचिठया करून घेतल्यामुळें, त्यांची स्थिति बरीच सुधारून ते स्वतंत्र शेतकरी बनले. पण हा फरक फारच लहान प्रमाणांत झाला, व पूर्वीप्रमाणें बहुतेक जनता “ गुलामगिरीच ” अनुभवीत राहिली. अशी स्थिति झाली असतां १३४८ सालीं इंग्लंड देशांतील एकंदर लोकांवर व विशेषतः खालच्या वर्गावर एक घोर आपत्ति कोसळली. त्या वर्षी उन्हाळ्यांत प्लेगची भयंकर सांथ सुरू झाली. वस्ती दाट असून रहाणीही गलिच्छ होती. त्यामुळें ती सांथ हां हां म्हणतां सर्व देशभर पसरली. गरीब लोकांची तर जी दैना झाली तिचें वर्णन करणें अशक्यच आहे! बडया सरदारांच्या शेतवाडयांचें ( Manors) जे रिपोर्ट आहेत त्यांवरून असें दिसून येतें कीं, अवघ्या वर्षांत शेतावर काम करणाऱ्या मजुरांपैकीं निम्मे दारुण रोग होऊन मृत्यु पावले. इतकेंच नव्हे तर या गरिबांच्या शुश्रूषेकरितां जे धर्माधिकारी व मठवासी जात त्यांच्यापैकींही शेंकडों लोक बळी पडले. ब्रिस्टल गांवांत या रोगाचा इतका कहर उडाला कीं, लोकवस्ती नाहींशी होऊन त्या गांवच्या बाजारपेठेंत रान माजलें! एकट्या लंडन शहरांत ५० हजार लोक मृत्युमुखीं पडले. ही सांथ आली तेव्हां इंग्लंडची ४० लाख लोकसंख्या होती, व १३ महिन्यांनीं ही सांथ संपली तेव्हां २० लाख एवढीच लोकसंख्या शिल्लक राहिली.

**३ मजुरांचे हाल**—याचा परिणाम इंग्लंडच्या औद्योगिक स्थितीवर अत्यंत झाला. जमिनीवर गुरांप्रमाणें राबणारे लाखों कंगाल मजूर ( Villeins ) मेले व जमिनी करण्यास माणसें मिळतनाशीं झालीं. तेव्हां बडया जमीनदारांना काय किंवा कायमचा धारा देऊन स्वतंत्र लहानशीं शेती करणाऱ्या स्वतंत्र शेतकऱ्यांना काय, जास्त मजुरी देऊन मजूर कामा-

वर आणणें भाग पडलें. त्यामुळें एका जमीनदाराच्या शेतवाडीवर काम करणाऱ्या मजुरास दुसरीकडे ज्यास्त मजुरी मिळत असल्यास तिकडे जाण्याचा मोह उत्पन्न झाला. त्या वेळीं पार्लमेंटमध्यें जमीनदार वर्गाचेच बहुतेक लोक बसत असल्यामुळें पार्लमेंटचे मजूरवर्गाविरुद्ध भराभर कायदे होऊं लागले. १३४९ त तिसऱ्या एडवर्डनें असा हुकूम काढला कीं, प्रत्येक धडधाकट्या माणसानें सांथीच्या पूर्वी ज्या पगारावर काम केलें असेल त्याच पगारावर आतांही काम केलें पाहिजे, व अशा माणसास कोणींही भिक्षा घालूं नये. १३५१ त शांततेचें रक्षण करणारे लोक नेमून मजुरीचा कायदेशीर दर त्यानीं ठरवावा असा एक "मजुरांचा कायदा" पार्लमेंटनें पास केला. याचा कांहीं विशेष परिणाम झाला नाहीं; तेव्हां १३६० त कोणाही धडधाकट्या मजुरानें आपला धनी जो जमीनदार असेल त्याला सोडून जाऊं नये व तसा तो सोडून गेला तर त्याला पकडून तुरुंगांत घालावें व त्याच्या कपाळावर तापलेल्या लोखंडानें डाग द्यावा, असें फर्माविणारा कायदा पास झाला. अशा रीतीनें सरकारानें मजुरांविरुद्ध कायदे पास केले, व त्यांचा अंमल होऊं लागला. त्यामुळें गरीब लोक त्रस्त झाले. याच सुमारास जॉन बॉल नांवाचा एक उपदेशक सर्व केंट परगण्याभर फिरून लोकांना सांगूं लागला; "ॲडम व ईव्ह या दंपत्यापासूनच सर्व लोकांची उत्पत्ति झाली ना? मग हे श्रीमंत चैनींत व सुखांत दिवस घालवितात, व आम्हांस मात्र हाल-अपेष्टा सोसाव्या लागाव्या हें काय म्हणून? खरोखर पाहिलें तर सर्व मनुष्यें सारखीं आहेत व हे भेद लबाडीनें निर्माण झाले आहेत; तेव्हां ते काढून जमिनीवर सर्व लोकांची सारखी सत्ता असावी. जेव्हां ॲडम जमीन खणीत असे व ईव्ह सूत कांतीत असे तेव्हां चैनी श्रीमंतास कोठेंच वाव नव्हता." जॉन बॉलच्या या उपदेशानें सामान्य जनतेचीं मनें बड्या लोकांविरुद्ध अधिकच प्रक्षुब्ध झालीं.

४ शेतकऱ्यांचा दंगा—१३८० सालीं फ्रान्समधील युद्धाचा

१ फ्रॉइसार्टचें क्रॉनिकल, पुस्तक दुसरें, प्रकरण ३.

खर्च भागविण्यासाठीं पंधरा वर्षांवरील प्रत्येक इसमावर डोईपट्टी बसविण्यांत आली. पुढील वर्षी केंट परगण्यामध्यें एका उन्मत्त कर वसूल करणारानें वॅट टायलर नांवाच्या एका कारागिराच्या मुलीचा अपमान केला. त्याबरोबर टायलरनें ह्या वसूल करणारास एकदम यमसदनास पाठविलें, व भोंवतालच्या भागांतील अगोदरच प्रक्षुब्ध लोकांस बोलावून दंग्यास आरंभ केला. नंतर इंग्लंडच्या कित्येक भागांत वसूल करणारे लोक व इतर सरकारी अधिकारी यांचे खून होऊं लागले. हर्टफर्डशायर व एसेक्स येथील दंगेखोरांनीं खूप धुडाई चालविली, बड्या जमीनदारांचे कागदपत्र जाळून टाकण्याच्या निमित्तानें त्यांनीं बऱ्याच मालाची नासाडी केली व जॉन बॉलला तुरुंगांतून सोडविलें. शेतवाडीवर गुरांप्रमाणें काम करावयाचें व एका जमीनदाराकडून दुसऱ्यास ती शेतवाडी विकली गेली कीं, तिजबरोबर विकलें जावयाचें ही दास्यपद्धति ( व्हिलनेज ) काढून टाकावी व बरेचसे कर अजिबात काढून टाकून बाकीचे थोड्या प्रमाणांत ठेवावेत व या दंग्यांत सामील झालेल्या सर्व लोकांस माफी मिळावी, अशा मागण्या करण्याकरितां दंगेखोर लंडनवर चालून गेले. या वेळीं तिसऱ्या एडवर्डचा नातू ब्लॅक प्रिन्सचा मुलगा दुसरा रिचर्ड ( १३७७–१३९९ ) हा गादीवर होता. तो वयानें अवघा पंधरा वर्षांचा होता, तथापि त्याच्या अंगीं धैर्य व धूर्तता हीं विशेष होतीं. तो स्वतः दंगेखोरांची गांठ घेण्यासाठीं गेला. भेटीच्या प्रसंगीं वॅट टायलर मर्यादा सोडून बोलत आहे असें पाहून पुढील प्रसंग टाळण्यासाठीं मेयरनें टायलरला एकदम ठार केलें. यामुळें दंगेखोर अधिकच चिडले. पण रिचर्ड त्यांच्यामध्यें जाऊन उभा राहिला व मी तुमचा पुढारी आहें असें सांगून, त्यांचीं गाऱ्हाणीं दूर करण्याचें त्यानें त्यांस आश्वासन दिलें. लागलीच दंगेखोर आपल्या गांवोगांव निघून गेले, व दंगा शांत झाला. परंतु राजाच्या कौन्सिलाचें मत निराळें होतें. त्यांनीं दंगेखोरांच्या पुढाऱ्यांस मग एकएकटें धरून फांशीं दिलें व सर्व भागांतील दंगे दडपशाहीनें पार नाहींतसें करून टाकिले. मग कायदा बदलला नाहीं तरी जरूरी भासूं लागल्यामुळें शेतवाड्यांवरील

मजुरांचें दास्य हळूहळू कमी झालें. एक तर, मजूर मागेल ती मजुरी देऊन शेतवाडीवर मजूर ठेवावे किंवा कायमच्या धाऱ्यानें जमिनी खंडास लावून द्याव्या, यांपैकीं कोणता तरी एक मार्ग स्वीकारणें वडया लोकांस सोईचें वाटूं लागलें. त्याचप्रमाणें कुरणें करून मेंढ्या पाळावयाच्या व लोकर करावयाची म्हटली तर थोडया मजुरांत काम भागेल, हें पाहून पुष्कळ शेतवाड्यांत पुढील दोन शतकांत मेंढ्या चारण्यास कुरणें करण्याकडे बऱ्याच जमिनदारांचा कल दिसूं लागला.

**५ लोलर्ड पंथ**——याच काळांत धर्मसंबंधीं सुधारणा करण्यासाठीं झटणारा एक धर्मसुधारक होऊन गेला. त्याचें नांव जॉन वुइक्लिफ (१३२४–१३८४) हें असून तो ऑक्सफर्ड येथें बेलियल कॉलेजांत शिक्षक होता. त्याच्या कळकळीमुळें व उत्साहामुळें एक लोलर्ड (स्तोत्रें गात भटकणारे) हा नवाच पंथ निर्माण झाला. या पंथाचीं मतें खालील प्रमाणें होतीं:——१ खूप उत्पन्नाच्या मिळकती धर्मोपदेशकांनीं विकत घेऊं नयेत. २ निरनिराळ्या ठिकाणच्या धर्मखात्याकडील जमिनी एकाच धर्मोपदेशकाच्या हातीं असून, त्यांच्या उत्पन्नांचा उपभोग त्यानें घ्यावा व थोडया पगारावर हस्तक नेमून त्याच्यातर्फे धर्मविधि चालवावे अशी पद्धति कित्येक ठिकाणीं होती. ती मोडून एका धर्मोपदेकानें एकापेक्षां ज्यास्त जमिनी आपल्या हातीं ठेवावयाच्या नाहींत असा नियम करावा. ३ एका ठिकाणचें धर्मखात्याचें उत्पन्न धर्मोपदेशकानें खावयाचें व दुसऱ्याच टापूंत रहावयाचें ही स्थितीही बंद केली पाहिजे. वुइक्लिफचीं दोन तत्वें तर अशीं होतीं कीं, पुढें सोळाव्या शतकांत जी धर्मसुधारणा सर्व युरोपखंडांत झाली तिच्यांत त्यांचा प्रमुखपणें समावेश झाला. त्यांपैकीं पहिलें तत्त्व असें कीं, पोपचा अधिकार इतर धर्मोपदेशकांवर चालूं नये, व बहिष्कृत करून लोकांस शासन करण्याचाही त्याला अधिकार असूं नये. दुसरें असें कीं, प्रभुभोजनाच्या वेळीं जीं द्राक्षासव व भाकरी वापरण्यांत येतात त्यांचें अद्भुत रीतीनें खिस्ताच्या रक्तांत व मांसांत रूपांतर होतें ही गोष्ट खरी नाहीं. अशीं मतें प्रतिपादन करूनही वुइक्लिफला धर्मोपदेशकांकडून त्रास झाला नाहीं याचें कारण राजघराण्या-

ंील मंडळी त्याला अनुकूल होती हें होय. परंतु त्याच्या वजनाचें मुख्य कारण असें कीं, त्यानें व त्याच्या शिष्यांनीं मिळून एकंदर बायबल ग्रंथाचें इंग्रजींत भाषांतर केलें व त्यामुळें सामान्य वाचकाला महत्त्वाचे भाग स्वतः पाहणें सुलभ झालें. व त्यावरून आपल्या धर्मपद्धतींत दोष आहेत, ही गोष्ट लोकांस पटूं लागली. परंतु १३९९ त दुसरा रिचर्ड पदच्युत होऊन त्याच्या जागीं लँक्यास्टर घराण्यांतील चौथा हेन्री (१३९९-१४१३) हा राजा झाला, तेव्हां त्यानें मात्र, पूर्वींचा राजा लोलर्डना अनुकूल होता व आज ते धर्मोपदेशकांविरुद्ध उपदेश करितात, त्यामुळें लोकांत स्वातंत्र्यप्रीति जास्त उत्पन्न होऊन राजकीय बाबतींतही तिचा उपयोग करण्याची बुद्धि लोकांस होईल व मग जास्त जवळच्या वारशाचे लोकांस सोडून आपल्याला मिळालेलें राज्य सोडून जाण्याची कदाचित् पाळी येईल, या भीतीनें १४०१ त लोलर्ड लोकांचा छळ करण्याचें धोरण स्वीकारिलें व लवकरच लोलर्डपंथाचा त्याग करण्याला तयार नसलेल्या लोकांस जाळण्याच्या शिक्षा देण्यांत येऊं लागल्या.

**६ पार्लमेंटचा चौदाव्या शतकांतील वृत्तांत**—चौदाव्या शतकांत पार्लमेंटच्या अधिकारांत पुष्कळच भर पडली. १३२२ सालीं दुसऱ्या एडवर्डनें कबूल केलें कीं, कोणताही सार्वजनिक हितसंबंधाचा किंवा राजघराण्यासंबंधींचा कायदा पार्लमेंट सभेची संमति घेतल्याशिवाय करण्यांत येणार नाहीं. १३७६ सालीं गुड पार्लमेंट भरली. तिनें ब्लॅक प्रिन्सच्या संमतीनें लॉर्ड लॅटिमर व नेव्हील या दोन राजमंत्र्यांची चौकशी[१]

---

१ या चौकशीस इंग्रजींत ( Impeachment इम्पीचमेंट ) म्हणतात. कोणाही बड्या सरकारी अधिकाऱ्यानें प्रजेवर जुलूम केला असें पार्लमेंटच्या नजरेस आलें तर त्याजवर खटला करण्यांत येई. या खटल्यांत लोकसभा ही फिर्यादी असून उमरावांची सभा न्यायाधिशाचें काम करी. बेकन, स्ट्रॅफर्ड व वॉरन हेस्टिंग्ज या तीन बड्या सरकारी अंमलदारांवर असे खटले झाले ते प्रसिद्ध आहेत. हल्लींची जबाबदार राज्यपद्धति सुरू होण्याच्या पूर्वींच्या काळीं राजसत्तेवर दाब ठेवण्याचें पार्लमेंटच्या हातचें हें एक उत्तम साधन होतें.

( Impeachment ) केली, व राजमंत्र्यांवर वचक बसविण्याचा हा अधिकार पहिल्यानें याच वेळीं अंमलांत आणिला गेला. धर्मसंबंधांतही पार्लमेंटनें कायदे करून परकीयांचा जाच काढून टाकिला. १३५१ त कायदा करून इंग्लंडच्या धर्मखात्याचें उत्पन्न परकीय लोकांना देण्यांत येत असे तें बंद करण्यांत आलें. १३५३ त प्रेम्युनायरचा कायदा करून पार्लमेंटनें असें ठरविलें कीं, पोप व त्याचे प्रतिनिधी यांनीं राजाच्या संमतीखेरीज इंग्लंडांत हुकूम पाठवूं नयेत, व परकीय कोर्टांपुढें अपील करण्याच्या पद्धतीस आळा घालण्यांत यावा. १३२२ सालीं दुसऱ्या एडवर्डला आणि १३९९ सालीं दुसऱ्या रिचर्डला नालायक ठरवून पार्लमेंटनें पदच्युत केलें, तेव्हां तर राजसत्तेपेक्षां लोकसत्ता श्रेष्ठ आहे ही गोष्ट बरीच स्पष्ट झाली व राजा नालायक असला अथवा जुलूम करूं लागला तर त्यास लोकांनीं खुशाल काढून टाकावें हें तत्त्व प्रत्यक्ष अंमलांत आलें.

**७ पार्लमेंटच्या अधिकाराची वाढ**—चौथा हेन्री तर काय पार्लमेंटच्या अनुग्रहानेंच राज्यावर आला होता. तेव्हां पार्लमेंटला नमून राज्यकारभार चालविण्यांतच आपलें हित आहे हें तो जाणत होता. त्याच्या राज्यांत बंडें उठलीं व हॅरी हॉट्स्पर नांवाचा शूर सरदार त्याचा मित्र होता तो त्याचा शत्रु बनला. अशा वेळीं लोकांवर अवलंबून राहण्याचें हेन्रीस विशेषच कारण झालें. शेवटीं १४०३ त स्कॉच लोक व हॉट्स्पर यांच्यांशीं श्रुजबरी येथें लढाई देऊन हेन्रीनें शत्रूंचा पुरा मोड केला. या लढाईत हॉट्स्पर पडला. तेव्हां चौथ्या हेन्रीच्या कारकीर्दींत पार्लमेंटला व विशेषतः लोकसभेस महत्त्वाचे हक्क मिळाले यांत कांहीं नवल नाहीं. १४०७ त एक पै खर्चण्याचें बिल कां असेना पण तें पहिल्यानें कॉमन्स सभेपुढेंच आलें पाहिजे, हा हक्क कॉमन्स सभेला देण्यांत आला. राजाला ज्या देणग्या द्यावयाच्या त्या कोणत्या बाबतींत खर्च करावयाच्या हें ठरविण्याचा हक्कही दोन्ही सभांस देण्यांत आला. अर्थातच राजास देणग्या द्यावयाच्या इतक्यावरच संतुष्ट न राहतां त्या

देणग्या आम्हीं सांगूं त्याच खातीं खर्च झाल्या पाहिजेत या तत्त्वाचा पुरस्कार लोकसभेनें यावेळीं केला.

या राजाच्या कारकीर्दींत तीन वेळां राजाच्या कौंसिलांत अधिकारी नेमण्याच्या वेळीं अमका मनुष्य नको असें पार्लमेंटनें आक्षेप आणिले, व आक्षेपार्ह माणसें नेमलीं जाऊं दिलीं नाहींत; हेंही कृत्य फार महत्त्वाचें आहे; कारण त्यावरून राजाचे प्रधान पार्लमेंटला जबाबदार आहेत या तत्त्वाची कबुलीच पर्यायानें राजाकडून मिळाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. अमुक एक कायदा राजानें करावा असा पार्लमेंटनें अर्ज केला म्हणजे पुष्कळ वेळां राजाचे धूर्त प्रधान बाह्यतः दिसण्यापुरतां पार्लमेंटनें सांगितलेल्या मजकुराचा, पण वस्तुतः निराळ्याच आशयाचा, कायदा करीत. ही स्थिति पालटावी म्हणून १४१४ त पांचव्या हेन्रीकडून असें कबूल करून घेण्यांत आलें कीं, पार्लमेंट ज्या अर्थाचा कायदा करण्यास सांगेल त्याच अर्थाचा कायदा करण्यांत यावा. पुढें पुढें पार्लमेंटचें महत्त्व इतकें वाढलें कीं, तिचे सभासद होणें म्हणजे आपल्यावर ओझें लादून घेण्यासारखें आहे, असें जें लोकांस वाटत होतें त्या स्थितींत पूर्ण पालट पडला. परगण्यांतून जे नाइट कॉमन्स सभेला निवडून यावयाचे ते निवडून देण्याचा हक्क वार्षिक चाळीस शिलिंग उत्पन्नाची ज्यांची ज्यांची मालकीची जमीन असेल त्यांस देण्यांत आला. (१४३०). याच नियमास अनुसरून १८३२ पर्यंत निवडणुकी होत असत. येणेंप्रमाणें पार्लमेंटनें राजसत्तेवर बरेंच वर्चस्व मिळविलें. परंतु लवकरच इंग्लंडांत यादवी सुरू झाली व राजसत्ता अगदीं दुळी पडली आणि सर्व देशभर बेबंदशाही माजली. त्यामुळें पार्लमेंटनें मिळविलेले अधिकार व्यवहारदृष्ट्या निरुपयोगी झाले. तथापि पार्लमेंटच्या दोन सभा त्या काळीं झाल्या असून कर बसविणें, कायदे करणें व अधिकाऱ्यांवर हुकमत चालविणें या तिन्ही बाबतींत आज जो तिचा अधिकार चालतो त्या सर्वांची रूपरेखा त्या काळींच आंखली गेली होती हें निर्विवाद आहे.

# १३ यादवी १४५५–१४८५

**१ लोकांवरील जुलूम**——शूर पांचवा हेन्री वारला व त्याच्या मागून इंग्लंडच्या गादीवर त्याचा कर्तृत्वहीन मुलगा सहावा हेन्री आला. तो गादीवर असतां १४५३ त एका क्याले बंदराखेरीज बाकीचा फ्रान्सांतील सर्व मुलूख इंग्रजांच्या हातून गेला, हें मागील एका प्रकरणांत सांगितलेंच आहे. या वेळीं अर्ल ऑफ सफोक हा सहाव्या हेन्रीचा मुख्य कारभारी होता. फ्रेंच युद्ध सुरू असल्यामुळें सरदारांनीं सशस्त्र पुंड नोकरीस ठेवण्याची पद्धति पडली होती. या पुंडांचा उपयोग फ्रेंच युद्ध मंदावतांच एकमेकांचा मुलूख लुटावा, मिळकत लाटावी, या कामाकडे सरदार लोक करूं लागले. त्यामुळें देशांत अस्वस्थता माजली. सरदारांनीं अशा तऱ्हेचे पुंड ठेवूं नयेत म्हणून पार्लमेंटनें कित्येक कायदे पास केले, पण त्यांचा अंमल करण्याचें काम सफोकसारख्या दुर्बल कारभाऱ्याच्या हातीं असल्यामुळें त्यांचा फारसा उपयोग झाला नाहीं. लोकांचा त्रास दूर न झाल्याकारणानें सफोकविरुद्ध लोकमत क्षुब्ध झालें होतें. नंतर १४५० त त्याची चौकशी होऊन त्याला हद्दपारीची शिक्षा झाली व तो फ्रान्समध्यें जात असतां त्याचा खून झाला. तथापि सफोकच्या अनुयायांच्या हातींच राज्यसूत्रें राहिलीं.

**२ जॅक केडचा दंगा**—मिडलसेक्स, सफोक, नॉर्फोक व केंट या परगण्यांत दंगे होऊं लागले. जॅक केड नांवाचा एक बंडखोर तीस हजार लोकांसह खुद्द लंडनवर चालून आला ! सरकारनें प्रजेवर करांचें असह्य ओझें लादलें, राजघराण्यांतील कार्यक्षम लार्डांस वगळून इतर लुंग्यासुंग्यांच्या हातीं राज्यकारभाराचीं सूत्रें दिलीं, राजाच्या खाजगीकरितां माल घेण्याच्या हक्काचा दुरुपयोग केला, दुर्बळपणानें फ्रान्स हातचा घालविला, पार्लमेंटच्या निवडणुकींत अयोग्य ढवळाढवळ केली, इत्यादि आरोप जॅक केडनें सरकारावर जाहीर रीतीनें केले, व ड्यूक ऑफ यॉर्क

यास कारभारी नेमण्याबद्दल विनंति केली. सरकारनें युक्तीनें दंगेखोरांची पांगापांग केली, व जॅक केडला ठार केलें. पण राज्यकारभारांत सुधारणा करण्याची मागणी कांहीं केल्या सरकारास हाणून पाडतां आली नाहीं.

**३ ड्यूक ऑफ यॉर्कची महत्त्वाकांक्षा**--रिचर्ड ड्यूक ऑफ यॉर्क व ड्यूक ऑफ सॉमरसेट या दोघांत कारभारीपदाविषयीं सारखी चढाओढ सुरू होती. यॉर्क हा हुशार व कर्तृत्ववान् होता व सॉमरसेट कांहीं तसा नव्हता. तथापि सहाव्या हेन्रीची राणी मार्गरेट ही यॉर्कला अधिकार प्राप्त होऊं न देण्यासाठीं अहर्निश झटत होती. याचें कारण असें कीं यॉर्कचा, आज कारभारीपद मिळवून पुढें संधि येतांच राजपद मिळविण्याचा बेत आहे, हें त्या धोरणी राणीनें ओळखिलें होतें. ड्यूक ऑफ यॉर्क हा तिसऱ्या एडवर्डच्या दुसऱ्या मुलाचा वंशज होता व सहावा हेन्री हा तिसऱ्या मुलाचा वंशज होता. तेव्हां राजापेक्षांही आपला गादीवर जास्त हक्क पोहोंचतो असें रिचर्ड, ड्यूक ऑफ यॉर्क याचें म्हणणें होतें. राजा सहावा हेन्री कर्तृत्वहीन होता, व फ्रान्समधील शतसांवत्सरिक युद्ध नुक्तेंच संपलें असल्यानें सरदार व त्यांनीं ठेविलेले पुंड यांना कांहींच उद्योग राहला नव्हता. अशा स्थितींत दोन घराण्यांत गादीबद्दल चुरस कशी वाढते, व आपला रणकंडु शमविण्याची आपल्याला कशी संधी मिळते यासाठीं सरदार लोक अगदीं टपले होते. शेवटीं ड्यूक ऑफ यॉर्क व

---

**यॉर्किस्ट घराणें १४६१–१४८५**

रिचर्ड ड्यूक ऑफ यॉर्क (तिसऱ्या एडवर्डच्या दुसऱ्या मुलाचा वंशज)

चौथा एडवर्ड १४६१–१४८३ तिसरा रिचर्ड १४८३-१४८५

पांचवा एडवर्ड १४८३

राजा सहावा हेन्री यांचें भांडण विकोपास गेलें. याचें मुख्य कारण परदेशांत नाहीं तर स्वदेशांत कां होईना युद्ध करावें व प्रतिपक्षास चीत करून यश उपटावें, याविषयींची सरदारांची प्रबल इच्छा हेंच होय !

**४ युद्धास सुरवात**—इतक्यांत १४५३ त राणीला मुलगा झाला. तेव्हां तर दोन्ही पक्षांस आपापली तरतूद करून ठेवणें अधिकच जरूर झालें. थोड्याच दिवसांनीं सहाव्या हेन्रीस वेड लागलें, व मार्गरेटच्या म्हणण्यास न जुमानतां पार्लमेंटनें ड्यूक ऑफ यॉर्कला कारभारी नेमिलें; परंतु लवकरच राजाचें वेड गेलें व बायकोच्या आग्रहावरून त्यानें यॉर्कला कारभारावरून काढून टाकिलें व सॉमरसेटला कारभारी नेमिलें. यामुळें यॉर्क चिडून गेला व आपल्या अनुयायांस लीस्टर येथें जमवून तो लंडनवर चालून येऊं लागला. राजाच्या बाजूच्या सैन्याची व त्याची सेंट ऑल्बन्स येथें गांठ पडली ( १४५५ ). त्या युद्धांत सॉमरसेट पडला व राजा कैद झाला. यानंतर यॉर्कच्या हातीं सर्व सत्ता आली. राजानें त्याला कारभारी नेमिलें व कारभार चालू झाला. पण ही शांतता फार दिवस टिकणें शक्य नव्हतें. एक वर्षांतच राणीच्या सल्ल्यानें यार्कला फिरून त्यानें कारभारीपदावरून काढिलें. तीन वर्षेंपर्यंत दोन्ही पक्ष लढाईची तयारी करीत होते. शेवटीं नॉर्दम्पटन येथें लढाई होऊन तींत सहावा हेन्री कैद झाला, व राणी आपल्या मुलासह स्कॉटलंडांत पळून गेली ( १४६० ).

**५ यॉर्कच्या पक्षाचा विजय**—या वेळेपासून उघड दोन पक्ष झाले. एक लँक्यास्ट्रियन किंवा सहावा हेन्री व त्याचा मुलगा यांस गादीवर आणण्यासाठीं खटपट करणारा पक्ष, व दुसरा यॉर्किस्ट किंवा ड्यूक ऑफ यॉर्क व त्याच्या संततीला गादी मिळावी यासाठीं प्रयत्न करणारा पक्ष. या युद्धांत या प्रतिस्पर्धी पक्षांचीं चिन्हें म्हणून गुलाबाचीं फुलें उपयोगांत आणीत. लँक्यास्ट्रियनांचें चिन्ह तांबडें गुलाबाचें फूल असून, यॉर्किस्ट बाजूकडे पांढरें गुलाबाचें फूल चिन्ह म्हणून वापरण्यांत येत होतें. म्हणून या युद्धास **गुलाबी झुंज** असें नांव पडलें. नॉर्दम्पटन

येथील लढाईनंतर लॉर्डांनीं असें ठरविलें कीं, सहाव्या हेन्रीच्या हयाती-पर्यंत त्यानें राज्य करावें, पण राज्यकारभार ड्यूक ऑफ यॉर्कनें पहावा; व सहाव्या हेन्रीच्या मरणानंतर यार्क हाच गादीवर यावा. या अटींस सहाव्या हेन्रीनें कबुली दिली, व राज्यकारभार चालू झाला. परंतु मार्गरेट राणीनें इंग्लंडच्या उत्तरेकडील प्रांतांत आपल्या पक्षास अनुयायी मिळविले व लढाईची तयारी चालविली. हें बंड मोडण्यासाठीं यॉर्क उत्तरेकडे चालून गेला. वेकफील्ड येथें लँक्यास्ट्रियनांशीं त्याची गाठ पडून त्याचा पुरा पराभव झाला व तो स्वतः मारला गेला (१४६० डिसेंबर). पण रिचर्ड ड्यूक ऑफ यॉर्कच्या मृत्यूनें लढाई संपली नाहीं. त्याचा मुलगा एडवर्ड हा आपल्या बापाप्रमाणेंच कर्तृत्ववान् असून तो यॉर्किस्ट पक्षाचा पुढारी झाला. त्याला ड्यूक ऑफ वॉरिक नांवाचा हुशार, लोकप्रिय व प्रबल सरदार साहाय्यकारी मिळाला. वॉरिकनें जलदी करून एडवर्ड यास लंडनांत चौथा एडवर्ड म्हणून राज्याभिषेक करविला. नंतर तांतडीनें सैन्य जमवून तो उत्तरेकडे गेला. टाउटन येथें दोन्ही पक्षांचें निकराचें युद्ध होऊन लँक्याट्रियन सैन्यानें पळ काढला! (१४६१). लँक्यास्ट्रियनांचे बहुतेक सर्व बडे सरदार मारले गेले. फक्त राणी व तिचा मुलगा, व सॉमरसेट येवढेच पुढारी निसटले, ते स्कॉटलंडांत गेले. अशा रीतीनें यॉर्किस्टांची सरशी होऊन चौथा एडवर्ड गादीवर कायम झाला.

**६ यॉर्किस्ट पक्षांत दुही**—पण आतां एक नवेंच विघ्न उपस्थित झालें. १४६४ सालीं एडवर्डनें एलिझाबेथ वुड्व्हिल या विधवेशीं लग्न लाविलें, व तिच्या नातलगांचा राज्यकारभारांत सुळसुळाट झाला. त्याचप्रमाणें लंडनच्या लोकांच्या समाधानार्थ आपल्या बहिणीचें लग्न ड्यूक ऑफ बर्गंडीशीं करण्याचें एडवर्डनें ठरविलें. या दोन्ही गोष्टी एडवर्डचा मुख्य साहाय्यकारी वॉरिक यास आवडल्या नाहींत व त्याला राजाचा राग आला. त्यानें एडवर्डचा भाऊ क्लॅरेन्स याला आपली मुलगी दिली, व त्याला राज्यावर आणण्याचीं कारस्थानें चालविलीं; व यॉर्क-शायरमध्यें राजाविरुद्ध बंडें उठविण्याचाही उद्योग केला. शेवटीं जेव्हां या

गोष्टी उघडकीस आल्या तेव्हां तो फ्रान्सांत पळून गेला, व मार्गरेटच्या बाजूस मिळाला. तिच्या मुलाला त्यानें आपली मुलगी दिली. यॉर्कशायरमध्यें बंडें होत होतीं त्यांजपासून आपला फायदा करून घेण्याकरितां वॉरिक इंग्लंडांत आला. आपल्याला आतां तोंड देणें अशक्य आहे असें पाहून चौथा एडवर्ड ड्यूक ऑफ बर्गंडीच्या आश्रयास पळून गेला. इकडे वॉरिकनें आपणच दोनदां पदच्युत केलेल्या सहाव्या हेन्रीस १४७० च्या सप्टेंबरांत पुन्हां गादीवर बसविलें.

**७ एडवर्डला पुन्हां राज्यप्राप्ति**—एका वर्षाच्या आंतच बर्गंडीच्या ड्यूकचें साहाय्य मिळवून एडवर्ड इंग्लंडांत आला. तेव्हां त्याच्या बाजूस पुष्कळ लोक मिळाले. पण वॉरिकची—लँक्यास्ट्रियन - बाजू पुष्कळच अधिक बळकट होती. दोन्ही सैन्यांची बार्नेट येथें गांठ पडली ( १४७१ एप्रिल ). तेथें झालेल्या युद्धांत धुकें पडून लँक्यास्ट्रियन सैन्यांत अव्यवस्था माजली, ड्यूक ऑफ क्लॅरेन्स हा आपला सासरा वॉरिक यास सोडून आयत्या वेळीं फितुर होऊन आपला भाऊ एडवर्ड यास मिळाला व लढाईच्या ऐन गर्दींत वॉरिक पडला. या कारणांनीं एडवर्डला जय मिळाला. यापुढें मार्गरेट फ्रान्सांतून आली. तिचा टयूक्स्बरी येथें एडवर्डनें पराभव केला ( १४७१ मे ). या टयूक्स्बरीच्या युद्धांत मार्गरेटचा मुलगा पडला व भांडणाचें मूळच तुटल्यासारखें झालें. लवकरच लँक्यास्ट्रियन पक्षाच्या पुढाऱ्यांस पकडून मार्गरेट शिवाय बाकीच्यांस एडवर्डनें फांशीं दिलें, व मार्गरेटला कैदेंत ठेविलें. सहावा हेन्री तुरुंगांत याच सुमारास मरण पावला. कदाचित् त्याचा खूनही झाला असावा. अशा प्रकारें १४७१ सालीं लँक्यास्ट्रियन पक्षाच्या प्रमुख मंडळीस मूठमाती मिळून वॉरिकच्या हाताखालीं त्यांनीं फिरून जी उचल केली होती तिचा पुरा नायनाट झाला, व यॉर्किस्ट पक्ष निर्भयपणें राज्य करूं लागला.

**८ चौथा एडवर्ड**—१४७१ पासून १४८३ पर्यंत चौथ्या एडवर्डनें शांतपणें राज्य केलें. या बारा वर्षांत त्यानें पार्लमेंट कधींच बोलाविली नाहीं.

लँक्यास्ट्रियन सरदारांच्या जप्त झालेल्या जहागिरींची दांडगी उत्पन्नें राजास मिळाल्यामुळें कर बसविण्याचें फारसें कारणच उरलें नाहीं. इंग्लिश राजानें फ्रान्सांत कांहीं गडबड करूं नये म्हणून फ्रान्सच्या राजाकडूनही पैसा मिळूं लागला. याशिवाय श्रीमंत प्रजाजनांपासून नजराणे ( Benevolences ) घेण्याचा प्रघात एडवर्डनें पाडिला. या सर्व कारणांनीं लोकमताची फिकीर न करतां राज्य चालविणें एडवर्डला शक्य झालें. १४८३ त एडवर्ड वारला.

**९ रिचर्डची कारवाई**—एडवर्डच्या मागें त्याचीं तीन अपत्यें होतीं. वडील मुलगी एलिझबेथ ही १७ वर्षांची होती. दोन मुलगे होते; त्यांपैकीं पहिला मुलगा एडवर्ड हा बारा वर्षांचा होता. व दुसरा मुलगा रिचर्ड हा सात आठ वर्षांचा होता. चौथ्या एडवर्डच्या मागून त्याचा वडील मुलगा एडवर्ड यास ' पांचवा एडवर्ड ' ही पदवी देऊन गादीवर बसविण्यांत आलें, व राजा अल्पवयी असल्यामुळें सर्व कारभार चौथ्या एडवर्डचा भाऊ रिचर्ड हा पाहूं लागला. हा रिचर्ड कार्यक्षम होता, पण त्याची महत्त्वाकांक्षा जबर असून तो सद्‌सद्विवेक बुद्धीस जुमानीत नसे. त्याचा डाव स्वतःस इंग्लंडची गादी मिळविण्याचा होता. यास्तव त्यानें एडवर्ड व रिचर्ड या आपल्या दोन्ही पुतण्यांस आपल्या कबजांत घेतलें व मग त्यांना तुरुंगांत टाकून नीचपणानें त्यांचा खून करविला. त्यांचा पक्ष घेणाऱ्या सर्व सरदारांस ठार केलें व स्वतःस तिसरा रिचर्ड ही पदवी घेऊन त्यानें राज्याभिषेक करून घेतला. त्याचा स्वभाव अत्यंत संशयी बनला होता, व आपल्या साथीदारांपैकींही पुष्कळांची त्यानें पुतण्यांप्रमाणें वाट लाविली. लोकांस आपल्या दुष्कृत्यांचा विसर पडावा म्हणून त्यानें सवलतीचें धोरण स्वीकारिलें, व विरुद्ध पक्षास आपल्या विरुद्ध जाण्यास कांहींच साधन राहूं नये या हेतूनें त्यानें आपली पुतणी एलिझाबेथ हिशीं लग्न करण्याचा घाट घातला !

**१० हेन्री ट्यूडर**—तिसरा रिचर्ड लोकांत फारच अप्रिय झाला होता, व त्याचें कोणतेंच कृत्य लोकांस पसंत पडेना. या स्थितीमुळें

हेन्री[1] टयूडर नांवाच्या लँक्यास्ट्रियन पक्षाच्या सरदारानें फ्रान्समधील सरदारांची मदत घेऊन कांहीं फौज जमविली व तो मिल्फर्ड हेवन या बंदरांत उतरला ( १४८५ जून ). वेल्श लोक त्याला मिळाले व रिचर्डच्या सैन्याशीं त्याची बॉस्वर्थ येथें गांठ पडली. तेथें हेन्रीचें सैन्य अवघें ५००० असून रिचर्डचें १४००० होतें. तथापि रिचर्ड सर्व सैनिकांस अप्रिय आहे ही गोष्ट त्याला माहीत होती, व यामुळेंच आपला जय होईल अशी त्याला आशा होती. खरोखरच रिचर्ड इतका अप्रिय होता कीं, त्याच्या सैन्यापैकीं बरेच लोक लढलेच नाहींत व लॉर्ड स्टॅन्ले याच्या हाताखालील बराच मोठा भाग हेन्रीच्या बाजूस जाऊन मिळाला. स्वतः रिचर्ड मात्र निराशेनें उत्पन्न होणाऱ्या तडफेनें लढला;पण हेन्रीकडे जाण्यासाठीं जोरानें हाणमार करीत असतां तो मारला गेला; व त्याचा मुकुट रणांगणावरच लॉर्ड स्टॅन्ले यानें हेन्रीच्या मस्तकावर ठेविला; व येणेंप्रमाणें सातवा हेन्री हा टयूडर घराण्याचा पहिला राजा गादीवर आला.

**११ यादवीचे परिणाम**—ही जी १४५५ पासून १४८५ पर्यंत इंग्लंडांत यादवी माजली तिजमध्यें बहुतेक सरदारघराणीं लयास गेलीं. या युद्धांत एकंदर समोरासमोर उभें राहून केलेल्या १४ लढाया झाल्या. राजघराण्याचें रक्त अंगीं खेळणारे असे सुमारें ऐशीं पुरुष मारले गेले, व एकंदर सरदारांपैकीं निम्मे सरदार धारातीर्थीं पतन पावले. सरदारघराण्यांपैकीं पुष्कळांच्या जमिनी निर्वंश झाल्यामुळें म्हणा अगर राजाधिकाऱ्यांनीं जबरीनें काढून घेतल्यामुळें म्हणा इंग्लंडच्या राजाच्या ताब्यांत गेल्या. यामुळें पुढील शतकांत टयूडर राजांस अमर्यादित सत्ता प्राप्त झाली, व त्यांनीं निरंकुशपणें सत्तेचा उपभोग घेतला. आतांपर्यंत सर्व जनतेचें पुढारीपण सरदार लोक गाजवीत, व देशांत राजावर काय किंवा बहुजनसमूहावर काय त्यांचा अत्यंत वचक असे. यापुढें ही स्थिति नाहींशी झाली व सातवा हेन्री गादीवर आल्यापासून सरदार लोक जे

---

१ जॉन ऑफ गॉंट, डयूक ऑफ लँक्यास्टर याच्या पणतीचा मुलगा.

एकदां मागें पडले ते कायमचेच मागें पडले! यादवीच्या वेळीं सरदारांनीं आपल्या चाकरीस जे लष्करी लोक ठेविलेले असत त्यांच्या साहाय्यानेंच ते लढाई करीत. यामुळें सामान्य जनतेवर या युद्धांत फारसा भार पडला नाहीं. शिवाय या युद्धांत प्रदेश जिंकावयाचा हेतु नसून केवळ राजकीय सत्ता आपल्या हातीं यावी यासाठीं दोन पक्ष भांडत असल्यामुळें इंग्लंडांतील निरनिराळ्या शहरांस या युद्धांत फारसा त्रास सोसावा लागला नाहीं. त्यांत व्यापार, उद्योगधंदे वगैरे सुरळीत चालले होते. त्यांतल्या त्यांत युद्धोपयोगीं शस्त्रें, कपडे व इतर सामान करावें लागल्यामुळें कांहीं उद्योगधंद्यांना विशेष उत्तेजन मिळालें. या अवधींत इंग्लिश व्यापाऱ्यांनीं फ्लँडर्स व प्रशिया या देशांशीं इंग्लंडचा चाललेला सर्व व्यापार स्वदेशी जहाजांतून चालू केला होता. याच सुमारास ऱ्हाईन नदीच्या मुखाशीं हेरिंग नांवाचे मासे दिसूं लागले; व तेव्हांपासून या हेरिंग माशांना पकडून मच्छेमारीचा एक नवीनच धंदा चालविण्याची संधी हजारों इंग्लिशांस मिळाली. याप्रकारें इंग्लंडांतील बडा वर्ग दुर्बळ होऊन नामशेष होण्याच्या पंथास लागला. अशा वेळीं सामान्य जनतेची उन्नति होण्याचीं अनुकूल साधनें चहूंकडून वृद्धिंगत झालीं, व लॉर्ड नाहींतसे होऊन लवकरच त्यांच्या जागीं कॉमन्स (सामान्य जन) प्रबल होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. हीं चिन्हें खोटीं नसून खरीं कशीं होतीं व या क्रांतीस साहाय्यभूत अशा आणखी कोणत्या गोष्टी घडून आल्या याचें वर्णन पुढें येईल.

---

## १४ नवयुगास आरंभ.

**१ नवीन युगाचे विशेष—** इ. स. १४८५ त सातवा हेन्री गादीवर आला; तेव्हांपासून आधुनिक काळास आरंभ झाला असें

म्हणतात. हा आधुनिक काळ मागील काळापासून ज्या बाबतींत निराळा आहे त्या बाबती कोणत्या व त्यांचा प्रादुर्भाव कसा झाला हें कळणें जरूर आहे. १ छापण्याची कला, २ दर्यावरील सत्ता, ३ आधिभौतिक शास्त्रांची आवड, ४ धार्मिक बाबतींतही अंधपरंपरेला न जुमानतां स्वतंत्र विचार करण्याकडे ओढा, ५ राष्ट्रीयत्वाची भावना, ६ लोकसत्ताक राज्यपद्धति--या सहा बाबी म्हणजे आधुनिक युगाचे विशेष गुण असून त्यांच्यामुळेंच मध्ययुग व नवयुग यांत जमीन अस्मानाचें अंतर पडलें आहे. म्हणून या गोष्टींचाच आतां क्रमशः विचार करूं.

**२ छापण्याची कला**— छापण्याच्या कलेचा मूळ शोध जॉन गटेनबर्ग नांवाच्या जर्मनानें १४५० च्या सुमारास लाविला. हा गटेनबर्ग जर्मनीमधील हेसे संस्थानांतील मेन्झ गांवीं इ. स. १४१० त जन्मला. इ. स. १४२५ पासून लोकांच्या कर्जाऊ रकमा काढून शास्त्रीय शोध लावण्यांत तो गर्क झाला. दगड गुळगुळीत करण्याची युक्ति पहिल्यानें काढून त्यानें नंतर दगडाचे आरसेही तयार केले. १४३८ पासून छापण्याचे प्रयोग करून पहाण्याकडे त्याचें लक्ष वेधल्याचें दिसून येतें. त्याच्या प्रयोगांत त्याला यश येऊन त्यानें लॅटिन भाषेंत बायबल हा ग्रंथ छापण्यास सुरुवात केली, व १४५५ सालीं तो ग्रंथ पूर्णपणें छापून काढिला. परंतु या कामीं त्याला अतोनात कर्ज झालें. यापासून त्याला इतका त्रास झाला कीं, शेवटीं त्याला आपला छापखाना विकून टाकावा लागला. फिरून गटेनबर्गला नवा व्यवसाय पाहणें प्राप्त झालें. व त्यानें १४६५ त एका आर्चबिशप ( मुख्य धर्मगुरू ) च्या हाताखालीं नोकरी धरली. १४६८ त गटेनबर्गचा अंत मोठ्या हृदयद्रावक रीतीनें झाला. त्याला मागें अपत्य कांहींच नसून दारिद्र्य तर हात धुऊन त्याच्या पाठीमागें लागलें होतें व मित्रांनींही त्याचा त्याग केला होता. अशा रीतीनें विपन्नस्थितींत जरी या थोर पुरुषाचें शरीर मृत्युमुखीं पडलें असलें तरी त्याच्या हातून झालेलीं कृत्यें इतक्या महत्त्वाचीं आहेत कीं, जोंवर छापण्याची कला

कायम आहे तोंवर गटेनबर्गचें नांव सर्व जगांत गाजत राहील. ही गटेनबर्गनें शोधून काढलेली छापण्याची कला वुइल्यम क्यॅक्स्टन यानें इंग्लंडांत आणिली चौथ्या एडवर्ड राजाची बहीण मार्गरेट हिचें बर्गंडीच्या ड्यूकशीं लग्न झालें होतें, तिच्या खाजगींत क्यॅक्स्टन नोकरीस होता. त्या नोकरींत असतां त्यानें फ्लँडर्समधील ब्रुग्जशहरीं 'ट्रॉयची गोष्ट' नांवाच्या एका फ्रेंच भाषेंतील पुस्तकाचें इंग्रजींत भाषांतर करून तें छापलें. अशा रीतीनें १४७४ सालीं इंग्रजी भाषेंतील पहिलें पुस्तक छापलें गेलें. नंतर तो आपला छापखाना व खिळे घेऊन लंडनला आला. वेस्ट मिन्स्टरमध्यें त्यानें एक घर घेतलें व पुढें सर्व आयुष्यभर छापण्याचें काम त्यानें अव्याहत चालविलें. क्यॅक्स्टनच्या उदाहरणावरून इतरांनींही छापण्याची कला उचलली व लवकरच पुष्कळ पुस्तकें छापलीं जाऊन तीं स्वस्त झालीं. येणेंप्रमाणें छापण्याच्या कलेचा इंग्लंडांत प्रसार झाला. हजारों लोकांना वाचण्याची आवड उत्पन्न झाली. पुढें या नव्या कलेनें विद्येचा प्रसार सामान्य जनसमूहांतही अति मोठ्या प्रमाणानें कसा करून दिला, हें आजच्या काळीं हरघडी आपल्या प्रत्ययास येत आहे.

**३ अमेरिकेचा शोध**—दर्यावरील सत्ता व व्यापार यांस उत्तेजन आलें तें कोलंबसानें सन १४९२ त अमेरिका शोधून काढिली तेव्हांपासून आलें. कोलंबस हा त्या काळीं भरभराटींत असलेलें इटलींतील व्यापाराचें बंदर जिनोआ येथें १४३६ सालीं जन्मास आला. लहानपणापासूनच दर्यावर त्याची प्रीति जडली व आपण खलाशी व्हावें असें त्यास वाटूं लागलें. त्यानें आपल्या आयुष्याचीं आरंभींचीं कांहीं वर्षें समुद्रावरील गुंड लोकांत घालविलीं. एकदां पोर्तुगालच्या किनाऱ्याजवळ एक युद्ध झालें; त्यांत त्याचें जहाज फुटलें. तो एका फळीवरून तरंगत येऊन कसाबसा त्या प्रसंगांतून बचावला व लिस्बन शहरीं आपल्या भावाच्या घरीं येऊन दाखल झाला. पुढें पोर्तुगालमध्यें नकाशे तयार करण्याचा धंदा करून तो राहिला. त्यानें ज्योतिषाचें ज्ञान मिळविलें व युरोपच्या पश्चिम किनाऱ्यावर बऱ्याच सफरी केल्या. त्या वेळीं हिंदुस्थानशीं खुष्कीनें

व्यापार चाले व तलम कापड, मसाल्याचें सामान, मोतीं, जवाहीर इत्यादि मोलवान पदार्थांची हिंदुस्थानांतून युरोपांत रवानगी होत असे. परंतु युरोपच्या पूर्व भागांत राज्य मिळविण्यासाठीं मुसलमान सारखी खटपट करीत होते, त्यांनीं १४५३ त कॉन्स्टांटिनोपल घेतल्यापासून या व्यापारास अडथळा होऊं लागला व युरोपियन ख्रिस्ती राष्ट्रांस हिंदुस्थानशीं आपला व्यापार अव्याहत चालण्यास समुद्रावरून एकादा रस्ता निघाला पाहिजे, असें वाटूं लागलें. कोलंबसास असें वाटलें कीं, आपण जर समुद्रांतून पश्चिमेकडे खूप दूर गेलों तर पृथ्वी वाटोळी असल्यामुळें हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यास जाऊन पोहोंचूं. म्हणून तो पोर्तुगालच्या राजापाशीं हिंदुस्थानची सफर करण्यास पैशाची मदत मागूं लागला. परंतु हिंदुस्थानास पश्चिमेकडून पोंचण्याची त्याची कल्पना कोणास न पटून त्यास कोणींही द्रव्यसाहाय्य केलें नाहीं. त्यानें इंग्लंडचा राजा सातवा हेन्री यासही पत्रें पाठविलीं, पण उत्तर आलें नाहीं, शेवटीं तो स्पेनच्या इझाबेला राणीकडे गेला. तिला मात्र त्याची कल्पना पसंत पडली; परंतु तिच्या सल्लागार मंडळींनीं कोलंबसास मुळींच पैशाची मदत न करण्याबद्दल आग्रह धरिला; त्यामुळें राणी मदत करीना. पुढें सात वर्षांनीं राणी स्वतःच्या खर्चानें सफरीची तयारी करून देण्यास सिद्ध झाली. कोलंबसास त्या सफरीवर जाणाऱ्या लोकांचा मुख्य ( Admiral ) नेमण्यांत आलें. कोलंबसाचीं जहाजें या सफरींत अमेरिकेच्या[१] पूर्व किनाऱ्याजवळच्या बहामा

---

१ अमेरिगो व्हेस्पुसी ( १४५२-१५१२ ) नांवाच्या एका इटालियन नाविकानें स्पेन व पोर्तुगाल येथील सरकारांच्या साहाय्यानें बऱ्याच सफरी केल्या. १४९९ सालीं त्यानें अमेरिकेच्या किनाऱ्यावरून शेकडों मैल प्रवास केला. कोलंबसानें त्याच्या पूर्वींच्या वर्षीं ( १४९८ ) खुद्द अमेरिका खंडांत प्रवेश केला होता. तथापि त्याची सफर सरकारी रीतीनें गुप्त राखण्यांत आली; व अमेरिगोच पहिल्यानें त्या खंडांत गेला ही बातमी प्रसिद्ध होऊन त्या खंडास अमेरिका असें नांव पडलें.

बेटांस जाऊन लागलीं ( १४९२ ). त्याला वाटलें कीं, आपण हिंदुस्थानच्या पूर्वेच्या बेटांवरच आलों आहों; म्हणून त्यानें त्या बेटांना इंडीज असें नांव दिलें. परंतु तीं हिंदुस्थानापासून अगदीं दूर असल्यामुळें हल्लीं त्यांना ' वेस्ट इंडीज ' म्हणण्याची चाल पडली आहे.

**४ क्यॅबटची सफर—** जॉन क्यॅबट व त्याचा मुलगा सेबॅशियन क्यॅबट हे व्हेनिशियन व्यापारी ब्रिस्टल येथें रहात असत. त्यांनीं युरोपच्या दक्षिणेस व पश्चिमेस सफरी केल्या होत्या. कोलंबसास दूरच्या सफरींत नवा देश सांपडला, असें पाहून क्यॅबट पितापुत्रांस उत्साह वाटला, व त्यांनीं सातव्या हेन्रीला आपल्या सफरीस पैसा पुरविण्याविषयीं विनंति केली. सातवा हेन्री मोठा द्रव्यलोभी त्याला वाटलें कीं, क्यॅबटनीं नवे देश शोधून काढून त्यांतील संपत्ति जर इकडे आणली तर आपल्याला हा द्रव्य मिळण्याचा अनायासाचाच मार्ग आहे, म्हणून त्यानें क्यॅबटना जहाजें वगैरे सफरीची सर्व तयारी करून दिली. क्यॅबटनीं वायव्येकडे रोंख धरून प्रवास चालविला. व धोक्याच्या व बऱ्याच पल्ल्याच्या प्रवासानंतर ते लॅब्रॅडोर[१]च्या किनाऱ्यावर पोहोंचले ( १४९७ ). पुढें त्यांनीं प्रवास तसाच चालू ठेवून एक देश शोधून काढिला. त्यास त्यांनीं न्यूफौंडलॅंड[२] असें नांव दिलें. नंतर उत्तर अमेरिकेच्या किनाऱ्याचा त्यांनीं शोध लाविला. स्पेनच्या आश्रयानें कोलंबस ( जिनोईज ) अमेरिकेस गेला व इंग्रजांच्या आश्रयानें क्यॅबट (व्हेनिशियन) तेथें गेले. तेव्हां या सफरीवरूनच स्पेन व इंग्लंड हीं राष्ट्रें अमेरिकेवर पुढें आपापला हक्क सांगूं लागलीं. येणेंप्रमाणें अमेरिकेसारखा धनधान्यसमृद्ध व लोकवस्ती अगदीं विरळ असलेला देश आयताच युरोपियन लोकांच्या हातीं आला. यामुळें युरोपि-

---

१ क्यॅनडा संस्थानांत क्वेबेकच्या उत्तरेस प्रांत आहे.

२ मराठी अर्थ नवीन सांपडलेली भूमि; कॅनडाच्या आग्नेयीस बेट आहे.

यन लोकांच्या धाडसी वृत्तीस उत्तेजन मिळून युरोपमधील वाढलेल्या लोकसंख्येस विस्तृत क्षेत्र मिळालें व आजच्या वैभवशाली युरोपचें बीजारोपण झालें.

**५ विद्येचें पुनरुज्जीवन**— पश्चिम रोमन साम्राज्याचा लय झाला तेव्हांपासून तुर्क लोकांनीं कॉन्स्टॅन्टिनोपल घेतलें ( १४५३ ), व विद्येचें पुनरुज्जीवन झालें, तेथपर्यंतच्या काळास युरोपच्या इतिहासांत मध्ययुग असें म्हणतात. या काळामध्यें धर्मगुरू तेवढेच विद्वान असत. ही गोष्ट केवळ धार्मिक ज्ञानासंबंधीं नव्हे; तर इतर सर्व प्रकारचें ज्ञान किंवा विद्वत्ताही धर्मगुरुंच्याच ठायीं असावयाची अशी स्थिति होती. पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते कां सूर्य पृथ्वी-भोंवतीं फिरतो हा वास्तवीक ज्योतिष शास्त्रांतील प्रश्न. परंतु हा देखील सोडविण्याचा मक्ता धर्मगुरूंनींच घेतलेला होता. जर कोणीं इतर मनुष्यानें या प्रश्नासंबंधीं शोध करून धर्मगुरूंच्या उलट मत प्रतिपादन केलें, तर त्यांना तो आपला अपमान झाला असें वाटे, व राजसत्ता सर्वस्वी त्यांच्या अंकित असल्या-मुळें असल्या स्वतंत्र विचाराच्या मनुष्यास शिक्षा देवून त्याचा भयंकर छळ करण्यास ते सिद्ध होत. परंतु जुलूम केला तरी सत्य बाहेर पडण्यास उशीर लागेल इतकेंच; तें कधींही कायमचें दडपलें जात नाहीं. याचें प्रत्यंतर म्हणजे पोपची गादी जेथें आहे त्या इटलींतच स्वतंत्र बुद्धीनें विचार करून ज्ञान मिळविण्याच्या चळवळीस आरंभ झाला. कॉन्स्टॅन्टिनोपल तुर्क लोकांनीं घेतलें तेव्हां तेथें असलेले जुने ग्रंथ घेऊन तेथील विद्वान लोक युरोपांत पसरले, व पूर्वीं ग्रीस व रोम हीं वैभवाच्या शिखरावर ज्या वेळीं होतीं, त्या वेळीं झालेल्या तेजस्वी ग्रंथांचें अध्ययन करण्याची लाट उसळली. इरॅसमस ( १४६६–१५३६ ) या डच ग्रंथकारानें ‘ मूर्खस्तुति ’ नांवाचा व्याजोक्तिपरिपूर्ण ग्रंथ लिहून त्यांत मठवासी लोकांच्या जुन्या विचारांची खूप टर उडविली. १५१६ मध्यें त्यानें बायबलच्या ‘ नव्या कराराची एक सुधारलेली आवृत्ति प्रसिद्ध केली. तींत ग्रीक मुळाबरोबर लॅटिन भाषांतर देऊन ठिक-

ठिकाणीं टिपांमध्यें प्रचलित मतें कशीं चुकीचीं आहेत हें सिद्ध केलें होतें. इंग्लंडांतही लवकरच या विचारांनीं प्रेरित झालेले पुरुष निघूं लागले. जॉन कॉलेट ( १४६७–१६१९ ) हा आपल्याला मुळांत ख्रिस्ताची शिकवण समजून घेतां यावी म्हणून ग्रीक भाषा शिकला. नंतर त्यानें स्वतःस झालेलें ज्ञान समाजांत प्रसृत करण्यासाठीं लंडनमध्यें ' सेंटपॉल-ची शाळा ' काढिली. थॉमस मूर ( १४८०–१५५१ ) यानें ' युटोपिया ' नांवाचा ग्रंथ लिहिला; त्यांत ' उत्तम राज्य ' वर्णिलें असून आज लोकसत्तेच्या वेळीं ज्या तत्त्वांवर राज्य चालविण्यांत यावें, असें आपण म्हणतों तीं सर्व तत्त्वें त्यांत ग्रथित केलेलीं आढळतात. सार्वत्रिक शिक्षण, शुद्ध न्याय, धार्मिक सहिष्णुत्व, वाईट राजास गादीवरून काढून टाकण्याचा प्रजेचा हक्क इत्यादि महत्त्वाच्या गोष्टींचा मूरनें पुरस्कार केला आहे. यावरून त्याची जोरदार कल्पनाशक्ति व अकुंठित दूरदृष्टि व्यक्त होतात. पुतळे करण्याच्या कलेसही जोर येऊन चित्रकलेचा अभ्यास सृष्टीला धरून विशेष आस्थापूर्वक होऊं लागला. त्याचप्रमाणें शिल्पकलेलाही उत्तेजन आलें. एकंदरीनें मध्ययुगांत हें जग नश्वर व पापानें भरलेलें असून त्यांतून आपल्याला मुक्तस्थिति कशी मिळणार, हें शोधून त्या दिशेनें प्रयत्न करण्याची पद्धति मागें पडून जग सुंदर व पवित्र असून जगांतील निरनिराळ्या वस्तूंचा शक्य तितका अधिक उपभोग घ्यावा व जगाच्या सौंदर्यांत भर टाकावी या विचारांचा पगडा लोकमतावर बसला.

६ इतर शोध—धर्मशास्त्राबाहेरच्या इतर विषयांत शोधक लोक निपजूं लागले; व त्यांनीं नवे शोध लाविले. होकायंत्रांत सुधारणा, ताऱ्याची उंची मोजण्याचें यंत्र, दुर्बिणीचा शोध इत्यादि सुधारणा नौकानयन शास्त्रांत झाल्या. बंदुकीच्या दारूचा शोध लागला व मध्ययुगांत युद्धांत वापरण्यांत येणारीं तरवारीं, भाले, वगैरे शस्त्रें मागें पडलीं. या दारूच्या शोधापासून युद्धसंबंधीं साधनसामुग्रींत व डावपेचांत इतकी क्रांति झाली कीं, सामान्य मनुष्यास थोडक्याशा अभ्यासानें युद्धांत सामील होणें अशक्य झालें व कायमचीं लष्करें ठेवून त्यांत युद्ध हाच कायमचा

व्यवसाय करण्याच्या हेतूनें भरती केलेल्या लोकांचा युद्धाच्या कामीं उपयोग करणें भाग पडलें. प्रशियांतील कोपर्निकस ( १४७३–१५४१ ) व इटलींतील ग्यालिलिओ ( १५६४–१६४२ ) यांच्यासारखीं माणसें ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करूं लागलीं व धर्मगुरूंच्या अक्षम्य छळास भीक न घालतां खोल अभ्यास करून काढिलेल्या प्रमेयांची त्यांनीं लोकांस ओळख करून दिली. हीच लाट सर्व युरोपभर पसरून आजची आधिभौतिक शास्त्रांची परिणत स्थिति त्यांस प्राप्त झाली आहे.

**७ राष्ट्रकल्पना**–मध्ययुगांत युरोपखंडांतील बहुतेक सर्व देश धर्मदृष्ट्या व राजकीयदृष्ट्या एकाच पोपचे व बादशहाचे अंकित असून आपण सर्व ख्रिस्ती लोक एक आहों ही भावना त्यांच्या ठायीं जोरांत होती. धर्मयुद्धांनीं तर या ऐक्याचें संवर्धनच केलें. परंतु पंधराव्या शतकाच्या शेवटीं या स्थितींत प्रचंड फरक झाला. इंग्लंड, फ्रान्स, स्पेन या देशांस आपण निरनिराळीं राष्ट्रें आहों अशी जाणीव उत्पन्न झाली. नवीन भूमीचा शोध लागल्यावर आपल्या जातभाईंच्या ताब्यांत ती आली पाहिजे, म्हणून युरोपांतील इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल वगैरे देशांतील सरकारें झटूं लागली, व त्यामुळें ‘ स्वतंत्र राष्ट्र ’ या भावनेस जोर आला. त्याचप्रमाणें धर्मसुधारणेची चळवळ सुरू होऊन सर्व देशांनीं पोपची आज्ञा प्रमाण मानण्याचें कारण नाहीं, ज्या त्या देशाच्या राजानें व लोकांनीं हा धर्माचा प्रश्न आपल्या सोईस पडेल तसा सोडवावा हा विचार बळावत गेला व त्यामुळें धर्मदृष्टीनें युरोपखंड एक होतें, ती स्थिति जाऊन त्याचे निरनिराळे तुकडे झाले. शिवाय याच सुमारास इंग्लंड, फ्रान्स इत्यादि देशांतील सरदार मागें पडून राजसत्ता प्रबळ झाली. अर्थात् त्या देशांतील राजांनीं दुसऱ्या देशांतील राजांस नरम आणून आपआपल्या राष्ट्रांचें वैभव वाढविण्याची खटपट चालविली. उदाहरणार्थ फ्रान्सचा राजा पहिला फ्रॅन्सिस व जर्मन बादशहा पांचवा चार्लस या दोघांचीही इटलींत मुलूख जिंकण्याची इच्छा होती. त्या दोघांशींही प्रसंगानुसार सख्य करून त्यांची सत्ता फारशी वाढूं न देण्याची इंग्लंडचा राजा आठवा हेन्री यानें खबरदारी ठेविली व तेणें-

करून राष्ट्र या नात्यानें इंग्लंडची इभ्रत वाढली. अलीकडे तर युरोपांतील देशांतून आपण निरनिराळीं राष्ट्रें आहोंत ही भावना अत्यंत बळावली असून आपले हितसंबंध जपण्यास तीं कशीं जागरूक असतात हें प्रसिद्धच आहे.

**८ लोकसत्ताक राज्यपद्धति**—एकदां स्वतंत्रपणें बुद्धि वावरूं लागली म्हणजे ती सर्व विषयांत प्रवेश करते त्याप्रमाणें लोकांच्या धर्मविचारांतही तिनें क्रांति घडवून आणिली यांत नवल नाहीं. परंतु यासंबंधीं माहिती पुढें म.गूं. आज विस.व्या शतकांत सर्व सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें लोकसत्ताक राज्यपद्धति प्रचलित आहे. त्याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे छापण्याच्या कलेमुळें बहुजनसमूहांत ज्ञानाचा प्रसार फारच झपाट्यानें व मोठ्या प्रमाणावर झाला, हेंच होय. इंग्लंडांत लोकसत्ताक पद्धतीची वाढ कशी झाली हें पुढें येणारच आहे. आणखीही पुष्कळ बाबतींत अर्वाचीन युग व मध्ययुग यांमध्यें फरक आहेत. परंतु त्यांच्या मुळाशीं या प्रकरणांत वर्णिलेले विशेष प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें आहेत. म्हणून तेवढ्यांचेंच वर्णन येथें केलें आहे.

---

# १५ सरदार शमले व राजाला नमले !

**१ सोळाव्या शतकाचा ओघ**—मध्ययुगांत सरदारांचें प्राबल्य विशेष असे. धर्मयुद्धांत फ्रान्सशीं झालेल्या शतसांवत्सरिक युद्धांत त्यांनीं आपली लढण्याची हौस पुरवून घेतलीच. पण पुढें बाहेर कोठेंच रणक्षेत्र दिसेना तेव्हां स्वदेशांतच यॉर्क व लँक्यास्टर असे दोन पक्ष उभे करून त्यांनीं आपला रणकंडु शमविला. शतसांवत्सरिक युद्धांतील पराजयानें व यादवीच्या दंगलींनें इंग्लिश लोक अगदीं त्रासून गेले. शिवाय देशांत दारिद्र्याचाही कहर उसळला होता. तेव्हां लोक अगदीं असंतुष्ट होते.

अशा वेळीं धाकदपटशा दाखवून कां होईना सर्व देशभर शांतता व स्वास्थ्य यांची स्थापना करील असा राजा इंग्लंडास पाहिजे होता. सुदैवानें १४८५ त गादीवर आलेला सातवा हेन्री व त्याचे वंशज म्हणजे ट्यूडर राजे ( १४८५–१६०३ ) जे इंग्लंडवर आले ते कर्तबगार असून या कामास योग्य असेच निघाले. आणखी या काळांत-सोळाव्या शतकांत–धर्मसंबंधीं कलह माजून युरोपांत दोन पक्ष झाले. स्पेन हें राष्ट्र त्या काळीं फारच बलाढ्य असून धर्मकलहांत इंग्लंडच्या विरुद्ध बाजूस होतें तेव्हां त्याच्याशींही शेवटचीं ट्यूडर राणी एलिझाबेथ हिला झगडावें लागलें. त्या झगड्यांतही इंग्लंडची फत्ते झाली; व त्याचा महत्त्वाचा परिणाम म्हणजे ‘ नवीन जगांत ’ आपल्याला वांटा मिळावा यासाठीं पुष्कळ धाडसी इंग्रजांनीं जोरानें खटपट केली. तेव्हां ट्यूडर राजांनीं शांतता राखण्यास्तव केलेले प्रयत्न व धर्मकलहामुळें इंग्लंडला करावा लागलेला झगडा, ह्याच या शतकांतील महत्त्वाच्या गोष्टी असून इतर सर्व हकीकती त्यांजशीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें संबद्ध आहेत, असें आढळून येईल.

**२ हेन्रीचें धोरण**—मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें इ. स. १४८५ त बॉस्वर्थ फील्डच्या रणांगणवर हेन्री ट्यूडर यांस विजयश्रीनें

---

### अनियंत्रित राजसत्ता.

ट्यूडर घराणें १४८५–१६०३

सातवा हेन्री १४८५–१५०९

आठवा हेन्री १५०९–१५४७

| | | |
|---|---|---|
| मेरी | एलिझाबेथ | सहावा एडवर्ड |
| १५५३-१५५८ | १५५८-१६०३ | १५४७-१५५३ |

माळ घातली; आणि त्याच्या मित्रांनीं तिसऱ्या रिचर्डचा पडलेला मुकूट उचलून घेऊन त्याच्या डोकीवर ठेविला, आणि ' राजा ' म्हणून त्याचें अभिनंदन केलें; पुढें त्यानें थाटानें लंडन शहरीं प्रवेश केला, व पार्लमेंटनें त्याला राजा म्हणून मान्य केलें. यॉर्क व लँक्यास्टर या दोन पक्षांतील दुही कायमची नाहींशी व्हावी या हेतूनें हेन्रीनें चौथ्या एडवर्डची मुलगी एलिझाबेथ हिशीं विवाह केला या विवाहानें ' यॉर्क ' च्या पक्षांतील पुष्कळ लोकांचें समाधान झालें व त्यांनीं हेन्रीस विरोध करण्याचें सोडून दिलें. हेन्री मोठा धूर्त होता. तो गादीवर येण्यापूर्वी यॉर्क व लँक्यास्टर यांच्यांत दुफळी होऊन जी बेबंदशाही माजली तिचें कारण राजसत्तेचें दौर्बल्य होय, हें त्यानें तेव्हांच ओळखिलें. राजसत्ता प्रबल व समृद्ध झाल्यास जनतेचा तिला पाठिंबा मिळण्यास वेळ लागणार नाहीं, हेंही त्याच्या लक्षांत आलें. तेव्हां त्यानें आपल्या सर्व कारकिर्दींत द्रव्यसंचय करण्याचें धोरण स्वीकारिलें. या कामीं आर्चबिशप मॉर्टन, एम्प्सन् व डड्ले या तिघांचा त्याला फार उपयोग झाला. लोकांपासून ' देणग्या ' मिळविण्यास मॉर्टन एक खाशी युक्ति अंमलांत आणीत असे. एखाद्या गृहस्थाची रहाणी चैनीची असली तर आपली चैन कमी करून राजास देणगी देण्यास तुम्हास कांहींच हरकत नाहीं असें त्यास कळविण्यांत येई. बरें रहाणी गरिबीची असली तर देणगीपासून सुटका होत असेल असें कोणास वाटेल ! पण छे. मॉर्टन कसला वस्ताद, तो म्हणे, ' तुम्ही गरिबीनें रहातां, तेव्हां तुम्ही शिल्लक टाकीत असलाच पाहिजे. तींतून देणगी द्या म्हणजे झालें ! ' हीच कारवाई ' मॉर्टनचा कांटा ' ( Morton's fork ) या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे.

**२ तोतये**—हेन्री इतका खबरदार होता तरी तो राज्याचा अगदीं जवळचा वारस नसल्यामुळें राज्यांत बंडें उद्भवणें साहजिक होतें. एडवर्ड, अर्ल ऑफ वॉरिक हा हेन्रीपेक्षां राज्याचा जवळचा वारस होता. त्यानें गडबड करूं नये म्हणून त्यास हेन्रीनें पकडून लंडनच्या किल्ल्यांत ठेवून दिलें. पुढें लॅम्बर्ट सिम्नेल ह्या एका व्यापाऱ्याच्या मुलानें ' मी

एडवर्ड ( वॉरिकचा अर्ल ) आहें ' असें जाहीर करून बंड उभारिलें. त्या वेळीं हेन्रीनें कैदेंत असलेल्या एडवर्डला किल्ल्यांतून बाहेर काढून सर्व लोकांस दाखवून सिम्नेल तोतया असल्याची सर्व लोकांची खात्री पटविली. तथापि आयर्लंडांत यॉर्किस्ट पक्ष लोकप्रिय असल्यानें तेथील लोकांनीं सिम्नेलची बाजू धरली. त्यानें आपणास सहावा एडवर्ड ही पदवी घेऊन डब्लिन येथें पार्लमेंट बोलाविली व इंग्लंडवर स्वारी केली. पण १४८७त स्टोक येथें पराभव होऊन सिम्नेल कैद झाला. हेन्रीनें तोतयाच्या बाजूच्या लोकांस कडक शासन केलें; परंतु सिम्नेलला अपराधाची क्षमा करून आपल्या पदरीं ठेविलें. यानंतर परकिन वॉर्बेक हा तोतया आयर्लंडांत पुढें आला. तिसऱ्या रिचर्डनें १४८३ त आपल्या दोघां पुतण्यांना कैदेंत ठेविलें होतें. त्या राजपुत्रांची अखेर काय गत झाली हें अद्यापि एक गूढच होतें. त्या राजपुत्रांपैकीं धाकटा भाऊ रिचर्ड मी आहें, असें सांगून वॉर्बेकनें चौथा रिचर्ड ही पदवी धारण केली व तो इंग्लंडवर चाल करून आला. परंतु त्याचाही पराभव होऊन तो कैद झाला ( १४९४ ). लंडनच्या किल्ल्यांत कैदेंत असतां वॉरिकचा अर्ल एडवर्ड याशीं त्याची मैत्री जडली व दोघांनीं कैदेंतून निसटून जाण्याचा कट केला. तो उघडकीस येऊन उभयतांस फांशीं देण्यांत आलें.

**४ आयर्लंडची व्यवस्था**—सिम्नेल व वॉर्बेक या तोतयांच्या बंडास आयरिश लोकांनीं मदत केली; यास्तव आयर्लंडवर आपला अंमल दृढ करण्याकरितां एडवर्डनें सर एडवर्ड पॉयनिंग्ज याची आयर्लंडच्या गव्हर्नरच्या जागीं नेमणूक केली. त्यानें आयरिश पार्लमेंटमध्यें दोन कायदे पास करून घेतले (१४९४). १ इंग्लंडच्या राजाच्या संमतीखेरीज आयरिश पार्लमेंटची बैठक होऊं नये. २ इंग्लंडच्या राजाची अगाऊ मंजुरी असल्याशिवाय कोणताही कायद्याचा मसुदा आयरिश पार्लमेंटपुढें विचाराकरितां येऊं नये. या कायद्यांनीं आयरिश पार्लमेंट हें इंग्लंडच्या राजाच्या हातांतील बाहुलें बनलें !

**५ सरदारांचा पाडाव**—मध्य युगांत सरदार प्रबळ होते, त्यामुळें राजेलोकांस त्यांच्या तंत्रानें वागावें लागे. परंतु सातवा हेन्री गादीवर आला तेव्हां सरदारांची स्थिति हलाखीची झाली होती. करितां त्यांची सत्ता संपुष्टांत आणून त्यांस आपले अंकित करून टाकण्यास ही संधि उत्तम आहे असें हेन्रीच्या तेव्हांच लक्षांत आलें. सरदारांनीं वाजवीपेक्षां अधिक शिपायी आपल्या तैनातीस बाळगूं नयेत असा कायदा त्यानें प्रथम केला व तो किती कडक रीतीनें अमलांत आणिला हें खालील उदाहरणावरून कळून येईल. ऑक्सफर्डच्या अर्लनें हेन्रीस बॉस्वर्थच्या लढाईंत पुष्कळ साहाय्य केलें होतें, व हेन्रीचाही त्याच्यावर लोभ होता. एकदां हेन्री स्वारीवर असतां त्याच्या गांवीं गेला. तेव्हां हेन्रीचा सन्मान करण्यासाठीं आपले शिपायी दुतर्फा उभे करून त्यानें आपल्या ऐश्वर्याचें प्रदर्शन केलें. त्या प्रसंगीं हेन्री बोलला. " तुम्ही माझा सन्मान केला याबद्दल मी आभारी आहें. परंतु माझे कायदे माझ्यासमोर मोडले जातात हें पाहून मला खेद होतो. " ऑक्सफर्डच्या अर्लला या कायद्याच्या उल्लंघनाबद्दल १०,००० पौंड दंड भरावा लागला. सरदारांकडून कायद्याचें उल्लंघन झाल्यास त्यांस शासन करण्यास सामान्य न्यायमंदिरें उपयोगीं पडणार नाहींत हें जाणून हेन्रीनें 'स्टार चेंबर' नांवाचें एक स्वतंत्र न्यायमंदिर स्थापिलें. या कोर्टापुढें तैनाती शिपायांबद्दलचा कायदा मोडणें, दंगा, मारामारी, बेकायदेशीर मंडळ्या, खोट्या साक्षी, बनावट कागद करणें वगैरे अपराधांची चौकशी चाले. या कोर्टांत पंच बोलाविण्याची पद्धति नव्हती व त्याच्या निकालावर अपील ( वरिष्ठांकडे दाद ) ही होत नसे. या कोर्टास फांशीची शिक्षा देण्याचा अधिकार नव्हता तरी जबर दंड ठोठावण्याची पूर्ण मोकळीक होती. अशा रीतीनें हें कोर्ट अन्यायाचें व जुलुमाचें साधनच झालें. सरदारांच्या वंशपरंपरा चालत आलेल्या जहागिरीच्या वारसदारीचे हक्क ठरविले गेले असून यापूर्वीं कोणाही सरदाराला आपली स्थावर मिळकत विकतां येत नसे. हेन्रीनें ती मिळकत विकण्यास परवानगी दिली. त्यामुळें पुष्कळ कर्जबाजारी सरदारांच्या जहागिरी श्रीमंत व्यापाऱ्यांनीं घेतल्या. या काय-

ह्यानें जुन्या सरदारांची जूट फुटली हें खरें; पण मध्यम व्यापारी वर्ग हा एक सरदारांचा नवीन वर्ग झाला व त्यांजपासून राजांना पुढें जुन्या सरदारांपेक्षां अधिकच त्रास झाला.

६ **राज्यकारभार**—कांहीं कांहीं माल परदेशी जहाजांतून याव-याचा तो स्वदेशी जहाजांतूनच आणिला पाहिजे, असा कायदा करून इंग्लिश नौकानयनास व व्यापारास हेन्रीनें उत्तेजन दिलें. त्याचप्रमाणें कॅबट ( व्हेनिशियन ) यास मदत देऊन सफरीवर पाठविलें व त्यानें उत्तर अमेरिकेचा शोध लावला. पुढें उत्तर अमेरिकेंत वसाहती करण्याचा इंग्रजांस अधिकार मिळाला, त्याचें मूळ ही मदतच होय. व्यापारास हेन्रीनें दिलेल्या सवलतीमुळें निर्गतीवरील व अयातीवरील जकातीपासून होणारें उत्पन्न पुष्कळ वाढलें व देश समृद्ध झाला. इतर देशांच्या राजघराण्याशीं लग्नसंबंध जोडून त्यानें परदरबारीं इंग्लंडचें वजन पुष्कळ वाढविलें. त्यानें आपली मुलगी मार्गरेट हिचा स्काटलंडचा राजा चौथा जेम्स याशीं विवाह लावून दिला ( १५९२ ). व स्पेनच्या राजाची मुलगी क्याथराइन हिचा आपला वडील मुलगा आर्थर याशीं विवाह लावून तीस त्यानें आपली सून करून घेतलें ( १५०१ ). पण आर्थर लवकरच वारला ( १५०२ ). तेव्हां स्पेनशीं सख्य कायम ठेवण्याच्या हेतूनें आपला धाकटा मुलगा हेन्री—हाच पुढें आठवा हेन्री झाला—याशीं त्याच्या विधवा झालेल्या भावजयीचें लग्न लावून दिलें. त्यास धर्माची हरकत होती. परंतु पोपकडून खास परवानगी आणून हें लग्न हेन्रीनें घडवून आणिलें. हेन्री १५०९ मध्यें क्षयाची भावना होऊन मरण पावला. तो शूर, कर्तृत्ववान् पण लोभी होता. हेन्री राज्यावर बसला तेव्हां सरकार दुर्बल असून जिकडे तिकडे अंदाधुंदी होती, तो सर्व प्रकार मोडून त्यानें जोरदार व संपत्तिमान् राजसत्तेची इंग्लंडांत स्थापना केली; व त्यामुळें लवकरच देशांत शांतता नांदूं लागली आणि इंग्लिश लोकांस ‘ नवीन मनूंतील ’ आपली कामगिरी बजाविण्याची सुसंधी प्राप्त झाली.

# १६ वूल्सेची कर्तबगारी.

१ **आठवा हेन्री**—सातव्या हेन्रीच्या मागून त्याचा मुलगा आठवा हेन्री हा गादीवर बसला ( १५०९ ). तेव्हां तो अठरा वर्षांचा असून स्वरूपानें देखणा, मनाचा मोकळा, दिलदार आणि हौशी असल्यामुळें तात्काळ लोकप्रिय झाला. त्याच्या कंजूष बापानें चोवीस वर्षांच्या काटकसरीनें जमविलेली सर्व पुंजी त्यानें दोन वर्षांतच नाच, रंग, तमाशे, लष्करी खेळ इत्यादींत उडवून टाकिली.

२ **वूल्सेचा उत्कर्ष**—आठवा हेन्री गादीवर आल्यापासून थॉमस वूल्से नांवाचा एक धर्माधिकारी त्याचा सल्लागार होता. वूल्से हा एका खाटकाचा मुलगा असून त्याचा जन्म १४७१ त झाला. त्याची बुद्धि तीव्र व स्वभाव अत्यंत महत्त्वाकांक्षी होता. तो वयाच्या चौदाव्या वर्षी ऑक्सफर्ड विद्यालयाचा पदवीधर झाला. सातव्या हेन्रीनें त्याची तरतरी पाहून त्याला लिंकन परगण्याचा धर्माधिकारी नेमिलें. त्याची बुद्धिमत्ता आठव्या हेन्रीच्या नजरेस आल्यावरून त्यानें त्याला आपल्या मंत्रिमंडळांत घेतलें. १५१४ त तो मुख्य मंत्रि झाला. पोप दहावा लिओ यानें त्याला कार्डिनल[१] पदवी दिली आणि नंतर लवकरच त्याला आपला प्रतिनिधि ( पेपल लेगेट ) नेमिलें; यापुढें तर खुद्द पोपची गादी आपल्याला मिळेल अशी त्याला आशा होती व त्यासाठीं तो एकसारखा खटपटही करीत होता. इतक्या झपाट्यानें वूल्से योग्यतेस चढला, त्यामुळें त्याचा स्वभाव अरेरावी बनला. हाताखालच्या लोकांना उद्दामपणानें वागविण्याची हाव त्याला वाटूं लागली, व आपल्या ऐश्वर्याच्या दिमाखानें लोकांचे डोळे दिपवून टाकण्यांत तो धन्यता मानूं लागला. तो हलक्या

---

१ धर्मखात्यांतही मोठया मानाची पदवी असून कार्डिनलांच्या संघास पोपची निवडणूक करण्याचा अधिकार असतो.

कुळांत जन्मलेला असून मोठ्या सरदारांसही त्याच्यापुढें हांजी हांजी करण्याचा प्रसंग आला. त्यामुळें सरदारांचा त्याच्यावर दांत असून ते त्याच्या नाशास अगदीं टपून बसले होते. तो विद्येचा मोठा भोक्ता असल्यामुळें विद्वानांना उदार आश्रय देत असे, आणि गरीब पण होत्करू विद्यार्थ्यांस तर त्याच्यापासून कधींच विन्मुख जावें लागलें नाहीं. शिवाय न्यायाच्या कामांत तो कडक व निःपक्षपाती होता.

**३ परराष्ट्रीय धोरण**—त्या काळीं इटलींत पांच स्वतंत्र राज्यें नांदत असून त्या देशांतील एकराष्ट्रीयत्वाची भावना लुप्तप्राय झाली होती. जर्मन बादशहाही दुर्बल झाले होते व त्यांच्यांतही त्या देशाचें परकीय स्वाऱ्यांपासून रक्षण करण्याचें सामर्थ्य उरलें नव्हतें. अशा वेळीं स्पेन व फ्रान्स येथील राजे महत्त्वाकांक्षी असल्यामुळें इटलींत मुलूख जिंकण्याची चढाओढ त्यांजमध्यें लागणें स्वाभाविक होतें. स्पेनचा राजा फर्डिनंड यानें पोप व बादशहा यांस आपल्या बाजूस वळवून घेऊन फ्रान्सविरुद्ध 'पवित्र संघ' स्थापिला. फ्रान्सविरुद्ध युद्ध करावयाचें हें इंग्लंडचें मामुली धोरण बनलें होतें. त्यास अनुसरून व आपल्या सासऱ्यास मदत करण्यासाठीं म्हणून हेन्रीनें १५१२–१३ त फ्रान्सवर मोठ्या खर्चाच्या पण निष्फळ स्वाऱ्या केल्या. फ्रान्सशीं गिनीगेट ( १५१३ ) येथें लढाई करण्यांत हेन्री गुंतला आहे असें पाहून नेहमींप्रमाणें स्कॉटिश लोकांनीं इंग्लंडवर चाल केली. पण फ्लॉडन फील्ड येथें लढाई होऊन स्कॉटलंडचा राजा, आठव्या हेन्रीचा मेहुणा चौथा जेम्स हा तींत मारला गेला. या लढायांकरितां सैन्य व पैसा यांची उभारणी करण्यांत वूल्सेनें आपलें बुद्धिसर्वस्व खर्च केलें. तथापि या युद्धांतील हेन्रीचें धोरण त्यास पसंत नव्हतें. फ्रान्समध्यें मुलूख जिंकण्याचें जुनें धोरण सोडून युरोपांत जीं फ्रान्स, स्पेन व इतर राष्ट्रें होतीं तीं जेणेंकरून इंग्लंडच्या दब्दास मान देऊं लागतील असें परराष्ट्रीय धोरण इंग्लंडनें स्वीकारिलें पाहिजे असें त्याचें मत होतें. स्पेनचा बादशहा व पोप हे ज्या अर्थीं एक होऊन फ्रान्सशीं भांडत आहेत त्या अर्थीं इंग्लंडनें फ्रान्सचीच कड [illegible]नली पाहिजे, म्हणजे इंग्लंडची युरोपांत

प्रतिष्ठा वाढेल असें तो म्हणत होता. गिनीगेटच्या लढाईनंतर आपला सासरा आपली कांहींच फिकीर करीत नाहीं हें हेन्रीस प्रत्यक्ष दिसून आलें व त्यानें वूल्सेचें फ्रान्सशीं सख्य करण्याचें धोरण उचलून धरलें. ( १५१४ ). फ्रान्सशीं सख्य बळकट व्हावें म्हणून वूल्सेनें फ्रान्सचा राजा बारावा लुई–तो बावन वर्षांचा होता तरी–याशीं हेन्रीची सतरा वर्षांची धाकटी बहीण मेरी हिचा विवाह घडवून आणिला. वूल्सेनें इंग्लंडच्या परराष्ट्रीय धोरणांत ही जी क्रांति घडवून आणिली तीवरून त्याचा धूर्तपणा व मुत्सद्दीगिरी हीं स्पष्टपणें दिसून येतात. आतां परदरबारीं इंग्लंड कोणती बाजू घेणार हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा होऊन बसला व इंग्लंडचें साहाय्य संपादन करण्यासाठीं फ्रान्स व स्पेन यांची एकसारखी खटपट सुरू झाली. दुर्दैवानें विवाह झाल्यावर तीन महिन्यांनींच लुई वारला व त्याच्या मागून त्याचा पुतण्या ' पहिला फ्रान्सिस ' हा फ्रान्सचा राजा झाला ( १५१५ ). १५१६ त फर्डिनंड मृत्यु पावला व त्याचा नातू चार्लस हा स्पेनचा राजा झाला. १५१९ त मॅक्झिमिलिअन हा जर्मन बादशहा वारला, व बादशाही पदावर स्पेनचा राजा चार्लस याचीच निवडणूक[1] झाली. फ्रान्सिस व चार्लस यांनीं मागील राजांचेंच

---

[1] जर्मनीच्या बादशहाची निवडणूक करण्याचा हक्क एकंदर सात जणांस होता. मेंझ, कोलन व ट्रायेर येथील धर्मगुरू हे तीन मतदार असून बोहिमिया, ब्रँडेनबर्ग, सॅक्सनी व पॅलॅटिनेट या संस्थानचे अधिपति हे आणखी चार मतदार होते. बादशहाची निवड झाल्यावर त्याला पोपकडून अभिषेक होई. बहुशः एका ठरीव घराण्यांतील पुरुषांचीच या जागीं निवडणूक होत असे. चार्लस हा पूर्वीचा बादशहा मॅक्झिमिलिअन याचा नातू ( मुलाचा मुलगा ) होता. हा स्पेनचा राजा व जर्मनीचा बादशहा या दोन्ही पदांवर आरूढ झाला व स्पेन, जर्मनी, बर्गंडी, नेदर्लंड्स व सिसिली हे युरोपांतील देश व स्पॅनिश अमेरिका इतका विस्तृत मुलूख त्याच्या ताब्यांत आला. बादशहा या नात्यानें पांचवा चार्लस ही पदवी त्यास असून स्पेनचा राजा या दृष्टीनें त्याचें पहिला चार्लस हें नांव होतें.

इटलीविषयक धोरण पुढें चालविलें.

**४ इंग्लंडच्या मदतीचें महत्त्व**—फ्रान्सिसनें गादीवर बसल्याबरोबर इटलीवर स्वारी केली व मिलन हा प्रांत जिंकला ( १५१५ ). त्यानें हेन्रीची आपल्यास मदत मिळावी या हेतूनें त्यास फ्रान्समध्यें पाचारण करून नेलें व त्याची मोठ्या थाटानें भेट घेतली (१५२०). या प्रसंगीं अतिशय थाट करण्यांत आला होता; त्यावरून हा प्रसंग 'सुवर्ण वस्त्र भूमि' ( Field of the Cloth of gold ) या नांवानें प्रसिद्ध आहे. पण या प्रसंगाचा हेन्रीच्या मनावर कायमचा ठसा उमटल्यासारखें दिसत नाहीं; या वेळीं फ्रान्सिसचा प्रतिपक्षी चार्लस हा होता. त्याचीही हेन्री आपल्या बाजूस मिळावा म्हणून फार खटपट होती. तेव्हां परराष्ट्रीय राजकारणांत इंग्लंडास सहज महत्त्व प्राप्त झालें. हेन्री इंग्लंडांत परत आल्यानंतर थोड्याच दिवसांनीं चार्लस यानें त्याची गांठ घेतली. हेन्रीची बायको क्याथराइन ही त्याची आत्या होती व शिवाय फ्लँडर्स या प्रांताशीं इंग्लंडचा लोंकरीचा व्यापार चालत असे. तो प्रांतही चार्लसच्याच ताब्यांत होता. तेव्हां या दोन कारणांचा जोर होऊन हेन्रीनें चार्लसची बाजू धरली. चार्लसला मदत करण्याकरितां १५२२ त हेन्रीनें फ्रान्सवर स्वारी केली. पैशाच्या टंचाईमुळें सैन्याचे हाल होऊं लागले; हेन्रीनें वूल्सेला पार्लमेंटकडून पैशाची मागणी करण्याकरितां पाठविलें. वूल्से फ्रान्सशीं चालविलेल्या युद्धास प्रतिकूल होता तरी त्यानें पार्लमेंटाकडून पैशांची मंजुरी घेतली व धनिकांकडून 'सक्तीच्या खुषीनें' देणग्या मिळविल्या. पण १५२५ सालीं जर्मनीचा बादशहा पांचवा चार्लस यानें फ्रान्सचा राजा फ्रान्सिस यावर पेव्हिया येथें मोठा जय संपादन केला. त्यामुळें चार्लसचें पारडें इतकें जड झालें कीं, हेन्रीनें त्याची बाजू सोडून त्यास डोईजड न होऊं देण्याकरितां फ्रान्सिसला मदत केली व त्यास चार्लसच्या कैदेंतून सोडविलें. युद्धांत पाण्यासारखा पैसा खर्च करूनही म्हणण्यासारखा लाभ कांहींच झाला नाहीं. युद्धाकरितां पैसे पुरविण्यासाठीं जबर कर बसल्या कारणानें वूल्सेच्या

धोरणाबद्दल लोकमत प्रतिकूळ झालें व सर्वांस वूल्से अगदीं नकोसा झाला. यापुढें तर हेन्रीचा स्वच्छंदीपणा वूल्सेस चांगलाच भोंवला.

**५ ॲन बुलीन**—स्पॅनिश राजकन्या क्याथराईन हिच्याशीं हेन्रीचें लग्न झाल्याचें मागें सांगितलेंच आहे. तेरा वर्षेंपर्यंत हें जोडपें सुखानें नांदलें. या काळांत त्यांना बरींच मुलें झालीं, पण मेरी नांवाच्या एका मुलीखेरीज सर्व मुलें लहानपणींच वारलीं. आपल्याला मुलगा नाहीं हें पाहून हेन्रीचें मन उदास झालें. इतक्यांत क्याथराईनही त्याच्या मनांतून कायमची उतरण्यास एक कारण घडून आलें. फ्रान्सांतून नुकतीच आलेली ॲन बुलीन नांवाची एक दासी क्याथराईनच्या सेवेंत राहिली. तिच्या सौंदर्यास हेन्री भुलला व त्यानें तिच्या नातलगांवर पदव्यांची व देणग्यांचीं खैरात करण्याचा सपाटा चालविला. पुढें चार वर्षांनीं ‘ माझें क्याथराईनशीं झालेलें लग्न कितपत सशास्त्र आहे याबद्दल मला संशयच आहे, आणि माझीं मुलें लहानपणीं मरतात यावरून तें देवासही सम्मत नाहीं असें दिसतें ’ अशा प्रकारचा युक्तिवाद आपल्या मंत्र्यांपुढें बोलून दाखविण्यास हेन्रीनें सुरवात केली. पुढें थोड्याच दिवसांनीं हें लग्न धर्मविरुद्ध असल्यानें रद्द आहे असें मान्य करण्याविषयीं त्यानें पोपला विनंति केली. ही लग्न रद्द करण्याची कल्पना वूल्सेला पहिल्यानें फारच आवडली. कारण आतां हेन्रीचा एकाद्या फ्रेंच राजकन्येशीं आपण विवाह घडवून आणूं व आपलें त्या दरबारीं बरेंच महत्त्व वाढेल असें त्यास वाटलें. परंतु हेन्री हा क्याथराईनशीं झालेलें लग्न धर्मदृष्ट्या बेकायदेशीर ठरवून ॲन बुलीनशींच लग्न लावणार असें जेव्हां त्याला कळलें तेव्हां मात्र त्याची पूर्ण निराशा झाली, व तो आठव्या हेन्रीच्या संकल्पाच्या उलट बोलूं लागला. पण हेन्रीच्या अत्यंत आग्रहावरून पोप सातवा क्लेमेंट याजकडून लग्न बेकायदेशीर असल्याचा ठराव करून घेण्याबद्दल तो अत्यंत झटूं लागला. परंतु पोपास स्पेनच्या राजासही नाखूष करणें बरोबर वाटत नव्हतें. म्हणून त्यास इकडे आड इकडे विहीर, असें झालें व तो मान्यता देण्याचें लांबणीवर टाकूं लागला.

६ **वूल्सेचा अंत**—अॅन बुलीनशीं व्हावयाचें लग्न लांबणीवर पडल्यामुळें हेन्री फार रागावला. पोपचें तो काय नुकसान करूं शकणार ? तेव्हां ‘ वड्याचें तेल वांग्यावर ’ या न्यायानें त्यानें वूल्सेसच शासन करण्याचें ठरविलें. राजाच्या सम्मतीखेरीज पोपचे हुकूम इंग्लंडांत आणणें बेकायदेशीर असें ठरविणारा ‘ प्रेम्युनायरचा कायदा ’ दुसऱ्या रिचर्डच्या कारकिर्दींत झाला होता. वूल्सेचें आजपर्यंतचें प्रत्येक कृत्य हेन्रीच्या सम्मतीनेंच चाललें होतें, तरी पोपचा प्रतिनिधि ( लेगेट ) बनून त्यानें हा कायदा मोडला असा हास्यास्पद आरोप त्याच्यावर लादण्यांत आला व त्याची सर्व मिळकत जप्त करण्यांत आली. चॅन्सेलरची जागा त्याच्याकडून काढून यॉर्कच्या आर्चबिशपच्या मूळच्या जागीं त्यास परत पाठविण्यांत आलें. येवढ्यावरच न थांबतां पुढें त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप लादण्यांत आला व त्याला लंडनला आणण्यासाठीं लोक गेले. ते त्याला पकडून आणीत असतां वाटेनें तो लीस्टर अॅबेस ( मठ ) पोंचला तेव्हां तो अतिशयच खंगला होता तेथेंच त्याचा दोन दिवसांनीं मोठ्या हृदयद्रावक रीतीनें अंत झाला. त्याचे शेवटचे उद्गार खालीं दिल्याप्रमाणें होते. “ मी या राजाची जितक्या दृढ निष्ठेनें सेवा केली तितक्या निष्ठेनें व तत्परतेनें मी जर ईश्वराची सेवा केली असती तर त्यानें माझ्या वृद्धापकाळीं मला अशा तऱ्हेनें अंतर दिलें नसतें ” ( १५३० ).

---

## १७ धर्मसुधारणा.

१ **अनुकूल परिस्थिति**—आठवा हेन्री गादीवर आला, त्यानंतर थोड्याच वर्षांनीं जर्मनींत धर्मसुधारणेची एक नवीनच चळवळ सुरू झाली. इतर देशांप्रमाणें इंग्लंडांतही ती पुढें चालू झाली, त्यामुळें तिच्या मूळ उत्पत्तीची हकीकत सांगणें जरूर आहे. ख्रिस्ती धर्म-

संस्थांची स्थिति समाधानकारक नसल्यानें ती सुधारण्याचे एक दोन प्रयत्न यापूर्वींच झाले होते. तेराव्या शतकांत फ्रान्समध्यें आल्बिजेन्सेस लोकांनीं, आणि पंधराव्या शतकांत इंग्लंडांत जॉन वुइक्लिफ व त्याचे अनुयायी ( लोलर्ड ) यांनीं, खिस्ती धर्माचें स्वरूप उज्ज्वल करण्याचा प्रयत्न केला. पण त्या वेळीं शिक्षणप्रसार फारच अल्प असल्यामुळें, या चळवळींस यश आलें नाहीं. आतां छापण्याची कला निघाल्यापासून बायबलचें अध्ययन सर्वत्र होऊं लागून सामान्य जनांना आपल्या धर्माचें ज्ञान होऊं लागलें. आणि धार्मिक बाबतींत पोप आणि त्याचे हस्तक यांचेकडून धर्मबाह्य आचरण कसें होतें हें त्यांस समजूं लागलें.

**२ मार्टिन ल्यूथर**—परंतु पोपचा अधिकारच झुगारून देणारा धर्मवीर अद्याप कोणी निपजला नव्हता. ही उणीव मार्टिन ल्यूथरनें भरून काढिली. ल्यूथर हा जर्मनींतील सॅक्सनी प्रांतांत विटेनबर्गच्या विश्वविद्यालयांत तत्त्वज्ञानाचा पंडित असून ऑगस्टिन पंथाचा अनुयायी होता. बायबल हाच खिस्ती धर्माचा प्रमाणभूत ग्रंथ असून, येशू खिस्तावर विश्वास ठेवून त्याच्या उपदेशाप्रमाणें वागण्यानेंच पापाचें निरसन होतें, इतर कशानें होत नाहीं; बायबल ज्याचें त्यानें वाचावें व आपलें तारण करून घ्यावें, त्यास धर्माधिकाऱ्यांच्या मदतीची जरूर नाहीं, अशीं त्याचीं ठाम मतें होतीं.

**३ पापमुक्ततेचे पास**—अकराव्या शतकांत खिस्ताची जन्मभूमि जरुसलेम तुर्कांचे ताब्यांतून सोडविण्याकरितां धर्मयुद्धें सुरू झालीं होतीं. त्या युद्धांना पैसा पुरविण्याकरितां, त्या वेळचा पोप दुसरा अर्बन यानें ‘ पापमुक्ततेचे पास ’ विकण्याची पद्धति पहिल्यानें सुरू केली होती. आतां ल्यूथरच्या वेळीं रोम येथें सेंट पीटरचें देऊळ बांधण्याचें काम चालू होतें. त्या कामास पैसा जमविण्यासाठीं पोप दहावा लिओ यानें असेच पापमुक्ततेचे पास विकण्यास काढिले. टेझेल नांवाचा जोगी कांहीं पास घेऊन ते विकावयास विटेनबर्ग येथें आला. मार्टिन ल्यूथरला ही चाल धर्मबाह्य वाटत होती. म्हणून त्यानें त्या पासांचा जाहीर रीतीनें निषेध

केला. तेव्हां जिकडे तिकडे खळबळ उडून गेली. आपलीं धर्ममतें लोकांस कळावीं म्हणून ल्यूथरनें त्यांची एक प्रत आपल्या देवालयाच्या दरवाजावर लाविली (१५१७) पोपची आज्ञा मोडिल्याबद्दल ल्यूथरला जाब विचारण्यांत आला. तेव्हां त्यानें 'बायबलची आज्ञा मला मान्य आहे, इतर कोणाची आज्ञा मला मान्य नाहीं,' असा खडखडीत जबाब दिला. त्यावर पोपनें ल्यूथरवर बहिष्कार घातल्याचें जाहीर केलें. पण ल्यूथर कांहीं तेवढ्यानें डगमगला नाहीं. त्यानें बहिष्कार-पत्राची एक प्रत उघड रीतीनें भर चव्हाट्यावर जाळून टाकिली.

**४ प्रॉटेस्टंट**—ल्यूथरच्या मतांचा प्रसार होण्याचें या बहिष्कारानें थांबलें नाहींच; तर अतीशय दाबांतून सुटलेल्या वाफेप्रमाणें त्याचीं मतें चोहोंकडे फार जोरानें फैलावूं लागलीं. हें पाहून पोपच्या अनुयायांनीं स्पायर्स[१] शहरीं एक धर्मसभा भरवून धार्मिक बाबतींत पोपच मुख्य असून पूर्वींचे आचार सर्व लोकांनीं पाळावे असें जाहीर केलें (१५२९). धर्मसभेच्या या ठरावाचा ल्यूथरच्या अनुयायांनीं निषेध केला म्हणून त्या वेळेपासून त्यांना प्रॉटेस्टंट (निषेध करणारे) म्हणूं लागले.

**५ धर्मसंरक्षक**—इंग्लंडचे राजे पूर्वींपासून धर्मसुधारणेच्या विरुद्ध होते. चौथ्या व पांचव्या हेन्रींनीं तर जॉन वुइक्लिफच्या अनुयायांस जिवंत जाळलें होतें. मार्टिन ल्यूथरनें पोपचें आज्ञापत्र जाळल्याचें जेव्हां आठव्या हेन्रीस कळलें तेव्हां त्यानें रोमन क्याथॉलिक धर्माच्या सात प्रमुख तत्त्वांच्या मंडनार्थ लॅटिन भाषेंत एक चोपडें लिहिलें[१] व पोपला नजर केलें. या कामगिरीबद्दल पोपनें त्याला धर्मसंरक्षक ( Defender

---

१ बव्हेरियामध्यें ऱ्हाइनच्या कांठीं आहे.

१ आठवा हेन्री हा सातव्या हेन्रीचा दुसरा मुलगा होता. तेव्हां त्याला राजपद मिळण्याचा फारसा संभव नसल्यामुळें लहानपणीं त्याला धर्मविषयक शिक्षण देण्यांत आलें होतें व धर्म-ज्ञानामध्यें तो चांगला तरबेज झाला होता. या ज्ञानसंपादनामुळेंच त्याला पोपचें मंडन करणारें वरील चोपडें लिहितां आलें.

of the Faith ) ही पदवी दिली. ती इंग्लंडच्या राजांच्या बिरुदावळींत अद्याप चालू आहे. पण ती पदवी पोपनें देतांना ज्या धर्मपंथाचे संरक्षक म्हणून ती दिली त्या पंथाचे संरक्षक इंग्लंडचे राजे राहिले नाहींत हें लक्षांत ठेविण्यासारखें आहे.

६ **पोपचा पाडाव**—अशा तऱ्हेनें हेन्रीनें पोपची तळी उचलून धरली खरी; परंतु लवकरच पुढें मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें क्याथराइनशीं झालेलें लग्न रद्द ठरवावयाचें होतें, त्यास पोप परवानगी देईना म्हणून तो पोपवर अत्यंत रागावला; परंतु पोपची खोड कशी मोडावी हें एकदम त्यास न सुचल्यामुळें त्याच्यावरील राग त्यानें आपला एकनिष्ठ सेवक वूल्से याजवरच काढिला. इतक्यांत केंब्रिज येथील जीजस कॉलेजांतील एक पंडित क्रॅन्मर यानें या प्रकरणाचा निकाल युरोपांतील प्रमुख विश्वविद्यालयांतील पंडितांचीं मतें मागवून करावा असें सुचविलें. त्याप्रमाणें तीं मतें मागाविल्यावर ‘ भावजयीशीं विवाह करणें धर्मविरुद्ध असल्यामुळें क्याथराइनचा विवाहच रद्द समजावा ’ असें बहुमत असल्याचें दिसून आलें. या निकालानें क्रॅन्मरचें नशीब फळफळलें. तो लगेच क्यान्टरबरीचा आर्चबिशप झाला ( १५३१ ). इंग्लंडांतील सर्व धर्मखात्याचा मुख्य राजाच आहे असें जाहीर करून पोपच्या सत्तेवर मुळांतच घाव घालावा अशी सूचना थॉमस क्रॉम्वेल नांवाच्या एका गृहस्थानें केली. ती हेन्रीस पटली. इंग्लंडमध्यें बिशप व आर्चबिशप यांच्या नेमणुका होतांच त्यांना आपल्या जागेचें पहिल्या वर्षाचें उत्पन्न पोपला द्यावें लागत असे; तें त्यांनीं इतःपर पोपास देऊं नये व पोपचे कोणतेही हुकूम ऐकूं नयेत असा पार्लमेंटनें कायदा केला( १५३२ ),व राजा हाच धर्मखात्याचा मुख्य आहे अशी हेन्रीनें धर्माधिकाऱ्यांकडून कबुली घेतली. १५३३ त क्रॅन्मरनें हेन्रीचा क्याथराइनशीं झालेला विवाह रद्द आहे असा ठराव केला. आणि नंतर ॲन बुलीनशीं हेन्रीचा विवाह झाला. पोपला ही हकीकत कळतांच त्यानें हेन्रीवर बहिष्कार घातला. पण हेन्रीनें त्याला मुळींच जुमानलें नाहीं. आपल्या राजावर बहिष्कार घातला हें पाहून

इंग्रजांस संताप आला व पार्लमेंटनें सर्व धर्मबाबतींत राजाच धर्माचा मुख्य आहे असें ठरविलें ( १५३४ ). अशा तऱ्हेनें धर्मसुधारणेच्या उलट असलेला व पोपचा कट्टा भक्त असलेला हेन्री व्यावहारिक बाबतींत पोप आड येतांच त्याची सत्ता पार झुगारून देऊन आपणच धर्मखात्याचा मुख्य झाला व पोपविरुद्ध ल्यूथरादिकांनीं चालविलेल्या धर्मसुधारणेच्या चळवळीस त्यानें अप्रत्यक्ष उत्तेजन दिलें.

---

## १८ आठव्या हेन्रीची दडपशाही

**१ बायबलाचें भाषांतर**—मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें रोमच्या पोपची इंग्लंडांतील सत्ता संपुष्टांत येऊन इंग्लंडचा राजाच इंग्लंडचा पोप बनला. तेव्हां ओघानेंच धर्मसंस्थांवर देखरेख करण्याचें काम व त्यांस वळण लावून देण्याचें काम त्याजकडे आलें. बायबल हा ग्रंथ केवळ धर्माधिकाऱ्यांनींच वाचावयाचा व सामान्य जनांनीं त्यांच्या तोंडून त्याचें स्पष्टीकरण ऐकावयाचें अशी आजपर्यंत वहिवाट होती. परंतु धर्म सुधारणेच्या चळवळीपासून प्रत्येक मनुष्यानें बायबल वाचून व त्याप्रमाणें शुद्ध आचरण ठेवून मोक्ष मिळवावा, अशा तऱ्हेचीं मतें प्रचलित होऊं लागलीं. त्यामुळें बायबलाचें इंग्रजींत भाषांतर होणें अवश्य होतें. अशा तऱ्हेचा प्रयत्न माइल्स कॉव्हरडेल यानें केला होता ( १५२६ ). हेन्री स्वतःच पोप बनल्यावर इंग्रजी बायबलाचा प्रसार करणें योग्य आहे असें त्यास वाटलें. इंग्रजींत भाषांतर केलेली बायबलची प्रत १५३६ त स्वित्झर्लंडांतून इंग्लंडांत आली होती. तिच्यावरून सुधारून एक प्रमाणभूत अशी प्रत तयार करण्याकरितां क्यान्टरबरीचा आर्चबिशप क्रॅन्मर व इतर कांहीं बिशप ( धर्माधिकारी ) यांस नेमण्यांत आलें. १५३७ त प्रत्येक गांवच्या देवळांत त्यांनीं तयार केलेलें इंग्रजी बायबल ठेविण्यांत आलें.

२ मठजप्ती— इंग्लंडांत जे मठ होते त्यांतील जोगी व जोगिणी यांची पोपबद्दल फार आदरबुद्धि होती. त्यामुळें पोपची इंग्लंडांतील सत्ता नाहींशी झाली हें त्यांस रुचणें शक्य नव्हतें. तेव्हां मठांचा नाश करून पोपला अनुकूल अशा इंग्लंडांतील या वर्गाचा आधारच काढून टाकावा असें हेन्रीनें ठरविलें. मठ, विद्यालयें व धर्मसंस्था यांच्या त्या वेळच्या स्थितीसंबंधीं रिपोर्ट करण्यासाठीं क्रॉम्वेलच्या अध्यक्षत्वाखालीं एक कमिशन पहिल्यानें नेमण्यांत आलें. मठ हीं अनीतीचीं माहेरघरें बनलीं आहेत, असा या कमिशननें रिपोर्ट केला. या रिपोर्टाच्या आधारावर पार्लमेंटनें मठजप्तीचे कायदे पास केले. व सन १५३६ त लहान लहान मठांच्या व १५३९ त मोठया मठांच्या जिंदगीची जप्ती झाली. त्यांच्या जप्त केलेल्या जमिनीच्या उत्पन्नांतून राजानें धर्माधिकाऱ्यांच्या सहा नवीन जागा निर्माण केल्या. केंब्रिज येथें एक व ऑक्सफर्ड येथें एक अशीं दोन नवीं विद्यालयें स्थापिलीं. कांहीं ठिकाणीं शाळा, दवाखाने व धर्मसभा स्थापन केल्या. ज्या मठवाशांचीं उत्पन्नें जप्त केलीं होतीं त्यांना तहाहयात नेमणुका करून दिल्या. बाकीच्या सर्व उत्पन्नांतून नवीन सरदारवर्ग निर्माण केला. पुढें प्रसिद्धीस आलेलीं डइले सीमूर, सेसील इत्यादि घराणीं यांपैकींच होत. ही मठांची जमीन ज्या लोकांच्या हातीं आली, ते पोपचे अनुयायी बनणें अशक्य होतें. थोडयाच वर्षांत सुमारें ४०००० लोकांचे हितसंबंध या जमिनींत गुंतले व धर्मसुधारणेचीं मुळें इंग्लंडांत कायमचीं रुजण्यास त्यांचा फार उपयोग झाला.

३ बंडें—हेन्रीच्या या कृत्यामुळें देशांतील लोक नाखूष झाले. कांहीं लोकांस असें वाटलें कीं, मठजप्तीनंतर ही विध्वंसाची मोहीम देवळांवर होणार व आपल्या धर्माचें मूळच उपटलें जाणार. मठविध्वंसामुळें ज्यांच्या पोटावर पाय आला ते लोक असंतुष्ट होऊन बंडास प्रवृत्त झाले. केंट परगण्यांत एलिझबेथ बार्टन नांवाच्या एका स्त्रीनें बंड उभारिलें, पण तें तत्काळ मोडण्यांत आलें. लिंकन येथेंही बंडावा उत्पन्न झाला पण तोही

फार वेळ टिकला नाहीं. यॉर्क परगण्यांत एक मोठें बंड उद्भवलें, त्यांत चाळीस हजार लोक सामील झाले. त्यांनीं यॉर्क, हल वगैरे शहरें काबीज केलीं. यॉर्कचा धर्माधिकारी व कित्येक सरदार बंडवाल्यांस मिळाले. राजाच्या दुष्ट मंत्र्यांस घालवून द्यावयाचें, पोपच्या अधिकाराची पुनः स्थापना करावयाची, व पाखंडमताचें बीं अजीबात नाहींसें करावयाचें, या उद्देशानें बंडवाले लंडनवर येऊं लागले. अग्रभागीं क्रॉस घेऊन धर्मगुरु चालत होते म्हणून या बंडाला 'धार्मिक यात्रा' म्हणतात. बंडवाल्या लोकांस खोटीं आश्वासनें दिल्यामुळें लोक परत गेले व पुढें बंडांतील पुढारी लोकांस धरून फांशीं देण्यांत आलें. तेव्हां या बंडाचा मोड झाला ( १५३७ ).

**४ कृतांताचा कायदा**—खुद्द हेन्रीलासुद्धां पोपची सत्ता झुगारून देणें या एका बाबीखेरीज प्रॉटेस्टंट पंथाची इतर कोणतीही बाब मान्य नव्हतीच. तेव्हां या बंडाचें निमित्त करून त्यानें प्रॉटेस्टंट धर्माच्या विरुद्ध असलेल्या तत्त्वांची अंमलबजावणी करण्याचें ठरविलें. त्यानें खेड्यापाड्यांतील देवळांतून इंग्रजी बायबलच्या प्रती काढून घेऊन केवळ शहरांत मात्र ठेवाव्या असा हुकूम सोडिला. प्रॉटेस्टंट पंथाचा देशांत प्रसार होत होता तो थांबविण्याकरतां पार्लमेंटकडून एक कायदा करविण्यांत आला. या कायद्यानें प्रत्येक धर्मानुयायानें पुढील तत्त्वें मान्य केलींच पाहिजेत असें ठरविलें. १ खिस्त भोजनाचे वेळीं जीं भाकर व द्राक्षासव अभिमंत्रित करून सर्वांना वांटण्यांत येतात तीं बदलून अनुक्रमें येशू खिस्ताचें प्रत्यक्ष मांस व रक्त बनतात. २ खिस्त भोजनाचे वेळीं धर्माधिकाऱ्यांची आवश्यकता. ३ धर्मोपदेशकांना लग्न करण्याची बंदी. ४ कोणाही मठवाशानें एकदां ब्रह्मचारी रहाण्याची शपथ घेतली कीं ती पाळलीच पाहिजे. ५ मृताच्या आत्म्याच्या शांतीकरितां कोणालाही खाजगी प्रार्थना करण्याची मुभा. ६ धर्मोपदेशकाचे कानांत पापोच्चारण करून प्रायश्चित करण्याची वहिवाट चालू ठेवावयाची. या सहा तत्त्वांपैकीं पहिलें तत्त्व अमान्य करणारास जिवंत

जाळण्याची शिक्षा असून बाकीचीं पांच नाकबूल केल्यास पहिल्या अपराधाबद्दल जिंदगीची जप्ती व दुसऱ्या अपराधाबद्दल देहांत प्रायश्चित्त अशा शिक्षा ठरविल्या. या भयंकर शिक्षांमुळें या कायद्यास कृतांताचा कायदा ( Bloody Statute ) असें नांव मिळालें.

**५ अनियंत्रित अधिकार**—याच वेळीं राजानें काढिलेल्या वट हुकुमास पार्लमेंटच्या कायद्याप्रमाणें मान द्यावा असा कायदा पार्लमेंटनें केला ( १५३९ ). त्यामुळें पार्लमेंट हें एक राजाच्या हातांतील खेळणें आहे अशा स्वरूपाला पोंचलें व राजा सूत्रचालक बनला. निवडक सरकारी वडे अधिकारी एके ठिकाणीं जमत व राजाच्या धोरणाचा गुप्त रीतीनें खल करीत, आणि त्यांच्या निर्णयावर राज्यकारभार चाले. त्यामुळें पार्लमेंटला कांहींच काम राहिलें नाहीं. या अधिकारी वर्गालाच ' प्रिव्ही कौंसिल[१] ' म्हणत.

---

१ नॉर्मन राजांचे वेळीं क्यूरिया रेजिस नांवाचें राजाचें एक सल्लागारमंडळ असे, तेंच प्रिव्ही कौंसिलचें मूळ असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या वेळीं कायदे करणें, त्यांचा अंमल करणें व न्याय देणें या सर्व बाबींत राजे या मंडळाचा सल्ला घेत. परंतु दुसरा हेन्री व पहिला एडवर्ड यांनीं न्यायाचीं मंदिरें स्थापिलीं, त्यामुळें न्यायाचें काम या मंडळाकडून बरेंचसें गेलें. त्याचप्रमाणें वसूल व खजिना यांची व्यवस्था पाहणारा ट्रेझरर निर्माण होऊन या कामाची फारकत झाली. त्याचप्रमाणें पार्लमेंट निर्माण झाल्यानंतर कांहीं काळपर्यंत लोकसभेनें अर्ज करावेत व मग या प्रिव्ही कौंसिलची त्यांजवर वाटाघाट होऊन त्याला कायद्याचें स्वरूप यावें असें चाललें होतें. लोकसभेस ही ढवळाढवळ रुचली नाहीं व ही पद्धति बंद पडली व तेव्हांपासून कायदे करण्याच्या कामीं या कौंसिलची सत्ता संपुष्टांत आली. ट्यूडर राजांनीं मात्र पार्लमेंटला धुडकावल्यामुळें त्यांच्या वेळीं प्रिव्ही कौंसिलची सत्ता बरीच वाढली होती. आतां अंमलबजावणी संबंधांत या कौन्सिलचा उपयोग करण्याचा प्रयत्न दुसऱ्या चार्लसच्या वेळीं डॅन्बी हा प्रधान कामावरून

**६ वेल्स व आयर्लंड**—हेन्रीच्या अनियंत्रित सत्तेस इंग्लंडचें क्षेत्र न पुरल्यामुळें त्यानें वेल्स व आयर्लंड यांनाही आपल्या चांगलेंच कबजांत आणिलें. वेल्स प्रांतांतील जुनी पद्धति मोडून त्याचे परगणे पाडिले व इंग्लंडचे कायदे त्यांना लागू केले. इंग्रज पार्लमेंटास सभासद पाठविण्याचाही त्यांना अधिकार दिला (१५३६). आयर्लंडमध्यें प्रत्यक्ष इंग्रजांच्या अंमलाखालच्या मुलुखांत आपली पूर्ण सत्ता स्थापण्याचा हेन्रीनें प्रयत्न केला. त्यावरून तेथें बंड झालें. बंडाच्या सबबीवर बहुतेक आयर्लंड बेट हेन्रीनें जिंकून टाकिलें. जिंकलेल्या प्रांतांचे निरनिराळे

---

निघाल्यानंतर करण्यांत आला. तो यशस्वी झाला नाहीं, व पुढें प्रधान-मंडळाची पद्धति कायम झाली, आणि सर्व अंमलबजावणीचें काम त्याच्या हातीं गेलें. हल्लीं प्रधानमंडळ ही एक प्रिव्ही कौंसिलची कमिटीच मानण्यांत येते व त्या दृष्टीनें अजूनही अंमलबजावणीची सत्ता प्रिव्ही कौंसिलच्या हातीं आहे असें वाटल्यास म्हणावें ! शिवाय व्यापार नियामक मंडळ Board of trade, शिक्षामंडळ Education committee, स्थानिकस्वराज्य मंडळ Local Government Board, याही व्यवहारतः प्रिव्ही कौंसिलच्या कमिट्याच असतात. परंतु या कौंसिलकडे मुख्यतः न्यायखात्यांतील अपिलांचा निकाल करावयाचा हेंच मुख्य काम असून हिंदुस्थान, वसाहती, चॅनल आयलंड्स व आइल ऑफ मॅन यांतून आलेल्या खटल्यांत ही सत्ता बजाविण्यांत येते. हें काम या कौंसिलच्या ज्युडीशियल कमिटीकडे असून हिंदुस्थान, वसाहती व ग्रेट ब्रिटन यांतील न्यायखात्यांत नाणावलेल्या लोकांचा तींत अंतर्भाव होतो व या कमिटींतील सर्व सभासदांस सालीना चारशें पौंड पगारही देण्यांत येतो. खुद्द प्रिव्ही कौंसिलकडे आतां विवक्षित कार्य राहिलें नसून त्यांत सुमारें तीनशें सभासद असतात. त्याची सभा नवीन राजा गादीवर आला असतां अगर एकादा पोषाखी प्रसंग साजरा करावयाचा असतां भरते. अमीर अल्ली या गृहस्थास प्रिव्ही कौंसिलचे पहिले हिंदी सभासद होण्याचा मान मिळाला.

भाग करून प्रत्येक भागावर आपल्या मर्जींतील एक एक अर्ल( सरदार) हेन्रीनें नेमून टाकिला व इंग्रजी भाषा व धर्म इतकेंच नव्हे तर इंग्रजी पेहरावसुद्धां तेथील मूळच्या लोकांवर कायद्यानें लादण्यांत आला (१५४२).

**७ लग्नें**— ॲन बुलीन हिजशीं हेन्रीनें मोठ्या उत्साहानें लग्न लाविलें व तिजपासून त्याला एलिझबेथ नांवाची मुलगी झाली. पण ॲन बुलीनवरही राजाचें प्रेम फार दिवस टिकलें नाहीं. त्यानें पातिव्रत्यभंगाच्या आरोपावरून ॲनला फांशीं दिलें; आणि दुसरेच दिवशीं जेन सीमूर या स्त्रीशीं लग्न लाविलें. तिला एडवर्ड हा मुलगा झाला, व पुढें ती वारली. यापुढेंही हेन्रीनें आणखी तीन लग्नें केलीं. परंतु ऐतिहासिकदृष्ट्या तीं महत्त्वाचीं नाहींत. आपल्या कारकिर्दीच्या शेवटीं जेन सीमूरपासून झालेला मुलगा एडवर्ड याचें, स्कॉटलंडचा मृत राजा पांचवा जेम्स याची मुलगी व स्कॉटलंडच्या राज्याची वारस मेरी स्टुअर्ट हिजशीं लग्न करून, दोन्ही देशांत सख्य करण्याचा हेन्रीचा विचार होता. पण स्कॉटलंडमधील सत्ताधारी क्याथॉलिक पक्षास हें रुचलें नाहीं. व त्यांनीं तिचा फ्रेंच राजपुत्राशीं विवाह लाविण्याचें ठरविलें.

**८ गरिबांचे हाल**—आठवा हेन्री हा शोकी असून आपल्या लहरीप्रमाणें सर्व कांहीं झालें पाहिजे असा त्याचा हेका असे. स्त्रिया, मंत्री व खुद्द पार्लमेंट या सर्वांस त्याच्या लहरी स्वभावापासून अत्यंत त्रास झाला. मठ–विध्वंसापासून पुष्कळ द्रव्य त्याचे हातीं आलें होतें; परंतु तें लवकरच संपलें. त्यानंतर द्रव्य मिळविण्याची त्यानें खाशी युक्ति काढिली. पूर्वीं रुप्याचीं नाणीं पाडतांना बारा औंस रुप्यास पाऊण औंस हिणकस मिसळावयाचें अशी रीत होती. ती बदलून हिणकसाचें प्रमाण खूप वाढवून त्यानें नाणीं तयार केलीं ( १५४३ ). त्यामुळें हेन्रीला लाभ झाला खरा, पण पदार्थांच्या किंमती भयंकर वाढल्या व त्यामुळें गरिबांचे अत्यंत हाल झाले ! आठवा हेन्री १५४७ त मरण पावला. त्याच्या कारकिर्दींत इंग्लिश राष्ट्राचें वजन परदरबारीं चांगलें

बसलें व देशांतही त्यानें राजसत्ता आपल्या बापाप्रमाणें किंबहुना ज्यास्तच दृढमूल केली.

---

## १२ इंग्लंडांत प्रॉटेस्टंट मताचा स्वीकार.

**१ पिंकीची लढाई**—आठव्या हेन्रीनंतर त्याचा मुलगा एडवर्ड हा सहावा एडवर्ड ही पदवी घेऊन इंग्लंडच्या गादीवर आला. त्यावेळीं त्याचें वय अवघें दहा वर्षांचें होतें. एडवर्ड हा अल्पवयी असल्यामुळें राज्याचा अधिकार हेन्रीनें केलेल्या मृत्युपत्राप्रमाणें एका कारभारी मंडळाच्या हातीं देण्यांत आला होता. या मंडळाचा मुख्य एडवर्डचा मामा सॉमर्सेट हा होता. सॉमर्सेट प्रॉटेस्टंट मताचा पुरस्कर्ता होता. १५४३ त स्कॉटलंडशीं झालेल्या तहाअन्वयें स्कॉच राजकन्या मेरी हिचा विवाह एडवर्डशीं व्हावयास पाहिजे होता. परंतु स्कॉच लोकांना ही गोष्ट मान्य नव्हती. तेव्हां आपला हेतु तडीस नेण्याकरितां सॉमर्सेटनें स्कॉटलंडवर स्वारी केली. आणि पिंकी येथें स्कॉटिश लोकांचा पराजय केला. परंतु स्कॉटिश लोकांनीं राजकन्येला फ्रान्सांत पळवून नेऊन ठेविल्यामुळें युद्धांत जय झाला तरी सॉमर्सेटास युद्धाचा हेतु साध्य न होतां तसेंच इंग्लंडांत परत यावें लागलें. नंतर त्या राजकन्येचा विवाह फ्रान्सच्या राजपुत्राशीं झाला.

**२ नवीन धर्ममताची स्थापना**—सॉमर्सेटनें कॅन्टरबरीचा आर्चबिशप क्रॅन्मर याच्या सल्ल्यानें इंग्लंडांत प्रॉटेस्टंट मत कायदेशीर रीतीनें प्रस्थापित करण्याचा उद्योग आरंभिला. एक प्रार्थनापुस्तक तयार करण्यांत आलें व त्याचा उपयोग धर्माधिकाऱ्यांनीं केलाच पाहिजे, असा सक्त कायदा करण्यांत आला. हें प्रार्थनापुस्तक तयार करण्यांत तीन हेतु होते. ‘प्रार्थनेच्या वेळीं बायबल वाचण्याचा प्रचार ठेवून एकंदर

वर्षांत बायबलचा बराचसा भाग लोकांच्या कानावर घालावयाचा. २ प्रार्थना लॅटिन भाषेंत न चालवितां इंग्रजींत चालवावयाची व तेणेंकरून पोप-पासून झालेली फूट दृढ करावयाची. ३ भोळसर गोष्टी व रिकाम्या भाकडकथा यांना प्रार्थनेंतून अजीबात फांटा द्यावयाचा.' लोकांतील भोळेपणा घालविण्यासाठीं मूर्तींचा नाश करावा, इतकेंच नव्हे तर देव-ळांच्या खिडक्यांतील कांचेवर रंगविलेलीं संतांच्या अद्भुत चरित्रांचीं चित्रेंही पार नाहींतशीं करून टाकावीं असाही सरकारानें हुकूम सोडिला. धर्मगुरूंनीं ब्रह्मचारीच राहिलें पाहिजे असा क्याथॉलिक पंथाचा नियम होता; तो नियम काढून टाकून धर्मगुरूंस गृहस्थाश्रम स्वीकारण्याची परवानगी देण्यांत आली. क्रॉम्वेलनें धर्माचीं मुख्य तत्त्वें बेचाळीस कल-मांत ग्रथित केलीं होतीं, तीं धर्मसभेनें पसंत केलीं आणि १५५३ त 'धर्माचा पाया' म्हणून राजाकडून प्रसिद्ध करण्यांत आलीं, व अशा रीतीनें इंग्लंडच्या धर्मावर प्रॉटेस्टंट मताचा छाप कायमचा बसला. पुढें एलिझबेथच्या कारकिर्दींत या बेचाळिसांपैकीं तीन कलमें गाळण्यांत आलीं व तेव्हांपासून बाकीचीं ३९ कलमेंच धर्माचा पाया मान-ण्यांत येत आहेत.

**३ दोन पंथांमधील भेद**—प्रॉटेस्टंट व क्याथॉलिक या मतांमधील भेद पुढील दोन कारणांमुळें उत्पन्न झाला आहे. मनुष्याची पापापासून मुक्तता होऊन त्यास मोक्ष कसा मिळेल या प्रश्नास क्याथॉलिक मताचें उत्तर असें आहे कीं, पोप व त्याचे हाताखालचे धर्मगुरु यांच्या मध्यस्थी-शिवाय मनुष्यास मोक्ष मिळणें शक्य नाहीं. प्रॉटेस्टंट मत याच्या अगदीं उलट असून, मनुष्य बायबल स्वतंत्रपणें वाचून त्याप्रमाणें जर आचरण ठेवील तर त्यास हटकून मोक्ष मिळेल असें प्रॉटेस्टंटांचें म्हणणें आहे. प्रभुभोजनाचे वेळीं जीं द्राक्षासव व भाकरी वापरण्यांत येतात तीं अनुक्रमें ख्रिस्ताचें रक्त व मांस बनतात अशी क्याथॉलिकांची समजूत आहे; प्रभु-भोजनाचे वेळच्या अन्नासंबंधीं 'हें माझें शरीरच आहे, हें घ्या व खा' असा खुद्द ख्रिस्ताच्या तोंडचा बायबलांत उल्लेख आहे; त्याचा क्याथॉलिक लोक आपल्या मतास आधार सांगतात. प्रॉटेस्टंटांचें मत 'असा त्या अन्नांत

फरक होत नाहीं ' असें असून वरील वचनांत ख्रिस्तानें अलंकारिक भाषा वापरली आहे असें ते म्हणतात. अशा तऱ्हेनें क्याथॉलिक मताची भिस्त पोपवर तर प्रॉटेस्टंटांची भिस्त प्रत्येक मनुष्याच्या बुद्धीवर आहे. प्रॉटेस्टंट मत असें कीं, लोकांनीं स्वतः बायबल वाचावें, विचार करावा व मोक्ष मिळवावा. असें जरी असलें तरी पहिल्यानें पुष्कळ वर्षेंपर्यंत इंग्लिश धर्मखात्याचा पोपप्रमाणेंच लोकांच्या मनावर पगडा होता. आणि इंग्लिश प्रॉटेस्टंट धर्मखात्यानें धार्मिक आचार व विचार यांसंबंधीं नियम करावेत व त्यांची लोकांमध्यें अंमलबजावणी करावी असेंच चाललें होतें.

**४ देशांतील बंडाळी**—असा हा नवीन पंथ होता व तो बऱ्याच विचारी लोकांस पटला. परंतु खेडेगांवांतील ' अडाणी ' लोक ज्या धर्मपंथांत वाढले होते तीं मतें त्यांस एकदम कशीं सोडवणार ? हीं नवीन मतें पाहून ते तर अगदीं भांबावून गेले. मठविध्वंसामुळें पुष्कळ लोकांच्या पोटावर पाय आला होता, ते या नवीन मतांस अनुकूल असणें शक्य नव्हतें. यामुळें देशांत अस्वस्थता माजली. शिवाय ही अस्वस्थता वाढण्यास आणखीहीं कारणें होतीं. शेतांतील धान्यापेक्षां लोकरीला दर चांगला येतो असें पाहून कित्येक जमीनदारांनीं शेतांचीं मेंढ्या चारण्याकरितां कुरणें बनविलीं. त्यामुळें शेतांतील मजुरांची संख्या कमी होऊन बेकार लोक वाढत चालले. शेतांचीं कुरणें झाल्यामुळें व आपणास काम मिळत नाहीं अशी समजूत झाल्यामुळें शेतांभोंवतालचीं कुंपणें मोडावयाचीं, आणि पाखंड मत पसरल्यापासून आपणास हालअपेष्टा भोगाव्या लागतात तेव्हां तें पाखंड मत मोडून काढावयाचें, असा बेत करून लोक दंगे करूं लागले. नॉर्फोक येथील बंडाळी सर्वांत मोठ्या प्रमाणावर होती. सोळा हजार शेतकरी व मजूर यांनीं बंडाचें निशाण उभारिलें. त्यांचा पुढारी केट यानें आपलें एक न्यायकोर्ट भरवून त्यापुढें सावकार लोकांना खेंचून त्यांजवर गरीब लोकांस छळल्याचा आरोप ठेवून त्यांस शिक्षा ठोठावावयाची असा प्रकार राजरोसपणें सुरू केला. तेव्हां केटवर

सैन्याची रवानगी करण्यांत आली, आणि त्यास पकडून फांशीं देण्यांत आलें ( १५४९ ).

**५ कारभारांत बदल**—देशांतिल या बंडाळीचें खापर सॉमसेंटच्या माथीं फोडण्यांत आलें. तो प्रधानमंडळाचे सर्व अधिकार बळकावून एकटाच राज्यकारभार पहात असल्यामुळें प्रधानमंडळास त्याची उचलबांगडी करण्यास केव्हां संधि मिळते असें झालें होतेंच; इतक्यांत या बंडाळया माजल्या; तेव्हां या संधीचा वेळींच उपयोग करून त्यांनीं त्याला कामावरून दूर केलें व दरसाल त्यानें तीस हजार रुपये दंड द्यावा असें ठरविलें. पण राजानें त्याला दंडाची माफी केली. आतां सर्व सत्ता सॉमर्सेटचा प्रतिपक्षी नॉर्दंबर्लंड ( जॉन डड्ले ) याच्या हातांत गेली. सॉमर्सेटनें नॉर्दंबर्लंडच्या सत्तेस विरोध करण्याचा प्रयत्न केला. पण तो फसून सॉमर्सेटवरच राजद्रोहाचा आरोप ठेवण्यांत येऊन त्यास फांशीं देण्यांत आलें (१५५१).

**६ लेडी जेन ग्रे**—नॉर्दंबर्लंड हाच आतां प्रमुखपणें व निर्धास्तपणें राज्यकारभार पाहूं लागला. सहावा एडवर्ड जात्या अशक्त असे. तो फार दिवस वांचणार नाहीं व त्याच्या नंतर त्याची बहीण मेरी रोमन क्याथॉलिक होती ती गादीवर येणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां प्रॉटेस्टंट सूत्रधारांस काळजी पडली. नॉर्दंबर्लंडास तर केवळ धर्मपंथ बदलणार इतकेंच नसून आपल्या हातांतील राज्यसूत्रेंही जाणार असें वाटलें व अत्यंत चिंता पडली. परंतु आपल्या हातांतच राजामागें सत्ता ठेविण्याचा त्याला एक खासा उपाय सुचला. त्यानें सातव्या हेन्रीची नात जेन ग्रे हिचा आपल्या मुलाशीं विवाह केला, व तीच एडवर्डमागून गादीची वारस आहे असें त्यानें ठरविलें. तिला वारस ठरवितांना खालील तर्कशास्त्र लढविण्यांत आलें होतें. हेन्रीशीं झालेला क्याथराइनचा विवाह बेकायदेशीर असल्यामुळें मेरी ही कायदेशीर वारस होत नाहीं, आणि एलिझबेथची आई ॲन बुलीन हिजवर पातिव्रत्यभंगाचा आरोप आल्यामुळें तीही बेवारस ठरते. सबब लेडी जेन ग्रे हीच कायदेशीर वारस आहे. हा युक्तिवाद सहाव्या एडवर्डकडून मान्य करून

घेण्यांत आला. आणि या अर्थाचें मृत्युपत्र त्याजकडून करून घेऊन त्यावर नॉर्दंबर्लंडनें धाकदपटशा देऊन सरदारांच्या सह्या घेतल्या. आर्चबिशप क्रॅन्मर यानेंहि त्याजवर सही केली. यानंतर एडवर्डची प्रकृति बिघडली, व त्याचा अंतकाळ लवकरच ओढवला ( १५५३ ). नॉर्दंबर्लंडनें आपला हेतु साधण्याकरितां विषप्रयोग केला असेंही म्हणतात. एडवर्ड मरणसमयीं केवळ सोळा वर्षांचा होता. त्याच्या मागून लेडी जेन ग्रे हीस राणी करून राज्यसूत्रें आपल्याच हातीं ठेविण्यासाठीं नॉर्दंबर्लंड सज्ज होता.

---

## २० क्याथॉलिक मताची पुन्हा स्थापना.

**१ मेरीचें राज्यारोहण**——एडवर्डच्या मृत्यूनंतर नॉर्दंबर्लंडनें लेडी जेन ग्रे हिच्या नांवानें द्वाही फिरविली व मेरीस पकडण्यासाठीं सैन्य पाठविलें. पण मेरी सैन्याच्या हातीं न सांपडतां नॉर्फॉक येथें पळून गेली. लेडी जेन ग्रेच्या राज्यारोहणानें कोणासही आनंद वाटला नाहीं. मेरीस मात्र कांहीं सरदार लोक मिळाले, आणि ती लंडनवर चाल करून आली. लंडन तेव्हांच हस्तगत झालें. नॉर्दंबर्लंडास एकदम कैद करून फांशीं देण्यांत आलें. लेडी जेन ग्रेस नवऱ्यासह कैदेंत ठेविली आणि मेरीनें मोठ्या थाटानें राणी म्हणून लंडन शहरांत प्रवेश केला.

**२ क्याथॉलिक मताचा पुरस्कार**——मेरीचा ओढा आपल्या आईप्रमाणें क्याथॉलिक धर्माकडे होता. प्रॉटेस्टंट लोकांच्या मतानें क्याथराइनचें आठव्या हेन्रीशीं झालेलें लग्नच रद्द ठरून मेरी बेवारस ठरत होती. तेव्हां त्या पंथाचीं मतें मेरीस मान्य नव्हतीं हें उघड आहे. राज्यावर येतांच प्रॉटेस्टंट पंथ हाणून पाडून क्याथॉलिक पंथ प्रचलित करण्यास तिनें सुरवात केली. प्रॉटेस्टंट धर्मगुरु क्रॅन्मर, रिड्ले, लॅटिमर यांस कैदेंत

टाकून गार्डिनर, बॉनर इत्यादि क्याथॉलिक धर्मगुरूंस कामावर नेमण्यांत आलें. एडवर्डच्या वेळीं तयार झालेलें धर्मपुस्तक वाचण्याची बंदी करण्यांत येऊन लॅटिन भाषेंत पूर्ववत् प्रार्थना चालविण्यांत येऊं लागल्या. पार्लमेंटनें क्याथराइनचा आठव्या हेन्रीशीं झालेला विवाह धर्मास धरून होता असें ठरविलें; त्यानंतर एडवर्डच्या कारकिर्दींत झालेले सर्व धर्मविषयक कायदे रद्द आहेत असें त्या सभेनें ठरविलें.

**३ फिलिपशीं विवाह**——इ. स. १५५४ त स्पेनचा राजा पांचवा चार्लस यानें आपला मुलगा फिलिप याशीं लग्न करण्याबद्दल मेरीचें मन वळविलें. स्पेनचा राजा बलाढ्य असून क्याथॉलिक पंथाचा कट्टा अभिमानी होता. तेव्हां इंग्लंडचा अशा रीतीनें स्पेनशीं संबंध जडल्यास इंग्लंड स्पेनचा एक सुभा होऊन स्पॅनिश धर्मखात्याचे जुलमी प्रकार इंग्लंडांत सुरू होतील अशी इंग्लिशांस भीति होती; शिवाय राजपुत्र फिलिप हा मेरीचा जवळचा नातलग असून तिच्यापेक्षां वयानें अकरा वर्षांनीं लहान होता. यास्तव तो बेत रहित करण्याबद्दल मेरीस सर्व लोकांनीं अर्जद्वारें विनंति केली. परंतु त्याकडे दुर्लक्ष करून मेरीनें फिलिपशीं विवाह करण्याचा निश्चय कायम ठेविला. सामोपचारानें काम होईना, तेव्हां लोकांची मनें निराशेनें खवळून जाऊन बंडें उद्भवलीं. पण त्यांचा लवकरच मोड झाला. या बंडांचें प्रायश्चित्त लेडी जेन ग्रे, तिचा नवरा व बाप या सर्वांस भोगावें लागलें व त्या सर्वांचा शिरच्छेद करण्यांत आला. राजकन्या एलिझबेथ हिजवरही घोरपड आली होती. परंतु तिचें दैव बलवत्तर असल्यामुळें तिचा जीव बचावला; तथापि तिला वुडस्टॉक येथें कैदेंत ठेविण्यांत आलें. याप्रमाणें बंडाचा बींमोड झाल्यावर मेरीचा फिलिपशीं विवाह झाला ( १५५४ ). पार्लमेंटानें विवाहास अनुमती दिली; इतकेंच नव्हे तर राजपुत्र फिलिप यास 'राजा' हा किताबही सादर केला.

**४ पुनः पोप**——विवाह झाल्यावर पोपशीं समेट करण्याचें काम उरकून टाकण्याचें ठरलें. या नव्या बेतास अनुकूल असें पार्लमेंट बनविण्यांत आलें. कार्डिनल पोल नांवाच्या इंग्रजास पोपनें आपला प्रति-

निधि ( पेपल लेगेट ) नेमिलें. पार्लमेंटच्या सर्व सभासदांनीं गुडघे टेंकून प्रार्थना केल्यावर पोलनें 'तुमच्या पापांचें क्षालन झालें' असा त्यांस आशीर्वाद दिला, व सर्व इंग्लंड देश पोपनें आपल्या सत्तेखालीं घेतल्याचें जाहिर केलें. पुढें एक महिन्यानें १५२८ पासून पोपविरुद्ध झालेले सर्व कायदे रद्द आहेत असें पार्लमेंटनें ठरविलें.

**५ प्रॉटेस्टंटांचा छळ**—क्याथॉलिक पुढाऱ्यांस आपल्या धर्माची छाप इंग्लंडवर बसविण्याची आतां उत्तम संधि होती. त्यांनीं जर प्रॉटेस्टंट पंथाच्या प्रचारकांस उदारपणानें वागविलें असतें, धर्मगुरूंचें आचरण पवित्र व शुद्ध करण्याकडे लक्ष ठेविलें असतें व क्याथॉलिक मताच्या गौण मुद्यांस फाजील महत्त्व देऊन जर विरुद्ध पक्षास उगीच छळलें नसतें, तर इंग्लंड देश आज कदाचित् क्याथॉलिक मतानुयायीच राहिला असता. परंतु मेरी व तिचे सल्लागार यांस अशी सुबुद्धि सुचली नाहीं व त्यांनीं अमानुष छळ करून प्रॉटेस्टंट पंथाचें इंग्लंडांतून उच्चाटन करण्याचा विचार केला. इ. स. १५५५ पासून प्रॉटेस्टंट पंथाचे अनुयायांस जिवंत जाळण्याचा क्याथॉलिक सरकारानें सपाटा चालविला, तो मेरीच्या कारकिर्दीच्या अखेरपर्यंत सुरू होता. धर्माकरितां प्राणत्याग करण्यांत रिड्ले, लॅटिमर, होलीगेट वगैरेंचीं नांवें सर्वश्रुत झालीं आहेत. आर्चबिशप क्रॅन्मर यास एकदम जाळण्यांत आलें नाहीं. प्रॉटेस्टंट पंथाचा हा आधारस्तंभच आपल्या बाजूला वळल्यास या पंथाचें पुनः इंग्लंडांत नांवही ऐकूं येणार नाहीं असें वाटल्यामुळें क्याथॉलिक पुढाऱ्यांनीं, "तुम्ही आपलें मत बदलून क्याथॉलिक झाल्यास तुम्हास जीवदान देऊं' अशी त्यास आशा लाविली. क्रॅन्मर वयोवृद्ध झाला असून अगदीं क्षीण झाला होता. तुरुंगांतील यातनाही त्याला असह्य झाल्या होत्या. अशा वेळीं चितेचें भयंकर चित्र त्याच्या डोळ्यांपुढें उभें राहतांच त्याचें मन क्षणमात्र कचरलें व लिहून आणिलेल्या माफीपत्रावर त्यानें सही केली. परंतु इतक्यांत क्याथॉलिक अधिकाऱ्यांनीं आपलें मत बदलून त्यास जाळण्याचाच हुकूम कायम केला. निराशेनें क्रॅन्मरचें धैर्य दुणावलें. मरणापूर्वीं प्रॉटेस्टंट पंथच आपल्यास मान्य असल्याचें त्यानें जाहीर

केलें आणि चिता पेटवितांच ज्या हातानें माफीपत्रावर सही केली होती तो उजवा हात त्यानें प्रथम ज्वालेंत धरिला आणि शांत चित्तानें हूं का चूं न करितां तो अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडला ! धर्मच्छळाच्या तीन वर्षांच्या अवधींत सुमारें तीनशें असामींस जाळण्यांत आलें. या धर्मच्छळामुळें लोकांच्या मनांत प्रॉटेस्टंट पंथाविषयीं तिरस्कार उत्पन्न न होतां त्याजविषयीं त्यांचा आदरच उलट वाढला, व क्याथॉलिक धर्माविषयीं त्यांच्या मनांत अत्यंत तिटकारा उत्पन्न झाला.

६ **पोपशीं तंटा**— मठविध्वंसाच्या वेळीं आठव्या हेन्रीनें मठांच्या जमिनी जप्त करून त्यांची नवीन व्यवस्था केली होती. पोपशीं मेरीनें समेट केला तेव्हां या जमिनींची हेन्रीनें केलेली व्यवस्था आपणास मान्य असून त्यांत आपण कांहीं एक ढवळाढवळ करणार नाहीं असें पोपनें आश्वासन दिलें होतें. परंतु आतां तें धाब्यावर बसवून ज्या जमिनी पूर्वी मठांकडे होत्या त्या सर्व धर्मखात्यासच मिळाल्या पाहिजेत असा पोपनें हट्ट धरला. मेरी ऐकेना; तेव्हां तिजशीं भांडून पोपनें कार्डिनल पोल यास आपल्या प्रतिनिधिपदावरून काढिलें. तरी पण मठांच्या जमिनींसंबंधींचे पोपचे हुकूम आपणास मान्य नसल्याचें मेरीनें जाहीर केलें. अशा तऱ्हेनें आपणच पोपचा हुकूम मोडून इंग्लडांतील क्याथॉलिक मताचा प्रचार संपुष्टांत आणणारांच्या प्रयत्नास तिनें अप्रत्यक्ष बळकटी आणिली.

७ **क्याले गेलें**— स्पेनच्या फिलिपशीं मेरीचा विवाह झाल्यापासून फ्रान्सवर तिनें स्वाऱ्या करण्याचा सपाटा चालविला होता. स्पेनचें फ्रान्सशीं युद्ध सुरू झालें होतें; तेव्हां मेरीनें आपल्या नवऱ्याच्या मदतीकरितां नेदर्लंडांत सैन्य पाठविलें. इकडे फ्रेंच सैन्यानें क्याले बंदरास वेढा घातला आणि आठ दिवसांतच तें मजबूत ठाणें सर केलें (१५५८). यापूर्वी दोनशें वर्षेपर्यंत क्याले इंग्रजांच्या ताब्यांत असल्यामुळें त्यांना तें हातचें गेल्याबद्दल फार वाईट वाटलें. मेरीला ही बातमी ऐकतांच जो धक्का बसला त्यांतून ती पुढें फार दिवस वांचली नाहीं. नवऱ्याची तिच्यावर प्रीति नव्हतीच. धर्मच्छळामुळें प्रजेचाही तिजबद्दल प्रतिकूल ग्रहच होता. तशांत हा लढाईतील पराजयाचा अपमान तिला सहन न

होऊन ती त्याच दुःखांत मरण पावली ( १५५८ ). कार्डिनल पोलही त्याच दिवशीं मरण पावला, मेरीला मूलबाळ कोणी नव्हतें. तिच्यामागून प्रॉटेस्टंट मताच्या छायेखालीं वढलेली एलिझबेथच राणी होणार असल्यामुळें क्याथॉलिक मताची इतिश्री होऊन प्रॉटेस्टंट मताचा प्रचार इंग्लंडांत होणार हें बहुतेक ठरल्यासारखेंच होतें.

---

## २१ प्राटेस्टंट पंथ पक्का रुजला.

**१ एलिझबेथचा स्वभाव**—मेरीच्या मागून आठव्या हेन्रीची स्त्री ॲन बुलीन हिची मुलगी एलिझबेथ गादीवर आली ( १५५८ ). ही स्त्री होती तरी पुष्कळ मर्दानी गुण तिच्या ठिकाणीं वसत होते. ती घोड्यावर बसण्यांत पटाईत असून नेमबाजी तिला उत्तम अवगत होती. तिचा स्वभाव गंभीर असून भाषणाची ढब जोरदार होती. राज्यकारभाराचें सूक्ष्म धोरण तिच्या ठायीं असून इंग्लंडच्या भावी वैभवाचीही कल्पना तिला होती. या मर्दानी गुणांबरोबर स्त्रियांचे कांहीं गुण तिजमध्यें उत्कटत्वानें होते. आपल्या सौंदर्याचें व वैभवाचें प्रदर्शन करण्याची हौस आणि बड्या लोकांचें लक्ष आपल्याकडे ओढून घेण्याची आवड हे बायकी गुणही तिच्यामध्यें होते.

**२ धोरण**—एलिझबेथनें जें धार्मिक धोरण स्वीकारलें तें तिच्या स्वतःच्या आवडीस अनुसरून नसून तो पंथ स्वीकारणें तिला परिस्थितीमुळें भाग पडलें हेंच खरें. क्याथराइनचा विवाह रद्द असल्याचें पोपास मुळींच कबूल नसल्यामुळें त्याच्या मतें ॲन बुलीनचें लग्न धर्मबाह्य ठरत होतें. तेव्हां एलिझबेथनें क्याथॉलिक पंथ स्वीकारणें म्हणजे राज्यास बेवारस ठरून 'मला राज्यच नको' असें म्हणण्यासारखें होतें. पोपच्या मतें सातव्या हेन्रीची पणत स्कॉटलंडची राणी मेरी हीच इंग्लंडच्या राज्यास वारस असून तिला गादीवर बसविण्याच्या खटपटींत तो होता.

तेव्हां एलिझबेथनें ऐहिक बाबीप्रमाणें धार्मिक बाबतींतही राजाच धर्माचा मुख्य आहे, असा आठवा हेन्री आणि सहावा एडवर्ड यांच्या कारकिर्दींत चालू असलेला ठराव पार्लमेंटाकडून कायम करून घेतला. त्याचप्रमाणें सहाव्या एडवर्डच्या कारकिर्दींत चालू असलेलें इंग्रजी धर्म-पुस्तक प्रचारांत आणिलें आणि राजानें घालून दिलेल्या पद्धतीहून निराळ्या पद्धतीनें सार्वजनिक प्रार्थना करण्याची बंदी करणारा कायदाही पास करून घेतला ( १५५९ ). परंतु पहिल्यानें कांहीं वर्षें त्याची अंमलबजावणी कडक रीतीनें होत नव्हती.

३ **प्यूरिटन**—एलिझबेथच्या कारकिर्दींत ज्या धर्मगुरूंना जागा देण्यांत आल्या त्यांपैकीं कांहींजण मेरीच्या धर्मच्छळाच्या कारकिर्दींत हॉलंड व स्वित्झर्लंड या देशांत पळून गेले होते. तेथें जॉन क्यालव्हिन यांच्या उपदेशानें ते प्यूरिटन ( शुद्ध ) अथवा जहाल प्रॉटेस्टंट बनले. त्यांच्या मनांत जुन्या धार्मिक चालीरीतीविषयीं इतका तिटकारा भिनला होता कीं, त्यांना कोणत्याही धार्मिक विधींत बाह्य चिन्हें खपत नसत. बाप्तिस्मा देतांना क्रूसाची खूण करणें, लग्नाच्या वेळीं अंगठ्यांची अद-लाबदल करणें, प्रार्थनेच्या वेळीं गाणें बजावणें करणे, फार तर काय, पण प्रार्थनामंदिरांत शोभेकरितां चित्रें टांगणें. हेंही त्यांना सम्मत नसे. त्याच-प्रमाणें प्रार्थना चालवितांना धर्मगुरूनें पांढराच पोषाक करणें, प्रभु

१ क्यालव्हिन ( १५०९–१५६४ ) फ्रान्सांतील पिकार्डी परगण्यांत जन्मास आला. हा मोठा धर्मवेत्ता असून मार्टिन ल्यूथरनें आरंभिलेलें सुधारणेचें कार्य यानें पुढें चालविलें. मनुष्याची नियतिवशता याच्या पंथास मान्य असून व्यक्तीनें स्वप्रयत्नानें ईश्वरप्राप्ति करून घ्यावी, व्यव-स्थाची जरूर नाहीं, हें तत्त्व मुख्य म्हणून मानण्यांत येई. धर्मविधी साधे असून धर्मव्यवस्था बिशपच्या हातीं न ठेवितां लोकायत्त असावी असेंही याचें म्हणणें होतें यानें आपलें बरेंचसें आयुष्य जिनीव्हा व बेसेल येथें घालविलें. याच्या अनुयायांना क्यालव्हिनिस्ट असें नांव असून हल्लीं प्रेस्बिटीरियन, इण्डिपेण्डण्ट व बहुतेक सर्व फ्रेंच प्रॉटेस्टंट यांचा त्या-मध्यें समावेश होतो.

भोजनाच्या वेळीं गुडघे टेकणें, किंवा उत्सावाचे आणि उपवासांचे दिवस पाळणें, या सर्व समजुती वेडगळपणाच्या वाटून ते त्यांचा निषेध करीत. इंग्लंडांत कायदेशीर म्हणून जी प्रार्थना ठरविण्यांत आली होती तिच्यां-तून कांहीं या गोष्टी वगळल्या नव्हत्या. अर्थातच प्यूरिटन लोकांना तशी प्रार्थना करणें मुळींच पसंत पडलें नाहीं व ते तिच्याविरुद्ध आचरण करूं लागले. तेव्हां एलिझबेथलाही 'प्रार्थनेचा कायदा' सक्तीनें अमलांत आणणें भाग पडलें. मग प्यूरिटनांनींही कायदेशीर रीतीनें प्रचलित धर्माशीं आपला संबंध तोडून ते आपल्या 'गुप्त धर्मसभा' भरवूं लागले, आणि प्रचलित धर्मापासून निराळे असे पुढें जे अनेक पंथ( Dissenters) उत्पन्न झाले त्यांतील पहिल्या पंथाची त्यांनीं याप्रमाणें उभारणी केली.

**४ जेसूटपंथ**—युरोपांत प्रॉटेस्टंट मताचा प्रसार जेव्हां जारीनें होऊं लागला तेव्हां त्यास अडथळा करण्यासाठीं जेसूट[1] नांवाचा एक धर्मगुरूंचा पंथ उत्पन्न झाला. एलिझबेथ गादीवर येऊन तिनें प्रॉटेस्टंट

१ हा पंथ इग्नेशियस लॉयोला नांवाच्या स्पॅनिश सरदारानें पुरातन काळापासून चालत आलेल्या रोमन क्याथॉलिक धर्माचें प्रॉटेस्टंट मतापासून संरक्षण करण्यासाठीं १५३४ सालीं स्थापन केला. या पथांतील लोकांस पुष्कळ वर्षेपर्यंत पोपच्या गादीचे आधारस्तंभ मानण्यांत येत असे. यांतील लोकांचे धर्मगुरु व साधे सभासद असे दोन पोटभेद असून या पंथांतील सभासदाचे पूर्ण हक्क मिळण्यापूर्वीं उमेदवारास कडक शिस्त व अतिशय अभ्यास या दुहेरी पेंचांतून जावें लागतें. आम्ही स्वेच्छेनें गरीबी स्वीकारूं, सर्वतोपरी नीतिमत्तेनें वागूं, वरिष्ठाचे हुकूम बिनहरकत पाळूं व पोपच्या आज्ञेबाहेर कालत्रयींही जाणार नाहीं, अशा शपथा या पंथांतील सभासदास प्रवेश होतांच घ्याव्या लागतात. यांची धर्मश्रद्धा, कर्तव्यनिष्ठा व विद्वत्ता मशहूर आहेत. तथापि धर्मसेवेबरोबर राजकारणांत ढवळाढवळ करण्याची खोड या पंथांतील प्रमुख लोकांस असल्यामुळें फ्रान्स, स्पेन, रशिया व हॉलंड इत्यादि देशांतून कित्येक वेळां या लोकांची सरसहा हकालपट्टी करण्यांत आली. तथापि या पंथाचे एकंदर दहा हजारपर्यंत कट्टे अनुयायी असावेत असा अंदाज आहे.

धर्म हाच इंग्रज राष्ट्राचा धर्म होय असें जाहीर केल्यावर युरोपच्या इतर भागांतील क्याथॉलिकांनीं जेसूट धर्मगुरूच्या द्वारा इंग्लंडांत क्याथॉलिक मताचा प्रसार करण्याची खटपट चालविली. फ्रान्समध्यें दुए, ऱ्हीम्स व रुऑन इत्यादि ठिकाणीं शाळा स्थापून इंग्लिश जेसूट तयार करण्यांत येऊं लागले व ते इंग्लंडांत येऊन आपलें काम गुप्तपणें करूं लागले. राणीची धार्मिक सत्ता कबूल न करणाऱ्या रोमन क्याथॉलिक लोकांची संख्या झपाझप वाढूं लागली. त्यामुळें प्रस्थापित प्रॉटेस्टंट पंथाच्या संरक्षणार्थ क्याथॉलिकांवर कडक निर्बंध घालणें जरूर झालें. रोमन क्याथॉलिक धर्मगुरूनें इंग्लंडांत राहणें म्हणजे राजद्रोह करणें असून जर एखाद्या धर्मगुरूनें प्रभुभोजनाचा समारंभ केला तर त्यास देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा देण्यांत यावी, असले कडक कायदे पार्लमेंटनें केले. सर्व देशभर राणीनें केलेल्या नियमांप्रमाणेंच धार्मिक प्रार्थना चालाव्यात यासाठीं या प्रार्थनांस हजर न राहाणारास तो प्रॉटेस्टंट असला तरी जबर दंड ठोठावण्यांत येईल असा निर्बन्ध करण्यांत आला. शेवटीं १५८३ त एक 'हाय कमिशन कोर्ट' उघडण्यांत आलें. त्याच्याकडे धार्मिक कायद्यांची सक्त अंमलबजावणी करणें व धर्मगुरूंनीं प्रचलित धर्माहून इतर धर्ममतांचा उपदेश करून धर्मद्रोह केल्यास त्यांस शिक्षा करणें, हीं कामें सोपविण्यांत आलीं. या सर्व निर्बंधांचा सुपरिणाम होऊन सहाव्या एडवर्डच्या वेळीं स्थापला गेलेला प्रॉटेस्टंट धर्म हाच इंग्लंडच्या जनतेचा धर्म बनून तो दृढमूल झाला. आणि प्रॉटेस्टंट पंथाच्या इतर शाखा व क्याथॉलिक पंथ यांनीं त्याचें उच्चाटन करण्याचे केलेले सर्व प्रयत्न विफल झाले.

**५ आयर्लंडांतील दंगल**—इंग्लंडांत आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून क्याथॉलिकांनीं आयर्लंडांत आपली चळवळ चालू केली. 'ओनील' पुढाऱ्यांनीं आयर्लंडांत उत्तरेकडच्या अल्स्टर प्रांतामध्यें बंड उभारिलें ( १५६५ ). पुढें चार वर्षांनीं डेस्मॉंड घराण्यानें सर्व मन्स्टर प्रांतांत दंगल उडवून दिली. या बंडवाल्यांस पोप व स्पॅनिश लोक यांनीं पैशाचें आणि तसेंच मनुष्यांचें साहाय्य केलें. शेवटीं ( १५७९ )

मध्यें या बंडाचा पुरा मोड करण्यांत आला. त्यावेळीं सर्व मन्स्टर प्रांत बेचिराख करण्यांत येऊन डेस्मॉंड घराण्याचा जवळ जवळ निर्वंश करण्यांत आला व त्याच्या जमिनी इंग्रजांची वसाहत करण्यासाठीं एलिझबेथच्या मर्जींतील सरदारांस बहाल करण्यांत आल्या.

---

## २२ क्याथॉलिकांचें कारस्थान.

**१ मेरीचें स्कॉटिश लोकांशीं भांडण**— सातव्या हेन्रीची पणत ( मुलीची नात ) स्कॉटलंडची राणी मेरी ही क्याथॉलिक असून ज्या वर्षीं एलिझबेथ गादीवर आली त्याच सालीं तिचें फ्रेंच राजपुत्राशीं लग्न झालें. तिनें एलिझबेथचा इंग्लंडच्या गादीवर कांहीं हक्क नाहीं असें जाहीर करून स्वतः इंग्लंडच्या राजपदाचीं चिन्हें धारण केलीं. तिचा नवरा लवकरच वारला आणि मेरी स्कॉटलंडांत गेली. स्कॉटलंडांत जॉन नॉक्स[1] ( १५०५-१५७२ ) याच्या उपदेशावरून क्याथॉलिक धर्माची

---

[1] याच्या पंथाचीं तत्वें बहुतेक प्रॉटेस्टंट पंथासारखींच होतीं. फक्त धर्मखात्याची मुख्य सत्ता कोणाकडे द्यावयाची यासंबंधीं दोन्ही पंथांत भेद आहे. प्रॉटेस्टंट ( इंग्लंडांतील ) पंथांत पूर्वीं चालत आलेली क्लर्जी, बिशप, आर्चबिशप अशी धर्माधिकाऱ्यांची चढती परंपरा असून सर्व धर्मखात्याचा मुख्य राजा होय अशी समजूत आहे. पण प्रेस्बिटीरियन पंथांत सामान्य जनांनीं निवडलेले धर्मगुरू व इतर कांहीं शहाणे लोक मिळून एक प्रेस्बिटरांचें मंडळ बनत असे व सर्व धार्मिक सत्ता या मंडळाच्या हातीं असे. ही निवडणुकीची पद्धति खालपासून वरपर्यंत सारखी असून लहानशा खेड्यापासून तों तहत सर्व देशांतील धार्मिक सत्ता अशा तऱ्हेनें निवडून आलेल्या मंडळाकडे असे. हा पंथ व इंग्लंडांतील स्थापित प्रॉटेस्टंट पंथ या दोहोंमधील फरक स्पष्टपणें दाखविण्याकरितां इंग्लंडांतील प्रॉटेस्टंट पंथास एपिस्कोपसी अथवा प्रेलसी ( ज्यांत बिशपच्या हातीं बहुतेक सर्व अधिकार आहे असा पंथ ) असें नांव दिलेलें आढळतें.

पिछेहाट होऊन प्रेस्बिटीरियन धर्ममत पसरलें होतें. मेरी राणी क्याथॉलिक धर्माची असल्यामुळें तिचा उपद्व्यापी सावत्रभाऊ मरे यास स्कॉटिश सरदारांत फूट पाडून प्रेस्बिटीरियन मताचे सरदार आपल्या बाजूस वळवून घेण्याची उत्तम संधि मिळाली. तशांत मेरी ही रागीट स्वभावाची व अविचारी असल्यामुळें त्याच्या प्रयत्नास यश येण्यास वेळ लागला नाहीं. स्कॉटलंडांत परत गेल्याबरोबर मेरीनें स्कॉटिश लोकांच्या इच्छेविरुद्ध डार्न्ले नांवाच्या सुंदर पण मूर्ख अशा एका आपल्या जवळच्या नातलगाशीं लग्न लाविलें. लग्नानंतर थोड्याच दिवसांनीं डार्न्लेनें गुप्त कारस्थान करून मेरीचा सेक्रेटरी रिझिओ यास तिच्या समक्ष ठार केलें. यापुढें मेरीचें डार्न्लेशीं मुळींच न पटून ती बॉथ्वेल नांवाच्या एका श्रीमंत सरदाराच्या सल्ल्यानें कारभार पाहूं लागली. पुढें लवकरच डार्न्ले मारला गेला. या दुष्ट कृत्यांत बॉथ्वेलचा संबंध आहे अशी लोकांची समजूत होती. परंतु पुढें एक महिन्यानें मेरीनें बॉथ्वेलशीं विवाह लाविला; तेव्हां या कृत्यांत बॉथ्वेल तेवढा सामील नसून मेरीही सामील आहे, असा लोकांस बळकट संशय आला. मेरीविरुद्ध लोकमत इतकें खवळलें कीं, तिला आपल्या जिवाची धास्ती वाटूं लागली. लवकरच तिला 'राणी' पदावरून दूर करून तिचा तान्हा मुलगा जेम्स यास 'सहावा जेम्स' अशी पदवी देऊन गादीवर बसविण्यांत आलें (१५६७). मरे हा राजप्रतिनिधि होऊन राज्यकारभार पाहूं लागला. त्यानें मेरीला लॉक लेव्हन किल्ल्यांत बंदांत ठेविलें. मेरीनें थोड्याच दिवसांत बंदींतून आपली सुटका करून घेतली आणि सहा हजार सैन्य जमा करून ती राजधानीवर चालून जाऊं लागली. परंतु क्लाइड नदीच्या कांठचें लँगसाईड येथें तिचा सपशेल पराभव होऊन तिला जीव बचावण्यासाठीं इंग्लंडांत पळून जावें लागलें.

२ **एलिझबेथच्या अडचणी**—एलिझबेथ मात्र फारच अडचणींत पडली. मेरीला मोकळें ठेवावें तर ती आपल्याला गादीवरून काढून स्वतःच राणी होण्याचे प्रयत्न करणार; बरें तिला कैदेंत ठेवावयाचें म्हणावें तर त्याला कांहींच कायदेशीर पुरावा नव्हता. अशा स्थितींत एलिझबेथनें तिला नजरकैदेंत ठेविलें व डार्न्लेच्या खुनाशीं संबंध असल्याबद्-

लच्या तिच्यावरील आरोपाची चौकशी करण्याकरितां यॉर्क शहरीं एक कमिशन नेमिलें. मेरी आपल्या बंदिवासाच्या ठिकाणाहून एलिझबेथला पदच्युत करून ठार मारण्याचे कट करूं लागली. या कामीं स्पेन व फ्रान्सचे राजे व इंग्रज क्याथॉलिक यांचें तिला पूर्ण साहाय्य होतें. पहिल्या कटाचा उद्देश असा होता कीं, इंग्रज क्याथॉलिकांचा पुढारी सरदार नॉर्फोर्क व मेरी यांचा विवाह करून इंग्लंडांतील सर्व क्याथॉलिक लोक अनुकूल करून घ्यावयाचे आणि उत्तरेत बंडाचें निशाण उभारावयाचें. परंतु हा कट लवकरच उघडकीस येऊन कटांत सामील झालेल्या लोकांस कडक शासन करण्यांत आलें ( १५६९ ).

**३ हॉलंडला स्वातंत्र्यप्राप्ति**–एलिझबेथला राज्यावरून काढून टाकण्याचा पुढील एक कट तर अत्यंत भयंकर म्हणण्यास हरकत नाहीं. यांत स्पेन व फ्रान्सचे राजे आणि पोप हीं सर्व मंडळी होती. हल्लींचा हॉलंड देश व बेलजियम हीं त्या वेळीं स्पेनच्या सत्तेखालीं असून त्यांना स्पॅनिश नेदर्लंड्स म्हणत. त्यांपैकीं वरील भागांत म्हणजे हॉलंडांत प्रॉटेस्टंट धर्माचा फार जोरानें प्रसार झाला. हें स्पेनचा क्याथॉलिक राजा फिलिप यास न आवडून त्यानें सेनापति "आल्व्हा" यास तेथील बंदोबस्त करण्याकरितां पाठविलें ( १५६७ ). तेथील बंदोबस्त झाल्यावर आल्व्हानें एलिझबेथला पदच्युत करण्याकरितां इंग्लंडवर चालून जावें, असा फिलिपचा संकेत होता. एलिझबेथ इंग्लंडची कायदेशीर सत्ताधारी नाहीं, अशा अर्थाचा पोपकडूनही हुकूम सोडण्यांत आला. आल्व्हा स्वारी करून आला कीं, त्याच्या स्वारीच्या पांघरुणाखालीं ही राज्यक्रान्ति घडवून आणण्यास इंग्रज क्याथॉलिकांनीं जय्यत तयार असावें, अशी व्यवस्था करण्यांत आली; परंतु आल्व्हानें हॉलंडांत इतक्या जुलुमानें कारभार केला कीं, तेथील लोकांच्या चळवळीस उघड उघड बंडाचें स्वरूप आलें. पुढें आल्व्हाच्या हातून हें काम होत नाहीं असें पाहून फिलिपनें त्यास कामावरून दूर केलें. तरी पण नेदर्लंडांतील लोकांचा क्षोभ भडकत जाऊन त्यांपैकीं उत्तरेचीं सात संस्थानें स्वतंत्र झालीं (१५७९); व त्यांनाच हॉलंड हें नांव पडलें. हॉलंडास स्वातंत्र्य–प्राप्ति

करून देण्याच्या कामांत ऑरेंजचा वुइल्यम हाच प्रमुख होता. तो क्याथॉलिकांच्या डोळ्यांत अगदीं सलत होता. त्याचा सन १५८४ त खून झाला; तेव्हां हॉलंडांतील लोकांनीं आपलें राजपद स्वीकारण्याविषयीं एलिझबेथला विनंति केली. पण एलिझबेथनें इतकी जोखीम अंगावर घेण्याचें नाकारिलें. मात्र त्या बालप्रजासत्ताक राज्यास युद्ध संपेपर्यंत सैन्याची मदत करण्याचें तिनें आश्वासन दिलें. अशा तऱ्हेनें आल्हाच्या मागून फिलिपनें नेदर्लंडांत पाठविलेला सरदार पार्मा यासही तिकडेच गुंतवून ठेविण्याची एलिझबेथनें व्यवस्था केली. हॉलंडांतील प्रॉटेस्टंट पुढारी वुइल्यम याचा खून झाल्याचें पाहून इंग्लंडच्या पार्लमेंटास आपल्या राणीच्या जीविताविषयीं चिन्ता उत्पन्न झाली. राणीच्या शरीरास कोणत्याही प्रकारें अपाय करण्याचा कट करणारास एकदम देहान्त प्रायश्चित्त देण्यांत येईल असा कायदा तिनें पास केला; व रोमन क्याथॉलिक लोकांवर विशेष लक्ष ठेविण्यांत येऊं लागलें.

**४ मेरीची फांशी**—याच वेळीं अँन्थनी बॅबिंगटन या नांवाच्या एका माथेफिरू क्याथॉलिकानें एलिझबेथला ठार करून मेरीस गादीवर बसविण्याचा कट केला. या कटाची बातमी सेक्रेटरी वॉलसिंगटन यास लवकरच लागली; पण त्यानें त्याचा लागलीच निकाल न करतां तो तसाच परिपक्व होऊं दिला. जेव्हां कट अगदीं पूर्णावस्थेस आला व मेरीचा त्याशीं संबंध असल्याबद्दल मुळींच संशय राहिला नाहीं, तेव्हां कटवाल्यांस एकदम पकडण्यांत आलें. चाळीस सभासदांच्या जादा न्यायासनापुढें (स्पेशल कोर्ट) मेरीची चौकशी झाली व तिला दोषी ठरवून त्या कोर्टानें फांशीची शिक्षा सांगितली. प्रथम मेरीला फांशीं देण्याच्या हुकूमावर सही करण्याचें एलिझबेथनें नाकारिलें. आपल्या मंत्र्यांनीं तिला फांशीं देण्याचें काम आपल्या अधिकारांतच उरकून टाकावें अशी एलिझबेथची इच्छा होती. परंतु मंत्र्यांनीं तसें करण्याचें नाकारिलें व एलिझबेथला त्या हुकूमावर शेवटीं सही करावी लागली. ती केल्यावर ता. ७ फेब्रुवारी १५८७ रोजीं मेरीचा शिरच्छेद करण्यांत आला. मेरी हें क्याथॉलिक राष्ट्रांच्या हातांत प्रॉटेस्टंट इंग्लंडास त्रास देण्याचें एक

उत्तम हत्यार होऊन बसलें होतें; त्यामुळें ती मारली गेल्यावर प्रॉटेस्टंटांस आराम वाटला यांत नवल नाहीं.

---

## २३ समुद्रावर इंग्लंडचा जयजयकार!! १५८८

**१ मेरीचा वारस**—मेरीच्या मृत्यूमुळें एलिझबेथविरुद्ध होणारे कट बंद पडले. तथापि तिनें वधापूर्वी आपला इंग्लंडच्या गादीवरील वारशाचा हक्क स्पेनचा राजा फिलिप याच्या मुलीस दिला होता. मेरीला जेम्स–जो पुढें इंग्लंडचा राजा झाला–नांवाचा मुलगा होता. परंतु तो क्याथॉलिक नसून आपल्या मातेस कैदेंत ठेवणाऱ्या व शेवटीं फांशीं देणाऱ्या एलिझबेथचें पेन्शन खात होता! तेव्हां मेरीनें आपल्या वारशाचा हक्क त्यास दिला नाहीं यांत काय नवल? फिलिपला मात्र इंग्लंडवर स्वारी करण्यास आतां सोन्यासारखी संधी मिळाली. त्यानें आपल्या मुलीच्या इंग्लंडवरच्या गादीवरील हक्काचा अंमल करण्याकरितां एक जंगी स्वारी करून इंग्लंडांतील प्रॉटेस्टंटांचा नायनाट करण्याचा निश्चय केला. या स्वारीसाठीं केडिझ, कोरुन्ना वगैरे स्पॅनिश बंदरांत आरमाराची जोरानें तयारी चालू झाली

**२ सर फ्रान्सिस ड्रेक**—या वेळीं इंग्रज खलाशीही दर्यावर्दीपणांत मोठमोठीं धाडसाचीं कामें करूं लागले होते. कोलंबसानें अमेरिका खंडाचा शोध लाविल्यापासून सर्व युरोपियन राष्ट्रांत दर्यावर्दीपणाचा जो ऊत आला होता त्यांत अमेरिकेंतील सोन्यारुप्याच्या खाणींच्या शोधानें भर पडली. पोपच्या आज्ञापत्राप्रमाणें अमेरिकाखंडावर स्पेनची मालकी असल्यामुळें सोन्यारुप्यांनीं

---

१ नवे शोध झाल्यावर पोर्तुगाल व स्पेन यांजमध्यें मालकीसंबंधीं तंटे होऊं लागले. तेव्हां पोप सहावा ॲलेक्झँडर यानें उत्तरदक्षिण रेषा काढून तिच्या पूर्वेकडील प्रदेश पोर्तुगालचा व पश्चिमेकडील स्पेनचा असें ठरविलें (१४९३ मे ४). ही रेषा दक्षिण अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरून जात होती.

लादलेलीं स्पॅनिश गलबतें अमेरिकेंतून स्पेनला हरहमेश येऊं लागलीं. तें पाहून इंग्रज नाविकांचा मत्सराग्नि भडकला आणि त्यांनीं त्या श्रीमंत स्पॅनिश गलबतांना गांठून त्यांतील सोनें लुटून आपल्या देशास आणण्याचा सपाटा चालविला. या संभावित लुटारूपणांत सर जॉन हॉकिन्स व सर फ्रॅन्सिस ड्रेक हे प्रसिद्धीस आले. इ. स. १५७७ मध्यें ड्रेक दक्षिण अमेरिकेच्या खालील टोंकावरून पश्चिमेकडे गेला व पॅसिफिक किनाऱ्यावर स्पेनच्या गलबतांशीं लढून त्यानें सर्व माल लुटला. परंतु आल्या मार्गानें जाणें धोक्याचें होतें; कारण त्याच्या जहाजास पकडण्यास स्पॅनिश लोक टपून बसले होते. तेव्हां त्यांस झुकांडी देऊन त्यानें सर्व पॅसिफिक महासागरच आक्रमण्याचा निश्चय केला. सत्तर दिवसांनीं तो फिलिपाइन बेटांत आला. तेथून केप ऑफ गुडहोपला वळसा घालून तो प्लिमथ बंदरांत तीन वर्षांनीं दाखल झाला. त्याच्या जहाजाचें नांव (Golden Hind) सुवर्णमृग हें होतें. फिलिपनें इंग्लंडवर स्वारी करण्याकरितां आरमाराची तयारी चालविली होती. अशा वेळीं ड्रेक आपल्या धाडसी साहाय्यकाऱ्यांस बरोबर घेऊन स्पॅनिश किनाऱ्यावरील केडिझ बंदरांत अचानक उतरला. ड्रेक आला असें पाहतांच मालानें भरलेलीं स्पॅनिश व्यापारी जहाजें पळून जाऊं लागलीं. पण ड्रेक त्यांस कसचा जाऊ देतो ? त्यानें आपल्या खलाशांच्या दोन टोळ्या केल्या. एकीनें स्पॅनिश लढाऊ जहाजांना जाळून किंवा बुडवून त्यांचा नाश केला, तर दुसरीनें व्यापारी जहाजांवर चढून जंगी लूट मारली. अशा रीतीनें स्पॅनिश आरमाराचा नाश करून ड्रेक इंग्लंडास आला ( १५८७ ). या ड्रेकच्या स्वारीमुळें फिलिपची इंग्लंडवरील स्वारी एका वर्षानें लांबली.

**३ अजिंक्य आरमार निघालें**—पुढें सर्व जुळवा जुळव झाल्यावर ता. २९ मे १५८८ रोजीं स्पेनचें आरमार इंग्लंडवर स्वारी करण्या-

---

१ यापूर्वी १५२२ त मॅगेलन ( पोर्तुगीज ) यानें पृथ्वीप्रदक्षिणा केली होती. फिलिपाइन बेटांत असतां तो मारला गेला. तथापि त्याचें 'विजय' ( Victory ) नामक जहाज त्याच्याबरोबरच्या लोकांनीं परत स्पेनला आणिलें. तेव्हां पृथ्वीप्रदक्षिणा करणारा ड्रेक हा दुसरा होय.

करितां केडिझ बंदरांतून निघालें. ही आपली स्वारी खात्रीनें यशस्वी होणार अशी फिलिपला खात्री असल्यामुळें त्यानें त्या आरमारास 'अजिंक्य आरमार' असें नांव दिलें! या आरमारांत १२९ लढाऊ जहाजें असून अडीच हजार तोफा होत्या. नुसते खलाशी आठ हजार असून वीस हजार कवायती फौज होती. या आरमाराबरोबर सहाशें धर्मोपदेशकही निघाले होते. ते कशाला? तर इंग्लंडच्या किनाऱ्यावर पाय ठेवतांच तेथील धर्मभ्रष्ट लोकांस प्रायश्चित्त देऊन पावन करून घ्यावयाला! या आरमारावरील अधिकाऱ्यांस फिलिपचा असा हुकूम होता कीं, त्यांनीं इंग्लिश खाडींतून तसेंच पहिल्यानें नेदर्लंडच्या किनाऱ्याला लागावें व तेथें पार्मा याच्या हाताखालीं असलेलें सतरा हजार सैन्य आपल्यांत घेऊन मग त्या एकंदर फौजेनिशीं इंग्लंडवर जाऊन उतरावें.

**४ इंग्रजांची तयारी**---या मानानें पाहतां इंग्लिशांची कांहींच तयारी नव्हती. त्यांच्या आरमारांत तर चाळीस जहाजांची भरती नव्हती. व्यापारी कंपन्यांचीं व खाजगी मालकीचीं मिळून कशींबशीं एकशें चाळीस जहाजें जमा झालीं. या आरमाराचें आधिपत्य लॉर्ड हॉवर्ड याच्याकडे असून तो रोमन क्याथॉलिक होता, हें लक्षांत ठेविण्यासारखें आहे. स्पॅनिश सैन्य इंग्लंडच्या भूमीवर उतरतांच इंग्लिश क्याथॉलिक आपल्या बाजूस मिळतील अशी फिलिपची कल्पना होती. परंतु ही फिलिपची स्वारी म्हणजे आपल्या राष्ट्रस्वातंत्र्यावर घाला आहे, व हें धार्मिक युद्ध नसून राष्ट्रीय युद्ध आहे हें इंग्रजांनीं पक्कें ओळखिलें होतें; व त्यामुळें कोणीही इंग्रज क्याथॉलिक फिलिपला मिळाला नाहीं इतकेंच नव्हें, तर आपल्या राष्ट्रसंरक्षणार्थ कंबर कसून लढला. या कठिण प्रसंगीं हॉवर्डनें आरमाराचें आधिपत्य स्वीकारिलें ही एकच गोष्ट इंग्रजांमधील राष्ट्रीय भावनेची आणि ऐक्याची उत्तम साक्ष आहे. हॉकिन्स व ड्रेक हे साहसी नाविक हॉवर्डच्या हाताखालीं काम करीत होते. खुष्कीवर लंडनजवळच्या छावणींत सत्तर हजार सैन्य तयार झालें. परंतु त्यापैकीं बहुतेक लोक लष्करी शिक्षण न मिळालेले नवशिकेच असून

केवळ उत्साहानें देशसंरक्षणार्थ सैन्यांत शिरलेले होते. राणीचा आवडता सरदार लीस्टर हा या सैन्याचा नायक होता.

**५ युद्धप्रसंग**—१९ जुलै रोजीं 'अजिंक्य आरमार' इंग्लिश खाडींत दिसूं लागलें. तें अवाढव्य असून त्याची रचना चंद्रकोरेप्रमाणें होती. इंग्लिश जहाजें संख्येनें कमी व वजनानें किरकोळ असल्यामुळें अजिंक्य आरमाराशीं प्रत्यक्ष लढाई करणें अशक्य होतें. वारा स्पॅनिश लोकांस प्रतिकूळ होता व म्हणून तें आरमार फारच सावकाश चाललें होतें. पहिल्यानें त्या आरमाराच्या हालचालींवर नजर ठेवून त्यांतील चुकलेलीं जहाजें पकडून ठेवावयाचीं, येवढ्यावरच इंग्रजांस संतोष मानावा लागला. शेवटीं क्याले बंदरांत तें आरमार थांबलें. पार्माचें सैन्य डन्कर्क येथें होतें, तें येऊन त्या आरमारावर चढण्यापूर्वींच त्या आरमाराशीं तोंड देणें इंग्रजांस भाग होतें. या आरमाराशीं चाललेल्या युद्धांत कांहीं गोष्टी मात्र इंग्रजांस अनुकूळ होत्या यांत शंका नाहीं. इंग्लिश जहाजें लहान होतीं पण तीं सुटसुटित असल्यामुळें स्पेनच्या राक्षसी जहाजांभोंवतीं घिरट्या घालून त्यांच्यावर हल्ला करण्यास व त्यांना बेजार करण्यास त्यांना फार सोयीचें होतें. शिवाय स्पॅनिश धुडांना तितकें लवकर वळतां येत नसल्यानें व त्यांनीं सोडलेले तोफांचे गोळे इंग्रजांच्या डोक्यावरून पलीकडे पडत असल्यामुळें इंग्रजांस पुष्कळ फायदा झाला. क्याले बंदरांत तें आरमार असतां एके रात्रीं ड्रेकनें मोठ्या धाडसानें आपलीं आग लावणारीं आठ जहाजें त्या आरमारांत पाठवून, स्पॅनिश गलबतें जाळण्यास प्रारंभ केला. त्यामुळें स्पॅनिश कप्तानांना आगींतून बचावण्याकरितां नांगर ओढून दोरखंड तोडून टाकणें भाग पडलें. त्यांच्यांत गोंधळ माजला, व तीं एकमेकांवर आपटून त्यांचें बरेंच नुकसान झालें. याच वेळीं तुफानी वारा सुटला त्यानें तर इंग्रजांचें फारच काम झालें. सकाळींही फिरून इंग्रजांनीं गोळ्या झाडून फिरून हल्ला केला. स्पेनचीं सोळा गलबतें नष्ट झालीं व आणखी कित्येक खिळखिळीं झालीं.

**६ आरमार परतलें**—तेव्हां स्पॅनिश अधिपतीनें वाऱ्याच्या प्रति-

कूळतेमुळें स्कॉटलंडच्या उत्तर किनाऱ्याकडून स्पेनला परत जाण्याचा हुकूम केला. या युद्धप्रसंगांत इंग्रजांचीं शंभराहून कमी माणसें पडलीं व एकही जहाज दुखावलें नाहीं. इंग्रजांनीं फोर्थच्या मुखापर्यंत त्यांचा पाठलाग केला, व पुढें दारुगोळा संपल्यामुळें मोठ्या नाखुषीनें त्यांना पाठलागाचें काम सोडून द्यावें लागलें. वादळानें मात्र इंग्रजांस पुरें साहाय्य केलें. तें आरमार जें एकदां उत्तर दिशेला भरकटलें तें ऑर्कनी व शेटलंड बेटांच्या किनाऱ्यावर आपटून त्याचा पुरा निःपात झाला. आयर्लंडच्या पश्चिमेकडील एकट्या स्लिगो खाडींतच अकराशें प्रेतें वाहून आलीं. सुमारें पन्नास गलबतें व त्यांवरील आठ दहा हजार जखमी व अंथरुणास खिळलेले लोक येवढ्यांनींच काय तो स्पेनचा किनारा परत पाहिला ! इंग्रजांना पूर्ण जयश्री प्राप्त झाली. हा युद्धप्रसंग इंग्लंडच्या इतिहासांत अत्यंत संस्मरणीय होय; कारण या वेळेपासून स्पेनचें समुद्रावरील स्वामित्व जाऊन ब्रिटिश साम्राज्याचा आधारस्तंभ अशी जी इंग्लंडची नाविक सत्ता तिचा उदय झाला.

**७ आयर्लंडांत बंड**—अशा तऱ्हेनें चहूंकडून निराश झाल्यावर फिलिपनें आयर्लंडांतील अल्स्टर परगण्यांतील 'ओनील' लोकांचा पुढारी टायरोनचा अर्ल यास इंग्रजांविरुद्ध बंड करण्यास चिथविलें. एलिझबेथनें आपल्या प्रीतींतील सरदार एसेक्स यास तें बंड मोडण्यास आयर्लंडांत पाठविलें. परंतु एसेक्सच्या स्वारीची व्यवस्था नीट नसून त्यानें हुकुमाशिवाय बंडखोरांशीं तह केला व तसाच परवानगी नसतां इंग्लंडास तो परत आला. नंतर वेळोवेळीं हुकूम मोडल्याबद्दल त्याला जाब विचारतां त्यानें लंडनमध्यें बंड करण्याचा प्रयत्न केला. परंतु एलिझबेथवर लोकांची निष्ठा अचल होती त्यामुळें त्याला यश न येऊन भयंकर राजद्रोहाबद्दल त्याला फाशीं देण्यांत आलें. त्याच्या मागून आयर्लंडावर माउंटजॉय सरदार पाठविण्यांत आला. तो कडक असून क्रूर होता. त्यानें दडपशाही करून आयर्लंडास तेव्हांच वठणीवर आणलें.

**८ एलिझबेथचें गुणवर्णन**—१६०३ मध्यें इंग्लंडच्या वैभवाची चढती कमान असतां एलिझबेथ राणी आपल्या वयाच्या ऐंशींव्या

वर्षी वारली. एलिझबेथ मोठी कर्तबगार व धोरणी होती. तिच्या कारकिर्दीच्या शेवटीं शेवटीं इ. स. १६०० त इंग्लंडांतील व्यापाऱ्यांनीं 'ईस्ट इंडिया कंपनी' नांवाची व्यापारी कंपनी हिंदुस्थानशीं व्यापार करण्याकरितां स्थापन केली; व एलिझबेथकडून त्या कंपनीला सनद मिळाली. ट्यूडर घराण्यांतील राजांचें पार्लमेंटशीं वर्तन एकंदरीनें दांडगाईचेंच असे. परंतु ते कर्तृत्ववान् असून त्यांचीं परराष्ट्रीय कारस्थानें व धोरणें पूर्णपणें यशस्वी झाल्यामुळें देशांत त्यांच्याविरुद्ध गवगवा झाला नाहीं. एलिझबेथनें बलाढ्य स्पेनचा पाडाव केल्यामुळें इंग्लंडांत ती अत्यंत लोकप्रिय झाली ! तथापि ती आपल्या प्रीतींतील माणसांस निरनिराळ्या जिनसांचा व्यापार करण्याचे मक्ते देत असे; त्यामुळें जिन्नस महाग होऊन लोकांची गैरसोय होई. तेव्हां शेवटीं कॉमन्स सभेनें 'मक्ते देण्याची पद्धति एकदम बंद करण्यांत यावी' अशी मागणी केली. एलिझबेथनेंही लोकमताचा जोर पाहून मक्ते देण्याचें धोरण तावडतोब बंद केलें ( १६०१ ); यावरून तिचें दूरदर्शित्व व्यक्त होतें.

## २४ राजा हा ईश्वरी अंश आहे !


**१ पहिला जेम्स**—एलिझबेथ राणीनें मरते वेळीं आपली इच्छा दर्शविल्याप्रमाणें सातव्या हेन्रीच्या मार्गरेट नामक मुलीचा पणतु स्कॉटलंडचा स्टुअर्ट घराण्यांतील राजा सहावा जेम्स हा पहिला जेम्स[1] या पदवीनें इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड या तिन्ही देशांचा राजा झाला. स्कॉटलंड व इंग्लंड एकाच राजाच्या ताब्यांत आल्यानें त्या दोन्ही देशांमधील आजपर्यंतचा वैरभाव नाहींसा होऊन शांतता स्थापन झाली. तथापि स्कॉटलंडची पार्लमेंट यापुढें शंभर वर्षेपर्यंत स्वतंत्रपणें एडिंबरो येथें भरत असे.

**२ तीन धर्मपंथ**—त्या वेळीं इंग्लंडांत प्युरिटन ( जहाल प्रॉटेस्टंट ), एपिस्कोपेलियन ( साधे प्रॉटेस्टंट ) व रोमन क्याथॉलिक असे तीन धर्म-

१ जेम्स—टीप पान १४८ वर पहा.

पंथ होते. एलिझबेथची प्रतिस्पर्धी मेरी ही क्याथॉलिक असल्यामुळें तिचा मुलगा जेम्स आपल्या बाजूचा होईल असें क्याथॉलिक लोकांस वाटलें. स्कॉटलंडांत प्रेस्बिटीरियन मतें प्रचलित असल्यामुळें त्यांच्या सहवासांत वाढलेला जेम्स कडक प्रॉटेस्टंट मताचा असेल व आपल्याच पंथावर राजाचा अनुग्रह होईल अशी प्यूरिटनांनीं अटकळ बांधली. परतु इंग्लंडमध्यें प्रस्थापित धर्मपंथ एपिस्कोपेलियन असल्यानें धर्मसंरक्षक या नात्यानें आपल्यास राज्य करावयाचें आहे तोंपर्यंत तोच पंथ राजमान्य ठरला पाहिजे, अशा समजुतीनें जेम्सनें एपिस्कोपेलियन पंथालाच आपलें आनुकूल्य प्रगट केलें.

**३ क्याथॉलिकांचे कट**—तेव्हां प्यूरिटन व क्याथॉलिक यांची अत्यंत निराशा झाली. या निराशेच्या उद्वेगांत रोमन क्याथॉलिक लोकांनीं राजाविरुद्ध एक मोठा कट केला ( १६०३ ). पण हा कट ऐन वेळीं उघडकीस येऊन त्यांतील पुढाऱ्यांस फांशीं देण्यांत आलें. सर वॉल्टर रॅले याचें या कटांत कांहीं अग असल्यावरून त्यालाही फांशीची शिक्षा झाली; पण तिची अंमलबजावणी न करितां तूर्त त्यास तुरुंगांत ठेवण्यांत आलें. तेथें त्यानें जगाचा इतिहास लिहिला. यापुढें रोमन क्याथॉलिक लोकांविरुद्ध एलिझबेथच्या वेळीं पास झालेले कायदे जेम्सनें कडकपणानें अमलांत आणिले. त्यामुळें क्याथॉलिकांस जाच होऊं लागला; त्यांनीं संतापून जाऊन राजासह सर्व सभासद जमले असतां पार्लमेंटगृहच दारूगोळ्यानें उडवून देऊन प्रॉटेस्टंट पंथाचा नायनाट करावयाचा व क्याथॉ-



लिक पंथ प्रचलित करावयाचा या हेतूनें कट केला ( १६०५ ). कट-वाल्यांचें काम जोरांत चालू असून दारूगोळा सांठविण्यास पार्लमेंटच्या सभागृहाखालील तळघरच त्यांचे हातीं आलें. दारूगोळा सांठविण्याचें काम गाय फॉक्स नांवाच्या सोजिराकडे सोंपविलें होतें. येथवर ठीक झालें; पण पार्लमेंटची बैठक पुनः पुनः तहकूब होऊं लागली व पैसा अपुरा पडल्यामुळें कटवाल्यांस कांहीं श्रीमंत लोकांस आपल्या गुप्त कृत्यांत सामील करून घेणें भाग झालें. शेवटीं ५ नोव्हेंबर १६०५ हा बैठकीचा दिवस मुक्रर झाला. तथापि श्रीमंतांच्या द्वारें आतां कटांत बरेच लोक समाविष्ट झाल्यामुळें तो गुप्त राहणें शक्य नव्हतें. कटवाल्यांपैकीं एकानें आपल्या नातलगास 'पार्लमेंटवर अनिष्ट प्रसंग येणार असल्यामुळें बैठकीस तुम्हीं हजर राहूं नये' अशा अर्थाच्या पाठविलेल्या पत्रावरून तो कट उघडकीस आला. लागलीच कटवाल्यांस पकडण्यांत येऊन कडक शासन करण्यांत आलें व त्या वेळेपासून क्याथॉलिक लोकांविरुद्ध कडक कायदे करण्यांत आले व सक्त रीतीनें ते अमलांत आणण्यांत येऊं लागले. लंडन शहरांत राहण्याची मनाई होऊन वैद्यकी व वकिली हे धंदे करण्याची त्यांना बंदी झाली. त्यांस न्यायबाह्य ( Outlaw ) ठरवून त्यांच्याविषयीं कोणासही यत्किंचित् संशय आल्यास त्यानें खुशाल त्यांच्या घरांत शिरावें आणि त्यांच्या जिंदगीची वाटेल तशी नासधूस करावी, असा प्रकार होऊं लागला.

**४ हॅम्पटन कोर्टमधील सभा**—जेम्सच्या राज्यारोहणानंतर थोड्याच दिवसांनीं प्यूरिटन मताच्या आठशेंपंचवीस धर्मगुरूंनीं धर्मपुस्तकांत व धार्मिक विधींत फरक करण्याबद्दल त्याच्याकडे अर्ज केला. त्यावरून राजानें धार्मिक धोरण काय ठेवावें, याची चर्चा करण्यासाठीं हॅम्पटन कोर्ट येथील राजवाड्यांत धर्मगुरूंची एक सभा बोलाविली. या सभेंत प्यूरिटन लोकांनीं केलेल्या सूचना म्हणजे धर्मगुरूंनाही मान्य न करणारा असा जो प्रेस्बिटेरियन पंथ त्याच्या स्थापनेची प्रस्तावनाच त्यांच्याकडून केली जात आहे, अशा अर्थाचा युक्तिवाद प्यूरिटनांविरुद्ध लढविण्यांत आला. 'आज तुम्ही धर्मगुरू नको म्हणतां, उद्यां तुम्ही

राजाच आम्हांस नको म्हणाल,' असा मुद्दा राजाच्या बाजूतर्फे काढण्यांत येऊन प्यूरिटनांचीं तोंडें बंद करण्यांत आलीं. या सभेच्या शेवटीं एका धर्मगुरूच्या राजनिष्ठेनें इतकी भरारी मारली कीं, तो म्हणाला, 'राजाचा प्रत्येक शब्द म्हणजे साक्षात् परमेश्वराची आज्ञा !' या सभेपासून कांहीं फायदा झाला नाहीं हें निराळें सांगणें नकोच. मात्र 'डोंगर पोखरून उंदीर काढला' या न्यायानें तिचें फल म्हणून 'जेम्सची आवृत्ति' या नांवाची एक बायबलच्या भाषांतराची नवीन आवृत्ति काढण्यांत आली.

**५ राजाचे हक्क**—जेम्स जेव्हां गादीवर आला तेव्हांपासून "राजा हा ईश्वरी अंश आहे" या तत्त्वावर त्याची ठाम निष्ठा बसून गेली होती. राजानें या तत्त्वास धरून आपला वर्तनक्रम चालविल्यामुळ पुराणकालापासून चालत आलेले राजाचे हक्क म्हणून कांहीं असत, त्यांच्या योग्य मर्यादा निश्चित करणें पार्लमेंटास भाग पडलें. शिकारीसाठीं अरण्य राखणें, अज्ञानपालन, नाणें पाडणें इत्यादि बाबतींतील राजाच्या पुराण कालापासून चालत आलेल्या हक्कांखेरीज खालील बाबीही राजाच्या खास हक्काच्या म्हणून सर्वमान्य होत्या. (१) प्रधानमंडळाची नेमणूक करणें, (२) नवे लॉर्ड करणें, (३) व्यापारी कंपन्या, म्युनिसिपालिट्या व इतर मंडळ्या यांना सनदा देणें, (४) सक्ते देऊन व कर बसवून व्यापाराचें नियंत्रण करणें, (५) राज्याविरुद्ध उठलेल्या बंडखोरांस शिक्षा करणें, (६) अपराध्यांना शिक्षेची माफी देणें व कांहीं विशेष प्रसंगीं कायदा रद्द करणें, (७) कांहीं आकस्मिक खर्च उभा राहिला असतां नवे कर बसवून तो भागविणें. हे राजाचे हक्क प्राचीन कालापासून सर्वसंमत होते, तरी पण त्यांचा उपयोग शहाणपणानें व दूरदर्शीपणानें करण्यांत येईल अशी राजा व प्रजा या दोन्ही बाजूंची प्रत्यक्ष नसली तरी गर्भित कबुलीच असे. परंतु जेव्हां राजे लोक जॉन राजाप्रमाणें या हक्कांचा दुरुपयोग करीत तेव्हां 'मॅग्ना चार्टा' सारखे निर्बंध राजसत्तेवर घालणें लोकांस जरूर होई.

**६ भांडणाचें मूळ**—जेम्सनें व पुढील स्टुअर्ट राजांनीं 'आपण राजे अतएव ईश्वरच' या तत्त्वास उराशीं बाळगून राज्यकारभार हाकण्यास

जेव्हां सुरवात केली, तेव्हां वरील सात हक्कांचा दुरुपयोग करून आपली सत्ता अगणित वाढविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. राजाचे अधिकार अमर्याद असून त्यानें पार्लमेंटला कृपा म्हणून कांहीं थोडे हक्क दिले आहेत अशी त्यांची कल्पना असे. परंतु वास्तविक पाहिलें तर राष्ट्राचे अधिकार अनंत असून त्यांपैकीं कांहीं योग्यपणानें उपयोग करण्यासाठीं राजाच्या हातीं दिलेले असत. परंतु या गोष्टीकडे राजांनीं मुद्दाम दुर्लक्ष केलें, त्यामुळें पार्लमेंटनें कित्येक वेळां ज्यांत राजास हक्क नाहीं अशा ठरविलेल्या बाबींतही ढवळाढवळ करून आपणांस त्यांत हक्क आहे, असें म्हणण्यास ते कमी करीत नसत. आणि असें करितांना लोकपक्षानें कितीही विरोध केला तरी त्याची ते पर्वा करीत नसत. मक्ते देऊन किंवा कर बसवून व्यापाराचें नियंत्रण करण्याच्या हक्काचा उपयोग कर व मक्ते यांपासून उत्पन्न काढण्याकडेच ते करूं लागले. उत्पन्नाकरितां नवेच कर बसविण्यासही त्यांनीं कमी केलें नाहीं. राजद्रोही मनुष्यास बंदींत टाकण्याच्या हक्काचा उपयोग आपल्यावर टीका करणाऱ्या लोकांचीं तोंडें बंद करण्याकडे होऊं लागला. माफी देण्याच्या हक्काचा उपयोग व्यक्तीपुरताच करावयाचा असे; परंतु तो लोकसमुदायास माफी देण्याकडे करण्यांत येऊं लागला व अशा तऱ्हेनें पार्लमेंटचे ठराव असून नसल्यासारखे होऊं लागले. याचा परिणाम असा झाला कीं, राजा व पार्लमेंट यांजमध्यें तेढ उत्पन्न झाली, आणि राजाच्या हक्कावर कांहीं स्पष्ट निर्बंध घालण्यासाठीं पार्लमेंट झगडलें.

७ **राजा कीं पार्लमेंट**---ज्या वेळीं पहिला टथूडर राजा सातवा हेन्री गादीवर आला त्या वेळीं इंग्लंडची स्थिति अगदीं हलाखीची झाली होती. यादवीमुळें देशांत अस्वस्थता माजली होती व सर्व लोक चिंतेंत चूर होते. अशा वेळीं टथूडर राजांसारखे कर्तबगार राजे इंग्लंडला लाभले व त्यांनीं चोहोंकडे शांतता व स्वास्थ्य यांचा अंमल बसविला, यांत आपलें हितच झालें असें इंग्रजांस वाटलें यांत नवल नाहीं. शिवाय स्पेन इंग्लंडवर स्वारी करण्यास सारखा टपला असतां त्याजवर शेवटची टथूडर राणी एलिझबेथ हिनें जय मिळविला तेव्हां टथूडर राजांची कीर्ति कळ

सास चढली. अर्थातच पार्लमेंटला त्यांच्याशीं झगडण्याची कधींच बुद्धि झाली नाहीं. आतां स्टुअर्ट राजे गादीवर आले व त्यांची कारकीर्द १६८८ पर्यंत चालली. या काळांत (१६०३–१६८८) इंग्लंडला कोणीही परकीय प्रबळ शत्रु नव्हता. त्याचप्रमाणें टयूडर अंमलाखालीं अनुभविलेल्या शांततेमुळें व नवीन कल्पनांच्या प्रसारामुळें लोकांना राजाचें उगीच मिंधें रहाणें मुळींच पसंत नव्हतें. त्यामुळें स्टुअर्ट राजांसारखे हट्टी व अदूरदर्शी राजे व स्वतंत्र बाण्याचे आणि नवीन विचाराचे लोकप्रतिनिधि यांजमध्यें खटका उडणें स्वाभाविक होतें. तेव्हां राजा व पार्लमेंट यांच्यामधील तंटा हाच सतराव्या शतकांतील इंग्लंडच्या इतिहासाचा मुख्य विषय असून त्याचाच वृत्तांत या प्रकरणापासून सुरू झाला आहे. राजा श्रेष्ठ किंवा पार्लमेंट श्रेष्ठ या प्रश्नाचा निकाल या तंट्यांत लागावयाचा होता, व तो शेवटीं (१६८८ मध्यें) पार्लमेंटास अनुकूल असाच लागला हें आपणांस पुढें कळून येईल.

---

## २५ राजा व पार्लमेंट

**१ जेम्सचें व्यक्तिवर्णन**—शरिरानें जेम्स अशक्त असून चालतांना त्याचे पाय लटपटत. तोंडाच्या मानानें त्याची जीभ जास्त मोठी असून डोळ्यांतील बुबुळें गरगरा फिरविण्याची त्याला संवय असे. आपला खून होईल या भीतीनें तो जाड रजईचे कपडे अंगांत घाली. तो संकुचित मनाचा असला तरी जात्या हुशार होता. त्यानें स्कॉच शिक्षकापासून बरेंच पोकळ पांडित्य संपादन केलें होतें. त्याच्या बलावर रॅलेनें अमेरिकेंतून आणिलेल्या तंबाकूच्या धुरानें इंग्लंडची हवा दूषित होणार याकरितां तिचे निषेध करणारे लेख जेम्सनें लिहिले. याशिवाय चेटकासारख्या क्षुद्र विषयावर आणि धर्मशास्त्र व राजकारण यासारख्या

महत्त्वाच्या विषयांवर त्यानें ग्रंथ लिहिले. त्यानें कांहीं नीरस कविताही केल्या होत्या. त्याचे दोन महत्त्वाचे दोष सांगितले म्हणजे जेम्सचें व्यक्तिविषयक वर्णन पूर्ण होईल. ते दोष म्हणजे भ्याडपणा व बेमुर्वतखोरपणा. त्याचा भ्याडपणा तर इतका विलक्षण होता कीं, साऱ्या जन्मांत नागव्या तरवारीचें दर्शन त्याला सहन झालें नाहीं; व त्याचा ताठा तर इतक्या थराला गेला होता कीं ईश्वर व राजा हे सारखेच निर्दोष व सकलगुणमंडित आहेत अशी त्यानें आपली समजूत करून घेतली होती. सशक्त, कर्तृत्ववान् व व्यवहारकुशल अशा ट्यूडर राजांच्या गादीवर जेम्ससारखा दुबळा, कर्तृत्वशून्य व वृथा गर्व वाहणारा राजा आला ही गोष्ट ध्यानांत ठेविली म्हणजे पार्लमेंट व राजा या दोघांमध्यें माजलेल्या तंट्याचा बराच उलगडा होतो.

**२ पहिली पार्लमेंट (१६०४–१६१०)**—जेम्सनें १६०४ सालीं पहिली पार्लमेंट बोलाविली. तिनें 'राजा हा ईश्वरी अंश आहे' या तत्त्वाचा जोरानें निषेध केला. सभासद निवडतांना मतदारांस राजानें अशी सूचना केली होती कीं, सरकारनें न्यायबाह्य ( Outlaw ) ठरविलेल्या इसमास किंवा धार्मिक बाबतींत जहाल पंथाच्या इसमास निवडूं नये ! तथापि बकिंगहॅमशायर परगण्यातर्फे गुड्विन नांवाच्या न्यायबाह्य इसमाचीच निवडणूक झाली. तेव्हां सरकारनें मतदारांस फिरून निवडणूक करण्याचा हुकूम केला. कॉमन्सनीं या हुकुमाचा जोरानें निषेध केला, व राजानेंही त्यांचें म्हणणें मान्य केलें. त्यामुळें यापुढें निवडणुकीसंबंधाचे प्रश्न निघाल्यास त्यांचें निराकरण लोकसभेनेंच करावयाचें ही पद्धति कायम झाली व हा एक लोकसभेचा हक्क होऊन बसला. पार्लमेंटच्या सभासदांचा दुसरा एक हक्क याच वेळीं बजाविण्यांत

---

१ निवडणुकीसंबंधीं भानगड उपस्थित झाल्यास त्याचा निकाल लोकसभेनेंच करावयाचा ही पद्धति १८७८ पर्यंत चालू होती. परंतु तेव्हांपासून दोन हायकोर्ट जज्जांकडे हें काम सोंपविण्यांत आलें आहे.

आला. पार्लमेंटच्या कोणत्याही सभासदास शांतताभंग व राजद्रोह अशासारख्या भयंकर गुन्ह्यांखेरीज इतर कोणत्याही सबबींवर पोलिसनीं पकडावयाचें नाहीं असा तो हक्क होय. पूर्वी इंग्लंडमध्यें एकाद्या माणसास खूप कर्ज झालें कीं, त्यासाठीं त्याजवर दावा लावून त्यास तुरुंगांत टाकीत. त्याप्रमाणें शरले नांवाच्या एका पार्लमेंटच्या सभासदास कर्जासाठीं तुरुंगांत ठेविण्यांत आलें. त्या वेळीं लोकसभेनें चिकाटी धरून सभासदांस भयंकर गुन्ह्याखेरीज इतर सबबीवरून पकडावयाचें नाहीं हें तत्त्व सरकारास अंमलांत आणावयास लाविलें (१६०४).

३ **वसुलाविषयीं वाद**—जेम्सचा दरबारी खर्च अवाढव्य होता. त्याच्या उत्पन्नाच्या मुख्य बाबी म्हणजे राजाच्या तोडलेल्या जमिनी, सरंजामी नजराणे व कॉमन्सनीं राजास यावज्जीव वसूल करण्यास परवानगी दिलेला टनेज व पौंडेज हा कर या होत्या. टनेज व पौंडेज हा कर आयात व निर्गत मालावर घ्यावयाचा असे. टनेज हा कर आयात होणाऱ्या अगर निर्गत होणाऱ्या एक टन दारूवर एक शिलिंगापासून तीन शिलिंगांपर्यंत पडे व पौंडेज म्हणजे इतर सुक्या मालावर सहा पेन्सांपासून एक शिलिंगापर्यंत घ्यावयाचा असे. या करांचे नक्की दर कायम ठरले असून एका पुस्तकांत नमूद होते. तथापि राजानें आपलें उत्पन्न वाढविण्याकरितां कांहीं पदार्थांवरील दर वाढविले. हें कृत्य पार्लमेंटच्या संमतीशिवाय केलें असल्यानें कोणासच पसंत नव्हतें. व्यापारी लोक असंतुष्ट झाले व एका बेट्स नांवाच्या व्यापाऱ्यानें मनुकांवरील कर देण्याचें साफ नाकारिलें. त्याजवर खटला झाला व न्यायाधीश राजाचे मिंधे असल्यामुळें त्यांनीं बेट्सविरुद्ध निकाल दिला ( १६०७ ). याचा परिणाम असा झाला कीं, बहुतेक सर्व पदार्थांवर जादा जकात बसविण्यांत आली व राजाचें उत्पन्न मनस्वी वाढलें. परंतु लोकसभेनें (Commons) मात्र या जादा करांविरुद्ध पुढें सारखी ओरड चालू ठेविली. कारण उघडच आहे कीं, राजानें काढिलेल्या या युक्तीमुळें सरकारच्या कर बसविण्याच्या अधिकारावर त्यांची चालणारी हुकमत अगदीं फोल व्हावयाची, हें त्यांच्या सहज लक्षांत आलें. जेम्सचा खर्च उधळपट्टीचा असल्यामुळें

१६१० सालीं त्यानें पार्लमेंटपाशीं आणखी पैशाची मागणी केली. तेव्हां 'आमचीं दुःखें दूर करा मग देणगी मिळेल' असें निर्भीडपणाचें उत्तर लोकसभेनें दिलें व आपण स्वतंत्र असल्याचें प्रस्थापित केलें. झालें! जेम्सचें पित्त खवळलें व त्यानें पार्लमेंट बरखास्त करून टाकिली. तीन वर्षे गेल्यावर देणगी मागण्यासाठीं १६१४ सालीं त्यानें दुसरी पार्लमेंट बोलाविली; पण 'दुःखें दूर केलीं म्हणजे देणग्या मिळतील' या पूर्वी अंगिकारलेल्या तत्त्वाबरहुकूमच देणग्या देऊं, असें कॉमन्सनीं ठांसून सांगितल्यामुळें व कांहीं केलें तरी या निश्चयापासून न ढळण्याची त्यांची प्रवृत्ति दिसून आल्यामुळें जेम्स रागावला आणि या पार्लमेंटनें एकही बिल पास करण्यापूर्वीच ती बरखास्त करण्यांत आली. यावरून पार्लमेंटच्या शत्रूंनीं तिला वंध्या पार्लमेंट असें नांव दिलें, परंतु असें म्हणण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण आमच्या हक्कांना योग्य मान द्या म्हणजे आम्ही देणग्या देऊं या लोकसत्ताक राज्यपद्धतींतील आद्य तत्त्वाचा निर्भीडपणें पुनरुच्चार करण्यांत कॉमन्सनीं जो निग्रह दाखविला हें त्यांनीं थोडें काम केलें नाहीं.

४ जॉर्ज व्हिलिअर्स—यापुढें सात वर्षेपर्यंत (इ. स. १६१४ ते १६२१) जेम्सनें पार्लमेंटच बोलाविली नाहीं. १६१२ सालीं एलिझबेथच्या वेळेपासून असलेला कर्तृत्ववान् प्रधान सेसिल वारला. या मुत्सद्यानें राज्याचा थोडा तरी बोज राखला होता. तो एलिझबेथच्या वेळचा असल्यानें, स्पेनशीं शत्रुत्व आलें तरी हरकत नाहीं, प्रॉटेस्टंटांशीं सहकारित्व करावयाचें हें धोरण त्यानें चालविलें होतें; व त्यास अनुसरून त्यानें जेम्सची मुलगी एलिझबेथ हिचा जर्मनींतील पॅलॅटिनेटचा संस्थानिक फ्रेडरिक या प्रॉटेस्टंट राजपुत्राशीं विवाह लावून दिला होता. परंतु सेसिलचें हें धोरण राखलें गेलें नाहीं; व इंग्लिश राष्ट्रास अप्रिय असलेलें स्पेनशीं सख्य जोडण्याचें धोरण जेम्सनें स्वीकारिलें. सेसिलच्या मृत्यूनंतर जॉर्ज व्हिलिअर्स या नांवाच्या गृहस्थास ड्यूक ऑफ बकिंगहॅम ही पदवी देऊन जेम्सनें त्याच्यावर राज्यकारभार सोंपविला. त्यानें मक्तेदारांस मक्ते देतांना इतका लांच उपटला कीं, तो अवघ्या एका

वर्षांत लक्षाधीश झाला. तो राजाचा आवडता असल्यामुळें पदव्या काय, बड्या बड्या जागा काय, किंवा इतर देणग्या काय, मिळवून देणें त्याला अत्यंत सुलभ असे यामुळें त्याला पुष्कळच साथीदार मिळूं लागले, व उमरावांची सभा ( हाऊस ऑफ लॉर्ड्स ) तर त्याची अगदीं अंकित होऊन गेली. राजाला पैसा मिळवून देण्यासाठीं एकाद्या छोट्या जमीनदाराला बॅरोनेट[1] ही पदवी द्यावयाची अगर बॅरनला अर्ल करावयाचें व या नकली देणगीबद्दल चमचमीत देणगी उपटावयाची असा त्याचा क्रम असे.

**५ सावळागोंधळ**–सर एड्वर्ड कोक नांवाचा स्वतंत्र बाण्याचा पुरुष मुख्य न्यायाधिशाच्या जागेवर होता, त्यास बडतर्फ करण्यांत आलें ( इ. स. १६१६ ). त्याचा प्रतिस्पर्धी प्रसिद्ध लॉर्ड बेकन यास बाकिंगहॅमनेंच लॉर्ड चॅन्सेलरची ( न्यायाधीश ) जागा मिळवून दिली ( १६१८ ); व हा पंडित आपलें सर्व ज्ञान बाजूस ठेवून खुशाल लांच खात असे. या वेळीं जेम्स किती दंडेलीनें वागत होता याचें ठळक उदाहरण म्हणजे रॅलेची फांशी हें होय. १६०३ मधील कटांत सामील असल्याबद्दल रॅलेस तुरुंगांत टाकल्याची हकीकत मागें आलीच आहे.

---

१ एलिझबेथच्या कारकीर्दीच्या शेवटीं आयर्लंडांत सुरू झालेलीं बंडें पुरीं शमलीं नव्हतीं; व शेवटीं पहिल्या जेम्सनें १६०८ त उत्तरेकडील अल्स्टर परगण्यांतील जमीन जप्त करून ती इंग्लिश व स्कॉटिश वसाहतवाल्यांस वांटून दि ी. लंडन शहरास कांहीं जमीन मिळून तेथें लंडनडेरी हें ठाणें वसलें ! या नवीन वसाहतीचें रक्षण करण्यास पैसे पाहिजे होते. ते मिळविण्यास जेम्सनें बॅरोनेट ही पदवी काढिली व १००० पौंड घेऊन तिचें दान करण्यास सुरवात केली. बॅरोनेट व नाइट या पदव्यांत फरक असा कीं, पहिली वंशपरंपरा असून दुसरी केवळ एका व्यक्तीपुरती असून ती तिच्या हयातीपर्यंत चालते. या दोन्ही पदवीवाल्यांना सर हा किताब आपल्या नांवामागें लावितां येतो, हें खरें असलें तरी बॅरोनेटचा दर्जा नाइटपेक्षां श्रेष्ठ असतो. तथापि बॅरोनेट झाला तरी लॉर्डाहून कमी प्रतीचा हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

तेव्हांपासून तो तुरुंगांतच होता. मी अमेरिकेंतून तुम्हांस सोनें मिळवून देतों, असें रॅलेनें म्हटल्यावरून राजानें रॅलेस कैदेंतून सोडिलें. रॅलेनें सोनें आणण्यासाठीं अमेरिकेकडे एक मोठी सफर काढिली. पण दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यावरच त्याची व स्पॅनिश लोकांची झटापट झाली, व रॅलेस कांहींच सोनें न मिळतां तसेंच हात हालवीत इंग्लंडास परत यावें लागलें. स्पॅनिश लोकांशीं रॅलेचें विशेषच वैर होतें; व त्याचें कारण त्यानें अजिंक्य आरमाराची दुर्दशा करण्यांत उत्कृष्ट कामगिरी बजाविली होती येवढेंच नसून पूर्वीं सोनें व इतर माल यांनीं लादलेलीं स्पॅनिश जहाजें पकडून स्पेनचें त्यानें अत्यंत नुकसान केलें होतें हें होय. याहूनही स्पॅनिश लोकांच्या मनांत विशेष मत्सर उत्पन्न करण्यासारखी गोष्ट रॅलेच्या हातून झाली होती. फ्रॅन्सिस ड्रेक वगैरे लोक स्पेनचीं जहाजें लुटण्यांतच सार्थक्य मानीत; पण रॅलेची तेवढ्यावरच तृप्ति न होऊन अमेरिकेंत इंग्लिश वसाहती करून स्पेनविरुद्ध इंग्लंडचें कायमचें हित साधलें पाहिजे या मताचेंच त्यानें पहिल्यानें प्रतिपादन केलें व शंभर दीडशें लोकांच्या दोन टोळ्या १५८५ त एक व १५८७ त दुसरी, अशा अमेरिकेंत वसाहती करण्यासाठीं त्यानें पाठविल्या. आतां स्पेनच्या राजाचें सांत्वन करण्यासाठीं रॅलेवर पंधरा वर्षांपूर्वींच्या कटांत सामील असल्याचा आरोप ठेवून जेम्सनें त्यास यमसदनास पाठविलें ( १६१८ ). या कृत्यांत जेम्सचा असा गर्भित हेतु होता कीं, स्पेनच्या राजानें या कृत्यानें संतुष्ट होऊन आपला मुलगा चार्लस यास आपली मुलगी देण्यास तयार व्हावें.

**६ तिसऱ्या पार्लमेंटास सुरुवात**—अशा रीतीनें स्वच्छंदानें राज्यकारभार चालला असतां १६२१ त राजास फिरून पैशाची टंचाई भासूं लागली व पैसा मागण्यासाठीं त्यानें तिसरी पार्लमेंट बोलाविली. याच वेळीं जर्मनींतील प्रॉटेस्टंट व रोमन क्याथॉलिक संस्थानांमध्यें युद्ध चाललें होतें. तें तीस वर्षेंपर्यंत ( १६१८–१६४८ ) चालू होतें म्हणून त्यास 'त्रिंशद्वार्षिक युद्ध' म्हणतात. त्यांत प्रॉटेस्टंट बाजूनें जेम्सचा जांवई

ऱ्हाईन नदीच्या खोऱ्यांतील पॅलॅटिनेट प्रांताचा संस्थानिक फ्रेडरिक हा लढत होता. त्यास मदत करण्यासाठीं कॉमन्सनीं कांहीं पैसा मंजूर केला. परंतु जेम्स भित्रा असल्यामुळें जांवयाच्या बाजूनें युद्ध पुकारण्याचें धैर्य त्याला झालें नाहीं. मग बकिंगहॅमच्या मक्तेपद्धतीवर कॉमन्सनीं जोराचा हल्ला केला· हा हल्ला इतका बिनचूक व जोरदार होता कीं, राजानें सर्व मक्ते रद्द केले. पुढें लोकसभेनें लॉर्ड बेकन याजवर न्यायाधिशाचें काम करीत असतां पक्षकारांपासून जबर लांच उकळल्याचा आरोप ठेविला व त्याची चौकशी (Impeachsment) आरंभिली. लॉर्डांनीं त्यास दोषी ठरविलें. 'न्यायाधीश महाराज, या फुटक्या वेणूवर ( Broken reed ) आपण दया करावी अशी माझी आपणास नम्र प्रार्थना आहे,' अशा तऱ्हेनें बेकननें दया भाकिली. परंतु राजाच्या हातांतील बाहुलें बनून बेकननें केलेल्या अपराधाकडे पाहतां त्याजवर दया करणें अशक्य होतें. लॉर्डांनी त्याला ४०,००० पौंड दंड ठोठाविला व तुरुंगवासाची शिक्षा फर्माविली. परंतु राजानें मध्यें पडून त्याचा दंड माफ केला, आणि थोड्या दिवसांच्या तुरुंगवासानंतर त्यास सोडून देण्यांत आलें.

**७ स्पेनच्या राजकन्येशीं लग्न**— जेम्स आपला जांवई फ्रेडरिक यास मदत करीत नाहीं असें पाहून क्याथॉलिक-पक्षपाती स्पेननें फ्रेडरिकचा पॅलॅटिनेट प्रांत व्यापला. तेव्हां फ्रेडरिकला कांहींच आधार राहिला नाहीं. अशा वेळीं आपल्या जांवयास संकटांतून सोडविण्याची जेम्सनें एक अजब युक्ति काढिली. त्यानें आपला मुलगा चार्लस याचें स्पेनच्या राजकन्येशीं लग्न जुळविण्याचें बोलणें सुरू केलें ( १६२२ ). हा विवाह झाला कीं, स्पेन युद्धांतून आपलें अंग काढून घेईल व शांततेच्या मार्गानें आपला जांवई संकटांतून मोकळा होईल अशी जेम्सची कल्पना होती ! परंतु स्पेनची राजकन्या रोमन क्याथॉलिक असल्यामुळें हा विवाह इंग्लंडांत लोकप्रिय होणें शक्य नव्हतें. शिवाय स्पेन क्याथॉलिक असल्यामुळें तिच्याशीं शांतपणानें न वागतां तिला क्याथॉलिक पक्षांतून फोडण्यास तिजशीं युद्ध केलें पाहिजे असेंच इंग्लंडांतील लोकमत

होतें. पार्लमेंटचे कित्येक सभासद या प्रश्नासंबंधीं पार्लमेंटांत चर्चा करूं लागले. राजास हें न आवडून त्यानें हा माझा घरगुती प्रश्न आहे तेव्हां यावर चर्चा करण्याचा पार्लमेंटास अधिकार नाहीं असें फर्माविलें. यावर कॉमन्सनीं दबून न जातां, 'राष्ट्र, राष्ट्राचें संरक्षण, धर्म, कायदे व सार्वजनिक दुःखें हेच आमचे चर्चा करण्याचे योग्य विषय आहेत' असा ठराव पास केला. हें पाहून राजा चिडून गेला व त्यानें स्वतः कॉमन्सच्या सभागृहांत जाऊन आपल्या हातानें पार्लमेंटच्या दप्तरांतून हा ठराव ज्यांवर लिहिला होता ते कागद फाडून टाकिले (१६२२)! पुढें जेम्सचीं स्पॅनिश दरबाराशीं विवाहासंबंधीं बोलणीं होऊं लागलीं. परंतु अटी जमतना. तेव्हां जेम्सनें विवाह जमवून आणण्याची एक खाशी युक्ति काढिली. कादंबरींतील अद्‌भुत वर्णनें असतात त्याप्रमाणें राजपुत्र चार्लस यानें मंत्रि बकिंगहॅम याजबरोबर खोट्या दाढीमिशा लावून, आपल्या शृंगारचेष्टांनीं स्पॅनिश राजकन्येचें मन मोहून टाकण्यासाठीं स्पेनला जावें असें ठरलें; व प्रेम-संपादन पूर्ण झालें कीं, विवाहास कांहींच उशीर लागणार नाहीं असेंही भाकीत करण्यांत आलें. राजपुत्र चार्लस ठरल्याप्रमाणें आपल्या दैवाची पारख करण्यास स्पेनला गेला. तेथें त्याचा आदरसत्कार झाला. पण प्रेमसंपादनाच्या कामीं दुर्दैवानें त्यास अपयश आलें; व राजपुत्र आणि मंत्रि इंग्लंडला परत आले तेव्हां इतके चिडून गेले होते कीं, स्पेनच्या अपराधाचें शासन तिच्याशीं युद्ध करूनच केलें पाहिजे असे क्रोधोद्गार त्यांचे तोंडून निघाले! क्यार्थॉलिक स्पेनशीं युद्ध करावें हें मत जनतेस प्रिय असल्यानें बकिंगहॅमसारखा कर्तृत्वशून्य व हांजी हांजी करणारा मन्त्रिही त्या वेळीं लोकप्रिय झाला! (१६२४).

८ **जेम्सचा मृत्यु**—पार्लमेंटच्या सुदैवानें स्पेनशीं चाललेलीं विवाहाचीं बोलणीं फुकट गेलीं व स्पेनच्या राजकन्येशीं चार्लसचा विवाह झाला नाहीं. आतां बकिंगहॅमनें चिडून जाऊन स्पेनशीं युद्ध करणाऱ्या फ्रान्सच्या राजाची मुलगी हेन्रीएटा मराया हिशीं चार्लसचा विवाह जमवून आणण्याची खटपट चालविली, व इंग्लंडनें क्यार्थॉलिक धर्माविषयीं औदार्याचें धोरण स्वीकारावें या अटीवर तो विवाह निश्चित करण्यांत

आला. यापुढें जेम्स फार दिवस वांचला नाहीं. आळस, दारू व खादाड-
पणा या त्रयीचा जेम्स कायमचा अंकित असल्यामुळें त्यास लवकरच
( १६२५ ) मृत्यु आला. राजाची इच्छा हीच राष्ट्रांतील सर्वांत मोठी
शक्ति असून तिच्यापुढें बाकीच्या सर्व शक्ति तुच्छ होत हा मंत्र त्यानें
आपल्या राज्याचा वारस जो वडील मुलगा चार्लस यास सांगून ठेविला.
परंतु प्रजेची इच्छा हीच श्रेष्ठ होय हा मंत्र जपण्यास पार्लमेंटनें नुक्तीच
सुरवात केली असल्यामुळें या दोघांत खटका उडणें साहजिक होतें.

---

## २६ तंटा चालू राहिला.

१ **पहिला चार्लस**—जेम्स वारल्यावर त्याचा वडील मुलगा चार्लस हा गादीवर आला. तो खाजगी बाबतींत सभ्यपणानें वागत असे. परंतु राजा या नात्यानें प्रजेशीं त्याचें जें वर्तन होतें तें याच्या अगदीं उलट म्हणजे उद्दामपणाचें असे. खाजगी व्यक्ति या नात्यानें आपण सत्य, न्याय, नीति यांनीं बांधले गेलों असून ' राजे ' या नात्यानें मात्र आपण या सर्व बंधनांपासून अलिप्त आहों अशी चार्लसची अनिष्ट समजूतच या विलक्षण तफावतीच्या बुडाशीं होती.

२ **स्पेनशीं युद्ध**—चार्लसचें फ्रेंच राजकन्या हेन्रीएटा मराया हिशीं लग्न जमवून आणिलें तेव्हां स्पेनच्याविरुद्ध फ्रान्सतर्फे आपण लढाई करूं असें बकिंगहॅमनें कबूल केलें होतें. त्या ठरावाप्रमाणें चार्लसच्या कारकीर्दीच्या पहिल्याच वर्षी ( १६२५ ) स्पेनशीं लढाई सुरू झाली. अमेरिकन खाणींतील सोनें लादलेलीं जहाजें येत होतीं त्यांस गांठून पकडण्यासाठीं स्पेनच्या किनाऱ्यावरील कॅडिझ बंदराकडे इंग्रजी आरमाराचा एक काफिला पाठविण्यांत आला. पहिल्या जेम्सचें उत्पन्न जरी पुष्कळ होतें तरी त्याच्या उधळपट्टीमुळें खजिना बहुतेक रिकामाच होता.

त्यामुळें लढाऊ जहाजांची तरतूद न होतां हा काफिला व्यापारी जहाजांचाच बनविण्यांत आला, व त्यावरचे खलाशी केवळ सक्तीनें कामावर आणिले होते. येवढी तुटपुंजी तयारीही 'सक्तीचें कर्ज' काढूनच करण्यांत आली. इतक्या थंडाईनें आरंभिलेलें हें कार्य कसचें नीट होणार? इंग्लंडचें आरमार केडिझ बंदर न घेतां आणि सोनें न लुटतां तसेंच रिक्त हस्तें परत आलें (१६२५).

**३ रोशेलमधील फ्रेंचांस मदत**—फ्रान्सचा राजा क्याथॉलिक होता तरी फ्रान्समधील प्रॉटेस्टंट लोकांस आपल्या मतास अनुसरून प्रार्थना करण्याचा व कांहीं स्थळांस तटबंदी करून तेथें शिबंदी ठेवण्याचाही अधिकार असे. फ्रान्सच्या प्रधानास राजसत्ता दृढ करावयाची होती. तेव्हां आपल्या देशांतील शिरजोर प्रॉटेस्टंट लोकांस नरम आणण्यासाठीं रोशेलसारख्या ठिकाणच्या प्रॉटेस्टंटांस (यांस फ्रान्सांत ह्यूगेनॉट्स म्हणत) तटबंदी करून सैन्य ठेविण्याचा हक्क होता तो त्यानें काढून घेतला. त्यावरोबर रोशेल येथील प्रॉटेस्टंट चिडले व त्यांनीं दंगा आरंभिला. फ्रेंच राजानें त्यांच्यावर सैन्य पाठविलें व रोशेलला वेढा बसला. बकिंगहॅमनें लोकप्रियता संपादन करण्याच्या आशेनें रोशेलमध्यें अडकलेल्या फ्रेंच प्रॉटेस्टंटांस मदत करण्याकरितां सैन्य पाठविलें. याही स्वारीचा खर्च, टनेज व पौंडेज हा कर बेकायदेशीरपणें वसूल करून व सक्तीचीं कर्जें लादून, करण्यांत आला. रोशेलला वेढा घालणाऱ्या फ्रेंच सैन्याच्या एका मुख्य ठाण्यास इंग्रजांनीं वेढिलें व त्याचा चांगलाच कोंडमारा केला; परंतु निर्वाणीच्या प्रसंगीं फ्रेंच लोकांनीं वेढा उठविला, व रोशेलमध्यें अडकलेल्या फ्रेंचांस मदत करण्याचा प्रयत्न निष्फळ झाला. शेवटीं निराश होऊन बकिंगहॅम इंग्लंडास परत आला

**४ पहिली पार्लमेंट**—या अवधींत राजा व पार्लमेंट यांचें भांडण सारखें चालू होतें. टनेज व पौंडेज हा कर राजास तहाहयात वसूल करण्याची परवानगी कारकिर्दीच्या आरंभीं पार्लमेंट देऊन टाकीत असे; ही चाल सुमारें दोनशें वर्षांची असून जेम्सला याप्रमाणें परवानगी

मिळाली होती. आतां चार्लसनें जी पहिली पार्लमेंट बोलाविली तिच्यांतील कॉमन्ससभेनें मात्र हा कर तहाहयात वसूल करण्याची परवानगी न देतां एका वर्षापुरतीच ती परवानगी दिली. उमरावांच्या सभेस यांत राजाचा अपमान होत आहे असें वाटून तिनें लोकसभेचा ठराव मंजूर केला नाहीं. स्पॅनिश युद्धाकरितां पार्लमेंटनें १ लक्ष ४० हजार पौंडांची देणगी मंजूर केली. पुढें स्पेनशीं लढण्यासाठीं फ्रान्सकडे पाठविलेल्या जहाजांचा उपयोग रोशेलमधील प्रॉटेस्टंटांविरुद्ध होत आहे व राजाचा फ्रेंच राजकन्येशीं विवाह झाल्यापासून क्याथॉलिकांचा सरकारदरबारीं वडेजाव होत आहे, या बातम्या कळल्यावरून लोकसभेंत तीव्र क्षोभ दिसूं लागला, व तिनें मुख्यतः बकिंगहॅमविरुद्ध जोराची टीका केली. तेव्हां राजानें पार्लमेंट बरखास्त केली. लढाईचा खर्च व राणीची चैन चालविण्यासाठीं चार्लसला सारखी पैशाची जरूर लागे; यास्तव त्यानें दुसरी पार्लमेंट बोलाविली (१६२६). पण 'पुढचा मागल्यास बरा म्हणवितो,' या म्हणीचा त्याला प्रत्यय आला. ही पार्लमेंट बोलावितांना चार्लसनें विरुद्ध पक्षास कमकुवत करण्यास एक युक्ती योजिली. प्रत्येक परगण्यांत ज्या सभासदांच्या निवडणुकी होत त्या शेरिफ या अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं होत. तेव्हां खुद्द शेरिफला पार्लमेंटचे सभासद होतां येत नसे. याचा उपयोग करून चार्लसनें बकिंगहॅमला ज्या पक्षानें पहिल्या पार्लमेंटांत विरोध केला होता त्या पक्षाच्या प्रमुख गृहस्थांस शेरीफ नेमिलें. या युक्तीनें विरुद्ध बाजूचे पुढारी बाहेर राहिल्यानें कॉमन्सचें धोरण नरम होईल असा चार्लसचा अंदाज होता. तथापि या सोवळ्या सभेंतही बकिंगहॅमवर जोरदार व कळकळीची टीका करणाऱ्या एलियट या प्रसिद्ध पुढाऱ्याचा जोर होऊन तिनें मागील सभेच्या मागण्या कायम ठेवून शिवाय राजानें प्रजेकडून सक्तीनें कर्ज घेऊं नये आणि बकिंगहॅमवरील आरोपांची चौकशी ( Impeachment ) करण्याकरितां त्याला पार्लमेंटपुढें उभें करावें असें ठरविलें. तेव्हां राजानें पार्लमेंटचे पुढारी सभासद डिग्ज व एलियट यांना राजद्रोही भाषणाच्या आरोपावरून कैदेंत टाकिलें; पार्लमेंट बरखास्त केली ( १६२६ जून ); ठिकठिकाणीं जादा सैन्य

ठेवून त्याचा खर्च प्रजेकडून घेण्यास सुरवात केली; आणि देशांत स्वस्थता असतांना लष्करी कायद्याचा अवलंब केला.

५ हक्क संरक्षणाचा अर्ज—'रोशेल' मधील प्रोटेस्टंटांस मदत करण्याकरितां फ्रान्सवर फिरून चालून जावें असा बकिंगहॅमचा मानस होता, तेव्हां पैसा पाहिजे होता. त्यासाठीं चार्लसनें (१६२८) तिसरी पार्लमेंट बोलाविली परंतु तिनें लढाईसाठीं खर्चाची मंजुरी देण्याऐवजीं आपल्या तक्रारी राजापुढें मांडण्यासाठीं एक अर्ज तयार केला. त्या अर्जांत पांच मागण्या होत्या. १ पार्लमेंटच्या संमतीखेरीज कोणत्याही प्रकारच्या 'देणग्या' अथवा कर बसवावयाचे नाहींत, २ 'असले' कर वसूल करण्यास्तव शपथ घ्यावयाला लावावयाचें नाहीं किंवा न दिल्याबद्दल तुरुंगांत टाकावयाचें नाहीं, ३ सैन्यांतील व आरमारांतील शिपायांना '[१]खाजगी' घरांत राहण्यास परवाने देऊन त्यांच्या पोषणाचें ओझें खाजगी व्यक्तींवर टाकावयाचें नाहीं, ४ शांततेच्या वेळीं लष्करी कायदा अंमलांत आणावयाचा नाहीं, ५ आरोप न सांगतां कोणासही कैदेंत टाकावयाचें नाहीं, किंवा खटला चालू न करितां आरोपीस तुरुंगांत खितपत पडूं द्यावयाचें नाहीं. राजा या वेळीं पैशाच्या इतक्या अडचणींत होता कीं, त्यानें या मागण्या तात्काल कबूल केल्या. हीं कलमें इतकीं महत्त्वाचीं आहेत कीं, इंग्लिश सनदशीर राज्यपद्धतीच्या इतिहासांत मॅग्नाचार्टाच्या खालोखाल या हक्क संरक्षणाच्या अर्जासच (Petition of Right) स्थान मिळालें आहे. आपलें म्हणणें राजानें मान्य केलें हें पाहून कॉमन्सनींही युद्धाच्या खर्चास साडेतीन लक्ष पौंडांची मंजुरी दिली. या अर्जासंबंधीं बोलतांना कॉमन्स सभेचा एक सभासद म्हणाला "एकादा किडा पायांखालीं तुडविला जात असतां जें कांहीं

१ परदेशांतील युद्धाकरितां भरती केलेले शिपायी केव्हां केव्हां परवाने घेऊन 'खाजगी' घरांतून रहात; तेव्हां घरधन्यास व इतर मंडळीस विनाकारण नुकसान व त्रास सोसावा लागे, कारण सामानाची मोडतोड करणें व उच्छृंखलपणें वागणें ही त्यांची सहज लीला असे.

मागेल त्याहून आम्ही कांहीं एक जास्त मागत नाहीं: कृपा करून मला तुडवूं नका. "

६ गाऱ्हाण्यांचा खलिता—यानंतर बकिंगहॅम स्वतः रोशेलच्या मोहिमेवर जाण्यास निघाला. परंतु पोर्टस्मथ येथें गलबतावर चढण्याच्या अगदीं तयारींत असतां पूर्वींच्या स्वारींत त्याजवर रुष्ट झालेल्या फेल्टन नांवाच्या सैन्यांतील एका अधिकाऱ्यानें त्याचा अकस्मात् खून केला! यानंतर पांच दिवसांनींच रोशेल पडलें व चार्लसचें परराष्ट्रीय धोरण सपशेल फसलें. चार्लसनें मागील सालीं तहकूब केलेली पार्लमेंट फिरून बोलाविली ( १६२९ ). तिनें टनेज् व पौंडेज्, या करावर जोराचा हल्ला केला. मार्चांत ( १६२९ ) पिम, हॅम्पडन व एलियट यांनीं गाऱ्हाण्यांचा खलिता तयार केला. राजाच्या आज्ञेवरून स्पीकर तो खलिता सभेपुढें वाचूं देईना, व तो सभा तहकूब करतों असें म्हणूं लागला. तेव्हां हॉल्झ व

१ हा कॉमन्स सभेचा मुख्य असून कॉमन्स सभेचें सर्व काम याच्या अध्यक्षतखालीं होतें. ही जागा चौदाव्या शतकापासून चालत आली आहे. नवी पार्लमेंट भरली कीं, कॉमन्स सभेचें पहिलें काम म्हटलें म्हणजे स्पीकरची निवड करणें हेंच असतें. बहुत करून पूर्वींचा स्पीकर काम चालविण्यास समर्थ असल्यास त्याचीच या जागीं पुनर्योजना होते. ट्यूडर व स्टुअर्ट राजांच्या वेळीं स्पीकरची नेमणूक करण्याचें काम अप्रत्यक्षपणें राजाच्याच हातीं असे. स्पीकरचीं कामें पुढील होत. १ कॉमन्स सभेंत वादविवाद चालला असतां व्यवस्था राखणें, २ त्या सभेचें कायमचें अध्यक्षपद स्वीकारणें. ३ कॉमन्स सभेचें काम चालू असतां एकंदरीनें सभेचा उच्च दर्जा कायम राहील अशी तजवीज राखणें. याशिवाय प्रधानमंडळाची हल्लींची पद्धत अंमलांत येण्यापूर्वीं राजा व कॉमन्स या दोघांमध्यें मध्यस्थी करण्याचें कामही स्पीकरवर पडे. वरील कामांच्या यादीवरून कॉमन्स सभेंतील बहुतेक सर्व पक्षांस मान्य असा अधिकारी आणि निःपक्षपाती गृहस्थच या जागेस कसा योग्य ठरतो हें सहज कळेल.

व्हॅलेन्टाइन यांनीं त्यास सक्तीनें तसेंच खुर्चीवर बसविलें, सभागृहाचे दरवाजे लाविले; त्यामुळें राजपुरुषांना तहकुबीची नोटीस घेऊन आंत येणें अशक्य झालें व सभासदांनाही जागेवरून हालतां आलें नाहीं. मग स्पीकर व त्याचा कारकून यांनीं ठराव वाचण्याचें नाकारल्यावरून सर जॉन एलियट यानें तो टाळ्यांच्या गजरांत वाचला. ‘ जो कोणी धर्मांत अनिष्ट फरक करण्याचा प्रयत्न करील, किंवा जो कोणी टनेज व पौंडेज हे कर कॉमन्स सभेच्या संमतीखेरीज बसविण्याचा राजास उपदेश करील अगर तसे ते बसविले असतां खुषीनें देईल, तो मनुष्य देशद्रोही असून इंग्लंडच्या स्वातंत्र्याचा शत्रु आहे, असें आम्ही समजतों. ’ असा ठराव मोठ्या उत्साहानें कॉमन्स सभेनें पास केला.

---

## २७ सुलतानी अंमल.

**१ वेंटवर्थ**—गाऱ्हाण्यांचा खलिता पास होऊन आठ दिवस झाले नाहींत तोंच राजानें पार्लमेंट बरखास्त केली. यापुढें पार्लमेंट न बोलावितां लॉड, वेंटवर्थ इत्यादि मुत्सद्द्यांच्या साहाय्यानें राज्य चालविण्याचा चार्लसनें निश्चय केला; व पुढील अकरा वर्षेपर्यंत लोकसभेस धुडकावून आपल्या मुखत्यारीवर त्यानें राज्य केलें ( १६२९–१६४० ). वेंटवर्थ हा पूर्वीं लोकपक्षाकडे होता; परंतु राज्य लोकांना हितकारक झालें म्हणजे झालें, मग लोकसभेच्या तंत्रानेंच चालण्याची कांहीं गरज नाहीं असें त्याचें मत पडून इतर पुढाऱ्यांशीं त्याचा मतभेद झाला व तो राजास मिळाला. त्यास राजानें लॉर्ड स्ट्रॅफर्ड बनविलें !

**२ पार्लमेंटचा जोर**—या वेळीं पार्लमेंट सभेस अशा रीतीनें मूठमाती देऊन राज्यकारभार करणें चार्लसला सोईचें वाटलें हें खरें; पण असें करण्यांत त्याची मोठी चूक झाली. पहिल्यानें पार्लमेंट स्थापन

झाली तेव्हां ती राजेलोकांची मिंधी असे, असें म्हटल्यास चालेल. परंतु आतां तिचें स्वरूप पूर्णपणें पालटून गेलें होतें. ट्यूडर राजांचे वेळींच पार्लमेंट म्हणजे कस्पटासमान असें मानणें बरोबर नाहीं ही गोष्ट स्पष्टपणें दिसूं लागली होती; व एलिझबेथ राणीनें ही गोष्ट ओळखून मक्त्याच्या प्रश्नावर पार्लमेंटला अनुकूल निकाल दिला. राष्ट्रांत जागृति झाली असून चार्लस गादीवर आल्यावर अवघ्या चार वर्षांत पार्लमेंटच्या तीन निवडणुकी झाल्या; व त्या वेळीं पूर्वीं कधींही दिसून न आलेली दंगल उडून गेली होती. पार्लमेंट म्हणजे आपल्या सत्तेची बाब होय व तिचा सभासद असण्याचा मान मिळावा म्हणून सर्व देशभर वजनदार लोकांची खटपट असे. एकाद्या क्षुल्लक खेड्यातर्फे कां होईना आपण सभासद निवडून यावें असें कर्त्या पुरुषांस वाटूं लागलें होतें. अशा वेळीं कोणाही शहाण्या व स्वहितदक्ष राजानें पार्लमेंटला कधीं धाक दाखवून तर कधीं चुचकारून आपल्या ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न केला असता तर त्यास कांहीं तरी यश येण्याचा संभव होता; पण तिच्याशीं उभा दावा मांडून शेवटीं तिला अजिबात मूठमाती देण्याचा चार्लसनें केलेला विचार मात्र अत्यंत असमंजस होता.

**३ एलियटचा तुरुंगवास व अंत**—पार्लमेंट बरखास्त केल्यानंतर थोड्या दिवसांनीं राजानें एलियट आदिकरून नऊ पुढाऱ्यांस तुरुंगांत टाकिलें. त्यांनीं कोर्टांत आमची चौकशी व्हावी अशी न्यायाधिशांकडे मागणी केली; तिचा कांहींही उपयोग झाला नाहीं. इतरांनीं सरकारची माफी मागून आपली सुटका करून घेतली. एलियट मात्र तुरुंगवास मोठ्या धैर्यानें तसाच रुहन करीत राहिला. तो आजारी पडला तेव्हां त्यानें प्रकृति सुधारण्यासाठीं आपल्या परगण्यांत आपणास नेण्यांत यावें अशी विनंति केली. पण ती मान्य झाली नाहीं व त्याचा तुरुंगांतच अंत झाला. तो वारल्यानंतर त्याचें शव पुरण्यास आपल्या हातीं यावें अशी त्याच्या नातलगांनीं सरकारास विनंति केली. पण चार्लसनें हें मागणें मान्य केलें नाहीं व एलियटास तुरुंगांतच पुरण्यांत आलें.

**४ स्ट्रॅफर्डची चोख व्यवस्था**—या अकरा वर्षांच्या काळांत

वेंटवर्थ ( स्टॅफर्ड ) व लॉड हेच राजाचे मुख्य सल्लागार होते. वेंटवर्थ हा मोठा हुशार असून धोरणी होता. त्यानें तेव्हांच ताडलें कीं, राजा जो पेंचांत येतो व त्याला पार्लमेंटची जी कांस धरावी लागते त्याचें कारण 'उत्पन्न थोडें व खर्च फार' हेंच होय. तेव्हां त्यानें काटकसरीचें धोरण स्वीकारलें. कर–वसुलीच्या खात्यांत अत्यंत गोंधळ असल्याचें त्याला आढळून आलें; तेव्हां त्यानें त्या खात्यांतील गोंधळ मोडून नवीन व्यवस्था केली; व या मार्गानें एकही नवा कर न बसवितां केवळ कर गोळा करण्याच्या चोख व्यवस्थेनें त्यानें सरकारी उत्पन्न पुष्कळ वाढविलें. काटकसर करितांना सरकारी बाबतींत त्यास ती सहज करतां आली. पण राजाचे खर्च, राणीचे उधळेपणानें व ऐषआरामी डामडौलानें अत्यंत फुगले होते; ते कमी करण्यांत स्टॅफर्डला यश आलें नाहीं. इतकेंच नव्हे तर राणीचें शत्रुत्व त्यास पत्करावें लागलें, व याच कारणानें शेवटीं त्याची आयर्लंडांत रवानगी झाली ( १६३३ )! तेथें थोड्याच दिवसांत निरंकुश सत्ता जर हुशार पुरुषाचे हातीं आली तर तो कोणकोणते चमत्कार करूं शकतो याचें त्यानें उत्तम प्रदर्शन केलें. त्यानें प्रत्येक खातें सुधारिलें. तागाच्या कापडाचा धंदा ऊर्जितावस्थेस आणिला. पुष्कळ नवी जमीन सरकारच्या ताब्यांत आणिली; आणि सैन्यांत शिस्त आणून त्याचें सामर्थ्य वाढविलें. या सर्व गोष्टींनीं त्यानें आयर्लंडचें हित साधिलें हें खरें; पण लोकहित साधलें म्हणजे झालें मग लोकमताची पर्वा करण्याचें कारण नाहीं, अशी वेंटवर्थची उत्तम राज्यकारभारासंबंधीं कल्पना असल्यामुळें त्यानें आयरिश लोकमत कसें आहे इकडे लक्ष दिलें नाहीं. यामुळें त्याचा कडक राज्यकारभार आयरिश लोकांस जाचक होऊन भावी अस्वस्थतेचीं बीजें आयर्लंडांत पेरिलीं गेलीं.

५ **जाचक करवसुली**—इकडे चार्लसचा खर्च एकसारखा वाढतच होता. शेवटीं तर तो इतका वाढला कीं, जेम्सच्या खर्चाच्या तिप्पट व एलिझबेथच्या दसपटीबरोबर तो झाला. अर्थातच इतका खर्च राजास तोडून दिलेल्या जमिनी, सरंजामीचे हक्क, कोर्टांतील दंड इत्यादि नेह-

मींच्या वसूल बाबींतून भागणें शक्य नव्हतें. तेव्हां आणखी वसूलबाबी शोधून काढून नवीन कर अमलांत आणणें जरूर झालें. १६२८ तील ' हक्क संरक्षणाचा अर्ज ' या पार्लमेंटच्या कायद्याचा प्रतिबंध बाजूस सारून चार्लसनें टनेज व पौंडेज या करांचा वसूल अप्रतिहत चालविला होताच. वसूल वाढविण्यासाठीं ज्या युक्त्या चार्लसनें योजिल्या त्यांतील एक अशी होती कीं, अंमलांतून गेलेले जुनेपुराणे कायदे अंमलात आणावयाचे व त्यांच्या आधारावर वसूल करावयाचा. चाळीस पौंडांइतक्या वार्षिक साऱ्याची जमीन ज्याच्या मालकीची असेल त्यानें नाइट ही पदवी ग्रहण केलीच पाहिजे असा एक जुना कायदा होता. तो सक्तीनें अंमलांत आणण्याचें चार्लसनें ठरविलें. चाळीस पौंडांइतकें ज्यांचें जमिनीचें उत्पन्न असेल त्यांजवर ' नाइट ' ही पदवी जबरीनें लादावयाची व मग सरंजाम पद्धतीप्रमाणें त्यांजपासून कर उकळावयाचे! एकाद्याच्या मनांत नाइट होण्याचें नसेल तर त्यानें जबर दंड भरावा व पदवीपासून आपली सुटका करून घ्यावी! अशा रीतीनें दुधारी तरवारीप्रमाणें याचा दुहेरी उपयोग झाला. नॉर्मन वुइल्यमनें पुष्कळशी जमीन आपल्या ताब्यांत घेऊन तीवर शिकारीसाठीं अरण्यें राखल्याचें प्रसिद्धच आहे. पण अँजेव्हिन घराण्याच्या काळीं व त्यापुढील राजे लोकांनीं दुर्लक्ष केल्यामुळें या अरण्यांपैकीं बरीच जमीन सरदारांनीं आपल्या ताब्यांत घेतली होती. या कारणानें अरण्यें अगदींच संपुष्टांत आलीं होतीं. तेव्हां अरण्यांचा आकार पूर्वीइतका करण्याचा चार्लसनें बेत केला. सरदारांनीं ज्या जमिनी घेतल्या होत्या त्या त्यांजपासून परत घ्यावयाच्या अगर त्यांस जबर दंड ठोठावावयाचा हा क्रम सुरू झाला; व थोड्याच वेळांत अरण्यांचा आकार बराच वाढला; आणि दंडाच्या रूपानें खजिन्यांत बरीच भर पडली. तथापि या व्यवस्थेनें सरदार लोक चिडून गेले. एसेक्सच्या अर्लच्या मिळकतीपैकीं बराच मोठा भाग जप्त होऊन तो राजाविरुद्ध खूप खवळून गेला. अशा रीतीनें उत्पन्नाच्या मागें लागून देशांतील श्रीमंत अशा सरदार वर्गास राजानें दुखविलें.

**५ सर्व लोकांस दुखविलें**—सामान्यतः राज्यकर्त्यांचें असें

धोरण असावें लागतें कीं, एका वर्गास त्यांनीं दुखविल्यास दुसऱ्या वर्गास सुखांत ठेवून सर्वच प्रजा आपल्याविरुद्ध क्षुब्ध होणार नाहीं अशी व्यवस्था ठेवावी लागते. या तत्त्वाकडे दुर्लक्ष करून चार्लसनें सर्व वर्गांच्या लोकांस असंतुष्ट केलें. व्यापारी, छोटे जमीनदार व बडे जमीनदार या वर्गांचीं मनें त्यानें कशीं दुखविलीं हें पूर्वीं सांगितलेंच आहे. एलिझबेथच्या वेळीं एका कायद्यानें असें फर्माविण्यांत आलें होतें कीं, लंडनमध्यें जास्त घरें बांधूं नयेत. या जुन्या कायद्याच्या आधारावर लंडनमध्यें घरें बांधणाऱ्या कित्येक गृहस्थांस दंड करण्यांत आले. त्याच्या उलट आपल्या शेतवाडीवरील घरें पाडणाऱ्या कित्येक लोकांस दंड झाले. चार्लसनें लंडनच्या म्युनिसिपालिटीवर शस्त्र उचललें व पहिल्या जेम्सच्या वेळीं तिच्या ताब्यांत आयर्लंडमधील अल्स्टर परगण्यांतील जो कांहीं भाग देण्यांत आला होता त्याचा तिनें व्यवस्थितपणें उपयोग केला नाहीं, या सबबीवर तो तिजकडून जप्त करण्यांत आला. अव्यवस्था झाली हें खरें असलें तरी म्युनिसिपालिटीस दिलेली एक मोठी देणगी तिजकडून हिरावून घेऊन त्या श्रीमंत नगरवासीयांस दुखविणें अगदी गैर होतें. खाणावळवाल्यांना दारूवर एक नवा कर देण्याविषयीं हुकूम झाला; व ते जेव्हां तो मानीतना तेव्हां कोणतेंही मांस शिजविण्याची बंदी करून त्यांस तो देण्यास भाग पाडण्यांत आलें. उत्पन्न वाढविण्यास चार्लसनें ज्या साधनांचा उपयोग केला त्यांत मक्ते हें एक होतें. कोणाही व्यक्तीस व्यापारासंबंधीं मक्ते द्यावयाचे नाहींत असा १६२४ सालीं एक कायदा झाला होता. त्या कायद्याचा अर्थ काटेकोर रीतीनें असा करण्यांत आला कीं, व्यक्तीस तेवढे मक्ते द्यावयाचे नाहींत, मंडळ्यांस दिले तरी चालतील. राजाला असें वाटत होतें कीं, निरनिराळ्या पदार्थांचे मक्ते दिले कीं, चांगल्या पदार्थांची पैदास विशेष होईल. या सबबीवर त्यानें मंडळ्यांस मक्ते दिले. चार्लसचा अंदाज खोटा ठरला; कारण मक्तेवाले किंमती मात्र भारी ठेवीत व माल कसासाच असे. शिवाय साबण, पिण्याची दारू व बंदुकीची दारू इत्यादि सामान्य पदार्थांची व्यवस्था मक्तेवाल्यांकडे गेल्यानें छोटे व्यापारी व गिऱ्हाईक या दोन्ही वर्गांत असंतोष माजला.

**६ कोर्टांचा जुलूम**—अशा तऱ्हेनें जाचक करांनीं पीडलेल्या प्रजेस कडक न्यायमंदिरांकडून शांत ठेविण्याचा जोराचा प्रयत्न सुरूच होता. स्टार चेंबर कोर्ट हें कर न देऊन अथवा टीका करून सरकार-विरुद्ध जाणाऱ्या लोकांचा समाचार घेण्यास सज्ज होतें, तर एलिझबेथ राणीच्या वेळीं स्थापण्यांत आलेलें हाय कमिशन कोर्ट प्रचलित प्रार्थना-पद्धत न अनुसरणाऱ्या प्यूरिटनांचा खरपूस समाचार घेण्यास तत्पर होतें. या दोन्ही कोर्टांत इतर कोणत्याही कोर्टांत चालू नसलेली आरोपीची उलट तपासणी करण्याची पद्धति चालू होती; व पंचांच्या साहाय्यानें निवाडा करण्याची पद्धत मात्र चालू नव्हती. वडे गुन्हेगार तसेच सुट-तात, कारण लहान कोर्टांची त्यांजवर हुकमत चालत नाहीं, याकरितांच सातव्या हेन्रीनें स्टार चेंबर कोर्ट स्थापिलें होतें, व अजूनही दोन्ही पक्षांस खाजगी व्यक्ति असल्या म्हणजे त्यांत बरा न्याय मिळे. पण सरकार व व्यक्ति या दोघांमध्ये जेव्हां खटका उत्पन्न होई तेव्हां मात्र न्यायाधीश राजाचे मिंधे असल्यानें त्या कोर्टांत खरा न्याय मिळणें दुरापास्त असे.

**७ लॉडचा धार्मिक जुलूम**—धार्मिक बाबतींत राजाचा सल्लागार धर्माध्यक्ष लॉड हा होता. धार्मिक बाबतींतील त्याचीं मतें प्यूरिटनांच्या अगदीं विरुद्ध होतीं व तीं राजसत्तेस पोषक असल्यामुळें चार्लसनें त्याच्यावर प्रसन्न होऊन त्याची क्याण्टर्बरीच्या आर्चबिशपच्या जागीं नेमणूक केली होती (१६३३). जुन्या चाली सोडून देण्यांत इंग्लंडांतील सुधारकांनीं अतिरेक केला याकरितां आतां कांहीं चांगले जुने धार्मिक विधि फिरून सुरू करावे असें लॉडचें मत होतें. त्यास अनुसरून धर्म-गुरूंनीं ब्रह्मचारीच राहिलें पाहिजे, रविवारीं प्रार्थना झाल्यावर धर्ममंदिरांत मौजेचे खेळ खेळण्यास हरकत नाहीं, इत्यादि क्याथॉलिक पंथाला संमत असे बंद पडलेले प्रचार फिरून सुरू करण्याचा त्यानें उप-क्रम केला. त्यानें प्यूरिटन लोकांचें पित्त अगदीं खवळून गेलें. तेव्हां लॉडनें त्यांचेविरुद्ध कायदे करून व ते कडक रीतीनें अंमलांत आणून प्यूरिटनांचा बीमोड करण्याचा बेत केला.

## २८ सुलतानीचा कळस !!

१ **नौका-कर**—प्रजेपासून कर घेण्याची व तिला शांत ठेवि॰ण्याची मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें चार्लसनें व्यवस्था केली. तथापि इतक्या करानींही सरकारी खर्च व खाजगी उधळपट्टीचा खर्च हीं भागेनात. देशांतील सरकारी अधिकारी व आरमाराकडील अधिकारी यांचे पगारही वेळेवर होईनात व सरकारवर त्यांच्या बाक्या तुंबल्या. अर्थात् कामें नीट होईनात. आरमाराच्या गबाळपणामुळें आफ्रि॰केच्या उत्तरेकडील आल्जिरिया प्रांतांतील चांच्यांचें चांगलेंच फावलें. त्यांच्या चांचेगिरीनें व्यापाराचें नुकसान होऊन सरकारी उत्पन्नावरही त्याचा परिणाम झाला. तेव्हां चांचेगिरीपासून इंग्लिश व्यापाराचें रक्षण करण्याकरितां नॉय या फडणविसाच्या सल्ल्यानें चार्लसनें नौका-कर ( Ship money ) बसविण्याचें मनांत आणिलें ( १६३४ ). हा कर पूर्वींही शत्रूपासून इंग्लिश किनाऱ्याचें रक्षण करण्यासाठीं इंग्रज राजांनीं बसविला होता. तेव्हां तो पूर्वपद्धतीस सोडून नव्हता. या कराचे हुकूम खुद्द नॉयनें तयार केले असून तो फक्त किनाऱ्यालगतच्या परगण्यांवर बसविण्यांत आला. या कारणांनीं तक्रार न होतां त्या सालीं तो वसूल झाला. पण या कराचा उपयोग चांच्यांच्या बंदीकडे न करितां डच लोकांशीं आरमारी लढाई करण्यासाठीं आरमाराची बळकटी करण्या॰कडे करण्यांत आला. पुढें नॉय वारल्यावर हा कर परगण्यांवर सरसहा लादण्यांत आला. तरी एक वेळ लोकांनीं तो दिला. पण फिरून १६३७ सालीं, युद्धासारखें कोणतेंही संकट उपस्थित झालें नसतां या कराची सर्व परगण्यांपासून मागणी करण्यांत आली. तेव्हां पार्लमेंटच्या संमतीखेरीज असला कर बसविलेला पाहून प्रजेंत फारच असंतोष माजला.

२ **जॉन हॅम्पडनवर खटला**—बकिंगहॅम परगण्यांतील जॉन हॅम्पडन नांवाच्या प्रसिद्ध श्रीमंत शेतकऱ्यावर या कराची **वीस** शिलिंग

आकारणी करण्यांत आली. हॅम्पडनला इतके पैसे देणें मुळींच जड नव्हतें. परंतु हा कर अन्यायाचा आहे; सबब मी तो देत नाहीं असें त्यानें साफ सांगितलें; तेव्हां त्याच्यावर खटला करण्यांत आला. एकंदर बारा न्यायाधीश होते. नौकाकर बसविला तो बरोबर का चुकीचा या मुद्द्यावर बारा दिवसपर्यंत कडाक्याचा वाद झाला. वादांत ही गोष्ट सिद्ध झाली कीं, हा कर पूर्वी अत्यंत जरूरीच्या वेळीं व फक्त समुद्रालगतच्या भागांतून वसूल करण्यांत येत असे. शेवटीं, हा नौकाकर वसूल केला त्यांत इंग्लंडच्या मूलभूत कायद्याचें उल्लंघन झालें असें न्यायाधीशांस कबूल करणें भाग पडेल असा रंग दिसूं लागला. परंतु इतक्यांत खटला तहकुबीवर टाकण्यांत येऊन वादविवाद तसाच राहिला. मात्र झालेल्या वादविवादाची देशभर प्रसिद्धी होऊन इंग्लंड देशांतच काय पण स्कॉटलंडांतही चहूंकडे हॅम्पडनला अनुकूल असे उद्गार निघूं लागले. सात आठ महिने झाल्यानंतर न्यायाधिशांनीं हॅम्पडनच्या विरुद्ध निकाल सांगितला. परंतु हा निकाल सर्व न्यायाधिशांनीं मिळून एकमतानें दिलेला नव्हता. एकंदर बारांपैकीं दोन न्यायाधीश स्वतंत्र बाण्याचे असून त्यांनीं, हॅम्पडनचें करणेंच आमच्या मतें बरोबर आहे, असें सांगितलें. आणखी तिघेजण कांहीं गौण मुद्द्यांवरून त्यांच्या मतास पुष्टि देण्यास तयार झाले. अशा तऱ्हेनें बारांपैकीं सातजणांच्या बहुमतानें हॅम्पडन अपराधी ठरला व त्याची तुरुंगांत रवानगी झाली ( १६३८ ऑगस्ट ). राजानें हॅम्पडनाविरुद्ध निकाल व्हावा या हेतूनें न्यायाधिशांची विशेष सावधगिरीनें नेमणूक केली होती; तथापि एकंदर पांचजण हॅम्पडनच्या बाजूस मिळाले ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. या निकालानें प्रजेचीं मनें अत्यंत क्षुब्ध झालीं व चार्लस अगदीं अप्रिय झाला.

**३ देशत्याग**—अशा रीतीनें प्रापंचिक बाबतींत व धार्मिक बाबतींत असा दोहों बाजूंनीं छळ झाल्यामुळें पुष्कळ स्वातंत्र्यप्रिय लोक देशांतर करूं लागले. पहिल्या जेम्सच्या कारकीर्दींतही प्रस्थापित धर्माशीं ज्यांचीं मतें जमत नसत त्या लोकांविरुद्ध बरेच कडक कायदे झाले

होते. तेव्हां गांजलेल्या लोकांनीं अमेरिकेंत वसाहती करून या जाचांतून आपली सुटका करून घेण्याचा प्रचार पाडलाच होता. १६०७ मध्यें शंभर लोकांनीं जेम्सटाऊनची स्थापना केली. पुढें १६२० त प्रसिद्ध प्यूरिटन पंथाचे एकशेंवीस लोक 'मे फ्लॉवर' नामक जहाजांतून अमेरिकेंत वसाहत करावयास गेले. त्यांनीं न्यू प्लिमथची वसाहत स्थापिली. चार्लसचा पार्लमेंटला धाब्यावर बसवून सुलतानी अंमल ज्या सालीं सुरू झाला त्या १६२९ सालीं एक हजार प्यूरिटनांनीं देशत्याग केला व अमेरिकेंतील मॅसॅच्युसेट्समध्यें वसाहत केली. दंडेलीच्या पुढील अकरा वर्षांत पंचवीस हजार प्यूरिटन आपलें ऐहिक व पारमार्थिक स्वातंत्र्य राखण्यासाठीं अमेरिकेंत निघून गेले व तिकडे लहान लहान प्रजासत्ताक संस्थानें स्थापिलीं गेलीं. लोक देशत्याग करतात हीही गोष्ट चार्लसला सहन झाली नाहीं व त्यानें अमेरिकेस जाण्यास निघालेलीं कित्येक जहाजें परतविलीं, व त्यांवरील लोकांस देशत्याग करण्याची मनाई केली. या मना केलेल्या लोकांतच पिम, हॅम्पडन व ऑलिव्हर क्रॉमवेल हे पार्लमेंटचे पुढारी होते. यांना परतविल्याबद्दल चार्लसला पुढें केवढा पश्चात्ताप झाला असेल याची कल्पनाच करावी !

**४ स्कॉच धर्मांत ढवळाढवळ**—याप्रमाणें स्ट्रॅफर्ड व लॉड यांच्या सल्ल्यानें आणि स्टार चेंबर व हाय कमिशन या न्यायमंदिरांच्या मदतीनें चार्लसची सत्ता आयर्लंड व इंग्लंड या दोन ठिकाणीं बळावली असें भासूं लागलें. तेव्हां स्कॉटलंडासही एकदां वठणीस आणिलें म्हणजे कृतकृत्य झालों असें धर्माध्यक्ष लॉड यास वाटून त्यानें स्कॉटलंडकडे आपला मोर्चा फिरविला. धार्मिक सुधारणेंत स्कॉटिश लोक इंग्रजांच्याही पुढें गेले असल्यामुळें मुळावरच घाव घालावयाचा या बुद्धीनें लॉडनें स्कॉटलंडांत आपले हस्तक धर्माधिकारी नेमिले. स्कॉच लोकांनीं आपल्या सभा भरवून त्यांमधून धर्माधिकारी निवडण्याची पद्धति अनुभविली असल्यामुळें धर्माधिकारी नेमण्याची ही क्याथॉलिक पद्धति त्यांस आवडली नाहीं. परंतु प्रत्यक्ष त्यांच्या धर्मविधींत हात घातला नव्हता तेथवर त्यांनीं सहनशीलता धारण केली. एवढ्यानेंच शेफारून जाऊन लॉडनें

इंग्लिश पद्धतीवरहुकूम एक धर्मपुस्तक स्कॉटलंडकरितां तयार केलें, आणि प्रार्थनेच्या वेळीं प्रत्येक धर्ममंदिरांत त्याचा उपयोग करण्यांत यावा असा हुकूम सोडिला ( इ. स. १६३७ ).

**५ स्कॉटिश लोकांचा निश्चय**—यामुळें मात्र स्कॉच लोक खवळून गेले व ठिकठिकाणीं प्रार्थनापुस्तकाचा निषेध करण्यांत आला एडिन्बरो येथील धर्माधिकारी प्रार्थनेच्या वेळीं तें पुस्तक उघडूं लागला तोंच 'पोपचा अनुयायी, देशद्रोही, दगडाखालीं ठेचून ठार करा' असे उद्गार जिकडे तिकडे निघूं लागले. जेव्हां धर्माधिकारी गोंगाट शमविण्याचा प्रयत्न करूं लागला तेव्हां तर सर्व सभागृहभर टाळ्यांचा कडकडाट झाला, पाय आपटण्याचाही प्रकार होऊन चोहोंकडे आरोळ्या उठूं लागल्या. पुनः सामसूम झाल्यावर सार्वजनिक द्वेषास पात्र झालेल्या त्या धर्मपुस्तकांतून धर्मगुरू प्रार्थना वाचूं लागला. इतक्यांत श्रोतृवृंदापैकीं एक वृद्ध स्त्रीनें आपलें स्टूल त्याच्या डोक्यावर फेकून म्हटलें, "काय ? रोमन क्याथॉलिक लोकांची प्रार्थना ऐकण्यास कांहीं आम्ही येथें आलों नाहीं !" धर्माधिकाऱ्यांनीं तें पुस्तक प्रचारांत आणण्याचे हर प्रयत्न केले; पण त्यांमुळें दंगे न शमतां जास्त मोठ्या प्रमाणावर ते होऊं लागले. धर्मविषयक खर्चाकरितां धर्मसुधारणेच्या वेळीं तोडून दिलेल्या जमिनीही लॉड बळकावील अशी स्कॉच सरदारांना भीति पडली. म्हणून त्यांनीं एके ठिकाणीं जमून एक संघ निर्माण केला, व प्रत्येकानें वेळेनुसार शस्त्र धारण करूनही आपलें धर्मस्वातंत्र्य व प्रेस्बिटेरियन धर्माचें रक्षण करण्याची आणभाक घेतली ( १६३८ ). पुढें खेडेगांवांतील छोट्या जमीनदारांनाही त्यांनीं निमंत्रण केलें; व सर्वांनीं मिळून आपल्या धर्मस्वातंत्र्याचें रक्षण करावयाचें; किंबहुना सर्व राज्यसूत्रेंच आपल्या हातीं घ्यावयाचीं असा निश्चय केला.

**६ स्कॉच लोक निकरावर आले**—१६३८ च्या नोव्हेंबरांत एकशेंचाळीस स्कॉच धर्माधिकारी, व स्कॉच सरदारांचे व सामान्य जनतेचे शहाण्णव प्रतिनिधी यांनीं चार्लसचा अधिकारी हॅमिल्टन याची भेट

घेतली. हॅमिल्टन यास स्कॉच प्रतिनिधींचें वर्तन उद्धटपणाचें वाटलें, व त्यानें सभाच बरखास्त करण्याचा प्रयत्न केला. पण त्या सभेनें त्याचें म्हणणें न ऐकतां लॉडनें नेमिलेल्या सर्व धर्माधिकाऱ्यांस कामावरून काढून टाकिलें, आगंतुक इंग्लिश धर्मांतील वार्वीचा निषेध केला व प्रेस्बिटीरियन धर्म हा स्कॉटलंडचा प्रस्थापित धर्म असल्याचें जाहीर केलें ! राजास आतां स्कॉच लोकांशीं युद्ध करून त्यांस ताळ्यावर आणण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. स्कॉच लोकांनीं सैन्य जमवून वरेच किल्ले घेतले व बेरिकपर्यंत ते चाल करून आले. आपण अशा अडचणींत सांपडलों असतां इंग्रज प्रजा आपणास साहाय्य करील या आशेनें चार्लसनें पार्लमेंट बोलाविली ( १६४० एप्रिल ). परंतु त्याची आशा निष्फळ होऊन त्यानें एक महिन्यांतच ती पार्लमेंट बरखास्त केली.

**७ लाँग पार्लमेंट बोलाविली**—मग स्कॉच लोकांशीं स्नेहाचीं बोलणीं सुरू झालीं. पण या बोलण्यांपासून कांहींच निष्पन्न न होऊन स्कॉच लोकांनीं इंग्लंडच्या उत्तरेकडील नॉर्दंबर्लंड व डरहॅम या परगण्यांवर चालून येऊन ते काबीज केले. इंग्लंडांतील बडे लोक व सामान्य जन यांनीं पार्लमेंट बोलाविण्याविषयीं अर्ज करून राजामागें सारखा तगादा सुरू केला. शेवटीं राजानें त्यांची मागणी कबूल केली. पुढें चाल करून न येतां स्कॉच लोकांनीं स्वस्थ रहावें म्हणून दरमहा ४०,००० पौंडांचा लांच त्यांस भरण्याचें राजानें कबूल केलें, आणि युद्धाच्या खर्चास पैशाची मागणी करण्यासाठीं प्रसिद्ध ‘लाँग पार्लमेंट’ बोलाविली.

---

१ ही पार्लमेंट १६४० त भरली. ती रीतसरपणें १६६०त बरखास्त झाली. अर्थात् तिची बैठक वीस वर्षेपर्यंत टिकली. यावरूनच तिला लाँग पार्लमेंट ( दीर्घ काळ टिकलेली पार्लमेंट ) हें नांव पडलें.

## २९ लाँग पार्लमेंट भरली ( १६४० ).

**१ दोन कामें**—लाँग पार्लमेंटमध्यें राजाला प्रतिकूल सभासदांचाच विशेष भरणा होता. तिनें मुख्यतः दोन कामें करण्याचें ठरविलें. एक राजाचे साथीदार स्ट्रॅफर्ड व लॉड यांचा नाश करावयाचा व दुसरें नवे कायदे करून राजाच्या सत्तेस आळा घालावयाचा.

**२ स्ट्रॅफर्डची चौकशी**—स्ट्रॅफर्ड हा पूर्वी प्रजापक्षाचा असून नंतर राजपक्षास मिळाला म्हणून त्याच्यावर प्रजापक्षाचा दांत होताच. खडी फौज ठेवून आयर्लंडास त्यानें अगदीं वठणीवर आणिलें होतें. आतां मोकळा सोडल्यास आयर्लंडमधील सैन्याचा उपयोग तो इंग्लंडवर करील अशी धास्ती वाटत होती. म्हणून त्याचा तावडतोब समाचार घेण्याचें कॉमन्स सभेनें ठरविलें. त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून लॉर्ड्सपुढें कॉमन्सनीं त्याची चौकशी चालविली. 'मीं राजाविरुद्ध गोष्ट केली नाहीं' या मुद्द्यावर स्ट्रॅफर्ड आपला बचाव करूं लागला. यावर लोकपक्षाचा पुढारी पिम यानें उत्तर केलें कीं, ' राजा हा राष्ट्राचा प्रतिनिधि असल्यामुळें राष्ट्रावर दडपशाही करणें म्हणजे राजद्रोह करणेंच होय. ' परंतु ही विचारपद्धति अगदीं नवीन होती व प्रस्थापित कायद्यांत तिला कोठेंही आधार नव्हता; म्हणून तिच्या अनुरोधानें स्ट्रॅफर्डवर गुन्ह्याची शाबिती करण्यास लॉर्ड्स तयार होणार नाहींत हें उघड होतें. तेव्हां कॉमन्सना त्यास देहान्त प्रायश्चित्त देण्यासाठीं निराळाच मार्ग स्वीकारणें भाग झालें. स्ट्रॅफर्ड हा देशद्रोही आहे, म्हणून त्याला मरणाची शिक्षा व्हावी असा ठराव ( Bill of Attainder ) कॉमन्सनीं पास केला. लॉर्डांच्या सभेंत या बिलास विरोध झाला. परंतु इतक्यांत कांहीं राजपक्षीयांनीं गणीशीं संगनमत करून उत्तरेकडील सैन्य लंडनवर आणण्याचें गुप्त खलबत केलें आहे अशी बातमी उठली. त्यामुळें लोकसभेंत पास झालेल्या बिलास उमरावांनींही संमति दिली. आतां फक्त राजाची संमति

मिळावयाची राहिली. ती मिळणें फारच कठीण होतें. कारण त्यानें स्ट्रॅफर्डच्या केसासही धक्का लागूं देणार नाहीं असे उद्गार वारंवार काढिले होते. पण शेवटीं आपल्या वचनास हरताळ लागला तरी हरकत नाहीं, पार्लमेंटशीं झगडा नको, या बुद्धीनें चार्लसनें फांशीच्या हुकुमावर सही केली. स्वतःच्या जिवासाठीं आपल्या धन्याच्या जिवाला अपाय होऊं नये या इच्छेनें स्ट्रॅफर्डनें स्वतःच चार्लसला त्या ठरावावर सही करण्यास सांगितलें असें म्हणतात. ते कसेंही असलें तरी चार्लसनें आपल्या बचावासाठीं आपल्या विश्वासू मंत्र्याचा बळी दिला यांत संशय नाहीं. देशांतील कायदे व धर्म उलथून पाडण्याचा आरोप धर्माध्यक्ष लॉड याजवर ठेवण्यांत येऊन त्याचीही चौकशी सुरू झाली. परंतु त्याचा खटला मागें पडून दोन वर्षेंपर्यंत त्यास तसेंच तुरुंगांत ठेविण्यांत आलें. पुढें १६४५ सालीं त्यास फांशीं देण्यांत आलें.

**३ राजाच्या अधिकारावर निर्बंध**—अशा रीतीनें या दोघां बदसल्लागारांची वाट लावून पार्लमेंट राजाच्या सत्तेला आळा घालण्याच्या कामास लागली. "पार्लमेंटची निवडणूक निदान तीन वर्षांनीं तरी झालीच पाहिजे; राजानें जरी निवडणुकीचा हुकूम केला नाहीं तथापि मतदारांनीं आपण होऊनच आपले प्रतिनिधि निवडून पाठवावे; आणि नवीन पार्लमेंट भरल्यापासून पन्नास दिवसांच्या आंत ती तहकूब किंवा बरखास्त करण्याचा हक्क राजास असूं नये" असा ठराव करण्यांत आला ( १६४१ फेब्रुवारी ). मग राजाचीं जुलमाचीं साधनें जीं हाय कमिशन कोर्ट व स्टार चेम्बर कोर्ट त्यांस मूठमाती देण्यांत आली. जुलैंत 'नौकाकर' व टनेज आणि पौंडेज हा कर बसविणें बेकायदेशीर आहे असा ठराव पास झाला. आपल्या विरुद्ध पार्लमेंट जाऊं लागली कीं, ती बरखास्त करून मोकळें होण्याच्या मार्गाचा स्टुअर्ट राजांनीं-जेम्स व चार्लस या दोघांनींही-वेळोवेळीं अवलंब केला होता. आपल्यावर असाच प्रयोग होऊं नये यासाठीं लॉंग पार्लमेंटनें असा ठराव पास केला कीं, चालू पार्लमेंटची बैठक स्वतःच ती बरखास्तीचा ठराव पास करीपर्यंत बरखास्त होऊं नये. अशा रीतीनें राजकीय व्यवस्था झाली. पण

धार्मिक बाबतींतही निर्बंध करणें अवश्य होतें. लॉडनें जुने प्रचार सुरू करण्याच्या नांवाखालीं प्रॉटेस्टंट पंथापासून पिछेहाट करून क्याथॉलिक पंथच फिरून इंग्लंडांत सुरू करण्याचा घाट घातला आहे अशी सामान्य समजूत झाली होती. त्यामुळें क्याथॉलिकांविरुद्ध लोकमत खवळलेंच होतें. त्या परिस्थितीचा कॉमन्सनीं पूर्ण उपयोग करून लॉडनें नेमिलेल्या सर्व धर्माधिकाऱ्यांस त्यांच्या जागांवरून काढून टाकून मुळावर घाव घालण्याचा ठराव त्यांनीं पास केला. तो लॉर्डांच्या सभेंत पास झाला नाहीं; परंतु तो कॉमन्ससभेमध्यें पास झाला येवढ्यावरून प्रेस्बिटीरियन ( जहाल प्रॉटेस्टंट ) पंथाचीं मतें देशांत किती फैलावलीं होतीं हें दिसून येतें. थोड्याच दिवसांत दरबारांतून व सैन्यांतून क्याथॉलिकांस घालवून देण्यांत आलें; आणि प्रार्थनामंदिरांतील साधूंच्या मूर्ति व नकशीचे जिन्नस काढून फेकून देण्यांत आले.

**४ आयर्लंडांत बंड**——१६४१ च्या ऑगस्टांत चार्लस स्कॉटलंडांत गेला व स्कॉच लोकांना जादा हक्क देण्याचीं वचनें देऊन व कांहीं अंशीं पैशाची खैरात करून त्यांचा पुढारी अर्गाइल याजपासून इंग्लंडांत युद्ध सुरू झाल्यास स्कॉटलंड तटस्थ राहील अशी त्यानें हमी घेतली. लॉंग पार्लमेंटनें राजाच्या सत्तेस निर्बंध घालण्यासाठीं जे ठराव पास केले होते ते सर्व चार्लसनें मान्य केले होते. ही संमति केवळ शाब्दिक नसून मी खरोखर त्याप्रमाणें वर्तन करण्यास तयार आहें, असें राजानें जर प्रत्यक्ष कृतीनें दाखविलें असतें तर पुढील अनिष्ट प्रकार टळला असता; पण भवितव्यतेपुढें इलाज कोणाचा चालणार? राजानें आपलें वचन इतके वेळां मोडिलें होतें व पार्लमेंटला धाब्यावर बसविण्याचा त्याचा उद्योग इतक्या जारीनें सुरू होता कीं, त्याच्या शब्दावर कोणाचाही विश्वास बसणें अशक्य होतें. इतक्यांत आयर्लंडांतील क्याथॉलिक लोक स्ट्रॅफर्डच्या अंमलांतून सुटल्यामुळें दंगे करूं लागले. पण पार्लमेंटाची सैन्य तयार करण्याची छाती होईना. कारण सैन्य तयार केल्यास त्याचा उपयोग आयर्लंडांतील बंडाचा बीमोड करण्याकडे न करितां कदाचित् चार्लस पार्लमेंटांतील आपल्या शत्रूंचें पारिपत्य करण्या-

कडेच करील अशी पार्लमेंटास भीति पडली. इ. स. १६४१ च्या ऑक्टोबरांत आयर्लंडांतील अल्स्टर परगण्यांतील ओनील वगैरे पुढाऱ्यांनीं बंडाचें निशाण उभारलें; आणि सुमारें ५०,००० इंग्लिश जमीनदार व वसाहतवाले यांची सरसहा कत्तल झाली. ही भयंकर बातमी आल्यावर मात्र सैन्य तयार करून राजाच्या हाताखालीं द्यावयाचें कीं नाहीं या प्रश्नाचें कायतें निश्चित उत्तर देणें पार्लमेंटास जरूर झालें. राजाच्या हाताखालीं सैन्य देण्याची त्यांची तयारी नव्हतीच. राष्ट्रांतील लोकांतही संतोष राखण्यासाठीं अगदींच मूग गिळून बसणें इष्ट नव्हतें. तेव्हां कॉमन्ससभेनें पुढीलप्रमाणें मार्ग काढिला.

**५ गाऱ्हाण्यांची याद**—व्हेन, हॅम्पडन, पिम वगैरे पुढाऱ्यांनीं एक तक्रारींची याद तयार केली. तींत राज्यारोहणापासून चार्लसनें जें जें नियमबाह्य वर्तन केलें त्याचें पर्यालोचन असून, तो इंग्लंडांत व स्कॉटलंडांत क्याथॉलिक धर्मविधि पुनश्च सुरू करणार आहे, आणि आयर्लंडांतील क्याथॉलिकांनीं जे अमानुष प्रकार चालविले आहेत त्यांना त्याची फूस आहे, असे आरोप चार्लसवर केले होते. ही याद पार्लमेंटपुढें आली तेव्हां कडाक्याचा वाद होऊन १५९ विरुद्ध १४८ मतें पडून ती पसंत करण्यांत आली. 'ही जर नापसंत झाली असती तर मी माझें घरदार सर्व विकून टाकून अमेरिकेला निघून गेलों असतों' असें ऑलिव्हर क्रॉमवेल पुढें एके प्रसंगीं म्हणाला, या यादींत 'राजाचे मंत्री पार्लमेंटला जबाबदार आहेत व सर्व धार्मिक बाबतींचा निर्णय पार्लमेंटनें नेमलेल्या धर्माधिकारी मंडळानें करावा' अशा दोन मागण्या होत्या. त्या दोन्हीही चार्लसनें अमान्य केल्या. ही तक्रारींची याद पार्लमेंटांत पास झाली इतकेंच नव्हे, तर ती छापून हजारों प्रती सर्व इंग्लंड देशभर वांटण्यांत आल्या! स्कॉटलंडांतील लोक जेव्हां राजाविरुद्ध बंड करून उठले होते त्या वेळीं इंग्लिश पार्लमेंटांतील प्रमुख प्यूरिटन सभासदांनीं त्यांच्याशीं खलबतें केलीं व त्यांची त्या बंडास अप्रत्यक्ष सहानुभूति होती अशाबद्दलच्या बातम्या स्कॉटलंडांत गेल्यावेळीं चार्लसच्या कानावर आल्या होत्या. शिवाय अशीही बातमी उठली कीं, क्याथॉ-

लिकांस व आयरिश लोकांस चिथवून देशाची शांतता बिघडविण्याच्या आरोपावरून पार्लमेंटचे प्यूरिटन पुढारी राणीवर फिर्याद लावणार आहेत.

**६ पांच सभासदांस पकडण्याचा प्रयत्न**---तेव्हां चार्लस अगदीं खवळून गेला. त्यानें लॉर्डांच्या सभेंतील किंबोल्टन नांवाचा सभासद व कॉमन्स सभेपैकीं पिम, हॅम्पडन, हेसलरीग, हॉल्झ व स्ट्रॉड हे पांच सभासद, अशा सहा लोकांस पकडण्याविषयीं सरकारी वकिलास हुकूम दिला. परशत्रूंस इंग्लंडवर स्वारी करण्यास प्रोत्साहन दिलें व राजाविरुद्ध लढाई करण्याचा प्रयत्न केला, हे आरोप त्यांजवर ठेवण्यांत येणार होते. कॉमन्सनीं त्या सभासदांस राजाच्या आज्ञे-माणें पकडून दिलें नाहीं. त्यावर राणी चार्लसला म्हणाली "तुम्ही असें भाशूबाई-सारखे काय करितां ? तुम्ही स्वतः सभागृहांत जा व त्यांचे कान धरून त्यांना पकडून आणा." ही तंबी पोंचतांच दुसरे दिवशीं चार्लस स्वतःच पांचशें हत्यारबंद शिपायी बरोबर घेऊन पार्लमेंट सभागृहाकडे गेला. बरोबरचे लोक बाहेर ठेवून तो एकटाच आंत गेला. स्पीकरच्या खुर्ची-जवळ बसून पांच राजद्रोह्यांना पकडण्यास मी आलों आहे असें त्यानें सांगितलें.तेव्हां तुरुंगांत केव्हांही घातलें न जाण्याचा पार्लमेंटच्या सभासदांचा हक्क आहे असें कोणीसें पुटपुटलें. त्यावर राजद्रोहाच्या बाबतींत हा पार्लमेंटच्या सभासदांचा हक्क रद्द आहे, असें उत्तर करून चार्लसनें स्पीकर लेन्थॉल यास पांच सभासदांस आपल्या स्वाधीन करण्याविषयीं हुकूम केला. पार्लमेंटचे हक्क प्रस्थापित करण्यासाठीं आपला जीव धोक्यांत घालून लेन्थॉल म्हणाला "महाराज, ही सभा जो कांहीं हुकूम कराल त्याशिवाय इतर गोष्टी पाहण्यास माझे डोळे समर्थ नाहींत, अगर त्या ऐकण्याची माझ्या कानांत शक्ति नाहीं." हें उत्तर ऐकून सर्व सभागृह टाळ्यांच्या गजरांनीं भरून गेलें. राजा येत आहे, असें अगोदरच कळलें असल्यामुळें पांचही सभासद सभागृहांतून एका आडवाटेनें पसार झाले होते. तेव्हां चार्लस चरफडला खरा, पण तसेंच हात हालवीत परत

जाण्याखेरीज त्याला दुसरा मार्गच नव्हता. चार्लस जेव्हां जाऊं लागला तेव्हां 'आमचे हक्क' 'आमचे हक्क' अशा चोहोंकडून आरोळ्या उठल्या (इ. स. १६४२, जानेवारी ४).

---

# ३० हातघाईवर आले.

**१ धर्माधिकाऱ्यांविरुद्ध बिल**—चार्लस व लोकपक्ष या दोघां-मध्यें तंट्याचे जे मुद्दे निघाले होते त्यांत धर्माधिकाऱ्यांसंबंधींचा प्रश्न फार महत्त्वाचा होता. पार्लमेंटांत काय किंवा बाहेर देशांत काय प्युरिटन मतें फार फैलावलीं होतीं. त्यामुळें साहजिकच धर्माधिकाऱ्यांची श्रीमंती व सत्ता अत्यंत कमी केली पाहिजे आणि धार्मिक न्यायमंदिरांचेही अधि-कार संपुष्टांत आणावेत असें सामान्य मत होतें. कांहीं धर्माधिकारी लार्डांच्या सभेचे सभासद असत व ते राजाचे मिंधे असल्यामुळें लोक-पक्षानें कॉमन्स सभेंत पास केलेला कायदा राजास विरोधी असला तर लॉर्डांच्या सभेंत आपल्या संख्येच्या व फाजील राजनिष्ठेच्या जोरावर हाणून पाडण्यास ते कमी करीत नसत. त्यामुळें पारमार्थिक सुख समा-जास साधून देण्यासाठीं धर्माधिकारी आहेत, ऐहिक बाबतींत संबंध ठेविण्याचा त्यांना अधिकार नसावा, या तत्त्वावर पिमनें कॉमन्सपुढें असें बिल आणिलें कीं, धर्माधिकाऱ्यांना लॉर्ड्स सभेचे सभासदच होण्याची परवानगी नसावी. कॉमन्समध्यें तें बिल पास झालें; पण लॉर्डांच्या सभेंत तें पास होणें कठीण होतें. तेथें तें कुचंबत राहूं लागलें. त्यामुळें संतापून जाऊन लंडनमधील लोकांनीं धर्माधिकारी पार्लमेंटकडे जात असतां त्यांच्या गाड्या अडविल्या. त्यावर दंगे झाले व धर्माधिकाऱ्यांना लॉर्डांच्या सभेच्या बैठकीस हजर राहणें अशक्य झालें. त्यावर कित्येक धर्माधिकाऱ्यांनीं रुष्ट होऊन अशी तक्रार केली कीं, सभेस आम्हांस हजर न राहतां आल्यामुळें आमच्या पश्चात् झालेले कायदे रद्द

समजावेत. कॉमन्स सभेनें असली तक्रार केल्याबद्दल त्यांस देशद्रोही ठरविलें. देशांत प्रेस्बिटीरियन मताचेही पुष्कळ लोक होते. त्यांना धर्माधिकाऱ्यांचें (Bishops) प्रस्थ अजिबातच मोडून टाकावयाचें असल्यामुळें त्यांच्या कॉमन्समधील प्रतिनिधींनीं बिशप नाहींतसे करून सर्व धर्मसत्ता नऊ कमिशनरांच्या हातीं देण्याचें बिल कॉमन्स सभेपुढें आणिलें. त्यामुळें कॉमन्समध्यें दुफळी होऊन हाईड व फॉकलंड यांनीं धर्मखात्याची बाजू धरिली व कॉमन्समध्यें प्रस्थापित धर्माचा वाली व भावी राजनिष्ठ पक्ष निर्माण झाला.

**२ कॉमन्सचा निश्चय**—यानंतर मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें स्कॉच लोकांशीं कट केल्याच्या आरोपावरून कॉमन्स सभेच्या पांच सभासदांस पकडण्यासाठीं राजा स्वतः पार्लमेंटांत गेला. मग काय विचारतां ! राजानें पार्लमेंटच्या सभासदांच्या अगदीं सर्वमान्य हक्कांवर गदा आणिली. त्यामुळें कॉमन्स सभेचा राजाविरुद्ध अत्यंत क्षोभ झाला. राजा कॉमन्स सभेंत गेला त्या प्रसंगीं एका हजर असलेल्या गृहस्थानें असें लिहिलें आहे कीं, राजा पकडण्यास आला त्या वेळीं जर ते पांच सभासद हजर असते व राजानें त्यांना तेथें आपल्या हस्तकांकडून पकडण्याचा जर प्रयत्न केला असता तर कॉमन्स सभागृहांत रक्तपात झाल्याशिवाय राहिला नसता. यापुढें पिमनें कॉमन्स सभेंत जाहीर केलें कीं, "राजाचा जुलूम आतां असह्य झालेला आहे व आपलें राष्ट्र जिवंत ठेविण्यासाठीं आतां मोठा झगडा होणार असा रंग दिसत आहे. या कठीण प्रसंगीं कॉमन्स सभेस लॉर्डांची मदत मिळेल अशी आशा आहे; पण जरी ती मिळाली नाहीं तरी आपण एकट्यानेंच कां होईना, पण या झगड्यांत पडून आपलें राष्ट्रीय जीवित कायम राखण्याचा कॉमन्सचा निश्चय आहे." या पिमच्या बोलण्याचा हितकर परिणाम झाला; व लॉर्डांच्या सभेनें धर्माधिकाऱ्यांचा सभासद होण्याचा हक्क काढून घेण्याचें फार दिवस कुचंबत ठेविलेलें बिल एकदांचें पास केलें व कॉमन्सशीं सहकार्य करण्याची आपली तयारी असल्याचें प्रदर्शित केलें.

**३ अस्वस्थता**—पांच सभासद पकडण्याचा प्रयत्न हेंच युद्धाचें संनिकृष्ट कारण होतें असें मानण्यास हरकत नाहीं. हा प्रयत्न ज्या दिवशीं झाला त्या दिवशीं रात्रीं लंडन शहरांतील रस्ते लोकपक्षाकडील सशस्त्र लोकांनीं रोखून धरिले होते. व थोड्याच दिवसांत ही बातमी जवळच्या प्रांतांत पसरतांच जवळच्या गांवांतून लंडनला येणारे रस्ते आपल्या प्रतिनिधींचें रक्षण करण्याकरितां येणाऱ्या सशस्त्र लोकांच्या टोळ्यांनीं भरून गेले; आणि वेस्ट मिन्स्टर हॉलभोंवतीं ( कॉमन्स सभागृह ) सशस्त्र लोकांचे पहारे बसले. राजाच्या मित्रांची धांदल उडून गेली. इकडे राजाचें वर्तन अत्यंत जुलुमाचें झालें अशी स्वतः त्यांची मनोदेवता त्यांस साक्ष देत असल्यामुळें विरुद्ध पक्षाचे उलट कांहीं बोलतां येत नाहीं व इकडे पार्लमेंट सभागृहाभोंवतीं पहारे बसल्यामुळें सभेसही जाण्याची बंदी, अशी त्यांची स्थिति झाली. खुद्द राजवाड्याभोंवतींही दंगेखोर लोकांच्या टोळ्या संचार करूं लागल्या. तेव्हां चार्लसला तेथें राहणें धोक्याचें वाटूं लागलें आणि त्यानें लंडन शहर सोडिलें. आपले दागिने गहाण टाकून कर्ज काढण्यासाठीं राणीला त्यानें फ्रान्सांत पाठविलें; व स्कॉच लोकांच्या स्वारीच्या वेळीं दारुगोळा व शस्त्रास्त्रें हल येथें जमविलीं होतीं, तीं ताब्यांत घेण्यासाठीं चार्लस स्वतः हलकडे निघाला. तेथील गव्हर्नर सर जॉन हॅथॅम राजाच्या पायां पडला परंतु शहर राजाच्या ताब्यांत देण्याचें त्यानें साफ नाकारलें. गव्हर्नरच्या या कृत्यास पार्लमेंटनें पसंती दर्शविली, हें राजपक्षीय सभासदांस न आवडून त्यांनीं पार्लमेंटांतील आपल्या जागा सोडिल्या. फॉकलंड, हाइड इत्यादि बत्तीस लॉर्ड्स व कॉमन्स सभेचे साठ सभासद यॉर्क येथें जाऊन राजास मिळाले या सर्वांचें मत चार्लसनें लढाई करण्याच्या फंदांत पडूं नये असें होतें; व शांततेनें दोन्ही पक्षांत समेट करण्याची त्यांस आशा होती. यॉर्कशायरमधील जमीनदारांची एक टोलेजंग सभा भरली व तींत पार्लमेंटशीं युद्ध न करतां तंटा आपसांत मिटविण्याविषयीं राजास एक अर्ज करण्यांत आला.

**४ पार्लमेंटची यादी**—इतक्यांत राजपक्षीय लोक निघून गेल्या-मुळें पार्लमेंट एकमताची बनली होती; तिनें एकोणिस कलमांची यादी तयार करून ती राजाकडे पाठविली. त्या यादींत मुख्य मागणी अशी होती कीं राजानें राष्ट्रीय सैन्यावरील आपला अधिकार सोडून तो पार्लमेंटच्या स्वाधीन करावा; व सैन्य जमा झालें म्हणजे प्रत्येक परगण्याच्या तुकडीवर जो अधिकारी नेमावयाचा तो नेमण्याचा अधिकारही पार्लमेंटकडेच असावा व सर्व लष्करी अधिकाऱ्यांवर पार्लमेंटचीच हुकमत चालावी. अशा तऱ्हेनें राष्ट्रीय सैन्यावरील सत्ता सोडणें म्हणजे नामधारी राजे बन-ण्यासारखेंच होतें. तेव्हां अर्थातच चार्लसनें त्या यादीस आपली संमति दिली नाहीं, हें सांगणें नकोच. इकडे पार्लमेंटनें राजाच्या नांवावर व राज्यव्यवस्थेकरितां म्हणून उघड उघड सैन्य जमविण्याचा व कर वसूल करण्याचा सपाटा चालविला. उभय पक्षांत तडजोड होणें दुरापास्त होऊन राजानें नॉटिंगहॅम येथें ता. २४ आगष्ट रोजीं (१६४२) लढाईचें निशाण उभारलें; आणि लवकरच त्याच्या निशाणाखालीं १०,००० सैनिक जमले.

**५ दोघांचें बलाबल**—या युद्धांत जे दोन पक्ष झाले त्यांची वांटणी पुढीलप्रमाणें झाली. इंग्लंडच्या पश्चिम किनाऱ्यावरील ब्रिस्टल बंदरापासून पूर्व किनाऱ्यावरील हल बंदरापर्यंत जर एक रेषा काढिली तर त्या रेषेच्या दक्षिण-पूर्वेचा भाग लोकपक्षास अनुकूल होता आणि उत्तर-पश्चिमेचा भाग राजाच्या बाजूस होता. धंदेवारीनें पाहिलें तर उत्तर पश्चिमेकडचे जमीनदार व खानदानीचे लोक राजाकडे असून दक्षिण-पूर्वेकडील व्यापारी व धंदेवाले लोक पार्लमेंटकडे होते. धर्माच्या दृष्टीनें पाहिलें तर प्रस्थापित धर्म व पुराणमत यांचे वाली राजाकडे आणि प्यूरि-टन व प्रेस्बिटेरियन पंथांचे लोक पार्लमेंटकडे अशी स्थिति होती. राजाचा बोज मध्य इंग्लंडांत असून समुद्र-किनारा व त्यावर अवलंबून असणारा परदेशाशीं व्यापार हीं पार्लमेंटास मोकळीं होतीं. दोन्ही बाजूंनीं लढाई चालविण्यासाठीं पुष्कळच झीज सोशिली. राणीनें आपले दागिने विकले

आणि पुष्कळ राजपक्षीय सरदारांनीं दागदागिने व मूल्यवान् सामान विकून पैसे पुरविले. पार्लमेंटनें संसारांत लागणाऱ्या नेहमींच्या वस्तूंवर व विशेषतः मादक वस्तूंवर जबर कर बसविले. शिवाय प्रत्येक घरीं आठवड्यांतील एके दिवशीं उपवास करून वांचलेल्या अन्नाची किंमत राजाविरुद्ध लढणाऱ्या सैन्याच्या मदतीस द्यावी असा हुकूम तिनं काढिला. या युद्धांत राजाकडील लोक उमदे घोडेस्वार असल्यामुळें त्यांस ' क्याव्हेलीअर ' हें नांव पडलें, आणि पार्लमेंटकडील लोक केसाचे झुबके न राखतां केस बारीक कापीत त्यावरून त्यांस 'राउण्डहेड' हें नांव पडलें. या युद्धांत प्रत्येक बाजूकडील सैन्याचे बरोबर छापखाने होते. शस्त्रास्त्रांच्या लढाईबरोबरच टाइपांच्या मदतीनें एकमेकांवर कठोर शब्दप्रहार करून शाब्दिक लढाईही चालू होती! निरनिराळ्या धार्मिक व राजकीय प्रश्नांवर लिहिलेल्या लाखों हस्तपत्रकांची सर्व देशभर अगदीं गर्दी उडून गेली होती.

६ **प्यूरिटन पंथ**—पार्लमेंटच्या बाजूकडे प्यूरिटन पंथाचे लोक प्रमुख असल्यामुळें या ठिकाणीं त्या पंथाविषयीं कांहीं माहिती सांगणें अवश्य आहे. ख्रिस्तांचा पवित्र ग्रंथ जो बायबल त्यावर या पंथाचा पूर्ण विश्वास असून त्याचा अर्थ मात्र ज्यानें त्यानें आपल्या स्वतंत्र बुद्धीनें लावण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे, असा त्यांचा ठाम सिद्धांत असे. त्यांची धर्मश्रद्धा इतकी विलक्षण होती कीं, साध्या गोष्टी सुद्धां देवाच्या सत्तेनें व प्रेरणेनेंच होत आहेत ही बुद्धि त्यांच्या ठिकाणीं सदैव जागृत असे. यामुळेंच चैनीचा कंटाळा, मौजेच्या खेळापासून निवृत्ति व सुखोपभोग घेण्याची नावड, हीं त्यांच्या ठायीं उत्कटत्वानें दिसून येत. रंगेलपणा टाकून गांभीर्याचा प्यूरिटन साहजिकच स्वीकार करीत. इंद्रियांचे लाड पुरविण्याचें टाकून देऊन त्यांना स्वायत्त करण्याचीच त्यांची खटपट असे. झगझगीत व मोलवान पोषाक सोडून साध्या पोषाकाचीच आवड ते धरीत. बोलघेवडेपणास रजा देऊन मौनाचा ते अभ्यास करीत. आपला जन्म सुखोपभोगासाठीं नसून कांहीं तरी कर्तव्य करण्यासाठीं आहे, अशी त्यांची दृढ निष्ठा असे. आपले धर्मबांधव व

आपण ईश्वराचीं लेंकरें आहोंत व त्यामुळें आपलें बंधुत्वाचें नातें आहे, ही गोष्ट प्यूरिटनांच्या अंतःकरणांत दृढ रीतीनें ठसलेली होती. त्यामुळें एकादा श्रीमंत प्यूरिटन भिकारी मनुष्याशीं प्रेमानें वागत असे. त्यांना मूर्तिपूजा मान्य नसून धर्ममंदिरांत नकशी काढलेले पदार्थ अगर साधूंच्या तसबिरी ठेवणें त्यांना आवडत नसे. स्वतः आळशी राहणें हें त्यांना आवडत नसे व दुसऱ्यानें आळशी असणें गैरवाजवी होय अशी त्यांची कल्पना होती. प्यूरिटनांची राहणी नियमबद्ध असून, ते अगदीं काटक असत. या युद्धांतही प्यूरिटन लोकांनीं जी कामगिरी करण्याचें अंगावर घेतलें होतें, त्यांत देखील ईश्वराची आपणांस अशी आज्ञा झाली आहे अशीच त्यांची श्रद्धा असे. ईश्वर आपल्या बाजूला आहे या भरंवशावरच ते युद्ध करीत होते. या ईश्वरभक्तीच्या जोरावरच उपभोग व करमणूक यांची इच्छा न करतां, स्वायत्त, गंभीर व काटक होऊन आनंदानें लढण्यांत त्यांनीं आपलें तन, मन, धन खर्च केलें.

---

## ३१ राजाशीं युद्ध.

**१ राजाची सरशी**—राजाच्या सैन्याचा एक भाग कॉर्नवॉल या पश्चिम परगण्यांत होता. आणि दुसरा भाग यॉर्क या उत्तर परगण्यांत होता. या दोन स्थळांच्या मध्यें नॉर्दम्पटन, कव्हेण्ट्री, वॉरिक व वूर्स्टर या महत्त्वाच्या शहरांची रांग होती; ती ताब्यांत घेऊन पार्लमेंटचा मुख्य सेनापति एसेक्स यानें त्यावर शिबंदी ठेवून दिली होती. पश्चिमेकडील जमीनदारांना आपल्या सैन्यांत सामील करून घेण्याकरितां व सेव्हर्न नदीचें महत्त्वाचें खोरें व्यापण्याकरितां राजा पश्चिमेस श्रुजबरी येथें गेला. मग तेथून वाटेंत वूर्स्टर येथें तळ दिलेल्या एसेक्सच्या सैन्याची फिकीर न करितां लंडन व त्याच्या आसपासचीं महत्त्वाचीं व्यापारी शहरें काबीज करावीं या उद्देशानें राजा लंडनकडे चाल करून येऊं लागला. परंतु या

त्याच्या हालचालीचा सुगावा एसेक्सला लागून त्यानें लंडन सुरक्षित रहावें या उद्देशानें राजाच्या सैन्याचा पिच्छा पुरविला व त्यास उलटून एज्हिल येथें लढाई देण्यास भाग पाडिलें. हीच या युद्धांतिल सलामिची लढाई होय. तींत एसेक्सला चांगलासा जय न येऊन राजा लंडनच्या सन्निध दाखल झाला ! परंतु तेथें पार्लमेंटचें सैन्य सारखें जमत असल्यामुळें त्याला लंडन शहरांत पाऊल टाकण्याचें धैर्य झालें नाहीं; तेव्हां त्यानें तसेंच मागें सरून ऑक्सफर्ड येथें तळ दिला. एव्हांपासून राजपक्षाचें हेंच ठिकाण लष्करी केंद्र होतें. त्यामुळें इंग्लंडचा मध्यच राजाच्या हातांत असल्यामुळें कोणत्याही प्रांतावर स्वारी करून जावयाचें म्हटलें तरी राजास फारसें अंतर चालून जाण्याची अवश्यकता नसे. परंतु या बाबतींत पार्लमेंटपेक्षां राजाच जरी वरचढ असला तरी समुद्रकिनाऱ्याचा सर्व भाग पार्लमेंटच्या ताब्यांत असल्यामुळें परदेशापासून राजाचा अगदीं कोंडमारा झाला. इ. स. १६४३ च्या उन्हाळ्यांत राजाकडील सेनापति प्रिन्स रूपर्ट यानें ऑक्सफर्ड मधून आपल्या घोडेस्वारांनिशीं बाहेर पडून दोन तीन ठिकाणीं पार्लमेंटकडील सैन्यांचा पराभव केला, व ब्रिस्टल हल्ला करून घेतलें. १८ जूनला शाल्ग्रूव्ह येथें झालेल्या चकमकींत तर लोकपक्षाकडील हॅम्पडन हा कामास आला व त्यामुळें लोकपक्षाचें फार नुकसान झालें. उत्तरेकडे पार्लमेंटच्या ताब्यांत महत्त्वाचें असें हल बंदरच कायतें राहिलें; आणि पश्चिमेकडे ग्लूस्टरशिवाय सर्व टापू राजाच्या हातीं गेला. अशा रीतीनें लढाई सुरू झाल्यापासून वर्ष झालें न झालें तोंच राजाची वरचढ होऊन पार्लमेंटला जिकडे तिकडे अपयशच आलें.

**२ ऑलिव्हर क्रॉम्वेल**—इतक्यांत दोन गोष्टी अशा घडून आल्या कीं, त्यांच्यामुळें पार्लमेंटची पडती बाजू चांगलीच सावरली. पहिली गोष्ट म्हणजे ऑलिव्हर क्रॉम्वेल या सेनापतीचा उदय झाला. युद्ध सुरू होतांच प्यूरिटन लोकांमधून स्वातंत्र्यवादी ( इन्डिपेन्डण्ट ) नांवाचा धर्मशील, बलवान् व तेजस्वी पंथ निघाला. त्यांना धर्माधिका-

त्यांच्या सत्तेबद्दल तिटकारा वाटत असून ज्या त्या मंडळीला आपलीं धर्ममतें व आचार कायम करण्याची पूर्ण मुभा असावी आणि दुसऱ्यांनीं या बाबतींत ढवळाढवळ करण्याचें कांहीं कारण नाहीं, अशी त्यांची दृढ समजूत असे. त्यांना राजसत्तेविषयींही अत्यंत तिटकारा असून लोकसत्ताक राज्य स्थापिण्याविषयीं ते आतुर होते. या पंथाचा मुख्य सूत्रधार ऑलिव्हर क्रॉम्वेल हा होता. हा हंटिंगडन परगण्यांतील रहिवाशी असून लाँग पार्लमेंटचा सभासद असतांना ओंगळ पोषाक, खेडगळ चालचालणूक आणि ओबडधोबड भाषण यांबद्दल त्याची प्रसिद्धि होती. युद्ध सुरू झाल्यावर त्याला घोडयाच्या पथकावरील अधिकाऱ्याची जागा मिळाली. लवकरच त्याचे लष्करी गुण व पराक्रम दिसून आले आणि त्याला कर्नलची जागा मिळून तो एकदम हजारी बनला. एज्हिल येथें आपल्या पक्षास विजय न मिळण्याचीं कारणें काय असावींत याचा विचार करून त्यानें आपल्या सैन्याची सुधारणा करण्याचा उद्योग केला. त्यानें आपल्या सैन्यांतलि धर्मपराङ्मुख, कच्चया धीराचे व बेशिस्त लोक काढून टाकून त्यांचे जागीं पापभीरू, करारी, बाणेदार व हुकमी लोकांचा भरणा केला, आणि कवाइतीचें उत्तम शिक्षण देऊन लवकरच त्यांना लढाईचे कामीं इतकें तरबेज केलें कीं, यापुढें त्याच्या सैन्यास कोठेंही हार खावी लागली नाहीं; आणि या कारणामुळेंच त्याच्या पलटणीला 'पोलादी पलटण' ( Ironsides ) हें टोपण नांव पडलें.

**३ स्कॉच लोकांशीं सख्य**—दुसरी गोष्ट म्हणजे स्कॉच लोकांची मदत पार्लमेंटनें मिळविली. इंग्लिश पार्लमेंटनें स्कॉटिश पार्लमेंटशीं असा करारनामा केला कीं, प्रस्तुत युद्धांत परस्परांनीं परस्परांस मदत करावी. स्कॉटिश लोकांस मोबदला म्हणून इंग्लंडमध्यें प्रेस्बिटीरियन धर्मपद्धति सुरू करण्याचें इंग्लिश पार्लमेंटनें वचन दिलें. या तहाचे कागदावर बत्तीस लॉर्ड्स व दोनशें अठ्याऐशीं कॉमन्स यांनीं सह्या केल्या. लष्करी, मुलकी व धार्मिक अशा सर्व अधिकाऱ्यांना प्रेस्बिटीरियन धर्माची शपथ घेणें भाग पडलें. सुमारें दोन हजार धर्माधिकाऱ्यांनीं ही शपथ घेण्याचें नाकारिलें. त्यामुळें त्यांना आपल्या जागेवरून काढून टाकण्यांत आलें.

४ **मार्स्टनमूरची लढाई**——इ. स. १६४३ च्या डिसेंबरांत पिम वारला, तरी वर सांगितलेल्या अनुकूल कारणांनीं पार्लमेंटचे बाजूस १६४४ सालीं यशच येत गेलें. तद्दास अनुसरून २२००० स्कॉच सैन्य इंग्लंडांत उतरलें; राजाचा उत्तरेकडील सेनापति ड्यूक ऑफ न्यू-क्यासल हा होता. त्याला पायबंद देण्यासाठीं पार्लमेंटकडील जनरल फेअरफॅक्स हाही उत्तरेकडेच होता. फेअरफॅक्स आणि स्कॉटिश जनरल यांचा संकेत झाला कीं, न्यूक्यासलला मध्यें पकडून दोघांनीं मिळून चिरडून टाकावयाचा; परंतु न्यूक्यासलनें हा बेत ओळखून यॉर्क शहराकडे जाऊन तो तेथें छावणी देऊन बसला आणि पार्लमेंटचें सैन्य आणि स्कॉटिश सैन्य यांनीं मिळून त्या शहरास वेढा दिला. इतक्यांत न्यूक्यासलला कुमक करण्यासाठीं लँकेशायरमधून प्रिन्स रूपर्ट चालून आला. त्यानें वेढा उठविला व दोन्ही सैन्यें समोरासमोर लढाई देण्याचे तयारीनें मार्स्टनमूर येथें उभीं राहिलीं. पार्लमेंटच्या डावीकडील स्कॉटिश सैन्या-कडे लढाई सुरू झाल्याबरोबर थोड्याच वेळानें राजपक्षाच्या घोडदळानें सरशी मिळविली, आणि राजपक्षीय पायदळानें पार्लमेंटच्या उजवीवर हल्ला करून जेव्हां तीस पळवून लाविलें तेव्हां तर लढाई राजपक्षीयांनीं जिंकिली असेंच वाटलें. परंतु पार्लमेंटच्या सैन्याची अशी पिछेहाट झाली तरी क्रॉम्वेलचें स्वारांचे पथक व्यवस्थित असून ताज्या दमाचें होतें. त्यानें विजयानें हुरळून गेलेल्या राजाकडील पायदळावर अचानक हल्ला करून त्यांतील बहुतेक लोक जायां केले. क्रॉम्वेल लिहितो. ‘आमच्या घोडे-स्वारांनीं त्यांच्या पायदळावर हल्ला केला. व सर्वांस पिटाळून लाविलें. २०,१०० पैकीं प्रिन्सचे ४००० ही लोक शिल्लक राहिले नसावे असा अंदाज आहे.’ ‘डावीकडे मी माझ्या घोडेस्वारांनिशीं होतों. त्यांच्या घोडेस्वारांवर आम्ही जोराचा हल्ला केला. ईश्वरच आमचा वली, तेव्हां त्याचा पार धुव्वा उडाला यांत काय नवल !’ या लढाईत पार्लमेंटला यश आलें व रूपर्ट दक्षिणेस निघून गेला. लवकरच यॉर्क, न्यूक्यासल इत्यादि महत्त्वाचीं शहरें पार्लमेंटच्या कबजांत येऊन उत्तरेकडे पार्लमेंटचा चांगलाच बोज बसला (इ. स. १६४४ जुलै २). दक्षिणेकडे कॉर्न-

वॉलमधील राजपक्षीय सैन्य व ऑक्सफर्ड येथील राजाचें सैन्य या दोघांनीं मिळून एसेक्सचा बराच कोंडमारा केला आणि त्याचे बरेच लोक कामास आले, तथापि पार्लमेंटची बाजूच मार्स्टनमूरच्या लढाईपासून वरचढ झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

**५ पार्लमेंट पक्षांत फूट**—मार्स्टनमूरच्या लढाईनंतर पार्लमेंटच्या पक्षांत उघड दोन फळ्या झाल्या. आतांपर्यंत पार्लमेंटच्या पक्षांत प्रेस्बिटीरियन लोकांची सरशी होती; परंतु यापुढें इंडिपेन्डण्ट लोक पुढें सरसावले. चार्लसचा आपण पराभव केला याहून जास्त चढाई करून त्याला अगदीं चीत करण्याचें कांहीं कारण नाहीं अशी प्रेस्बिटीरियनांच्या विचारांची दिशा होती. त्यामुळें ते अंग चोरून काम करूं लागले व राजाशीं त्यांनीं तहाचीं बोलणींही सुरू केलीं. विशेषतः राजाच्या शरिरास दुखापत होऊं नये यासाठीं ते फार जपत. उदाहरणार्थ, एसेक्सवर जय मिळवून ऑक्सफर्डला राजा परत येत असतांना न्यूबरी येथें पार्लमेंटचा जनरल मँचेस्टर ( पूर्वींचा लॉर्ड किंबोल्टन ) यानें त्यास गांठिलें, पण तो अंग चोरून लढला व त्यानें राजाचें कांहीं नुकसान न करितां त्यास जाऊं दिलें. या कृत्याचा इंडिपेण्डट लोकांस अत्यंत राग आला.

**६ क्रॉम्वेलची सैन्यव्यवस्था**—पार्लमेंटांत क्रॉम्वेलच्या आग्रहामुळें असा ठराव पास झाला कीं, ( १६४५ एप्रिल ) पार्लमेंटांतील सभासदानें सैन्यांतील अधिकाऱ्याची जागा पत्करूं नये. या नियमान्वयें क्रॉम्वेलच्या मार्गांतून एसेक्स, मँचेस्टर वगैरे नादान अधिकारी दूर झाले. क्रॉम्वेल स्वतः पार्लमेंटचा सभासद होता, तेव्हां त्यानेंही आपल्या जागेचा राजीनामा दिला. परंतु हें सर्व कपट—नाटक होतें. क्रॉम्वेलनें राजीनामा दिल्याची वार्ता कळतांच पार्लमेंटनें त्याला सैन्यांत राहण्याबद्दल खास परवानगी देण्याचें ठरविलें आणि तो पुन्हां सैन्यांत दाखल झाला. फेअरफॅक्स यास प्रजापक्षाचा मुख्य सेनापति नेमून क्रॉम्वेल त्याचा दुय्यम म्हणून काम करीत असे. परंतु फेअरफॅक्स 'नांवाचा' मुख्य सेनापति असून खराखुरा अधिकार क्रॉम्वेलकडेच होता. क्रॉम्वेलनें यावेळीं सर्व

सैन्याची पाहणी केली, आणि नादान व पोटभरू लोक काढून त्यांच्या जागा, देवाविरुद्ध वर्तन करणारा राजा, त्याचा दरबार व धर्मखातें यांचा खरपूस समाचार घेण्याच्या निश्चयानें कामगिरी करून दाखविणाऱ्या पापभीरु लोकांस दिल्या.

**७ नेस्बीची लढाई**——स्कॉटलंडांत मॉन्ट्रूझ यानें राजाच्या वतीनें बंड उभारल्यामुळें स्कॉटिश सैन्य परत स्कॉटलंडांत गेलें. अशा रीतीनें उत्तर इंग्लंड मोकळें झालें, असें पाहतांच चार्लसनें ऑक्सफर्डमधून निघून उत्तरेकडे चाल केली. त्याबरोबर आपल्या नव्या सुधारलेल्या सैन्यानिशीं क्रॉम्वेल व फेअरफॅक्स यांनीं त्याच्या मागोमाग जाऊन त्यास नेस्बी येथें गांठिलें. या सुधारलेल्या सैन्याचें शिक्षण पक्कें झालें नसल्यामुळें पार्लमेंट-पक्षाच्या डावीकडील घोडदळावर रूपर्ट यानें जो जोराचा हल्ला केला त्यामुळें कच खाऊन तें पळूं लागलें. रूपर्टनेंही लांबवर त्याचा पाठलाग केला. इकडे उजवीवर क्रॉम्वेल होता, त्यानें जोराचे हल्ले करून राजाच्या डावीकडील घोडेस्वारांचा पूर्ण पराभव केला. पण रूपर्टप्रमाणें त्यांचा पाठलाग करण्याच्या भानगडींत न पडतां पार्लमेंट पक्षाच्या मध्यावर हल्ला करीत असलेल्या राजपक्षीय पायदळावर त्यानें हल्ला चढविला. क्रॉम्वेलच्या हल्ल्यानें राजाच्या पायदळाचा पूर्ण मोड झाला. रूपर्ट बऱ्याच उशिरा परत आला. त्यावेळीं पार्लमेंटची बाजू यशस्वी होऊन राजाच्या सैन्यांत पळ सुरू झाला होता. तो व्यवस्थितपणें व होईल तितका कमी नुकसानकारक करण्याची कामगिरीच आतां रूपर्टवर पडली. या नेस्बीच्या ( १६४५ जून ) लढाईनें राजपक्षाचा चुराडाच झाला. स्कॉटलंडांतही मॉन्ट्रूझच्या सैन्याचा मोड झाला. यापुढें राजपक्षाकडून मोठें सैन्य समोरासमोर युद्ध करण्यास असें कधींच आलें नाहीं. ठिकठिकाणीं राजपक्षाकडील लोक किल्ले धरून बसले होते. त्यांवर स्वाऱ्या करून पार्लमेंट पक्षीयांनीं क्रमानें सर्व ठाणीं काबीज केलीं. या ठाण्यांपैकीं शेवटीं जें ठाणें सर झालें तें वेल्सच्या सरहद्दीवरील रॅगलन हें होय ( १६४६ ऑगष्ट ).

**८ चार्लस परतंत्र झाला**——नेस्बीच्या लढाईनंतर जो राजपक्षाचा पाठलाग झाला त्यांत राजाचें सर्व दप्तर पार्लमेंटच्या हातीं आलें. त्यांत पत्रव्यवहार सांपडला, त्यावरून राजानें पार्लमेंटशीं लढण्याकरितां फ्रान्स, लोरेन व आयर्लंड येथून लष्कर आणण्यासाठीं तेथील लोकांशीं कारस्थानें केल्याचें उघडकीस आलें. राजाची सत्ता नियंत्रित करावी असें स्कॉटिश प्रेस्बिटीरियनांचे व इंग्लिश सनदशीर चळवळवाल्यांचें मत होतें. परंतु इंग्लडांतील जहाल प्रॉटेस्टंट व जलाल स्वातंत्र्यवादी ( इंडिपेन्डण्ट ) यांच्या मनांतून राजसत्ता अजिबात नाहींशीं करावयाची होती. तेव्हां ' दगडापेक्षां वीट मऊ ' या न्यायानें स्कॉटिश प्रेस्बिटीरियन सैन्याशीं चार्लसनें संधान बांधिलें. आणि तो न्यूआर्क येथें स्कॉटिश सेनापतीच्या स्वाधीन झाला ( १६४६ मे ). चार्लसच्या वतीनें इंग्लिश पार्लमेंटशीं बोलणें सुरू करण्यापूर्वी स्कॉटिश धर्मपद्धति आपणास मान्य असून तिची अंमलबजावणी आपण करूं अशा करारनाम्यावर सही करण्यास स्कॉटिश लोकांनीं त्यास सांगितलें. परंतु त्यानें सही करण्याचें नाकारल्यावरून स्कॉटिश लोकांस त्वेष येऊन त्यांनीं चार्लसला इंग्लिश सैन्याच्यां हवालीं केलें. पण तत्पूर्वी इंग्लिशांकडून आम्ही राजाच्या शरिराला कोणत्याही प्रकारें अपाय करणार नाहीं असें वचन घेतलें. चार्लसला स्कॉटिश लोकांनीं इंग्रजांच्या हातीं देण्यास दुसरेंही कारण होतें. चार्लसला आपल्या हवालीं करीपर्यंत आपण स्कॉटिश लोकांस लढाईच्या खर्चापैकीं कवडीही देणार नाहीं असा इंग्रज पार्लमेंटचा निर्धार होता. तेव्हां आपलें येणें चार लक्ष पौंड घेऊन आपल्या स्वाधीन झाल्यापासून सहा महिन्यांनीं चार्लसला त्यांनीं इंग्रजांच्या हवाली केलें ( १६४७ जानेवारी ).

## ३२ पार्लमेंटची सरशी.

**१ सैन्य व पार्लमेंट**——चार्लस हातीं येईपर्यंत पार्लमेंट व सैन्य यांचीं कृत्यें एक विचारानें होत होतीं. राजा हातीं येतांच पार्लमेंटास असें वाटूं लागलें कीं, आतां सैन्याची जरुरी नाहीं. तेव्हां सैन्यास रजा देऊन राजाशीं पुढील वर्तनाविषयीं वाटाघाट करण्याचा त्यांनीं व्यूह रचिला. पण सैन्य रजा घेण्यास कसें तयार होणार ? त्यानें पार्लमेंटास साफ कळविलें कीं, आमचा पगार द्या आणि इन्डिपेन्डण्ट पक्षाचे हक्क सुरक्षित ठेवण्याबद्दल हमी द्या, म्हणजे मग आम्ही शस्त्रें खालीं ठेवून घरीं बसूं. शिवाय कष्ट सैन्यानें करावे आणि फळ पार्लमेंटनें भोगावें, हा विचार बळावून सैन्यांत अत्यंत असंतोष माजला.

**२ चार्लस कैदेंत पडला**——याचा परिणाम असा झाला कीं, 'हॉल्म्बी हाऊस' येथें चार्लस पार्लमेंटच्या ताब्यांत होता, तेथें जॉइस नावांचा सैन्यांतील एक ऑफिसर एक सोल्जरांची तुकडी घेऊन गेला आणि चार्लसला पकडून त्यास सैन्याच्या हुकमतींत न्यूमार्केट येथें त्यानें बंदोबस्तानें ठेविलें ( १६४७ जून ३ ). एक आठवड्यानंतर सैन्यानें अशी मागणी केली कीं, ज्या अकरा प्रेस्बिटेरियन सभासदांनीं सैन्याविरुद्ध सूचना पार्लमेंटास केली त्यांना पार्लमेंटांतून हाकून द्यावें. लंडनमधील लोकमत पार्लमेंटास—प्रेस्बिटेरियनपक्षास—अनुकूल होतें. याकरितां सैन्यानें हल्ला करून लंडन आपल्या ताब्यांत घेतलें ( १६४७ ऑक्टोबर ). मग सैन्य आणि पार्लमेंट या दोघांमध्यें राजाशीं कोणत्या अटीवर तह करावा यासंबंधी बोलणीं सुरू झालीं व लवकर तोड निघेल असा रंग दिसूं लागला.

**३ राजाचें कारस्थान**——इतक्यांत चार्लसनें न्यूमार्केटमधील बंदीखान्यांतून निसटून इंग्लंडच्या दक्षिण किनाऱ्यावरील आइल ऑफ वाइट

या बेटांत क्यारिसब्रुक किल्लयाचा आश्रय केला. प्रसंग पडल्यास देशांतर करतां यावें हा या हालचालींत त्याचा उद्देश होता. तेथून राजानें इंग्लिश पार्लमेंटशीं तहाच्या वाटाघाटी सुरू केल्या, परंतु त्याबरोबरच आंतून स्कॉटिश लोकांशींही सूत्रें लाविलीं. स्कॉटिश लोकांस त्यानें असें वचन दिलें कीं, ' मी इंग्लंडांत प्रेस्बिटेरियन धर्ममत तीन वर्षेंपर्यंत सक्तीनें अमलांत आणीन.' या अटीवर स्कॉटिश लोकांनीं राजातर्फे इंग्लंडवर स्वारी करण्याचें कबूल केलें.

**४ स्कॉच लोकांशीं युद्ध व बंडाचा मोड**—१६४८ च्या एप्रिलमध्यें ड्यूक ऑफ हॅमिल्टन हा बरेंच मोठें स्कॉटिश सैन्य बरोबर घेऊन इंग्लंडवर चाल करून आला. स्कॉटिश लोक चालून आले, असें पाहतांच इंग्लंडांतील राजपक्षपाती लोकांनींही उचल केली आणि वेल्स, केंट व एसेक्स या परगण्यांत बंडाचीं निशाणें उभारण्यांत आलीं. हें पाहून आपणास जय मिळणार असे चार्लस आपल्या मनांत मांडे खाऊं लागला. परंतु हें सर्व केवळ मनोराज्य होतें, कारण क्रॉम्वेल व फेअर-फॅक्स हे ताबडतोब इंग्लंडांतील बंडें व स्कॉटिश लोकांची स्वारी यांचा पुरता मोड करण्याच्या उद्योगास लागले. फेअरफॅक्सनें एसेक्स व केंट परगण्यांतील बंडें मोडण्याचीं कामें अंगावर घेतलीं. आणि क्रॉम्वेल वेल्स-मधील बंडाळी मोडून स्कॉच सैन्याचा समाचार घेण्यास उत्तरेकडे गेला. त्यानें हॅमिल्टनच्या स्कॉच सैन्याशीं प्रेस्टन येथें गांठ घातली. ( १६४८ ऑगस्ट १७. ) तीन दिवसपर्यंत घनचक्कर युद्ध होऊन स्कॉच सैन्याचा पुरा मोड झाला. इकडे फेअरफॅक्सनें दक्षिणेकडील बंडावा इतक्या अवकाशांत मोडून टाकिलाच होता. एसेक्समधील बंड मोडणें फारच कठीण गेलें. एकटें कोल्चेस्टर शहर महिनाभर वेढा दिल्यानंतर हातीं आलें.

**५ दोन मतें**—अशा रीतीनें सैन्य बंडें मोडण्यांत गुंतलें असल्या-मुळें पार्लमेंटमध्यें प्रेस्बिटेरियन पक्षाची सरशी झाली आणि तिनें राजाशीं तहाचीं बोलणीं फिरून सुरू केलीं. आपल्या कांहीं मित्रांचें शासन

आणि इंग्लंडांतील प्रस्थापित धर्माचा मोड या दोन अटींशिवाय इतर सर्व अटी राजानें मान्य केल्या. कॉमन्स सभेनें येवढ्यांतच संतोष मानून राजाशीं तह करण्यास आतां हरकत नाहीं असें आपलें मत झाल्याचें जाहीर केलें. इतक्यांत सैन्याचीं कामें संपून तें परत आलें. त्याच्या पुढाऱ्यांस हें मुळींच पसंत पडलें नाहीं. त्यांचा तर ठाम निश्चय ठरला होता कीं, चार्लस स्टुअर्टनें लोकहित व ईश्वरेच्छा यांना पायाखालीं तुडवून रक्तपात केला आहे, तेव्हां त्याला देहान्त प्रायश्चित्त देऊनच या प्रकरणाची विल्हेवाट लाविली पाहिजे.

**६ प्राइडनें केलेली हकालपट्टी**---तेव्हां सैन्याच्या पुढाऱ्यांच्या हुकुमावरून क्यॅरिसब्रुक किल्ल्यांतून चार्लसला पकडून हर्स्ट किल्ल्यांत सैन्यानें त्याला आपल्या सक्त कैदेंत ठेविलें, हें सैन्याचें कृत्य कॉमन्स सभेस न आवडून तिनें राजाशीं शांततेनें एकी केलीच पाहिजे असा ठराव पास केला. यावर दुसरेच दिवशीं क्रॉम्वेलच्या आशेवरून कर्नल प्राइड यानें सोजिरांच्या साहाय्यानें कॉमन्स सभेंतील एकशें त्रेचाळीस शांततावादी सभासदांस सभागृहांतून हाकून दिलें. यासच इतिहासांत ' प्राइडनें केलेली हकालपट्टी ' असें नांव पडलें आहे. सैन्याच्या मताचे पक्षपाती असे त्रेपन्न सभासदच काय ते कॉमन्स सभेचे घटक म्हणून राहिले. लॉर्ड्सची सभा तर बंद करण्यांत आली. त्यावरून राजपक्षीयांनीं तीस 'लांडी पार्लमेंट' ( Rump ) असें निंदाव्यंजक नांव दिलें. दहा दिवसांनंतर या लांड्या पार्लमेंटनें राजाची चौकशी करण्याकरितां न्यायाधिशांचें एक वरिष्ठ कोर्ट निर्माण केलें. ' लोक हेच सर्व सत्तेचें आद्य मूळ असल्यामुळें आणि कॉमन्स हे लोकप्रतिनिधी असल्यामुळें त्यांची सत्ता हीच इंग्लंडांतील वरिष्ठ शक्ति होय. आणि राजा व उमराव यांची कोणत्याही प्रकारें जरूर नाहीं, ' या तत्त्वावर लांड्या पार्लमेंटनें आपला कारभार चालविला.

**७ चार्लसची चौकशी व शिक्षा**---राजाची चौकशी करण्यासाठीं नेमलेल्या जाना कोर्टांत १३५ न्यायाधीश निवडलेले होते. परंतु खटला चालल्या वेळीं साठच्या वर न्यायाधीश कधींही हजर नव्हते.

ब्रॅडशॉ नांवाचा वकील अध्यक्ष होता. चार्लसला कैद्याच्या पिंजऱ्यांत आणून उभें केलें आणि त्याजवरील आरोप वाचून दाखविण्यांत येऊन आपलें म्हणणें सांगण्याविषयीं सवाल करण्यांत आला. परंतु 'इंग्लंडच्या कायद्याप्रमाणें प्रत्येक मनुष्याला आपल्या दर्जाच्या पंचांसमोरच स्वतांची चौकशी व्हावी असा हक्क आहे. पण येथें माझ्या सरदारांपैकीं कोणीच हजर दिसत नाहींत, सबब मी या कोर्टाचा अधिकार मानीत नाहीं व कांहीं जबाबही देऊं इच्छित नाहीं.' असा रोखठोक जबाब चार्लसनें मोठें धैर्य धरून दिला. चार्लसचा मुलगा प्रिन्स चार्लस हा या वेळीं फ्रान्सांत होता. त्यानें आपल्या बापाचे प्राण वांचविण्यासाठीं अतोनात खटपट केली. त्यानें आपल्या सहीशिक्यानिशीं एक कोरा कागद न्यायाधिशांकडे पाठविला आणि 'तुम्ही वाटतील त्या अटी त्यांत घाला, मला त्या सर्व कबूल आहेत; फक्त कसेंही करून माझ्या वडिलांचे प्राण वांचवा,' असें एक पत्र लिहून धाडिलें. पण या पत्रास न्यायाधिशांनीं कांहीं एक उत्तर दिलें नाहीं. एक आठवडाभर खल होऊन पार्लमेंटशीं बेकायदेशीरपणें युद्ध करून हजारों निर्दोषी लोकांचा रक्तपात केल्याच्या आरोपावरून चार्लसला दोषी ठरविण्यांत आलें व त्यास फांशीची शिक्षा फर्माविण्यांत आली. यानंतर तीन दिवसांनीं ही शिक्षा अमलांत आली (३० जानेवारी १६४९).

---

## ३३ लोकसत्ताक राज्य–बंडांचा मोड.

**१ लोकसत्ताकाची स्थापना**— चार्लसला दिलेली शिक्षा अंमलांत आल्यावर ७०।८० सभासदांची लांडी पार्लमेंट भरली. या पार्लमेंटनें राजा ही पदवी अजीबात रद्द ठरवून 'जो कोणी कोणालाही राजा ही पदवी देईल तो देशद्रोही होय.' असें जाहीर केलें, लॉर्डांची सभा निरुपयोगी म्हणून मोडून टाकिली आणि सर्व नियामक व विधायक

सत्ता एकट्या कॉमन्स सभेच्या हाती ठेवून अंमलबजावणी करण्याकरितां चाळीस सभासदांचें एक कार्यकारी ( विधायक ) मंडळ नेमिलें. ब्रॅडशॉ हा या मंडळाचा अध्यक्ष होता. प्रसिद्ध कवि मिल्टन यास परराष्ट्रीय प्रधानाची जागा मिळाली. क्रॉम्वेल आणि फेअरफॅक्स यांचेकडे सैन्याधिकार सोपविण्यांत आला. राज्याचा पूर्वीचा शिक्का रद्द करून नवा शिक्का करण्यांत आला. त्याच्या एका बाजूस इंग्लंड व आयर्लंड यांचे नकाशे असून दुसऱ्या बाजूस कॉमन्स सभेचें चित्र आणि '१६४८ सालीं स्थापिलेलें लोकसत्ताक राज्य' अशा भावार्थाचे शब्द होते. इंग्लंडच्या प्रस्थापित धर्माप्रमाणें प्रार्थना करण्याची मनाई करण्यांत आली. आणि लंडन शहरांतील चार्लसचे पुतळे काढून टाकून छिन्नविच्छिन्न करण्यांत आले. परंतु चार्लसचा शिरच्छेद झाल्या वेळेपासून लोकमतानें उलट खाल्ल्यामुळें हे सर्व फेरफार लोकमताला मान्य नव्हते. देशांतील खरीखुरी सत्ता तीस हजार खड्या फौजेच्या हातांत असून ऑलिव्हर क्रॉम्वेल हा सैनिकांच्या गळ्यांतील ताईत होता. तेव्हां स्वाभाविकपणेंच सर्व राज्याधिकार क्रॉम्वेलच्या हातीं आला.

**२ सरकारचे शत्रु**—या नव्या सरकारास चोहोंकडून शत्रु उत्पन्न झाले. राजाचा शिरच्छेद केल्यामुळें कट्टे राजनिष्ठ लोक तर अगदीं चिडून गेले. प्रेस्बिटीरियन लोकांस लांड्या पार्लमेंटच्या कोणत्याच कारभाराची शिस्त पसंत पडली नाहीं. सैन्यांतही कांहीं माथेफिरू लोक निघाल्यामुळें तर शांतता राखण्याचें काम अत्यंत बिकट झालें. त्यांपैकीं कांहीं असें म्हणूं लागले कीं, सर्व माणसें सारख्या दर्जाचीं असल्यामुळें सर्वांना राजकीय सत्ता व हक्क समसमान वांटून देण्यांत यावेत. निरनिराळ्या लोकांचीं कामें निरनिराळ्या दर्जाचीं असलीं तरी प्राप्ति सर्वांना सारखीच मिळाली पाहिजे, असा कांहींचा आग्रह होता. दुसऱ्या कांहींनीं जगाचा प्रळयकाल जवळ आला असें मानून तदनुसार आपला वर्तनक्रम चालविला ! त्यांच्यापैकीं कांहींनीं येशुख्रिस्त व त्याचे अनुयायी यांचें पवित्र राज्य लवकर सुरू व्हावें यासाठीं चालू सरकारचा नाश करण्याची खटपट चाल-

विली. हें जेव्हां उघडकीस आलें तेव्हां मात्र क्रॉम्वेलनें सरकारास विरोध करणाऱ्या सर्व लोकांस कडक शासन करून त्यांची खोड मोडून टाकिली व मग लोकांच्या मनावर सरकारचा चांगलाच वचक बसला. परंतु आयर्लंड व स्कॉटलंड या दोन देशांत हें नवें राज्य उलथून पाडण्याविषयीं जीं बंडें झालीं त्यांच्या मानानें हा बंडावा कांहींच नव्हे. त्या बंडांची माहिती आतां आपण करून घेऊं.

**३ आयर्लंडांतील बंड**—आयर्लंडांत १६४१ सालीं क्याथॉलिक लोकांनीं बंड करून हजारों इंग्रजांची कत्तल केल्याचें मागें सांगितलेंच आहे. त्यानंतर इंग्लंडांतच युद्धाची धुमश्चक्री सुरू झाल्यामुळें इंग्रजांचें तिकडे दुर्लक्ष झालें. आतां आयर्लंडांतील राजपक्षीयांनीं चार्लसचा मुलगा राजकुमार चार्लस याच्या नांवानें द्वाही फिरविली. राजपक्षाचा सेनापति ऑर्मोंड असून डब्लिन, डेरी व बेलफास्ट खेरीज सर्व किल्ले त्याच्या स्वाधीन होते. अशा स्थितींत त्या बेटावरील इंग्लिश सत्ता अगदीं डळमळूं लागली होती; ती पुन्हां प्रस्थापित करण्याच्या कामावर लांडच्या पार्लमेंटनें क्रॉम्वेल यास धाडिलें. १६४९ च्या आगष्ट महिन्यांत क्रॉम्वेलनें आयर्लंडांत पाय ठेविला, आणि सहा महिन्यांच्या आंतच राजपक्षाचीं हाडें खिळखिळीं करून सगळा देश चित करून सोडिला. ड्रॉघेडाच्या किल्ल्यास वेढा घालून त्यानें तो किल्ला सर केला आणि त्यांतील ३००० शिबंदीची कत्तल केली. वेक्सफर्डची तीच अवस्था झाली, आणि ज्यांनीं ज्यांनीं म्हणून राजपक्षातर्फे शस्त्र उचललें त्या सर्वांना असेंच कडक शासन मिळालें. क्रॉम्वेलच्या या अघोर रक्तपातामुळें आयर्लंडमध्यें त्याचा इतका भयंकर दरारा बसला कीं, अजून सुद्धां दक्षिण आयर्लंडांतील एकाद्या मनुष्यास कोणाचें अनिष्ट चिंतन करावयाचें असल्यास "तुझ्या छातीवर क्रॉम्वेलचें पिशाच बसो" असा तो उच्चार करितो! मग आपला जांवई 'आयर्टन' यास आयर्लंडाचा बंदोबस्त करण्यास तेथें ठेवून क्रॉम्वेल इंग्लंडास परत गेला.

**४ आयर्लंडांत वसाहत**---आयरिश लोकांस वडिलोपार्जित जमिनीवरून हाकलून देऊन तेथें इंग्लिश व स्कॉटिश लोकांच्या वसाहती केल्याशिवाय आयर्लंडांत स्वस्थता व्हावयाची नाहीं असें क्रॉम्वेलच्या संमतीनें आयर्टननें ठरविलें. मग त्यानें या नवीन धोरणाची अंमलबजावणी करण्यास सुरवात केली. ही वसाहत करण्याची पद्धत पहिल्या जेम्सच्या वेळींही कांहींशी अमलांत आली होती, व आयर्लंडच्या उत्तरेकडील अल्स्टर परगण्यांत इंग्रजांच्या वसाहती त्या वेळीं करण्यांत आल्या होत्या. परंतु आतां कायद्याचा सक्त अंमल करून दक्षिण व मध्य आयर्लंडांतील हजारों आयरिश लोकांस पश्चिमेकडील कनॉट परगण्यांत जाऊन रहाण्यासाठीं हांकून देण्यांत आलें. हा कनॉट प्रांत ओसाड असून इतका नापीक होता कीं, " एकादा मनुष्य बुडून मरण्याइतकेंही त्यांत कोठें पाणी नव्हतें; मनुष्याला टांगून मारावयाचें म्हटलें तर पुरेतशीं झाडेंही त्यांत नव्हतीं, किंवा शवास पुरण्याइतकीही माती नव्हती. " असल्या निर्जन अरण्यांत हजारों लोकांची रवानगी करण्यांत आली आणि जे जाण्यास नाकबूल झाले त्यांस ' वेस्ट इंडीज ' मधील मळेवाल्यांस गुलाम म्हणुन विकण्यांत आलें. त्या काळीं युद्धांत सापडलेल्या कैद्यांची अशी वासलात करणें हा अमानुष प्रकार रोजच्या व्यवहारांतील रूढ चाल होऊन बसली होती. मग ती रिकामी झालेली जमीन इंग्लंड व स्कॉटलंड यांतील प्रॉटेस्टंटांस देण्यांत आली. अशा रीतीनें प्रॉटेस्टंट वसाहती केल्यावर आयर्लंडांत प्रॉटेस्टंट धर्ममताची सरशी होईल अशी क्रॉम्वेलची कल्पना होती ! आयर्लंडांतील कामगिरीबद्दल क्रॉम्वेलला लांड्या पार्लमेंटाकडून " लॉर्ड जनरल " ही पदवी मिळाली.

**५ स्कॉटलंडांतील बंड** - आयर्लंडांतून परत आल्याबरोबर स्कॉटलंडच्या कामगिरीवर क्रॉम्वेलची रवानगी झाली. चार्लसचा शिरच्छेद झाल्याचें ऐकतांच स्कॉटिश लोकांनीं राजपुत्र चार्लस याच्या नांवानें द्वाही फिरविली, आणि त्याला आपल्या देशांत पाचारण केलें. राजपुत्रानें

त्यांचें निमंत्रण स्वीकारलें व तो १६५० च्या जून महिन्यांत स्कॉटलंडांत आला. परंतु तो तरुण असून रंगेल स्वभावाचा असल्यामुळें स्कॉटिश प्रेस्बिटीरियनांच्या तापसी वृत्तीचा त्याला इतका वीट आला कीं, तो त्यांना सोडून उत्तर स्कॉटलंडांत निघून गेला. इकडे क्रॉम्वेल चाल करून गेला, तो जुलैच्या २८ तारखेस एडिंबरोस दाखल झाला. हल्ला करून शहर घेणें जड जाईल असें त्यास वाटलें. शिवाय इंग्रज सैन्यास धान्याचा इतका तुटवडा पडला कीं, अगदीं उपासमारीची वेळ आली; म्हणून तो एक महिन्यानें दक्षिणेकडे हटला. डनबारच्या डोंगराळ प्रांतांत येतांच त्याला असें आढळून आलें कीं, स्कॉटिश सैन्यानें इंग्लंडला जाण्याचे मार्ग रोखले आहेत व तें डोंगरांत असल्यामुळें त्याजवर हल्ला करणेंही धोक्याचें आहे. एका बाजूस समुद्र आणि दुसऱ्या बाजूस स्कॉटिश सैन्य होतें. अशा स्थितींत पायदळास समुद्रांतून पाठवून घोडेस्वारासह आपण स्वतः स्कॉटिश सैन्याची फळी फोडून इंग्लंडांत जावयाचें, असा क्रॉम्वेलनें बेत केला. इतक्यांत स्कॉटिश सेनापतीनें बरोबरच्या एका धर्माधिकाऱ्याच्या सांगण्यावरून इंग्रजांशीं समोरा समोर लढाई देण्यासाठीं आपलें सैन्य मैदानांत आणिलें. स्कॉच सेनापतीची ही चूक क्रॉम्वेलच्या चांगलीच पथ्यावर पडली. स्कॉच व इंग्रज यांचें तुंबळ रणकंदन होऊन स्कॉच लोकांचा पूर्ण पराभव झाला. त्यांचा दारूगोळा व जड सामान हीं सर्व इंग्रजांस मिळालीं ( ३ सप्टेंबर १६५० ). हा जय संपादन केल्यावर एडिम्बरो आदिकरून शहरें काबीज करून फोर्थनदीच्या दक्षिणेकडील सर्व स्कॉटलंडवर क्रॉम्वेलनें आपली सत्ता बसविली.

६ **दुर्दैवी राजपुत्र**—राजपुत्र चार्लस यास उत्तर स्कॉटलंडांत अपेक्षित मदत मिळाली नाहीं म्हणून तो स्कोन येथें परत आला. तेथें स्कॉटिश राजपक्षीय लोकांनीं त्याला दुसरा चार्लस ही पदवी देऊन राज्याभिषेक केला. त्यानंतर चार्लसनें क्रॉम्वेलला मागें टाकून धीटपणानें इंग्लंडांत प्रवेश केला. आपण लंडन ताब्यांत घेण्यास गेलों

असतां क्रॉम्वेलला अडवून धरण्यासाठीं पश्चिम परगण्यांतील व नार्दंब-लँड व यॉर्क या परगण्यांतील लोकांस उठविण्याची त्यानें खटपट चालविली. इतक्यांत चार्लस इंग्लंडांत घुसल्याची वार्ता क्रॉम्वेलला समजली व तो जलद चाल करून आला आणि त्यानें स्कॉटिश सैन्याला वूर्स्टर येथें गांठून त्याचा पुरा मोड केला ( ३ सप्टेंबर १६५१ ). चार्लस यावेळीं शत्रूच्या तावडींतून मोठ्या शर्थीनें वांचला. नानाप्रकारचे वेष धारण करून भटकत असतां अखेर ससेक्सच्या किनाऱ्याला पोंचून तेथून तो फ्रान्सला जाऊन पोंचला. या अज्ञातवासांत भटकतांना एके प्रसंगीं क्रॉम्वेलचें तांबडे डगलेवाले त्याच्या अगदीं नजीक येऊन ठेपले होते; तेव्हां त्यानें एका विशाल ओक झाडावर चढून त्याच्या खांद्यांत लपून कसा तरी आपला बचाव करून घेतला. त्यावरून स्टुअर्ट राजपक्षीयांची ओक झाडाच्या खांद्या ही एक प्रियवस्तुच होऊन बसली. चार्लसला जो पकडून देईल त्याला १००० पौंड इनाम मिळेल अशी सरकारनें जाहिरात लावली होती. तथापि त्याच्या प्रवासाची माहिती असणाऱ्या पन्नास लोकांतून कोणीच चहाडी करणारा आढळून आला नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. स्कॉटलंडांत क्रॉम्वेलनें जनरल मंक यास ठेविलें होतें. त्यानें लवकरच सर्व लोकांस शरण यावयास लावून तो देश काबीज केला आणि इंग्लंडचा अंमल तेथें कायम केला.

७ **हॉलंडशीं युद्ध**—त्याचप्रमाणें हॉलंड देशाशींही याच वेळीं तंटा सुरू झाला. पहिल्या चार्लसचा जांवई ऑरेंजचा राजपुत्र वुइल्यम हा हॉलंड देशांत लोकसत्ताक राज्याचा मुख्याधिकारी होता. अर्थात चार्लसचा शिरच्छेद झाल्याचें कळतांच इंग्लिश पार्लमेंटाविषयीं डचांचें मन कलुषित झालें आणि इंग्लंडांतून पळून गेलेल्या राजपक्षीय लोकांना हॉलंड हें एक आश्रयस्थानच बनलें. इ. स. १६५० त राजपुत्र वुइल्यम मरण पावला, पण त्याचे पश्चात् हॉलंडचें इंग्लंडशीं वैर कायमच राहिलें. शिवाय या दोन देशांमधील वैरास व्यापारविषयक चुरस हें एक कारण होतें. तेव्हां हॉलंडचा समुद्रावरील व्यापार समूळ बुडविण्याकरितां

इंग्लिश पार्लमेंटनें असा कायदा केला कीं, "इंग्लंडच्या कोणत्याही बंदरांत येणारा माल एक तर इंग्लिश जहाजांतून यावा, किंवा ज्या देशांत तो माल तयार झाला असेल त्या देशाच्या गलबतांतून यावा. दुसऱ्या देशच्या गलबतांतून आल्यास त्या गलबताला मज्जाव होईल" ( १६५१ ). इंग्लंडचा दर्यावरील व्यापार वाढविण्याला हाच नौकानिर्बंधाचा कायदा कारणीभूत झाला. या कायद्यामुळें डच लोकांस राग आला व लवकरच डच–इंग्रजांचें समुद्रावर युद्ध सुरू झालें. प्रारंभीं इंग्लिश ॲडमिरल 'ब्लेक' याला कित्येक जय मिळाले. परंतु लवकरच डच ॲडमिरल डी विट व डी रायटर यांनीं गुड्विन सॅन्ड्स नजीक इंग्लिश आरमाराचा फन्ना उडविला. आणि डच आरमारानें इंग्लिश खाडींतून इंग्लंडची सगळीं गलबतें हाकून लाविलीं ( १६५२ मे ). परंतु इ. स. १६५३ च्या प्रारंभीं ब्लेकनें पोर्टलंड जवळ डच लोकांचा पराजय केला. याच-प्रमाणें एकंदर पांच ठिकाणीं पराभव झाल्यामुळें डचांचीं बहुतेक गलबतें निकामी झालीं. तेव्हां १६५४ मध्यें उभय राष्ट्रांत तह होऊन समुद्रावर इंग्लिशांचें वर्चस्व कायम झालें आणि हॉलंड देशांतून राजपक्षीय लोकांना मदत किंवा प्रोत्साहन मिळूं नये असें ठरलें. या डच युद्धासाठीं झालेला खर्च भागविण्यासाठीं राजपक्षीयांच्या जमिनी व उत्पन्नें जप्त करण्यांत आलीं. त्यांपैकीं श्रीमंतांनीं पैसा भरून आपलीं उत्पन्नें सोडविलीं; परंतु गरिबांस हा मार्ग शक्य नसल्यामुळें त्यांस उत्पन्नें सोडणें भाग पडलें.

## ३४ क्रॉम्वेलचा कारभार.

**१ सभासदांची हकालपट्टी**—प्रजासत्ताकाची नामधारी चालक जी लांडी पार्लमेंट ती लॉंग पार्लमेंटचाच अवशिष्ट भाग होती; व त्या पार्लमेंटनें स्वतःच्या संमतीखेरीज आपली सभा बरखास्त होऊं नये असा ठराव केला होता. यासाठीं स्थिरस्थावर झाल्यावर क्रॉम्वेलनें नवीन

पार्लमेंटची निवडणूक करण्याच्या उद्देशानें या पार्लमेंटला स्वतःचा अधिकार खालीं ठेवण्यास सांगितलें ( १६५३ ). या लांडया पार्लमेंटच्या सभासदांना क्रॉम्वेल व त्याच्या हाताखालील सैनिक यांची भीति वाटूं लागली होती; सबब सैन्याची संख्या कमी करण्याची सूचना पार्लमेंटनें पुढें आणली. त्याबरोबरच नवीन पार्लमेंटांतही आपल्याच हातीं अधिकार रहावा या उद्देशानें नव्या पार्लमेंटांत लांडया पार्लमेंटचे सर्व सभासद कायम रहावेत, इतकेंच नव्हे तर नवे जे सभासद निवडावयाचे ते जुन्या सभासदांस पसंत असतील तेच निवडावेत, अशा प्रकारचें बिल लांडया पार्लमेंटांत पास होण्याचा रंग दिसूं लागला. या बिलावर मतें घेणें चाललें होतें; इतक्यांत पार्लमेंटगृहास सैन्याचा गराडा देऊन क्रॉम्वेल कॉमन्सच्या सभागृहांत शिरला आणि 'तुम्ही अन्यायी आणि स्वार्थसाधु आहांत' अशा अर्थाचा टोमणा त्यानें कॉमन्सना दिला. कांहीं सभासद क्रॉम्वेलच्या वर्तनावर टीका करूं लागले; तेव्हां क्रॉम्वेल एकदम ओरडला, 'पुरे, पुरे, अतां मी ही सभा बरखास्त करतों. तुम्ही येथें बसण्यास योग्य नाहीं.' खुणेबरोबर लष्करी शिपायी आंत शिरले आणि त्यांनीं सर्व सभासदांस हांकून दिलें. मग सभागृहास कुलूप मोहोर ठोकून क्रॉम्वेल चालता झाला. दुसरे दिवशीं कोणा वात्रट राजपक्षीयानें 'हें घर भाड्यानें द्यावयाचें आहे.' अशी एक जाहिरात त्या सभागृहाच्या दरवाजावर डकविली ( एप्रिल १६५३ ).

२ **क्रॉम्वेलचें समर्थन**—चार्लसनें पार्लमेंटच्या संमतीखेरीज राज्यकारभार चालविला, प्रजेवर नवे कर बसविले, व जुने वसूल केले. म्हणून त्याजवर देशद्रोहाचा आरोप ठेवून त्याला देहान्त प्रायश्चित्त देणाऱ्या क्रॉम्वेलची ही कृति पाहिली म्हणजे आश्चर्य वाटतें व क्रॉम्वेलच्या वर्तनांत विसंगतपणाचा भास होतो. परंतु यांत त्याचें वर्तन क्षम्य आहे. कारण त्याला दंडुकेशाहीशिवाय या पेंचांतून सुटण्यास मार्गच नव्हता. पार्लमेंटला सर्वस्वी फांटा देऊन अनियंत्रित सत्ता बळकावि-

ण्याचा जर त्याचा मनोदय असता तर त्याच्या अपराधाचें स्वरूप अक्षम्य झालें असतें. देशांतील राज्यकारभार पूर्णपणें लोकमतानें चालावा अशी त्याची मनापासून सात्त्विक इच्छा होती. पण ज्या वेळीं तेरा चौदा वर्षांपूर्वी निवडलेल्या पांच सहाशें लोकांपैकीं गळतां गळतां ५०।६० लोक शिल्लक राहिले आणि ते गाळीव सभासद आपणच पूर्वी पास केलेल्या नियमाच्या जोरावर धड राज्यकारभार स्वतःही चालवीनात अथवा सभा बरखास्त करून नवीन निवडणूक करण्याला लोकांना संधीही देईनात तेव्हां क्रॉम्वेलला त्यांना सभागृहांतून हांकून देणें भाग पडलें. यांत त्याच्याकडे बिलकूल दोष येत नाहीं.

**३ बेअरबोनची पार्लमेंट**—लांड्या पार्लमेंटला अर्धचंद्र मिळाल्यावर सैन्यावरील आठ अधिकारी व मुलकी खात्याकडील चार अशा बारा सभासदांचें मंडळ स्थापून क्रॉम्वेल हा त्याचा मुख्य झाला. सर्व सत्ता या मंडळाच्या हातीं आली. या मंडळानें एकशेंचाळीस लोकांची एक छोटी पार्लमेंट बोलाविली. या पार्लमेंटच्या सभासदांस व्यवहारज्ञान किंवा राजकारण यांचा फारसा गंध नव्हता. बेअरबोन नांवाचा एक चांभार सभासद त्यांचा म्होरक्या होता. त्यावरून या पार्लमेंटास ‘ बेअरबोनची पार्लमेंट ’ असेंही म्हणत. राज्यकारभारांत सुधारणा करण्याच्या इराद्यानें कांहीं जुलूम करणारीं खातीं व कामगारांच्या जागा त्यांनीं रद्द केल्या; परंतु त्यांचें काम करण्याकरितां नवीन व्यवस्था करण्याचें त्यांनीं तसेंच ठेविलें ! असल्या अव्यवहार्य सूचना करण्यांत आल्यामुळें क्रॉम्वेलच्या हातीं कारभार देऊन आपण मोकळें व्हावें असें तिच्यांतील पुष्कळ सभासदांस वाटूं लागलें. तेव्हां १६५३ च्या डिसेंबरांत एके दिवशीं अगदीं सकाळीं सभा भरवून क्रॉम्वेलच्या हातांत सर्व सत्ता देण्याचा ठराव त्यांनीं पास केला आणि आपल्या जागेचे राजीनामे दिले.

**४ घटनापत्रक**—या उपर जुने रिवाज बाजूस ठेवून नवेंच धोरण स्वीकारण्याचें ठरलें. सैन्याच्या कामगारांनीं कारभारास आधारभूत अशी एक

घटना(Constitution)तयार केली. तिजवरून इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड या सर्वांवर एक राष्ट्र म्हणून राज्य करावयाचें ठरलें; क्रॉम्वेल यास संरक्षक नेमण्यांत येऊन राज्यांतील मुख्य अधिकार त्याच्या हातीं देण्यांत आला. घटनेंत पुढील नियम मुख्य होते. १ संरक्षक व त्याचें मंडळ यांचे हातीं सर्व कारभार असावयाचा व हे एकदां नेमले कीं, जन्मभर आपल्या कामास पात्र समजावयाचे. २ एक कॉमन्स सभेचीच बनलेली पार्लमेंट असावयाची. तीन वर्षांनीं एकदां तरी तिची बैठक झालीच पाहिजे व निवडणूक झाल्यापासून पांच महिन्यांच्या आंत ती बरखास्त करावयाची नाहीं. ३ तीस हजार खडी फौज ठेवावयाची. ४ सर्व कर पार्लमेंटनें बसवावे. ५ निवडणुकीच्या पद्धतींत सुधारणा करून कांहीं मोठमोठ्या शहरांना निवडणुकीचा हक्क नव्हता तो देण्यांत यावा. ६ रोमन क्याथॉलिक व आयरिश बंडांत सामील असलेले लोक ह्यांस मत देण्यासही कायमचे अपात्र ठरविण्यांत यावें. कर बसविणें व कायदे करणें या बाबतींत पार्लमेंटची हुकमत चालावी, असें जरी ठरविलें होतें तरी सरकारच्या चालू खर्चाची तजवीज कायमच्या उत्पन्नांतून करण्यांत आली होती; त्यामुळें देणग्या देण्याचें नाकारून सरकारास चीत करण्याचा पार्लमेंटास अधिकार राहिला नाहीं. शिवाय संरक्षक व त्याचें मंडळ यांस जादा कायदे करण्याचा अधिकार असून पार्लमेंट रद्द करीपर्यंत त्यांचा अंमल चालावा अशी व्यवस्था होती. या घटनापत्राबरहुकुम पहिली पार्लमेंट १६५४ च्या सप्तेंबरांत भरली. तिनें मुळीं ज्या घटनापत्रावरून तिला पाचारण केलें होतें तें घटनापत्र कायदेशीर का बेकायदेशीर हा मुद्दा काढून प्रथम चर्चा सुरू केली, आणि शेवटीं तें बेकायदेशीर ठरवून आपण एक नवें घटनापत्रक तयार करण्याचा घाट घातला! तेव्हां अर्थातच होईल तितकी त्वरा करून १६५५ च्या जानेवारींत क्रॉम्वेलनें ती बरखास्त करून टाकिली.

**५ दहा सुभेदार**—इतक्यांत देशांत राजपक्षाच्या लोकांनीं दंगे सुरू केले. सॅलिसबरी येथील दंगा मोठें सैन्य पाठवून मोडावा लागला.

नंतर क्रॉम्वेलनें देशाचे दहा भाग करून प्रत्येकावर एकएका मेजर जनरलास सुभेदार नेमलें. ही व्यवस्था राजपक्षीयांच्या कटांवरून करण्यांत आली असल्यामुळें सुभेदारास आपल्या प्रांतांतील राजपक्षीयांच्या उत्पन्नावर शेंकडा १० याप्रमाणें कर बसवून आपला खर्च भागविण्याची ताकीद देण्यांत आली. जेथें लोक शांत राहिले तेथें सरकारानें सवलतीचें धोरण स्वीकारलें, तरी राजकीय अगर धार्मिक वादविवादाकरितां सभा भरविण्याची बंदी करण्यांत आली देशांत कट व बंडाळी यांचा सुकाळ झाल्यामुळें सरकारास असें कडक धोरण स्वीकारणें भाग झालें. एरवीं धार्मिक बाबतींत प्रजेशीं उदार वर्तन करणेंच श्रेयस्कर होय, असें क्रॉम्वेलचें ठाम मत होतें. 'तुम्ही कोणत्याही धर्मपंथाचे असा, तुम्ही शांततेनें आपले हेतु पार पाडा म्हणजे तुम्हांस पूर्ण मोकळीक आहे, परंतु जर तुम्ही धर्माच्या नांवाखालीं रक्तपात व बंडाळी सुरू कराल तर तें मात्र शक्य नाहीं,' असें त्याचें म्हणणें होतें. इ. स. १२९० पासून इंग्लंडांतून हांकून दिलेल्या ज्यू लोकांना त्यानें लंडनांत राहण्याची परवानगी दिली, इतकेंच नव्हे तर त्यास एक धर्ममंदीर बांधण्याचीही मुभा दिली.

**६ परराष्ट्रीय धोरण**—जोरदार परराष्ट्रीय धोरण स्वीकारून क्रॉम्वेलनें इंग्लंडच्या नांवाचा दरारा एलिझबेथच्या काळाप्रमाणें युरोपवर बसविला. स्पेन रोमन क्याथॉलिक असल्यामुळें त्या देशाशीं कुरापत काढून ॲडमिरल पेन व व्हेनेबल्स यांची वेस्ट इंडीजकडे रवानगी करण्यांत आली. तेथें त्यांनीं जमेका हें महत्त्वाचें बेट हस्तगत केलें (१६५५). इंग्लंडांत गृहकलह चालू असतां टयूनिस व अल्जीर्स येथील चांच्यांनीं इंग्लंडच्या व्यापारी जहाजांस फार त्रास दिला होता. त्यांच्यावर ब्लेकची रवानगी झाली. त्यानें चांच्यांचा समाचार घेऊन परत येतांना अमेरिकेच्या किनाऱ्यावरून आलेलीं दहा लक्ष पौंड किंमतीच्या रुप्यानें लादलेलीं स्पेनचीं जहाजें लुटलीं व सर्व माल इंग्लंडांत आणिला (१६५७ एप्रिल). फ्रान्सचा मुख्य मंत्री मॅझरीन हा क्रॉम्वेलचें सख्य जोडण्यास

आतुर होता. आल्प्स पर्वताच्या लगत राहणाऱ्या प्रॉटेस्टंटांस उदारपणानें वागविण्याविषयीं त्याच्यापासून कबूल करून घेऊन मग क्रॉम्वेलनें त्याच्याशीं सख्य केलें. मग इंग्रज-फ्रेंचांच्या फौजा नेदर्लंडवर चालून गेल्या. स्पेनच्या ताब्यांतील डन्कर्क हा किल्ला काबीज करण्यांत येऊन तो इंग्रजांस मिळाला ( १६५८ ).

**७ १६५६ ची पार्लमेंट**—देशांत आपली अप्रियता वाढत होती तरी १६५६च्या सप्टेंबरांत क्रॉम्वेलनें पुन्हां एकवार पार्लमेंट सभा बोलाविली. ही मागील पार्लमेंटापेक्षां विशेष कार्यक्षम दिसून आल्यावरून 'सुभेदारांची राज्यपद्धति' बंद करून हिच्या संमतीनेंच तो राज्यकारभार चालवूं लागला. १६५७ सालीं क्रॉम्वेलचा जीव घेण्याचा एक भयंकर कट उघडकीस आला, तेव्हां पार्लमेंटनें अर्जरूपानें सुधारणेसंबधीं आपलें म्हणणें त्याला कळविलें. त्यांत लॉर्ड्स सभा स्थापावी, कायकारी मंडळाचेंच प्रिव्ही कौन्सिल बनवावें व क्रॉम्वेलनें स्वतःस राजा हा किताब घेऊन आपला वारस नेमावा, अशी विनंती केली होती. सैन्यास मान्य होणार नाहीं म्हणून क्रॉम्वेलनें त्यांपैकीं 'राजा' ही पदवी स्वीकारण्याचें नाकबूल केलें. तथापि पदवी वगळून राजाचे सर्व अधिकार त्याला देण्यांत आले. लॉर्ड बनविण्याचा, लॉर्डांची सभा स्थापन करण्याचा आणि आपल्या पश्चात् वारस निवडण्याचा देखील त्याला हक्क मिळाला. ह्या अधिकारांचा उपयोग करून त्यानें आपल्या सैन्यांतील बऱ्याच अधिकाऱ्यांना लॉर्ड बनविलें आणि आपला मुलगा रिचर्ड यास आपला वारस ठरविलें ( १६५७ मे ).

**८ क्रॉम्वेलचे शेवटचे दिवस**—या नव्या व्यवस्थेप्रमाणें १६५८च्या जानेवारींत पार्लमेंट भरली. परंतु कॉमन्स सभेला क्रॉम्वेलनें बनविलेले नवे लॉर्ड पसंत पडले नाहींत व लॉर्ड्स सभेच्या अधिकाराविषयीं तिनें वाद माजविला; तेव्हां निरुपाय होऊन क्रॉम्वेलनें पार्लमेंट बरखास्त केली आणि यापुढें एकट्यानेंच राज्यकारभार चालविण्याचा निश्चय केला. अशा रीतीनें लोकांच्या अनुमतीनें राज्य चालविण्याचे प्रयत्न व्यर्थ होऊन

उतार वयांत क्रॉम्वेलच्या अंगावर सर्वस्वीं राज्यभार पडला. अशांत उघड रीतीनें त्याच्या खुनास प्रोत्साहन देणारीं हस्तपत्रकें वाटलीं जाऊं लागलीं! जीव घेण्यासाठीं कट होऊं लागले. तेव्हां काळजीनें तो अगदीं खंगला. इतक्यांत आगष्ट महिन्यांत त्याची आवडती मुलगी वारली. तेव्हां संसारांतूनही त्याचें मन अगदीं उडालें, व १६५८ सप्टेंबर ३ रोजीं म्हणजे डन्बार व वूर्स्टर येथील मोठे विजय ज्या तारखेस मिळविले होते त्याच तारखेस तो मरण पावला.

९ **क्रॉम्वेलची निरपेक्षता**—आपल्या आयुष्याच्या शेवटल्या आठवड्यांत त्यानें जी प्रार्थना केली ती पुढीलप्रमाणें होती. "हे परमेश्वरा मी तुजकडे लवकरच येणार. लोककल्याण करण्यासाठीं तूं मला जन्मास घातलेंस. तें लोककल्याण व तुझी सेवा कितीही चुकीनें असली तरी यथामति मी केली आहे. परमेश्वरा, तूं माझें वाटेल तें केलेंस तरी हरकत नाहीं; पण या लोकांचें हित करण्यास तूं कधींही विसंबू नकोस" या क्रॉम्वेलच्या शेवटच्या वाक्यावरून त्याचें ध्येय काय होतें तें चांगलें व्यक्त होतें. क्रॉम्वेल दुटप्पी होता व प्रजासत्ताक स्थापन झाल्यावर तर तो आपला बडेजाव करून घेण्याच्या मागें लागला होता असा कित्येकजण त्याच्यावर आरोप करतात; परंतु वेळोवेळीं त्यानें पार्लमेंट सभा बोलाविण्याचे प्रयत्न केले आणि आपला जीव धोक्यांत पडत असतांही केवळ लष्करी जोरावरच अधिकार चालविला नाहीं यावरून हे आरोप कसे अस्थानीं आहेत हें सिद्ध होतें.

## पहिला भाग समाप्त.

## परिशिष्ट—१

# सनावली.

### १ इंग्लिश वृत्तें.

| | |
|---|---|
| ५५ खि. पू. | ज्यूलियस सीझरची स्वारी. |
| ४३– ४१० | रोमन अंमल. |
| ४४९ | अँग्लो सॅक्सन स्वाऱ्यांना सुरवात. |
| ६६७ | धर्मदृष्ट्या इंग्लंडचें एकीकरण. |
| ८२७ | वेसेक्सचा एग्बर्ट सबंध इंग्लंडचा राजा झाला. |
| ८७१– ९०१ | महात्मा आल्फ्रेडची कारकीर्द. |
| १०१३–१०४२ | डेन राजांचा अंमल. |
| १०६६ | हेस्टिंग्जची लढाई, नॉर्मन विजय. |
| १२१५ | मोठी सनद. |
| १२६५ | मॉंटफर्टची पार्लमेंट. |
| १२९५ | नमुनेदार पार्लमेंट. |
| १२९६–१३२८ | स्कॉटलंड जिंकण्याचा प्रयत्न. |
| १३१४ | बॅनॅकबर्नची लढाई. |
| १३३८–१४५३ | फ्रान्सशीं शतसांवत्सरिक युद्ध. |
| १३४६ | क्रेसीची लढाई. |
| १३५६ | पॉयटीयर्सची लढाई. |
| १३८१ | शेतकऱ्यांचा दंगा. |
| १४१५ | एजिंकूरची लढाई. |
| १४२९ | जोन ऑफ आर्कचा उदय, ऑर्लीन्सचा वेढा. |
| १४५३ | शतसांवत्सरिक युद्धाचा अंत, क्यालेशिवाय सर्व मुलूख हातचा गेला. |
| १४५५–१४८५ | गुलाबी झेंड्याचें युद्ध. |
| १४८५ | बॉस्वर्थची लढाई. |

१४८५–१६०३ ट्यूडर घराण्याचा अंमल.
१५३४ पोपची सत्ता इंग्लंडांत अमान्य झाली.
१५३६ इंग्लंड व वेल्स यांचा संयोग.
१५४९ इंग्लंडांत प्रॉटेस्टंट पंथास धरून प्रार्थनापुस्तक रचलें.
१५५७ फ्रान्सशीं युद्ध होऊन क्याले हातचें गेलें.
१५८८ अजिंक्य–आरमाराचा नाश.
१६०३–१७१४ स्टुअर्ट घराणें.
१६०३ इंग्लंड व स्कॉटलंड एका राजाच्या अंमलाखालीं आलीं.
१६२८ हक्क–संरक्षणाचा अर्ज.
१६०० ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना.
१६०७ व्हर्जिनिया–वसाहतीची स्थापना.
१६४२–१६४९ राजा व प्रजा यांजमध्यें युद्ध.
१६४५ नेस्बीची लढाई.
१६४९ पहिल्या चार्लसची फांशी.
१६४९–१६६० लोकसत्ताक राज्य.
१६५२–१६५४ पहिलें डच युद्ध.
१६५५ स्पेनपासून जमेका बेट घेतलें.
१६५३–१६५८ क्रॉम्वेल 'संरक्षक' म्हणून कारभार करतो.

## २ परकीय वृत्तें.

७३२ मुसलमानांचा टूर्स येथें पराभव करून चार्लस मार्टेल यानें त्यांस पिरिनीजच्या दक्षिणेस हांकून लाविलें.
८०० शार्लमेन याला पोपकडून रोम येथें पश्चिमेकडील बादशाही पदावर अभिषेक. ही बादशाही म्हणजे प्रसिद्ध पवित्र रोमन–साम्राज्य असून तिचा अंमल सर्व पश्चिम युरोपवर चालू होता. १८०६ त नेपोलियननें या पदाचा नाश केला.
१०९६ पहिलें धर्मयुद्ध.

१०९९ जेरुसलेम खिस्ती लोकांचे हातीं आलें. तेथें खिस्ती राज्याची स्थापना होऊन गॉडफ्रे हा पहिला राजा झाला.
११८७ सलाहुद्दीन यानें जरुसलेम खिस्त्यांपासून परत घेतलें.
१२४७ युरोपांत व्यापारासाठीं हंस-संघाची स्थापना.
१२७० सातव्या म्हणजे शेवटच्या धर्मयुद्धास आरंभ.
१३२० एक जर्मन मठवासी मार्टिन श्वार्झ यानें बंदुकीच्या दारूचा शोध युरोपांत लाविला. चीन व इतर पूर्वेकडील देश यांजमध्यें तिची अगोदर माहिती होती.
१३८९ ऑस्ट्रियाचा अंमल झुगारून स्वित्झरलंड स्वतंत्र झालें.
१३०९-१३७६ रोमचे पोप दुर्बल होऊन त्यांना फ्रेंच राजाच्या हुकमतीखालीं फ्रान्समध्यें ॲव्हिग्नॉन येथें रहावें लागलें.
१३७८-१४१५ एकदम दोन पोपांची निवड व धर्मसंस्थेंत दुफळी.
१४१५ सिजिस्मंड बादशहाच्या मदतीनें एक पोप कायम झाला व दुफळी मोडली.
१४१७ प्रशियाच्या राजघराण्याचा—होहेनझोलर्न—मूळ स्थापक नर्नबर्गचा सहावा फ्रेडरिक हा ब्रँडेनबर्गचा मारग्रेव्ह झाला. पुढें १५२५त या घराण्यांतील पुरुष ड्यूक झाले, १७०१ त त्यांना राजपद मिळालें, व १८७१ त हे प्रशियाचे राजे नवीन जर्मन साम्राज्याचे बादशहा बनले.
१४१८ जॉन हस या धर्मसुधारकास कॉन्स्टन्स येथें जाळलें.
१४५३ कॉन्स्टॅन्टिनोपल तुर्कांनीं घेतलें.
१४७७ बर्गंडीचा ड्यूक चार्लस दी बोल्ड याची मुलगी मेरी हिचें ऑस्ट्रियन राजपुत्र मॅक्झिमिलिअन याशीं लग्न होऊन नेदर्लंड्स (बेल्जम व हॉलंड) ऑस्ट्रियाच्या ताब्यांत गेलीं.
१४७९ ॲरॅगॉनचा फर्डिनंड व क्यास्टिलची इझाबेला यांचा (१४६९ त) विवाह झाल्यामुळें स्पेनमध्यें एक राज्य झालें.

१४८३ प्रसिद्ध धर्मसुधारक मार्टिन ल्यूथर याचा जन्म.

१४९२ अमेरिकेचा शोध.

१४९७ व्हास्को डी गामा केपला वळसा घालून हिंदुस्थानांत गेला.

१४९८ सॅव्होनॅरोला या धर्म–सुधारकास फ्लॉरेन्स येथें जिवंत जा-
[ ळिलें.

१४९९ अमेरिगो व्हेस्पुसी अमेरिकेच्या मुख्य भूमीवर उतरला.

१५१७ मार्टिन ल्यूथरनें धर्म–सुधारणेस सुरवात केली.

१५१९ बादशहा मॅक्झिमिलिअन वारला. व स्पेनचा राजा पहिला चार्लस हा पांचवा चार्लस ही पदवी घेऊन पवित्र रोमन बादशहा झाला. त्याच्या ताब्यांत आस्ट्रिया, नेपल्स, नेदर्लंड, स्पेन व स्पॅनिश अमेरिका इतकें विस्तीर्ण राज्य आलें.

१५२१ कॉर्टेझ या स्पॅनिश अंमलदारानें अमेरिकेंत मेक्सिको जिंकलें.

१५२५ पेव्हियाची लढाई.

१५२९ जॉन क्यालव्हिननें आपल्या धर्म-सुधारणांप्रतिपादनास फ्रान्सांत सुरुवात केली.

१५३३ पिझॅरोनें पेरु जिंकला. मेक्सिको व पेरू या दोन्ही देशांत सोन्याच्या खाणी असून तीं संपत्तीचीं आगरें होतीं.

१५४० इटलींतील मिलन प्रांत स्पेनचा राजा दुसरा फिलिप यानें जिंकला, १७१४ त तो स्पेनपासून ऑस्ट्रियास देण्यांत आला.

१५५५ ऑग्जबर्ग येथें तह होऊन प्रॉटेस्टंटांस क्याथॉलिकांकडून सवलती मिळाल्या.

१५५६ बादशहा पांचवा चार्लस याचा राज्यत्याग. बादशाही पदावर पहिला फार्डिनंड याची नेमणूक झाली व स्पेनच्या राजपदावर दुसऱ्या फिलिपची नेमणूक होऊन त्याजकडे नेपल्स व सिसिली देण्यांत आलीं.

१५६४ जेसूट पंथ पोपनें मान्य केला. तो १५३४ त स्पेन-मध्यें इग्नेशियस लॉयोला यानें स्थापिला होता.

१५७२ 'संट बार्थोलिमो-डे' ( २४ आगस्ट ) या दिवशीं ८०,००० ह्यूगेनॉटांची (फ्रेंच प्रॉटेस्टंट) कत्तल झाली.

१५७६ स्पेनचें जूं झुगारून हॉलंड स्वतंत्र झालें.

१५८२ पोप तेरावा ग्रेगरी यानें पंचांगांत सुधारणा केली व नवीन पद्धत सुरू झाली. इंग्लंडांत ही पद्धत १७५२ त स्वीकारण्यांत आली. रशियांत मात्र अजून जुनी पद्धत चालू आहे.

१५८४ हॉलंड स्वतंत्र करणाऱ्या वुइल्यम दी सायलेंटचा खून.

१५९८ फ्रान्सचा राजा चौथा हेन्री यानें नॅन्टीजचा जाहीरनामा ( Edict of Nantes ) काढून फ्रेंच प्रॉटेस्टंटांस कांहीं सवलती दिल्या.

१५८०–१६४० पोर्तुगाल स्पेनच्या ताब्यांत होता. १६४० त पोर्तुगीज लोकांनीं बंड केलें व ब्रॅगॅन्झाच्या ड्यूकला पोर्तुगालचा राजा केलें.

१६१८–१६४८ जर्मनींतिल प्रॉटेस्टंट व रोमन क्याथॉलिक यांजमधील त्रिंशद्वार्षिक युद्ध. वेस्टफॅलियाचा तह ( १६४८ ).

## परिशिष्ट—२

# वाचनीय पुस्तकें व उतारे.

### ब्रिटनवर स्वाऱ्या ख्रि. पू. ५५–इ. स. १०६६

Berick the Briton by Henty.
Dragon and Raven by Henty.
King Olaf's Kinsman by Whistler.
Harold by Lord Lytton.
Hereward the Wake by Kingsley.

Poems.

Boadicea by William Cowper.
Caractacus by Barton.
Alfred the Harper by J. Stirling.

### सरदारांचें प्राबल्य १०६६–१४८५.

The Talisman by Sir Walter Scott.
The Ivanhoe by Sir W. Scott (Retold for Boys & girls).
The Days of Bruce by Grace Aguilar ( ,, ,, ).
Crecy and Poictiers by Edgar ( ,, ,, ).
The Last of the Barons by Lytton ( ,, ,, ).
Runneymede and Lincoln Fair by Edgar.
A Clerk of Oxford by Green.
The White Company by Conan Doyle.
Sir Nigel by ,, ,, .
At Agincourt by Henty.
Agincourt by Charles.
The Black Arrow by R. L. Stevenson.
For the Red Rose by Henty.
The Chantry Priest of Barnet by Church.
Quentin Durward by Scott.
A March on London (A story of Wat Tyler) by Henty.

In Freedom's Cause ( A story of Wallace and Bruce )by Henty.
With The Black Prince by Strang and Stead.
In the New Forest by ,, ,, .
Lion Heart (The Reign of Richard I) by Strang & Stead.
Claud the Archer ( The Reign of Henry V ) by Strang & Aston.
Poem: Evesham by Palgrave.

अनियंत्रित राजसत्ता १४८५–१६०३.

Windsor Castle by Harrison Ainsworth.
Kenilworth by Scott ( Retold for boys & girls ).
The Tower of London ( A story of Lady Jane grey ) by Ainsworth ( Retold for boys & girls ).
The Abbot by Scott.
The Monastery by ,, .
Westward Ho by Kingsley.
Arcadia by Philip Sydney.
Drake and Cavendish (Blackie's Library of famous books ).
By England's Aid ( The Freeing of the Netherlands ) by Henty.
Famous Discoveries by Sea & Land 'Blackie's Library of Famous books.
Macaulay's Essay on Lord Burleigh.
Poem 'The Spanish Armada by Macaulay.
,, The Revenge by Tennyson.

राजा की पार्लमेंट १६०३–१६६०.

Guy Fawkes by Harrison Ainsworth.
The Fortunes of Nigel by Scott ( Retold for Boys & girls ).
With the King at Oxford by Church.

A Legend of Montrose by Scott.
Woodstock by Scott.
One of Ruperts Horse ( Reign of Charles 1 ) by Strang.
Macaulay's Essays ( Milton, Hampden).
Poem: The Landing of the Pilgrim Fathers by Mrs. Hemans.